# भास कवीच्या नाटककथा.

सं. नाटक - ३७
प्रं. ९६.

मराठी ग्रंथ संग्रहालय
सं. नि. नं.
ना. १५५२६

नारायण आपटे.

आर्यभूषण प्रेस, पुणें.

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ७४२८

किंमत १२ आणे.

१९१७

230
५१२५

पुणें येथें **आर्यभूषण** छापखान्यांत **अनंत विनायक पटवर्धन** यांनीं छापिलें
व
**हरि नारायण आपटे** यांनीं पुणें येथें प्रसिद्ध केलें.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. ........
ता. ........
ठाणे.

# चि. कुमारी शकुंतला परांजपे.

“ गेल्या त्या चिमण्या उडोनि पहिल्या गोष्टींतल्या सर्वथा,
सांगा गोष्ट नवी मला लवकरी सोडीन मी मा अतां !”
या शब्दीं मज एक मित्रदुहिता घाली सदा बंधनीं,
घेतों मी सुटका करूनि भरुनी ही एकदां खंडणी !

# अनुक्रमणिका.

—:o:—


| विषय. | | | | | पृष्ठें. |
|---|---|---|---|---|---|
| उपोद्घात. | ... | ... | ... | ... | १–८ |
| प्रतिज्ञायौगंधरायण.... | | ... | ... | ... | १ |
| स्वप्नवासवदत्त. | ... | ... | ... | ... | १२ |
| अविमारक. | ... | ... | ... | ... | २० |
| चारुदत्त. | .... | ... | ... | .... | २७ |
| मध्यमव्यायोग. | ... | ... | ... | ... | ४० |
| पंचरात्र. | ... | ... | ... | ... | ४४ |
| दूतवाक्य. | ... | ... | ... | ... | ४८ |
| दूतघटोत्कच. | .... | ... | ... | ... | ५४ |
| कर्णभार. | .... | ... | ... | ... | ५८ |
| ऊरुभंग. | ... | ... | ... | ... | ६२ |
| प्रतिमा. | ... | ... | ... | | ६८ |
| अभिषेक. | ... | ... | ... | ... | ८८ |
| बालचरित. | ... | ... | ... | .... | १०३ |

# उपोद्घात.

आजपर्यंत ज्यांचें नांव मात्र कालिदासानें आणि इतर प्राचीन कवींनीं उल्लेखिलेलें आढळत होतें, परंतु ज्यांचे ग्रंथ मुळींच उपलब्ध नव्हते, अशा प्राचीन संस्कृत ग्रंथकारांपैकीं **भास** या नांवाचा कवि होता. सुदैवानें पांच सहा वर्षांपूर्वीं या कवीचीं तेरा नाटकें उपलब्ध होऊन आतां सर्व छापून प्रसिद्धही झालीं आहेत. या कवीच्या या नाटकांचा लाभ झाला त्याची गोष्ट अशी:—

**त्रावणकोर** संस्थानचे महाराज यांनीं आपल्या संस्थानच्या खर्चानें संस्कृत ग्रंथांचा संग्रह करून त्यांतील उपयुक्त तेवढे प्रसिद्ध करण्याचें काम चालविलें आहे. **त्रिवेंद्रम् संस्कृत ग्रंथावलि** नांवाची ग्रंथमालिका त्यांचे उदार आश्रयानें प्रसिद्धही होत असते. या मालेच्या प्रसिद्धीच्या व ग्रंथसंग्रह करण्याच्या कामावर **पंडित त्रिवेंद्रम् गणपतिशास्त्री** या नांवाच्या विद्वान् आचार्यांची योजना केलेली आहे. शास्त्रीबोआ ग्रंथांचा शोध लावण्यासाठीं वारंवार देशसंचार करीत असतात. त्याप्रमाणें इ. स. १९१० सालीं ते दक्षिण त्रावणकोर प्रांतीं प्रवास करीत असतां त्यांना ताडपत्रावर लिहिलेलें एक फार जुनें पुस्तक **पद्मनाभपुरा**जवळ असलेल्या **मनलिक्कर मठांत** सांपडलें. या पुस्तकांत कांहीं नाटकें लिहिलेलीं आढळलीं. ह्या पुस्तकाचीं पत्रें १०५ असून प्रत्येक पृष्ठावर सुमारें दोन ग्रंथांची ( ६४ अक्षरांची ) एक ओळ, याप्रमाणें दहा दहा ओळी आहेत. ग्रंथ प्राचीन **मल्याळ** लिपींत लिहिलेला आहे. शास्त्रीबोआंच्या मतें पुस्तक सुमारें ३००वर्षांचें जुनें आहे. तथापि पहिलीं बारा पत्रें खेरीज करून कोठें एकही अक्षर उडालेलें किंवा बुजलेलें नाहीं. पुस्तक वाचून पाहतां त्यांतील शब्दसौष्ठवावरून, रचनेंत प्रसाद दिसला त्यावरून व इतर काव्यगुणांची अगदीं परिपूर्तता पाहून हा ग्रंथ पूर्वकाळच्या ऋषींपैकीं अगर सुप्रसिद्ध कवींपैकीं कोणाचा तरी असावा असें त्यांच्या मनानें घेतलें. नीट तपास करून पहातां त्यांस त्या पोथींत खालीं दिलेलीं दहा रूपकें आढळलीं.

१ स्वप्नवासवदत्त.
२ प्रतिज्ञायौगन्धरायण.
३ पंचरात्र.
४ चारुदत्त.
५ दूतघटोत्कच.
६ अविमारक.
७ बालचरित.
८ मध्यमव्यायोग.
९ कर्णभार.
१० ऊरुभंग.

हीं सर्व पुरीं असून पुढें दुसरें एक प्रारंभाचें अर्धें पान सुमार लिहिलेलें असें रूपक होतें. तें दूतवाक्य. त्याची पुरी प्रत शास्त्रीबोआंस पुढें मिळाली. नंतर दुसऱ्या फेरीच्या प्रसंगीं **कदुतरुहुत्ती**जवळ **कैलासपूर** नांवाच्या गांवचे ज्योतिषी **पंडित गोविंद पिशरोदि** यांचे संग्रहांत तशाच प्रकारचें आणखी एक पुस्तक त्यांस सांपडलें. त्यांत नवीं दोन नाटकें

दिसलीं. एकाचें नांव **अभिषेक नाटक** व दुसऱ्याचें **प्रतिमा नाटक.** नंतर अधिक शोधाअंतीं असेंही आढळून आलें कीं, महाराजांच्या वाड्यांतील ग्रंथ-संग्रहांत या दोन नाटकांची एक प्रत आहे. याप्रकारें प्राचीन मल्याळम् लिपींत ताडपत्रावर सुमारें ३००।४०० वर्षांच्यापूर्वीं लिहिलेलीं आणि अत्यंत सुंदर अशीं तेरा नाटकें उपलब्ध झालीं. या नाटकांपैकीं एकाचें नांव मात्र ग्रंथांतरीं उल्लेखिलेलें आढळलें होतें, परंतु बाकीच्या बारांपैकीं कोणच्याही नाटकाचें नांवसुद्धां कोठें उल्लेखिलेलें आढळत नव्हतें. मग प्रत्यक्ष दर्शन कोठलें ?

हीं नाटकें उपलब्ध झाल्यानंतर अर्थातच तीं कोण्या कवीचीं असावीं याच्या शोधास शास्त्रीबोवा लागले. तेरांपैकीं कोणत्याही नाटकांत प्रारंभीं किंवा अंतीं कोठेंच कवीच्या नांवाचा उल्लेख केलेला नाहीं. अर्थात् आतां अंतःस्थ किंवा बाह्य प्रमाणांवरून अनुमानानें कवीच्या नांवाचा शोध लावणें भाग होतें. त्या दृष्टीनें पुस्तकाचें वाचन चाललें असतां प्रथम दृष्टोत्पत्तीस येणारा या नाटकांतील विशेष हा कीं, या प्रत्येकांत नाटकाचा प्रारंभ **नान्द्यन्ते ततः प्रविशति सूत्रधारः** अशा शब्दांनीं केलेला आहे. नांदी झाल्यानंतर सूत्रधार प्रवेश करतो. यावरून अर्थातच या कवीच्या काळीं प्रथम नांदी झाल्यानंतर सूत्रधार प्रवेश करून मग प्रारंभींचा मंगलश्लोक त्यानें ह्मणावयाचा असा प्रघात असावा.

कालिदासादिकांचीं जीं नाटकें प्रसिद्ध आहेत त्यांत नांदीचा श्लोक प्रथम म्हणून नंतर सूत्रधार बोलूं लागावयाचा असा क्रम आहे. प्रस्तुत तेरा नाटकांत कसा प्रारंभ आहे त्याचा मासला वाचकांस कळण्याकरितां एका नाटकाचा प्रारंभ देतों.

*नान्द्यन्ते ततः प्रविशति सूत्रधारः ।

**सूत्रधारः**—

शंखक्षीरवपुः पुरा कृतयुगे
नाम्ना तु नारायणः
त्रेतायां त्रिपदार्पितत्रिभुवनो
विष्णुः सुवर्णप्रभः ।
दूर्वाश्यामनिभः स रावणवधे
रामो युगे द्वापरे
नित्यं योऽञ्जनसन्निभः कलियुगे
वः पातु दामोदरः ॥

एवमार्यमिश्रान् विज्ञापयामि । अये किन्नु खलु मयि विज्ञापनव्यग्रे शब्द इव श्रूयते । अङ्ग पश्यामि ।

(नेपथ्ये) अहं गगनसञ्चारी ।

**सूत्रधारः**—भवतु विज्ञातम् ।

पतत्यसौ पुष्पमयी च वृष्टि-
र्नदन्ति तूर्याणि च देवतानाम् ।
द्रष्टुं हरिं वृष्णिकुले प्रसूत-
मभ्यागतो नारद एष तूर्णम् ॥

(निष्क्रान्तः)

* नांदी झाल्यावर मग सूत्रधार प्रवेश करतो.

**सूत्रधारः**—जो शंख व दुग्ध यांप्रमाणें गौर असें शरीर धारण करून कृतयुगांत नारायण नांवानें अवतरला; पुढें सुवर्णाप्रमाणें कांति धारण करून तीनही भुवनांवर एक एक पाऊल टाकून त्या भुवनांचें आक्रमण करून विष्णुरूप झाला; द्वापर युगांत दूर्वाप्रमाणें श्यामलवर्ण होऊन रावणवधार्थ राम झाला व कलियुगांत काजळासारखी सतेज कांति धारण करून जो अवतरला, तो दामोदर तुम्हां सर्वांचें नित्य रक्षण करो.

आर्यमिश्रांस मी आतां अशी विज्ञापना करतों कीं—अरे पण मी ही विज्ञापना करण्यांत गुंतलों असतां कोणाचा बरें शब्द ऐकूं येतो आहे? पाहूं या.

(पडद्यांत)

मी आकाशांत संचार करणारा.............

**सूत्रधारः**-ठीक आहे, समजलें. वृष्णिकुलांत श्रीहरीनें आतांच जन्म घेतला आहे, त्यामुळें आकाशांतून ही पुष्पवृष्टि होत आहे. देवादिक नानाप्रकारचीं वाद्यें वाजवीत आहेत आणि भगवान् नारद ऋषि त्या श्रीहरीचें दर्शन घेण्यासाठीं झपाट्यानें पृथ्वीतलावर येत आहे.

(जातो.)

हा प्रारंभ बालचरित नांवाच्या नाटकाचा आहे. याच प्रकारचे सर्व नाटकांचे प्रारंभ आहेत. इतकेंच नव्हे तर

एवमार्यमिश्रान् विज्ञापयामि। अये किन्नु खलु मयि विज्ञापनव्यग्रे शब्द इव श्रूयते। अङ्ग पश्यामि।

हीं वाक्यें, मंगलाचरणाचा श्लोक झाल्याबरोबर सूत्रधाराच्या तोंडीं प्रत्येक नाटकांत आहेत.

या सर्व प्रस्तावनेला 'प्रस्तावना' असें नांव नसून 'स्थापना' असें जुनें नांव बहुतेक नाटकांत आहे.

ज्याप्रमाणें प्रारंभीं त्याचप्रमाणें शेवटीं भरतवाक्यही एकाच तऱ्हेचें आहे. बहुतेक नाटकांत

इमां सागरपर्यन्तां हिमवद्विन्ध्यकुण्डलाम्।
महीमेकातपत्राङ्कां राजसिंहः प्रशास्तु नः॥*

किंवा

भवन्त्वरजसो गावः परचक्रं प्रशाम्यतु।
इमामपि महीं कृत्स्नां राजसिंहः प्रशास्तु नः॥†

शब्दसादृश्य, वाक्यरचनासादृश्य, अर्थसादृश्य आणि क्वचित् पद्यांचें ऐक्य हीं फार आढळतात. तेव्हां हीं सर्व नाटकें एकाच कवीच्या कृति होत याबद्दल शंकासुद्धां मनांत राहत नाहीं.

* सागरांपर्यंत विस्तारलेल्या व हिमालय आणि विंध्य या पर्वतांस कुंडलांप्रमाणें धारण करणाऱ्या या पृथ्वीचें साम्राज्य एकछत्री अधिकारानें (सार्वभौम म्हणून) राजसिंह आमच्यासाठीं चालवो.

† गोधनाची समृद्धि होवो, परचक्र नष्ट होवो व आमचेसाठीं या सर्व पृथ्वीवर राजसिंह राज्य चालवो.

परंतु हीं नाटकें कोणत्या कवीचीं हा प्रश्न राहिलाच. कोणत्याही नाटकांत प्रारंभीं स्थापनेंत किंवा अंतीं भरतवाक्याचे प्रसंगीं कोठेंही कवीचें नांव नमूद केलेलें नाहीं. अर्थात् अन्यमार्गानें प्रमाणें शोधून काढूनच कवीचें नांव मिळविण्याचा प्रयत्न करणें प्राप्त झालें. त्याहीसंबंधानें पंडित गणपतिशास्त्री यांनीं शोध करून अगदीं निःशंकपणें असें सिद्ध केलें आहे कीं, ज्या भास कवीच्या नांवाचा उल्लेख अनेक संस्कृत कवींनीं केला आहे, त्याच्याच या कृति होत. हे त्यांनीं शोधून काढलेले संस्कृत कवींनीं केलेले उल्लेख असे आहेत.

इ. स. ११५९ सालीं हयात असलेल्या **सर्वानंदां**च्या अमरकोशटीकासर्वस्व ग्रंथांत या नाटकांपैकीं **स्वप्नवासवदत्त** नाटकाचा उल्लेख आहे

**ध्वन्यालोक** नांवाच्या अलंकार ग्रंथाचा कर्ता **आनंदवर्धन** हा इ. स. च्या नवव्या शतकांत झाला. त्याच्या ग्रंथांत **वामन** नांवाच्या ग्रंथकाराचा निर्देश आहे. त्या **वामना**च्या अलंकारग्रंथांत वरील नाटकांपैकीं **स्वप्नवासवदत्त** नाटकांतले व **चारुदत्त** नाटकांतले श्लोक उदाहरणें म्हणून घेतलेले आहेत. अर्थात् ह्या नाटकाचा कर्ता त्या **वामना**च्या पूर्वीं म्हणजे इ. सनाच्या नवव्या शतकाच्या पूर्वीं झाला असला पाहिजे हें उघड झालें. **दण्डी** हा कवि इ. सनाच्या सहाव्या शतकांत झाला असें धरतात. त्याच्या अलंकारग्रंथांत या नाटकांतील श्लोक अलंकारांचीं उदाहरणें म्हणून दिले आहेत! अर्थात् हा कवि **दंडी**च्या पूर्वीं झाला असला पाहिजे.

**बाणभट्टा**नेंही या कवीवर एक सुंदर श्लोक लिहिला आहे तो असा—

सूत्रधारकृतारम्भैर्नाटकैर्बहुभूमिकैः ।
सपताकैर्यशो लेभे भासो देवकुलैरिव ॥ *

त्याचप्रमाणें **राजशेखराच्या सूक्तिमुक्तावलींत** या कवीच्या नाटकांपैकीं स्वप्नवासवदत्त या नाटकाचें नांव असून यानें अनेक नाटकें लिहिलीं असा उल्लेख आहे.

भासनाटकचक्रेऽपि च्छेकैः क्षिप्ते परीक्षितुम् ।
स्वप्नवासवदत्तस्य दाहकोऽभून्न पावकः ॥

**कालिदासाच्या मालविकाग्निमित्र** नाटकांत या कवीच्या नांवाचा स्पष्ट उल्लेख आहे तो असाः—

प्रथितयशसां भासकविसौमिल्लकविमिश्रादीनां प्रबंधानतिक्रम्य वर्तमानकवेः कालिदासस्य क्रियायां कथं परिषदो बहुमानः । ‡

कालिदासाच्या पूर्वी **भामहाचार्य** झाले. त्यांच्या ग्रंथांत व त्यांच्यापूर्वी **चाणक्य** ऊर्फ कौटिल्य म्हणून अर्थशास्त्रकार झाला. त्याच्या ग्रंथांत या कवीच्या कृतींचा उल्लेख आहे. कौटिल्याच्या अर्थशास्त्रांत या कवीच्या प्रतिज्ञायौगन्धरायण नाटकांतील एक श्लोक उतरून घेतला आहे. **कौटिल्य** ऊर्फ **चाणक्य** हा **अशोकाचा** आजा जो महाराजा **चंद्रगुप्त** त्याच्या वेळीं होता. अर्थात् या नाटकांचा कर्ता **भास** हा इ. सनापूर्वी ३२५ वर्षांच्या पूर्वी एकाददुसऱ्या शतकांत झाला असावा असें विधान करण्यास मुळींच हरकत नाहीं. त्याच्या पूर्वींच्या ग्रंथांतून उल्लेख सांपडल्यास याच्याही पलीकडच्या काळांत तो जाईल हें उघड आहे. कालिदासाच्या वेळीं त्याची कीर्ति जिकडे तिकडे पसरली होती व त्यास प्राचीन कवि समजत; तेव्हां तो पुष्कळच जुना असला पाहिजे.

येथपर्यंत या नवीन सांपडलेल्या तेरा नाटकांचा कर्ता कोण व तो केव्हां झाला हें निश्चित करण्यासाठीं आपल्याला सामान्यतः जीं प्रमाणें उपलब्ध आहेत त्यांजविषयीं झालें. आपण अनुमानें काढलीं तीं अशीं:—

१ या नाटकांचा कर्ता आजपर्यंत केवळ नांवानेंच माहिती असलेला **भासकवि** हा होय, व २ तो इ.स. पूर्वी ३२५ पासून ४२५ च्या दरम्यान झाला असावा. **कालिदास** कवि इ. स. पूर्वी १०० पासून ३०० पर्यंत झाला असावा अशी समजूत कित्येकांची आहे, ती जर खरी असेल तर भास अर्थात् त्याच्या पूर्वी शें दोनशें वर्षे झाला असला पाहिजे. कारण कालिदासानें त्याला प्राचीन कवि म्हणून त्याचा उल्लेख केला आहे. पुष्कळशा संस्कृत कवींच्या काळासंबंधानें अशीं अनुमानें काढूनच स्वस्थ बसावें लागतें. तसेंच या कवीच्याही बाबतींत स्वस्थ बसण्या-

---

* ज्यांचा आरंभ सूत्रधार करितो, ज्यांत भूमिका फार, जीं पताकायुक्त अशीं नाटकें—जणूं काय देवालयेंच—रचून भास कवीनें कीर्ति मिळविली.

या श्लोकांत सूत्रधार, भूमिका व पताका या तीन शब्दांवर श्लेष आहे. नाटकासंबंधानें सूत्रधार या शब्दाचा अर्थ उघड आहे. भूमिका=पात्रें, पताका हा एक अलंकारप्रकार आहे. देवालयाच्या संबंधानें सूत्रधार=मंदिरें बांधणारा कारागीर. भूमिका=जागा. पताका=ध्वज. श्रीमान् व उदार लोक ज्याप्रमाणें मंदिरें बांधणाऱ्या कारागिराकडून आरंभलेलीं, ज्यांत विस्तीर्ण भूमि आहे अशीं, जीं ध्वज-तोरणांनीं शोभिवंत केलीं आहेत अशीं देवालयें बांधून कीर्ति मिळवितात त्याप्रमाणें भासकवीनें सूत्रधाराकडून आरंभ करविलेलीं, पुष्कळ पात्रें ज्यांत आहेत अशीं व पताकास्थानादि अलंकारांनीं युक्त नाटकें रचून कीर्ति मिळविली.

हें भासकृत नाटकांचें वर्णन अगदीं योग्य आहे.

† भासकवीच्या नाटकचक्राची—संग्रहाची अग्निदिव्यानें परीक्षा करून पहाण्यासाठीं धूर्त लोकांनीं तीं सारीं नाटकें अग्नींत टाकलीं, परंतु त्यांतील **स्वप्नवासवदत्त** नाटकाला पावकही दाहक झाला नाहीं!

‡ ज्याची कीर्ति सर्वत्र पसरली आहे अशा भास व सौमिल्ल कविश्रेष्ठांचीं नाटकें टाकून सांप्रतचा कवि कालिदास, याच्या नाटकावर या सभेचें मन कसें गेलें?

खेरीज दुसरा मार्ग नाहीं. या अनुमानांनीं ज्यांची खात्री होत नाहीं असेही कित्येक विद्वान् गृहस्थ आहेत. त्यांचें म्हणणें हीं **भासाचीं** नाटकें नव्हेत, हीं कोणातरी भासक्या भुसक्या कवीनें चार चांगल्या चांगल्या कवींच्या कल्पना व उतारे चोरून व त्यांत आपल्या पदरच्या भिकार कल्पना व गचाळ अशुद्धें घालून लहान मोठीं संभाषणें बनविलीं आहेत ! असें म्हणण्यास ते पंडित प्रमाणें दाखवितात तीं अशीं:—

१. या कवीचें व्याकरणज्ञान अगदींच तुटपुंजें. पाणिनीच्या व्याकरणाच्या दृष्टीनें अशुद्ध प्रयोग फार. जे शब्द अमरादि कोशांतही सांपडत नाहींत असे शब्द त्याच्या नाटकांत आहेत.

२. नाट्यशास्त्राच्या नियमांसही या नाटकांत झुगारून दिलें आहे.

३. यांत रचनाचातुर्य नाहीं, रसपरिपोष नाहीं.

४. याच्या नाटकांतील म्हणून जीं पद्यें इतर ग्रंथकारांनीं उदाहरणादाखल घेतलीं आहेत तीं या प्रसिद्ध झालेल्या नाटकांतून आढळत नाहींत.

यावर उत्तरें देतां येतात तीं अशीं:—

१. पाणिनीय व्याकरणशास्त्र अस्तित्वांत येण्याच्या पूर्वींचा हा कवि असल्याकारणानें पाणिनीच्या नियमांनीं तो बांधला गेला नाहीं. त्याच्या काळीं संस्कृत भाषा ज्या व्याकरणपद्धतीनें बद्ध असेल तीप्रमाणें त्याचे प्रयोग असतील. तेवढ्यानें ते अशुद्ध म्हणतां येणार नाहींत. बरें यदाकदाचित् त्यानें अशुद्धरूपें योजिलीं असलीं व अपप्रयोग केले असले तरी तेवढ्यानें काय होतें ? शेक्सपिअरचें व्याकरणज्ञान काय होतें ? परंतु त्याच्या काव्यांपासून लाभणाऱ्या आनंदाकरितां त्याचें व्याकरणाचें अज्ञान लोक सहन करीत आले आहेत. "निरंकुशाः कवयः" शिवाय पाणिनीनें केलेले नियम पाणिनीनें स्वतःही आपल्या सूत्रांत उल्लंघिल्याचीं उदाहरणें आहेत, मग त्याला न मानणाऱ्या कवीनें निरंकुशत्वानें किंवा त्याच्या काळच्या लोकभाषेंत तसे नियम नसल्यामुळें ते उल्लंघिले असले तर त्यांत नवल काय ?

२. भरताचें सध्यां प्रचलित असलेलें नाट्यशास्त्र होण्याच्या पूर्वीं भास झाला, तो भरताचे नाट्यनियम कसे पाळणार ? भरताचें म्हणून जें नाट्यशास्त्र मिळतें त्यांत भासाच्या नाटकांवरूनच कांहीं नियम करून घातलेले असण्याचा संभव आहे. आणि यदाकदाचित् तें नाट्यशास्त्र पूर्वीं अस्तित्वांत असलें, तरी कांहीं नियम भासानें उल्लंघिले आहेत, तें योग्यच केलें आहे, असें आमचें मत आहे. रंगभूमीवर मृत्यु होऊं नये, हा तशापैकींच एक नियम. दुर्योधनाचा व दशरथाचा मृत्यु भासानें रंगभूमीवर दाखविले आहेत,त्यामुळें आमच्या दृष्टीनें करुणरसाची पुष्टिच झाली आहे, हानि झाली नाहीं. तेव्हां याही आक्षेपांत कांहींच अर्थ नाहीं.

३. तिसरा आक्षेप केवळ पूर्वग्रहामुळें उद्भवलेला दिसतो. आजपर्यंत कालिदासभवभूतींसारख्या साफसफाईची भाषा व ठाकठिकीचे अलंकार योजणाऱ्या कवींना या नव्या ओबडधोबड भाषा लिहिणाऱ्या परंतु प्रतिभासंपन्न कवीनें मागें सारलें म्हणण्याचें ज्यांच्या जिवावर येतें अशा पंडितांचे हे आक्षेप आहेत. संविधानकांत रचनाचातुर्य आहे हें जाणणें हातचें कंकण पाहण्याइतकें सोपें आहे. तीं संविधानकें प्रत्येक वाचकापुढें ठेविलीं आहेत. आमच्या मतें या नाटकांतून रचनाचातुर्य फार आहे, रसपरिपोषही फार सुंदर आहे. कालिदासादिकांनीं याच्या

कल्पना घेतल्या आहेत हें आतां मुळींच वादग्रस्त नाहीं. तें निकालांत लागलेलें प्रकरण आहे. आणि या कवीच्या श्रेष्ठपणाबद्दल हा कालिदासाचा पुरावाच पुरे आहे.

४. भासाचीं म्हणून पद्यें कोण्या ग्रंथकारांनीं उद्धृत करून घेतलीं आहेत तीं सध्यां उपलब्ध झालेल्या नाटकांत नाहींत, यावरून येवढेंच सिद्ध होईल कीं, भासाचीं एक तर आणखी कांहीं नाटकें असलीं पाहिजेत, किंवा उद्धृत करून घेणारांच्या स्मृतिदोषामुळें त्यांनीं तीं भासाचीं म्हणून उल्लेखिलीं असावीं. अशा स्मृतिदोषामुळें भलत्याच कवीचे श्लोक भलत्याच कवीच्या नांवावर सुभाषितसंग्रहांतून व इतर ग्रंथांतून दिल्याचीं उदाहरणें आहेत.

ज्याचे उल्लेख प्राचीन ग्रंथांतून आहेत त्या भासाचीं हीं नाटकें नसून हा केवळ आभास आहे असें ज्यांस वाटत आहे, त्यांना आमचें म्हणणें एवढेंच आहे कीं, प्रस्तुत नाटकें भासाचींच असा पक्ष धरणाऱ्या गृहस्थांचें म्हणणें जरी यदाकदाचित् चुकलें असें ठरलें आणि हीं दुसऱ्या कोण्या कवीचीं आहेत असेंही ठरलें, तरी त्यांचें महत्त्व, त्यांचें सौंदर्य हीं कांहीं कमी होत नाहींत. शेक्सपिअरनें नांवाविषयीं ह्मटलें आहे तेंच खरें.

What's in a name? that
which we call a rose
By any other name would
smell as sweet
Romeo & Juliet 2. 2. 43.

नांवांत काय आहे ?
म्हणतों ज्याला गुलाब तीं सुमनें ।
अपुल्या गोड सुगंधा
देतिल नित्यचि दुज्याहि नांवानें ॥

आमच्या दृष्टीनें भासकवीच्या अंगचे गुण या नाटकांवरून दिसतात ते असे:

१. शीघ्रकवित्व. हा कवि कोण्या तरी एका अगर अनेक राजांच्या पदरीं त्यांच्या आश्रयाला असलेल्या नाटकमंडळींचा नाट्याचार्य असावा; किंवा याची स्वतंत्र कुशीलव मंडळी असण्याचाही संभव आहे. आपली मंडळी घेऊन तो या दरबारांतून दुसऱ्या दरबारांत जात असल्याचाही संभव आहे. त्यानें आपल्या आश्रयदात्या राजाचें नांव कोठेंही घेतलें नाहीं. परंतु जास्त संभवनीय हेंच कीं, तो कोण्यातरी राजाचा आश्रित नाट्याचार्य असावा; कोणताही उत्सवप्रसंग आला कीं, राजाची आज्ञा नवीन नाटक करण्यासाठीं व्हावयाची, त्याप्रमाणें भासानें नाटक तयार करून आपल्या मंडळीकडून त्याचा प्रयोग करवून प्रसंग साजरा करावयाचा. असा एकंदर प्रकार असल्यामुळेंच त्याच्याकडून लहान लहान नाटकें तयार झालीं. अशा प्रकारचे नाट्याचार्य आश्रय देऊन ठेवावयाचे आणि आश्रित नटमंडळीकडून उत्सवप्रसंगीं नाटकप्रयोग करून पहावयाचे अशी रीति होती हें अभिषेक नाटकांत स्पष्ट दिसतेंच आहे. या दृष्टीनें विचार करितां उद्यां **भासा**चीं आणखी दहावीस नाटकें सांपडलीं तर निदान मला नवल वाटणार नाहीं. यासंबंधांत फ्रेंच नाटककार मोलिएटरचें व भासाचें फार साम्य आहे.

२. भासाला नटविद्या फार चांगल्या प्रकारें अवगत असली पाहिजे हें त्याच्या नाटकांतील व्यवस्थेवरून स्पष्ट होतें.

३. त्याचीं संविधानकें फार चतुरपणानें बसविलेलीं असतात.

४. त्याचें सृष्टिनिरीक्षण व व्यवहारनिरीक्षण फारच अलौकिक होतें. मनुष्यस्वभावाचें खरें ज्ञान त्याला होतें.

५ त्याचीं पात्रें खरोखरीचीं मनुष्यें आहेत. त्यांचे अंगीं अतिशयोक्तीनें आणलेली धीरोदात्तता किंवा दुष्टता कोठेंही सांपडणार नाहीं. तीं करणीनें अगदीं प्रमाणांत छानून छिनून गुळगुळीत केलेल्या संगमरवरी पुतळ्यांप्रमाणें थंडगार नाहींत; किंवा चित्रपटावर कुंचलीनें नानाप्रकारच्या रंगांनीं निर्माण केलेल्या, कोणचा तरी एकच विकार, एकच विचार, एकच परिस्थिति मुग्धपणें दाखविणाऱ्या चित्रांप्रमाणें त्यांच्या अंगीं एकांगीपणाही नाहीं. त्यांचीं पात्रें, जिवंत--हाडांमासांची, ज्यांच्या अंगांत उष्ण रक्त खेळतें आहे अशीं, लोभमोहकामक्रोधादि विकारांच्या मानवी मिश्रणांनीं बनलेलीं मनुष्येंच आहेत. नितांत व एकांत दुष्ट किंवा सुष्टपणा जगांत नाहीं, तसा याच्या पात्रांतही नाहीं. आणि याचें कारण हेंच कीं त्यानें जगांत भेटणारीं मानवी पात्रें निर्मिलीं आहेत. देवांचे अवतार जरी चित्रिले आहेत तरी ते मानव देहांतले अवतार आहेत, हें तो विसरला नाहीं. देवावतार म्हणून अशक्य अशीं उदारतेचीं किंवा उदात्ततेचीं कल्पनाचित्रें त्यानें उठवून दिलीं नाहींत; किंवा असुरदैत्यावतार म्हणून अशक्य अशा दुष्टतेचीं व नीचतेचींहि कल्पनाचित्रें उभीं केलीं नाहींत. या माझ्या म्हणण्याचा प्रत्यय सर्व नाटकांतून वाचकांस येणारा आहे. श्रीराम, सीता, लक्ष्मण, श्रीकृष्ण, भीम, दुर्योधन, रावण, बिभीषण, सुग्रीव, मारुती, भरत, कैकेयी, यौगंधरायण, वासवदत्ता, पद्मावती कोणचेंहि दैवी किंवा मानवी पात्र घ्या तें हालतें बोलतें, रागावतें रुसतें, हंसतें खेळतें असें मनुष्य आहे.

६. त्याच्या पात्रांचा स्वभावविकास फार व्यवस्थित व तो विकास दाखविण्याकरितां त्यानें योजिलेले प्रसंग फारच चातुर्याचे आहेत. स्वप्नवासवदत्त, प्रतिज्ञायौगंधरायण, अविमारक, अभिषेक, प्रतिमा, चारुदत्त या मोठ्या नाटकांतून या विधानांची सत्यता कोणासहि पटेल.

७. नाटकाचें खरें हृद्य व त्याच्या चांगलेपणाची खरी कसोटी त्यांतील गद्य भागांत असते. ज्या नाटकांत संभाषणें लहान लहान, प्रसंगाला उचित, विनोदपूर्ण, मार्मिक आणि मनोहर तें नाटक खरें काव्य. ‘ गद्यं कवीनां निकषं वदन्ति ’ ही कसोटी भासनाटकांना विन दिक्कत लावावी. तीं बावनकशीच उतरणार यांत शंका नाहीं.

८. त्याचा विनोद मोठा मार्मिक. त्याच्या विनोदांत, वर्णनांत, शृंगारांत अश्लीलपणाचा गंधही नाहीं. भरताच्या नाट्यशास्त्रांत सांगितल्याप्रमाणें नाटकें अशीं असावीं कीं कोण्याही गृहस्थानें आपली पत्नी, आपले मुलगे, मुली, सुना, चाकरनौकर, इत्यादिकांना घेऊन खुशाल आनंदानें पहाण्याऐकण्याला अणुमात्र संकोच वाटूं नये. भासाचीं नाटकें सर्वथैव अशीं आहेत. त्यांत अश्लील शब्द नाहींत इतकेंच नव्हे, तर स्त्रियांच्या विनयाला ज्यांच्या योगानें कसेंसेंच वाटेल अशा सूचना मनांत उभ्या रहाण्याजोगेही शब्द नाहींत.

९. सारांश **नाट्यकलेच्या दृष्टीनें** भास हा कवि आजपर्यंत आपणांस ज्ञात झालेल्या नाटकप्रणेत्या कवींत श्रेष्ठ आहे असें माझें मत झालें आहे. शेक्सपिअरच्या नाट्यकलेच्या छटा त्याच्या कृतींत मात्र पुष्कळ दिसतात. विविध मानवी स्वभाव त्यानें उत्तम रेखले आहेत. मनोविकारांचें पृथक्करण त्याच्या इतकें इतर कवींत नाहीं. सुभाषितांचें वैपुल्य तर अवर्णनीयच आहे. त्याची भाषा फार सोपी आहे. सुंदर आहे. मात्र ठाकठिकीची नाहीं, पण तेवढ्यानें त्याचें कवित्व

व नाट्यकला हीं कांहीं कमी योग्यतेचीं ठरत नाहींत. कालिदासाचा न्याय त्यांना लागू पडतोः

सरसिजमनुविद्धं शैवलेनापि रम्यं
मलिनमपि हिमांशोर्लक्ष्म लक्ष्मीं तनोति ।
इयमधिकमनोज्ञा वल्कलेनापि तन्वी
किमिव हि मधुराणां मंडनं नाकृतीनाम्॥*

**कालिदासा**च्याच दृष्टांतानें बोलूं म्हटलें तर **कालिदासा**ची कविता ही उद्यानलतेसारखी व **भासा**ची वनलतेसारखी होय.आणि म्हणूनच कालिदासाच्या शब्दांनीं आम्ही म्हणतोंः दूरीकृताः खलु गुणैरुद्यानलतावनलताभिः ! । †

हीं नाटकें १९१२ सालीं प्रसिद्ध झालीं आणि लागलींच मीं वाचलीं. एकदोन वेळ वाचनें झाल्याबरोबर यांतील अलौकिक सौंदर्यानें माझें मन वेधून जाऊन त्यांचा लाभ माझ्या संस्कृत न जाणणाऱ्या लहान मोठ्या मित्रांना यावा असें वाटून त्यांचीं यथामति सारें काढून करमणुकींत देण्यास सुरुवात केली. आणि आतां स्वतंत्र पुस्तकरूपानें प्रसिद्ध करीत आहें. यांचा आस्वाद वाचकांस अत्यंत आल्हादकारक होईल याबद्दल मला संशय नाहीं. शेवटल्या कित्येक नाटकांचीं सारें जितक्या विस्तृतपणें दिलीं आहेत तितक्या विस्तृतपणें पहिल्या दोनचार नाटकांचीं दिलीं गेलीं नाहींत. दुसऱ्या आवृत्तीच्या वेळीं ही उणीव दूर करितां येईल.

या पुस्तकाचीं प्रुफें वाचण्याचे कामीं माझे मित्र कविवर्य एकनाथपंत रेंदाळकर यांनीं मला फार साहाय्य केलें, त्यांचे आभार मानावे तेवढे थोडे आहेत.

आनंदाश्रम-पुणें,
ता. १३ सप्टेंबर १९१७.

**हरि नारायण आपटे.**

*** या कथा प्रथम करमणुकींत दिल्या तेव्हां "**भासकवींचीं नाटकें**" या मथळ्याखालीं दिल्या व त्याच मथळ्याखालीं प्रस्तुत पुस्तकांतही छापल्या; परंतु त्या मथळ्यामुळें यांत समग्र नाटकें भाषांतर रूपानें दिलीं आहेत असा वाचकांचा गैरसमज होऊं नये ह्मणून पुस्तकाच्या मुखपृष्ठावर **भासकवींच्या नाटककथा** हें नांव दिलें आहे.

---

* शैवालें जरि वेष्टिलें कमल तें वाटे किती सुंदर
चंद्राचा हि कलंक वाढित सदा कांतींत त्याच्या भर ।
ही नेसे जरि वल्कलें तरि किती रम्यासुतन्वी दिसे
नोहे भूषण काय त्यां? मधुरता ज्यांच्या स्वरूपीं वसे॥

† स्वभावसुंदर अशा गुणांनीं विपिनलतांनीं कैसें ।
क्रीडोद्यानामधिल लतांना दूर सारिलें खासें॥

# भास कवींचीं नाटकें.

## प्रतिज्ञायौगंधरायण.

### मंगल.

पातु वासदत्तायो महासेनोऽतिवीर्यवान् ।
वत्सराजस्तु नाम्ना सशक्तिर्यौगन्धरायणः ॥

हा या नाटकाचा मंगलाचरणाचा श्लोक. या श्लोकांत मंगलाचरण असून नाटकांतील मुख्य मुख्य चार पात्रांचीं नांवें आणलीं आहेत. वास्तविक त्या नांवांचा व श्लोकांतील अर्थाचा कांहीं तादृश संबंध नाहीं. परंतु भरताच्या नाट्यशास्त्राला अनुसरून या मंगलाचरणांत नाटकांतील मुख्य पात्रांचा नामनिर्देश करून दिला आहे. या श्लोकाचा अर्थ असा आहे:—

इंद्राला यज्ञयागादिकांत मंगलकारक असें साहाय्य ज्यानें दिलें, जो महासेन म्हणजे ज्याची सेना मोठी आहे असा, जो अति वीर्यवान्, जो शक्तियुक्त व योगसामर्थ्यवान् तो वत्सराज कार्तिकस्वामी तुमचें रक्षण करो. यांत नायिका वासवदत्ता, तिचा पिता महासेन (प्रद्योत), नायक वत्सराज व त्याचा मंत्री यौगन्धरायण यांचीं नांवें योजून दिलीं आहेत. अर्थमात्र कार्तिकस्वामीकडे लावला आहे. अशी रचना करणें हा एक अलंकारच आहे. आणि त्याला **मुद्रालंकार** नांव आहे.

अशी नाट्यशास्त्राला अनुसरून कवीनें योजना केली आहे खरी, परंतु विशेष ध्यानांत घेण्याजोगी मौज ही आहे कीं, नाटकांत नायक वत्सराज आणि नायिका वासवदत्ता हीं पात्रें मुळींच नाहींत. त्यांचा केवळ नामनिर्देश आहे. कोणी एखाद्यानें मुख्य गोष्ट वर्जून् बाकीचेंच आडंबर घातलें म्हणजे त्यानें हॅम्लेटशिवाय हॅम्लेट नाटक केलें असें इंग्रजींत विनोदानें म्हणतात. तशांतलाच प्रकार प्रस्तुत नाटकाचा झाला आहे! यांत मंगलाचरणांत जशीं नायक-नायिकांचीं म्हणजे वत्सराज आणि वासवदत्ता यांचीं नांवें मात्र आहेत, परंतु श्लोकाच्या अर्थाशीं त्याचा कांहीं संबंध नाहीं, तशीच स्थिति नाटकासंबंधांतही आहे. या नाटकांत त्या दोघांच्या नांवांचा मात्र उल्लेख आहे. परंतु तीं दोन्ही पात्रें प्रत्यक्ष रंगभूमीवर मुळींच आणलेलीं नाहींत. हा जो या नाटकांतला विशेष तो वाचकांच्या लक्षांत यावा म्हणूनच कवीनें मंगलाचरणांत मुद्रालंकार योजिला असावा. या मंगलाचरणांत आणखीही एक खुबी आहे ती ही कीं, यांत मोठ्या खुबीनें किंबहुना जवळजवळ स्पष्टपणें असें ह्मटलें आहे कीं, "नाम्ना-तु वत्सराजः" परंतु "सशक्तिर्यौगन्धरायणः" वत्सराजाचें नांव मात्र परंतु खरा सामर्थ्यवान् (अर्थातच वत्सराजानें अधिकार दिला ह्मणून) यौगन्धरायणच या नाटकांत दिसून येतो! आणि तेंच खरें आहे. कसें तें संविधानकावरून दिसेल. परंतु तें सांगण्यास प्रारंभ करण्यापूर्वीं

सूत्रधारानें नाटकाचा प्रस्ताव कसा केला आहे तो पहाण्याजोगा आहे.

**सूत्रधारः**–(इकडे तिकडे हिंडून पडद्याकडे पाहून) आर्ये, इकडे ये बरं!

(येऊन)

**नटीः**– आर्य, ही मी आलें

**सूत्रधारः**– कांहीं तरी एखादी चीज गा. तुझ्या गायनानें ही श्रोते मंडळी प्रसन्न झाली कीं, आपण नाटकाला आरंभ करूं. आर्ये, विचार काय चालला आहे? गाईनास ती?

**नटीः**– आर्या, मला स्वप्न पडलं त्यांत आपल्या नात्याच्या मंडळींविषयीं कांहीं अशुभ प्रकार पाहिला. तेव्हां त्यांचा कुशल-समाचार आणायला आधीं कोणी तरी आपण माणूस पाठवावा अशी माझी इच्छा आहे.

**सूत्रधारः**– ठीक आहे.

अस्मत्कार्य कराया
योग्य अशा पाठवीं नरा मी या।

(पडद्यांत)

सालका! तयार झालास का?

**सूत्रधारः**–

यौगंधरायण जसा
पाठवि नर राजवृत्त आणाया॥

(जातात.)

या रीतीनें नाटकाच्या प्रारंभींच्या प्रवेशाची प्रस्तावना सूत्रधारानें केली आहे.

आतां या नाटकाचें संविधानक पाहूं.

आपल्या राज्यासभोंवतालीं असणाऱ्या राज्यांत काय काय चाललें आहे हें पाहण्यासाठीं यौगंधरायण नेहमीं मोठा दक्ष असे. कारण, आपला राजा वत्सदेशाधिपति उदयनमहाराज याचें वैभव पाहून, त्याचा मत्सर करणारे अनेक राजे आहेत असें त्यास पक्केपणें माहिती होतें. तेव्हां न जाणों कोण्या वेळीं कोणत्या राजाच्या मनांत काय येईल आणि केव्हां आपलें सैन्य घेऊन आपल्या राज्यावर तो स्वारी करील असें त्याच्या मनांत येणें अगदीं स्वाभाविक होय. या चिंतेमुळें त्यानें आपले हेर चोहोंकडे पाठविले होते.

अवंति नगरीचा राजा प्रद्योत यास वासवदत्ता नांवाची एक अत्यंत रूपवती व गुणवती कन्या होती. ही कन्या कोणाला द्यावी याबद्दल राजा प्रद्योत व राणी अंगारवती यांस फार चिंता वाटत असे. वत्स देशाच्या राजा उदयनाखेरीज आपल्या कन्येला अनुरूप असा वरच कोठेंही त्याच्या नजरेस येईना. वासवदत्तेच्या रूपगुणांची कीर्ति ऐकून भरतखंडांतील बहुतेक राजांकडून त्यांचे दूत येऊन वासवदत्तेस मागण्या घातल्या गेल्या. परंतु राजानें त्यांपैकीं एकही वर निश्चित केला नाहीं. त्याच्या मनास कोणी येईनाच; आणि वत्सराज आपल्यास जांवई मिळावा अशी उत्कट इच्छा, पण वत्सराजाकडून मागणीच आली नाहीं। तेव्हां काय करावें? अशा विवंचनेंत राजा प्रद्योत असतां त्याला एक युक्ति सुचली. त्यानें असें मनांत आणलें कीं, उदयनास पकडून आणून त्याच्या मनांत आपल्या मुलीविषयीं प्रेमोद्भव होईल असें करावें, म्हणजे उदयन आपण होऊन वासवदत्तेला मागणी घालून वरील.

राजा प्रद्योतास ही युक्ति सुचली खरी. परंतु उदयनावर उघडपणें स्वारी करून जाण्याचें धैर्य त्यास होईना. तसें धैर्य होणें शक्यच नव्हतें. कां कीं, उदयन स्वतः अतिशय शूर, त्याचा अमात्य फार चतुर,

सं. ७१२९-३८



त्याचा सेनापति मोठा वीर, आणि त्याची सेना मोठी प्रचंड. इतक्या सगळ्या गोष्टी जेथें अनुकूल तेथें शत्रूचें काय चालणार? प्रद्योताला अर्थातच प्रत्यक्ष लढाई करून उदयनाला बंदिवान् करून आणण्याचें अशक्य दिसत होतें. प्रत्यक्ष लढाई नाहीं, तर आतां कांहीं तरी हिकमत करावयाची असा त्यानें बेत केला. हा त्याचा बेत सिद्धीस जाण्यास उदयनाच्या अंगीं असलेला एका बाबतींतला अभिमान हाच कारण झाला.

उदयनराजाला असा अभिमान असे कीं, हत्तीची खरी परीक्षा आपल्यालाच समजते आणि हत्तीला वठणीस आणून अंकित करून घेण्याची खरी विद्याही आपल्यालाच पूर्णपणे येते. असा अभिमान असल्यामुळे कोठेंही नवा रानटी हत्ती आला आहे, असें त्याला कर्णोपकर्णीं कळलें पुरे, कीं राजानें त्या हत्तीची शिकार करून त्यास धरून आणण्याची हांव धरलीच. ही राजाच्या स्वभावाची गोम प्रद्योत ऊर्फ महासेन यास ठाउक असल्यामुळें त्या माहितीचा उपयोग करून घेऊन राजाला बंदिवान् करून आपल्या नगरींत आणावयाचा असा त्यानें निश्चय केला.

त्यानें एक लांकडाचा कृत्रिम हत्ती तयार करविला. त्याला दारें खिडक्या ठेविल्या. आंत सशस्त्र असे रणशूर शिपाई बसविले आणि तो उदयनाच्या हद्दींतील नागवनांत नेऊन ठेवविला. हत्ती पण हत्ती तयार केला होता. असा कीं, माणसें तर काय परंतु हत्तीसुद्धां त्याच्याजवळ उभे राहिले तरी फसतील! असा हत्ती तयार करून तो त्या नागवनांत ठेविल्यानंतर ती बातमी उदयनराजाच्या कानीं जाईल अशी प्रद्योतानें तजवीज करविली. राजाचा स्वभाव हत्तीच्या कामांत फारच उतावळा होता. आणि त्यांत त्यावेळीं कर्मधर्मसंयोगानें राजा त्या नागवनाच्या अलीकडेच एका वनांत विहार करण्याकरितां गेला होता. मग काय विचारतां? बरोबर असणाऱ्या शिपाईप्याद्यांना किंवा सेनापतीलासुद्धां न विचारतां स्वारी सुमारें वीस शिपाई बरोबर घेऊन एकटीच तो नागवनांत आलेला नवा हत्ती गांठून त्याची शिकार करण्याला निघून गेली.

उदयनराजाचा अमात्य यौगन्धरायण हा फारच चतुर आणि मोठा कार्यकर्ता. आपल्या तर काय परंतु आपल्या सभोंवतालच्या सर्व राज्यांतून कोठें काय चाललें आहे, याची बित्तंबातमी काढण्यासाठीं त्याचे हेर सगळ्या भरतखंडभर पसरलेले होते. त्या हेरांपैकीं एकानें येऊन प्रद्योत राजाच्या ह्या दगलबाजीची बातमी यौगंधरायणास अगदीं बरोबर दिली होती. इतकेंच झालें कीं राजा वनविहार करण्याला राजधानींतून निघून गेला, आणखी मग ही बातमी त्याला लागली. तथापि दुसरे दिवशीं नागवनाला जाण्याचा त्याचा बेत होता हें याला माहिती असल्यामुळें त्यानें तावडतोब माणूस पाठवून राजाला सावध करावयाचें असा विचार केला व सालक नांवाच्या आपल्या एका विश्वासू सेवकाला राजाकडे जाण्यासाठीं तयारी करण्याला सांगितलें. या नाटकाच्या प्रस्तावनेंत सूत्रधार नटीच्या विनंतीवरून आप्तेष्टांच्या कुशलसमाचाराकरितां एक माणूस पाठवण्याचा विचार करून

अस्मत्कार्य कराया
योग्य अशा पाठवीं नरा मी या।

असें म्हणत असतां पडद्यांतून "सालका, तयार झालास का?" असे जे त्यास शब्द ऐकूं येतात, ते योगंधरायणानें राजाकडे पाठविण्यासाठीं तयार हो म्हणून आज्ञापिलेल्या पुरुषालाच संबोधून होते, आणि त्या

त्याच्या शब्दांमुळेंच यौगंधरायणाच्या दूत पाठविण्याशीं आपल्या दूत पाठविण्याचें साम्य दाखवून सूत्रधारानें यौगंधरायणाचा प्रवेश

यौगंधरायण जसा
पाठवि नर राजवृत्त आणाया ।

या आर्याधनें सुचवून आपण रंगभूमीवरून निघून जाण्याची योजना केली आहे. ही प्रवेशसूचना आणि शाकुंतलांतील प्रस्तावनेंतील प्रवेशसूचना वाचकांनीं तोलून पहावी.

यौगंधरायणानें दूत पाठवून राजाला सावध करण्याची योजना केली. हा दूत यौगंधरायणाच्या विश्वासांतला व मोठ्या आस्थेनें काम करणारा होता. यौगंधरायणानें त्याला हांका मारतांच हा पहा मी अगदीं सिद्धच आहें म्हणून तो पुढें आला. " तुला बराच लांब रस्ता काटायचा आहे " असें यौगंधरायणानें म्हणतांच "आपल्या ठिकाणीं माझी फार भक्ति म्हणून तर आपली सेवा करतों. " असें सालकानें उत्तर दिलें. तें ऐकतांच यौगंधरायणानें आनंदोद्गार काढला. " ओ हो ! हा जाणार, काम फत्ते करणार, याचा आमचा हेतु एक आहे.

ज्यांच्या मानसिं पूर्ण भक्ति, अथवा
जे सद्गुणां चाहती
कार्यें दुष्कर सोंपवाविं चतुरें
ऐशाच लोकांप्रती ।
जे विघ्ना निजशक्तिचा करिति ते
दैवाप्रमाणें कधीं
कार्याची तड लाविती कधिं परी
सोडोनि देती मधीं ॥ "

असें आपल्याशींच बोलून यौगंधरायणानें दूतास म्हटलें, " वेणुवनापासून तीन रानें ओलांडून नागवनांत उद्यां सकाळींच महाराज जाणार, त्याच्या आंत तूं त्यांना गांठलें पाहिजेस. "

दूतानें म्हटलें:—आर्यांकडून पत्र हातीं पडण्याचा काय तो अवकाश आहे.

यौगंधरायणानें पत्र लिहून त्याच्याजवळ दिलें आणि आतां त्याला जा असें सांगणार इतक्यांत राजाच्या नित्य परिवारांतील हंसक नांवाचा एक राजसेवक आल्याची वर्दी प्रतिहारीनें यौगंधरायणाला सांगितली. ती ऐकतांच त्यानें सालकास थोडें थांबावयास सांगून हंसकास आपल्याकडे आणण्याची आज्ञा केली.

हंसक हा राजाच्या शुश्रूषेंत अहोरात्र असणारा सेवक. तो कधींही राजापासून दूर व्हावयाचा नाहीं. असें असतां तो एकटाच आला आहे हें ऐकतांच यौगंधरायणाच्या मनांत काळजी व भीति उत्पन्न झाली. हंसकाला घेऊन ये म्हणून आज्ञा केल्याबरोबर प्रतीहारी त्यास आणण्यास जातांच यौगंधरायणाचें मन आतां आपल्याला काय ऐकावयास सांपडतें आहे कोणास कळे असें वाटून भय पावलें. कोठें तरी दूर देशीं गेलेल्या माणसास स्वदेशीं आपला अमुक अत्यंत प्रियजन अत्यवस्थ आहे असें कळावें आणि तो स्वदेशीं येऊन आपल्या घराजवळ जातांच त्याला आंत गेल्यावर आपल्याला चांगली बातमी कळते आहे कीं वाईट कळते आहे कोण जाणे! असें वाटून जसें त्याचें मन आशा आणि भीति यांच्या धारेंत सांपडतें तशीच यौगंधरायणाची या वेळीं स्थिति झाली होती.†

† **यौगंधरायणः**-महाराजांपासून कधींही दूर न होणारा हंसक एकटाच आला आहे असें ऐकून माझें मन फारच चिंतामग्न झालें आहे.

गेहीं दुर्गदपीडित प्रियजन टाकोनि देशांतरीं
कार्यासाठीं करी प्रवास परि जो
मागें फिरे सत्वरीं ।
माझी त्या पुरुषासमानचि पहा
साशंक चित्तास्थिती ।
इष्टानिष्ट कळेल काय न कळे
वार्ता मला संप्रति ॥

हंसक आला मात्र, यौगंधरायणानें त्याला "हंसका, महाराज अजून नागवनाला गेले नाहींत ना?" असें विचारलें, आणि हंसकानें त्यांस 'महाराज कालच गेले' असें सांगतांच 'आपण आंतां माणूस पाठविणें केवळ व्यर्थ' असें यौगंधरायणास दिसून आलें. 'आम्ही फसलों, आमचा घात झाला' असे उद्गार त्यानें काढले आणि हंसकास पुनः विचारलें:—"कायरे, कांहीं आशा बाळगायला जागा आहे कीं आजच प्राण सोडावे?"

हंसकानें उत्तर दिलें:—"महाराजांच्या शरीरास कांहींएक अपाय नाहीं, मात्र ..."

हंसक, महाराज शत्रूच्या हातांत सांपडून त्यांनीं त्यांना बंदिवान करून नेल्याची दुःखद वार्ता सांगावयालाच आला होता. आपला स्वामी शत्रूच्या तावडींत सांपडून त्यांनीं त्याला पकडून नेलें याबद्दल यौगंधरायणास फार दुःख झालें, उद्वेग चढला आणि त्याच्या तोंडून सहजच उद्गार निघाले ते असे:—"आजपासून वत्सराजाच्या मंत्रिमंडळाची दुर्बलता आणखी अपकीर्ति हीं जगांत महशूर झालीं. या वेळीं तो अनुत्पन्नकार्यपंडित (कार्य उभें राहिलें नाहीं तोंपर्यंत तें असें करूं तसें करूं अशा बढाया मारणारा) रुमण्वान् कोणीकडे गेला होता? सारे घोडेस्वार कोठें गेले होते?"

हंसकानें त्यावर म्हटलें, "सव फौजफांटा बरोबर असून लढाई करून तींत पराभव झाल्यामुळें जर महाराज धरले गेले असते, तर दोष काढायला जागा नव्हती. परंतु तसें झालें नाहीं. काल मोठ्या सकाळीं उठून नर्मदा ओलांडून महाराज हत्तींचा कळप जेथें होता तथ जाण्यास निवडक सैन्यासह निघाले. हत्तीचा कळप भेटला त्याला आम्हीं सर्वांनीं वेढा घातला. इतक्यांत एक पायदळ शिपाई त्या ठिकाणीं आला."

तें ऐकून यौगंधरायण त्यास मध्येंच ह्मणाला:—"आणि त्यानें महाराजांस सांगितलें कीं, येथून एक कोसाच्या अंतरावर एकजात नील वर्णाचा असा एक हत्ती आला आहे. त्याचीं नखें, दांत तेवढीं निळीं नाहींत. त्याच्या अंगावर मल्लिका लतेच्या आणि साल वृक्षाच्या डहाळ्या पसरून तो अगदीं झाकून गेला आहे. असेंच ना?"

यौगंधरायणानें त्या पायदळ शिपायाचे नेमके शब्द सांगतांच हंसकाला फार आश्चर्य वाटलें व तो त्यास म्हणाला—"तर मग आर्यांना सगळें ठाऊक होतें! जागृति असून हा दुष्ट प्रसंग ओढवला!"

**यौगंधरायणः**— बाबारे, जागृत बसणाऱ्यांपेक्षांही काळ मोठा बलवान् असतो! बरें मग पुढें?

**हंसकः**— ती त्या पायदळ शिपायानें सांगितलेली बातमी ऐकतांच महाराजांनीं त्या दुष्टाला शंभर सोन्याचीं नाणीं बक्षीस देऊन त्याचा सन्मान केला आणि म्हटलें:

'हस्तिशिक्षा नांवाच्या ग्रंथांत अशा हत्तीचा उल्लेख आहे. त्याचा वर्ण नीलकमलाप्रमाणें असतो व तो चक्रवर्ती हस्ती मानला जातो. तर आतां तुम्ही सारे सावध राहून या कळपावर नजर ठेवा. मी एकटा माझी वीणा घेऊन जाऊन तिच्या वादनानें भुलवून भुलवून त्याला वश करून घेऊन येतों.'

हें महाराजांचें भाषण ऐकून अमात्य रुमण्वानांनीं त्यांना आपण एकटेंच जाण्याचें साहस मुळींच करूं नये असें फार फार विनवण्या करून सांगितलें. परंतु महाराजांनीं त्यांचें मुळींच ऐकलें नाहीं. 'तुम्हीं कोणीं इथून हलतां काम

नये, मला कोणी खात नाहीं. तुम्ही तेथें येऊन गडबड केली तर त्या हत्तीला वश करून आणण्याला मला अडचणच पडेल.' असें ह्मणून ते तेथून तो हत्ती जिथें आहे असें कळलें होतें तिकडे निघून गेले. मोठ्या कष्टानें फक्त वीस जणांना आपल्याबरोबर येण्याबद्दल त्यांनीं परवानगी दिली होती, त्यांत मी होतों. महाराज आपल्या नीलबलाहक नांवाच्या हत्तीवरून उतरून सुंदरपाटल नांवाच्या घोड्यावर आरूढ झाले होते. त्यांच्या हातीं ती वीणा मात्र होती.

याप्रमाणें जणूं काय आमच्या व त्यांच्या दुर्दैवानेंच त्यांना त्या दिशेला ओढून नेल्यामुळें आम्ही अगदीं हताश झालों व त्यांच्या मागें चाललों होतों. सुमारें कोसभर गेलों इतक्यांत एका साल वृक्षाच्या छायेखालीं तो हत्ती दिसला. त्याचे पांढरे दांत मात्र पुढें आलेले दिसत होते. बाकी शरीराचा नीलवर्ण त्या वृक्षाच्या सावलींत लुप्त झाल्यामुळें जणूं काय तेथें नुसते दांतच आहेत असें भासे. इतक्यांत मागें कांहीं गडबड झाली. ही गडबड कशामुळें आहे हें पहाण्यासाठीं आम्ही मागें वळतों तों महाराज आपली वीणा घेऊन खालीं उतरले आणि त्या हत्तीजवळ जातात, तों त्या कपटहत्तींतून एकदम किती तरी सैन्य बाहेर पडलें. हें सारें प्रद्योताचें कपट असें महाराजांच्या तेव्हांच लक्ष्यांत आलें व तसें त्यांनीं मोठ्यानें ओरडून आम्हांस सांगून आपण एकटे वीणा ठेवून खड्ग उपसून शत्रूच्या सैन्याची संख्या किती वगैरे कांहीं मनांत न आणतां त्या सैन्यांत घुसले. त्यांनीं त्यावेळीं फारच विलक्षण पराक्रम केला. किती नरवीर मारले, परंतु काय उपयोग ? शेवटीं ते अतोनात थकले आणि तशांत भयंकर ऊन लागलें. यामुळें एकाएकी मूर्च्छा येऊन पडले. ही संधि पहातांच दुष्ट शत्रूंनीं आसपासच्या झाडांवरील वेली तोडून त्यांच्या कठिण अशा रज्जूंनीं त्यांना बद्ध केलें."

आपल्या स्वामीला शत्रूंनीं एखाद्या साध्या माणसाप्रमाणें वेलींच्या दोरांनीं बांधलें हें ऐकतांच यौगंधरायणाच्या मनाला फार उद्वेग झाला आणि त्यानें ह्मटलें:—"काय, महाराजांच्या ज्या बाहूंनीं विप्रांची पूजा केली, मित्रांस आलिंगनें दिलीं व शत्रूंस जेरीस आणलें, त्या बाहूंना वेलींच्या कर्कश रज्जूंनीं त्या दुष्टांनीं बांधलें अं: ? बरें पण महाराज शुद्धीवर केव्हां आले ? "

हंसक त्यावर ह्मणतो:—"थोड्या वेळानें महाराज शुद्धीवर आले, तेव्हां शत्रूचे लोक 'यांनीं माझा बाप मारला,' 'यांनीं माझ्या चुलत्याचें शिर उडविलें' असल्या तऱ्हेनें आक्रोश करीत अप्रत्यक्ष रीतीनें महाराजांच्या पराक्रमाचें वर्णन करीत त्यांच्या अंगावर वसावसा येऊं लागले. एकानें तर इतका अत्याचार केला कीं, त्यांच्या केशांस हात घालून त्यांच्यावर तलवार उपसली, परंतु तितक्यांत त्या रक्तानें माखलेल्या भूमीवर त्या दुष्टाचा पाय निसरून तो पडला व मारला गेला. पुढें चमत्कार असा झाला कीं, महाराजांनीं पहिल्या सपाट्यास प्रहार करून मूर्च्छित पाडलेला प्रद्योताचा अमात्य शालंकायन शुद्धीवर येऊन "हां, हां, थांबा, असला अत्याचार करूं नका," म्हणून आपल्या लोकांचा निषेध करीत त्या जागीं आला व महाराजांस प्रणाम करून त्यानें त्यांचे बंध सोडले."

इतकी हकीकत ऐकतांच यौगंधरायणाच्या जीवांत जीव आल्याप्रमाणें झालें आणि त्यानें "शाबास, शालंकायना शाबास, प्रसंगीं शत्रूही मित्र बनतात. बरें, पुढें त्या महात्म्यानें काय केलें ? " असे उद्गार काढले.

**हंसकः**—मग त्यानें महाराजांना फार जखमा लागल्यामुळें त्यांना पडूनच जाण्याजोगें वाहन तयार करून त्यांस उज्जयिनीस नेलें.

हंसकानें याप्रमाणें हकीकत सांगितल्यावर योगंधरायण कांहीं वेळ अगदीं स्वस्थ बसला. इतक्यांत उदयन राजाच्या आईकडून महाराजांना पाठविण्याकरितां म्हणून कांहीं मंगलालंकार आला. तो पहाण्याबरोबर यौगंधरायणास विशेषच वाईट वाटलें आणि आतां झालेली हकीकत त्या वृद्ध मातेच्या कानावर कशी घालावी याची त्याला मोठी चिंता पडली. तथापि हकीकत लपवून ठेवण्यांत कांहींच लाभ नाहीं हें जाणून त्यानें राजमातेकडून तो अलंकार घेऊन येणाऱ्या दूतीला म्हटलें " विजये, तूं आपलें नांव सार्थ कर. मी सांगतों तें कार्य उत्कृष्टपणें पार पाड. महाराज पकडले गेले ही बातमी राजमातेला कळव, परंतु ती एकदम मात्र सांगूं नको. कारण, आईचें हृदय फार कोंवळें असतें. त्याला जपलें पाहिजे. तेव्हां त्यांच्याजवळ गोष्ट काढशील ती अशा प्रकारें काढ.

युद्धप्रसंगिं न कळे कधिं काय होतें
प्रस्ताव हा करुनि दाखव संशयातें ।
होतां विषण्ण मन यापरिच्याच बोलें
सांगोनि दे हळुच संकट जें उदेलें ॥"

याप्रमाणें राजमातेला निरोप पाठविल्यानंतर त्यानें पुनः हंसकाला विचारलें, " तूं महाराजांच्याबरोबर असावयाचें तो तूं इकडे कसा आलास ? "

हंसकानें लागलींच त्याला सांगितलें: " महाराजांनीं स्वतःच मला सांगितलें कीं, तूं आपल्या राजधानीला जा आणि यौगंधरायणाला भेट. "

तें ऐकतांच यौगंधरायणाला आनंद व अभिमान वाटून त्यानें त्याला पुनः विचारलें, "काय म्हणतोस ? सगळ्या बाकीच्या सचिवांचें नांव न घेतां यौगंधरायणाला भेट म्हणून सांगितलें ? "

आणि हंसकानें " होय सांगितलें, तसेंच सांगितलें." असें उत्तर दिल्याबरोबर तो हंसकास म्हणाला: " इतक्या विश्वासाला खरोखर मी कांहीं पात्र नाहीं. आजपर्यंत माझ्या हातून तशी कांहीं सेवा घडली नाहीं. असें असून महाराजांचा जर इतका विश्वास माझ्यावर आहे, तर मी एक निराळाच पुरुष आतां महाराजांस दिसेन. ते शत्रूच्या राजधानींत असोत, त्याच्या कारागृहांत असोत, रानांत असोत. माझी निष्ठा त्यांच्या ठिकाणीं सारखीच असणार. आणि त्यांना फसवून बंदींत घालणाऱ्या व आपण जिंकलें असें समजणाऱ्या नृपाला मी फसवून महाराजांचें राज्य पुनः महाराजांस मिळवून देईन. मला आतां महाराज पहातील ते त्यांना पुनः राज्य मिळवून देणारा मंत्री असाच पहातील. "

यौगंधरायण अशा प्रकारें बोलत असतां राणिवशांत राजा बंदींत पडल्याची बातमी पसरून हाहाकार झाला. तो यौगंधरायणाच्या कानीं पडला. पुढें राजमातेकडूनही यौगंधरायणास निरोप आला कीं, "माझ्या पुत्राचा आधीं मित्र व मग अमात्य झालेल्या व ज्याला मीं पुत्रवत् मानलें आहे अशा यौगंधरायणानें आतां माझ्या पुत्राला सोडवून आणावें. तें करण्याला तोच समर्थ आहे. कारण, तोच मोठा धैर्यवान् आहे. संकटाला डगमगत नाहीं. फसला तरी विषण्ण होऊन बसत नाहीं. तोच मोठा बुद्धिमान् आहे. " राजमातेकडूनही अशाच प्रकारचा उत्साहजनक निरोप येण्याबरोबर यौगंधरायणास

विशेषच स्फुरण आलें आणि त्यानें प्रतिज्ञा केली कीं,

राहूनें चंद्र जसा
ग्रासियला शत्रुनें तसा स्वामी।
यौगंधरायण नव्हे
जरि सोडविना तयास सत्वर मी ॥

अशी प्रतिज्ञा केल्यावर तो लागलाच त्या उद्योगाला लागला.

इकडे आपल्या इच्छेप्रमाणें आपला अमात्य शालंकायन उदयन राजाला पकडून आणण्याची युक्ति करून त्या कार्याला गेला असतां राजा प्रद्योत केव्हां आपल्याला इष्ट अशी बातमी येते आहे याची अगदीं वाट पहात बसला होता. त्याच्या कन्येला मागणी घालण्यासाठीं अनेक राजांकडून दूत येतच होते. त्या सर्वांचा सत्कार करून त्यांस हो किंवा नाहीं असें कांहींच उत्तर न देतां तो ठेवून घेत असे. हें पाहून सर्व लोकांनाही फार चमत्कार वाटे. शेवटीं राजाच्या कंचुकीनें एके दिवशीं धीटपणा करून राजाला विचारलेंही कीं, "राजकुमारी वासवदत्ता आपल्याला द्या, म्हणून कित्येक राजांकडून दूतमुखांनीं आपल्याकडे मागण्या आल्या आहेत; परंतु आपण कोणालाच हो किंवा नाहीं म्हणत नाहीं याचा अर्थ तरी काय?" तेव्हां राजानें त्यास उत्तर दिलें "बाबारे, जांवयाच्या ठिकाणीं अमुक अमुक गुण पाहिजेत असें जें माझें ठरलें आहे, त्याप्रमाणें गुण मिळतील तर पहावे हा लोभ, आणखी मुलगी लवकर आपल्याजवळून दूर जाऊं नये अशी उत्कट इच्छा, या दोहोंच्या कचाट्यांत सांपडल्यामुळें एकदम निश्चय होत नाहीं.

असावा जामात
प्रथम गमतें श्लाघ्यकुलवान्
दयाशाली तैसा
गुण मृदु तरी तोचि बलवान्।
स्त्रिया रूपीं लुब्धा
म्हणुनि म्हणतों सुंदर हवा।
तसा तो वीर्येंही
युवतिजनरक्षाक्षम युवा ॥

कन्येला या प्रकारें चांगला वर मिळवायाला बापाचा उद्योग कारण होतो. पुढें तो मोठा भाग्यवान् निघावयाचा, तें अर्थातच तिच्या स्वतःच्या नशिबावर अवलंबून असतें.

इतक्यांत तेथें देवी अंगारवतीही आली. तिलाही मुलीचें लग्न लवकर होईल तर बरें असें वाटत होतेंच. राजा म्हणे त्याप्रमाणेंच तिच्या मनाची खरी स्थिति झाली होती.

साक्या.

कन्या झाली थोर परी न च
लग्न तियेचें केलें।
लोकांच्या या अपवादानें
लज्जामय मन झालें ॥
विवाह करुनी दिधली तरि मन
शोकें होतें व्याप्त।
धर्में प्रेमें मातृहृदय तें
ऐसें द्विविधा होत ॥

अशा तऱ्हेच्या गोष्टी चालल्या असतां राजा प्रद्योताला आपला अमात्य शालंकायन हा उदयन राजाला पकडून आणावयाला गेला होता त्याची आठवण झाली. व अजून तो कसा आला नाहीं, आणि त्याच्याकडून कांहीं वार्ताही कशी नाहीं, याबद्दल त्याला काळजी लागली. त्यानें तसे उद्गारही काढले. इतक्यांत शालंकायनाकडून एक दूत आला व म्हणाला:—"आपण उदयन राजाला पकडून घेऊन आलों आहोंत आणि त्याचें अत्यंत प्रियकर असें जें वाद्य 'घोषवती'

नांवाची वीणा ती आधीं नजराणा म्हणून महाराजांकडे पाठविली आहे."

ती वीणा पहाण्याबरोबर राजाला फार आनंद झाला. कारण उदयन राजा या वीणेच्या स्वरावर तर हत्तींना वश करून घेत असे. ती वीणा त्यानें घेतली व लागलींच आपली मुलगी वासवदत्ता हिला नजर म्हणून पाठविली. कारण वासवदत्तेला वीणा वाजवावयास शिकण्याची फारच उत्कट इच्छा झाली होती. देवी अंगारवती थोड्या वेळापूर्वीं आली तेव्हां राजाला तिनें हेंच सांगितलें होतें कीं, वासवदत्ता आपल्याला वीणावादन शिकावयाचें असा आग्रह धरून बसली आहे तर तिला तें शिकण्याची तजवीज करून द्यावी. त्यावर राजानें सहज विनोदानें म्हटलें होतें कीं, " आतां वीणावादन तिचा नवरा तिला शिकविल, " हीं विनोदाचीं बोलणीं होत आहेत तोंच वर सांगितलेला शालंकायनाचा निरोप व ती वीणा हीं आलीं. राजानें लागलींच वीणा वासवदत्तेकडे पाठविली आणि उदयन राजाला वासवदत्तेच्या महालाशेजारींच एका महालांत ठेवून त्याची फार उत्तम प्रकारची बडदास्त ठेवा असा हुकूम दिला.

उदयन राजा मोठा हौशी व सदा आनंदी. तो बंदींत पडला याबद्दल त्याला दुःख झालें, परंतु लवकरच त्याला तें दुःख नाहींसारखें वाटूं लागलें. कारण, वासवदत्तेची व त्याची भेट झाली आणि दोघांचें प्रेम जमून तिनें त्याच्यापासून वीणावादन विद्येचें ग्रहण केलें आणि त्यानें तिचें गांधर्वविधीनें पाणिग्रहणही केलें.

इकडे यौगंधरायणानें तर प्रतिज्ञा केली होती कीं मीं जर राजाला सोडवून परत आणलें नाहीं तर नांवाचा यौगंधरायणच नव्हे. त्या प्रतिज्ञेप्रमाणें त्यानें उद्योगही चालविला. त्याचें सैन्य कांहीं लहानसहान किंवा कसें तरी खोगीरभरतीचें नव्हतें. परंतु ही वेळ एकदम शत्रूवर हल्ला करण्याची नव्हती. कारण एक तर प्रद्योतराजा जागृतच असणार, व आपण उदयनाला अशा गफलतीनें धरून आणलें आहे तर त्याचें सैन्य व त्याचे अमात्य उगीच बसणार नाहींत हें त्यास उघड दिसत असणारच. शिवाय या वेळीं वासवदत्ता आपल्याला मिळावी अशी इच्छा करणाऱ्या राजांचे दूत येऊन उज्जयिनीस राहिलेले होते. तेव्हां प्रद्योतावर एकदम हल्ला केला तर ते सर्व राजे एकवटून प्रद्योतास साहाय्य करणारच. अशा वेळीं एकदम साहस करण्यापेक्षां कपटानेंच आपलें कार्य करून घेतलें पाहिजे, असा यौगंधरायणानें विचार केला. आणि आपल्या विश्वासांतल्या धूर्त व शूर लोकांपैकीं बऱ्याच लोकांना नाना प्रकारच्या कपटवेषांनीं उज्जयिनीस पाठविलें. सर्व शहरभर त्यांना जणूं काय त्यानें पसरून ठेवलें. सर्व शहरभरच नव्हे तर कित्येकांचा कांहीं निमित्तानें खुद्द राजवाड्यांतही प्रवेश करून घेतला. अशी सर्व योजना करून त्यानें आपण स्वतः वेड्याचें सोंग घेऊन उज्जयिनींत प्रवेश केला. त्याच्या लोकांपैकीं मुख्यांची तो संकेतानें वारंवार भेट घेऊन कोठें काय चाललें आहे, कोठें काय नाहीं याबद्दल नेहमीं बातम्या मिळवी. अशा स्थितींत त्यानें राजा उदयनापर्यंत आपलीं माणसें पोंचविलीं आणि अमुक दिवशीं अमुक अमुक प्रसंग घडवावयाचे, अमुक ठिकाणीं आगी लावावयाच्या, अमुक ठिकाणीं अमुक पागेंतील हत्तींना धुरानें घाबरवून सोडावयाचें आणि अमुक मार्गानें उदयन राजानें पळून जाण्याची व्यवस्था करावयाची व तो पळून गेला म्हणजे शहरभर पसरलेल्या आप-

त्या लोकांना वर्दी पोंचवून त्यांनीं एकत्र जमून राजवाड्यावर हल्ला करावयाचा असा त्यानें सर्व बेत रचून ठेविला होता. त्या थोडेसें वाईट वाटलें, तें एवढेंच कीं, रा वासवदत्तेच्या नादाला फारच लागला आ कारण अशा नादाच्या भरांत जर आपल बेताप्रमाणें एखादी बाब चुकली, त सर्वच बेत बाहेर फुटून सपश ढांसळावयाचा. परंतु पुढें त्यानें अ प्रतिज्ञा केली कीं, राजाकडून वासवदत्ते हरण करवून त्या दोघांसही पळव न्यावयाचें. असें जर आपण केलें नाहीं त आपण यौगंधरायणच नव्हों. या त्याच् निश्चयाला खुद्द प्रद्योत राजाचें एक तऱ्हे फार साहाय्य होतें म्हटलें तरी चालेल. साहाय्य हें कीं, वासवदत्ता उदयनाच्या ना लागली आहे याबद्दल त्याला मुळींच वा वाटत नव्हतें, इतकेंच नव्हे, तर तसेंच व्ह अशी त्याची इच्छा होती. इतर राजांक वासवदत्तेला मागणी घालण्याकरितां आले होते, परंतु एकाही राजावर तो नव्हता. परंतु उदयनाकडून मागणी नस त्याला कन्या दिली म्हणजे इतरांचा अ मान होणार आणि ते सर्व लढण्याला उ णार हें संभवनीय होतें. उदयनानें वासवदत्ते बलात्कारानें हरण करून तिला नेलें तर अ पला इलाज नाहीं असें राजांस दाखवि येणार होतें. असा राजाचा स्वतःचा अ तःस्थ मनोदय असल्यामुळें तो अप्रत्यक्ष उदयन व वासवदत्ता यांच्या प्रेमाचें दृढीकर व्हावें हें इच्छीतच होता. अशी एकं अंतर्बाह्य स्थिति असल्यामळें यौगंधरायणा केलेला बेत सिद्धीस जाण्यास पुष्कळ सो झाल्या. यौगंधरायणास हें सर्व माहीत हो तथापि तो कधीं कार्य सोपें म्हणून स्वस् बसत नसे. तो मोठा प्रयत्नवादी होता त्यानें खटपटींत अणुमात्र कमी केलें नाहीं. तो म्हणे:—

काष्ठीं अग्नि असे परी न निघतो
संघर्षणावांचुनी
भूमी गर्भजला जगास वितरी
खाणील जेव्हां कुणी ।
उत्साही पुरुषां असाध्य न मुळीं
कांहींहि कोठेंहि तें
मार्गी योग्य अशा प्रयत्न करितां
सिद्धी करीं राहते ॥

या दृढविश्वासानेंच त्यानें उद्योग केले. त्यानें आपल्या विश्वासांतला एक हस्तिशिक्षक ( माहूत ) राजाच्या गजशाळेंत नेऊन भिडविला होता. इकडे उदयन राजा वासवदत्तेवर पूर्णपणें आसक्त झाला व तीही त्याच्यावर अत्यंत प्रेम करूं लागली. यामुळें त्या दोघांनीं पळून जाण्याचा बेत केला तो अर्थातच गुप्त राहिला. मात्र तो यौगंधरायणास कळला होता. यामुळें राजानें वासवदत्तेस नेऊन केव्हां पळून जावयाचें व त्या वेळीं राजवाड्यांत काय गोंधळ उडवून द्यावयाचा याची सर्व योजना त्यानें ठरवून टाकिली होती. गजशाळेंतले सगळे हत्ती एकदम भिऊन त्यांची गडबड उडावी अशीही योजना केली होती. त्या धांदलींत उदयनराजाच्या हस्तिशिक्षकानें वासवदत्तेच्या नेहमींच्या हत्तिणीला अमुक अमुक ठिकाणीं आणावयाचें असें ठरलें होतें. त्याप्रमाणें सर्व व्यवस्था झाली. वेड्याच्या वेषानें सर्व उज्जयिनीभर भटकणाऱ्या यौगंधरायणानें आपल्या सर्व लोकांच्या भेटी घेऊन त्यांना वेळकाळ बरोबर सांगून दिला आणि बरोबर नेमक्या वेळीं सारा बार उडाला. उदयनराजा वासवदत्तेला घेऊन कौशांबीला पळून गेला. यौगंधरायणाच्या लोकांनीं व त्यानें

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे



स्वतः आपापलें खरें स्वरूप प्रकट करून सर्व राजवाड्याभर गोंधळ आरंभला. यौगंधरायणानें तर शौर्याची फार कमाल केली. परंतु किती झालें तरी यौगंधरायणाचे लोक किती? आणि प्रद्योत राजाचे किती? कांहीं वेळ धुमाकूळ झाला. परंतु थोड्याच वेळांत अत्यंत शौर्य दाखविणारा यौगंधरायणही शेवटीं पकडला गेला. आपला राजा वासवदत्तेला घेऊन कौशांबीला निघून गेला ही बातमी कळल्यामुळें यौगंधरायणास आपण पकडलों गेलों याबद्दल मुळींच वाईट वाटलें नाहीं. कारण तो जो राजवाड्यांत धिंगाणा घालीत होता, त्याचा हेतु एवढाच होता कीं, लोकांचें चित्त आपल्याकडे वेधलें असलें, म्हणजे उदयन व वासवदत्ता यांच्याकडे मुळींच जाणार नाहीं. आणि त्या प्रमाणेंच झालें. यौगंधरायणानें व त्याच्या कपटवेषी मित्रांनीं राजवाड्यांत व नगरींत ठिकठिकाणीं धुमाकूळ चालविल्यामुळें त्या पळून जाणाऱ्या दांपत्याकडे कोणाचेंच लक्ष्य गेलें नाहीं; बरें यदाकदाचित् गेलें असलें, तरी उदयनराजा आपलें व आपल्या नवपरिणीत वधूचें रक्षण करण्याला पूर्णपणें समर्थ होता, तो केव्हांच कौशांबीला जाऊन पोंचला आणि त्यानें यौगंधरायणाला सोडवून नेण्याचा उद्योग हातीं घेतला.

इकडे यौगंधरायणास पकडल्यावर थोडें स्थिरस्थावर झालें आणि तो पळून जाऊं नये म्हणून त्याला आयुधागारांत ठेवून अगदीं कडेकोट बंदोबस्त करण्याचा सपाटा चालला, तेव्हां यौगंधरायण म्हणाला: "या लोकांचें वर्तन किती हास्यास्पद आहे!

अम्ही केवळ वत्सराज धरला
बंदींतही घातला
रक्षावा अतिमात्र जागृतपणें
मंत्रीजनांनीं भला।
तें तेव्हां विसरोनि पूर्णपणिं कीं
हे शाहणे झोंपती
रत्ना चोरुनि नेलियावरि रिती
पेटी अहा रक्षिती॥

यौगंधरायणानें दुहेरी प्रतिज्ञा केली होती हें वर सांगितलेंच आहे. एक तर उदयन राजाला सोडवीन तरच मी यौगंधरायण ही, आणि दुसरी अर्जुनानें सुभद्रेचें जसें हरण केलें तसें राजाकडून वासवदत्तेचें हरण जर न करवीन तर मी यौगंधरायणच नव्हे. तो बाणीनें म्हणे, "वासवदत्तेचें हरण करवीन इतकेंच नव्हे तर वासवदत्तेसह महाराजांस प्रद्योताच्या बंदींतून काढून नेईन, असें न झालें, तर मी यौगंधरायणच नव्हे."

यौगंधरायणाच्या या दोन्ही प्रतिज्ञा खऱ्या झाल्या. यामुळें त्याला आपण बंदींत पडलों याबद्दल कांहीं वाटलें नाहीं. आपण आपल्या सर्व योजना मोठ्या चातुर्यानें पार पाडल्या याबद्दल त्याला अभिमानच वाटला.

इकडे प्रद्योतराजाच्या मनाप्रमाणें सर्व कांहीं घडलें. त्याच्या मनांत वासवदत्ता वत्सराजालाच द्यावी असें होतें. परंतु त्याची मागणी नव्हती. इतर राजांच्या मागण्या असून त्यांच्यापैकीं कोणालाच पसंत न करतां ज्यानें मागणी केली नाहीं त्याला देणें शिस्तीला सोडून झालें असतें. आणि रिकामे तंटे उपस्थित झाले असते. उदयनराजानें वासवदत्तेचें हरण केलें यामुळें सर्व तंटा आपोआपच मिटला. असो.

उदयनानें वासवदत्तेला नेल्यावर प्रद्योतानें यौगंधरायणास सत्कारपूर्वक एक अलंकार पाठविला आणि त्याबरोबर निरोपही पाठविला कीं,

युक्त्या तुवां बहुत योजियल्या अमात्या
मातें मुळीं न अपकारक जाहल्या त्या।

मी द्वेष ना करिं कधींहि खऱ्या गुणांचा ॥
स्वीकार शुद्ध हृदयें करिं भूषणाचा ॥

तो निरोप ऐकतांच यौगंधरायणास मेल्याप्रमाणें झालें व तो म्हणाला:—

मीं जीं पेटविलीं घरें अजुनि ना
गेलीं विझोनी पुरीं
मंत्री क्षोभविले तयांस अजुनी
शांती न आली खरी।
दंडावें मजला परी वितरितो
सन्मान हा भूपती
जो मोठा अपकारि त्यास पुजणें
देहांतशिक्षाच ती ॥

राजाच्या मनांत खरें काय होतें तें या प्रसंगावरून समजतेंच, परंतु या नाटकाच्या शेवटीं तर तें अगदींच स्पष्ट केलें आहे, तें असें:—अंगारवती राणीला आपली कन्या वासवदत्ता उदयनानें हरण करून नेली असें कळल्याबरोबर फारच वाईट वाटलें आणि ती राजवाड्याच्या गच्चीवरून उडी टाकून प्राण देण्यास उद्युक्त झाली, तेव्हां राजानें "देवी, आनंद करावयाचा सोडून या शुभ प्रसंगीं तूं हें साहस काय आरंभलें आहेस? क्षत्रियधर्माप्रमाणें वासवदत्तेचा उत्तम प्रकारें विधिपूर्वक विवाह झाला आहे. तुझ्यादेखत विवाह व्हावा असें असलें तर तूं त्या दोघांच्या तजविरी आहेत त्या तजविरींचा विवाह लावून आपली हौस पुरवून घे."

राजाचें हें बोलणें ऐकून यौगंधरायणासही आनंद झाला. "एकूण राजानें कन्याहरणाबद्दल रागावण्याचें एकीकडे राहून तो या संबंधाबद्दल आनंदच मानतो आहे, मग मींहि त्यानें केलेला सत्कार व दिलेली ही भेट अवश्य घ्यावी." म्हणून त्यानें तो अलंकार घेतला व शेवटीं भरतवाक्य झटलें.

याप्रमाणें या चार अंकी नाटिकेंत कथा आहे.

पहिल्या अंकांत राजा उदयनास नीलवर्णाच्या बनावट हत्तीच्या आमिषानें फसवून प्रद्योतानें धरून नेवविलें व ग ती वार्ता ऐकून यौगंधरायणानें आपल्या महाराजांस सोडवून आणण्याची प्रतिज्ञा केली आहे.

दुसऱ्या अंकांत राजा प्रद्योत ऊर्फ महासेन हा आपल्या पत्नीशीं व सेवकांशीं वासवदत्तेच्या लग्नाविषयीं गोष्टी बोलत असतां उदयनास धरून आणल्याचें वर्तमान आलें व त्यावरून उदयनाची सत्कारपूर्वक व्यवस्था ठेवण्याविषयीं त्यानें आपल्या अमात्यास सांगितलें आहे.

तिसऱ्या अंकांत यौगंधरायण वेड्याचें सोंग घेऊन व त्याचे विश्वासू मित्र आणि साहाय्यक लोक यांची एकांतीं गांठ पडून उदयन व वासवदत्ता यांच्याविषयीं आणि त्यांना सोडवून पळवून नेण्याविषयीं भाषणें झालीं. बंदींत उदयनमहाराज वासवदत्तेच्या ठिकाणीं अनुरक्त झाले आहेत व आनंदांत आहेत हें ऐकून यौगंधरायणास थोडी खिन्नता आली. परंतु त्याचें धैर्य न खचतां त्यान उलटी पुन: जोरानें दुहेरी प्रतिज्ञा केली कीं, अर्जुनानें सुभद्रेला व नागानें पद्मलतेला हरण करून नेलें त्याप्रमाणें राजाकडून वासवदत्तेचें हरण करवून मी दोघांसही बंदींतून सोडवून स्वराज्यांत नेईन तर यौगंधरायण खरा. एकंदर खलबतें अशीं करून जो तो आपापल्या सोंगाची बतावणी करीत आपापल्या ठिकाणीं गेला.

चवथ्या अंकांत यौगंधरायणाच्या योजनेप्रमाणें वासवदत्ता व उदयन हत्तिणीवर बसून निघून गेलीं आणि राजवाड्यांत व नगरांत गोंधळ उडवून यौगंधरायण धरला गेला. परंतु पुढें त्यासही राजा प्रतोदानें सत्कार करून एक अलंकार नजर म्हणून दिला व त्यास झालें तें योग्य व इष्टच झालें असें सुचविलें.

# स्वप्नवासवदत्त.

धूर्त लोकांनीं भासकृत नाटकांची परीक्षा अग्निदिव्यानें करावयाची ठरवून तीं अग्नींत टाकलीं, परंतु त्यांतल्या स्वप्नवासवदत्त नाटकाला पावक ( अग्नि ) ही दाहक झाला नाहीं, अशा अर्थाचा श्लोक मागें उपोद्घातांत दिल्याचें वाचकांस आठवत असेलच. त्या स्वप्नवासवदत्त नाटकाचें संविधानक आतां पाहूं.

उदयनाचें व वासवदत्तेचें लग्न होऊन थोडा काळ लोटला नाहीं तोंच उदयनाच्या राज्याचा कांहीं महत्त्वाचा भाग एका शत्रूनें जिंकून घेतला. याचें कारण राजाचें राज्यकारभारांत दुर्लक्ष्य हेंच असावें. वासवदत्तेचें हरण करून तिला आणून तिच्याशीं विवाह केल्या दिवसापासून राजाला वासवदत्तेखेरीज कांहीं सुचेनासेंच झालें. त्यानें अहोरात्र वासवदत्तेच्या महालांत तिच्यासंनिध असावें, राज्यकारभारांत बिलकुल लक्ष्य घालूं नये, यौगंधरायण, रुमण्वान् वगैरे 'मंत्रिमंडळीची भेटसुद्धां घेऊं नये, असा प्रकार सुरू झाला. तेव्हां अर्थातच शत्रूंना फावलें असावें. यौगंधरायण फार चतुर व फार जागरूक. रुमण्वान् फार शूर. परंतु खुद्द स्वामीची दृष्टि नसल्याकारणानें त्यांच्या चातुर्याचें, जागरूकपणाचें व शौर्याचें तेज पडेना. राजाचा दरारा हा सगळ्यांत अधिक असतो. तो थोडा कमी झाला कीं इतरांना आपलें पाऊल पुढें टाकण्यास सवड सांपडते, तशीच स्थिति या वेळीं झाली असावी.

याला आतां उपाय काय करावा? असें मनांत येऊन मंत्रिमंडळींनीं कोण्या सिद्ध पुरुषास विचारणा केली असतां त्यानें सांगितलें कीं, " मगध राजाची कन्या पद्मावती इचा व उदयनाचा विवाह घडून आला तर उदयनास पुनः गतराज्यभागाची प्राप्ति आहे. तेव्हां गेलेला राज्याचा भाग पुनः मिळावा अशी आतुरता असली, तर हा विवाह घडवून आणण्याची तजवीज करावी. "

यौगंधरायणानें तें ऐकतांचें त्याला मोठी चिंता पडली कीं, वासवदत्तेच्या ठिकाणीं इतका अनुरक्त—नव्हे आसक्त झालेला राजा दुसऱ्या स्त्रीशीं विवाह करण्यास तयार होईल हें संभवनीय कसें? तेव्हां जर हा योग घडवून आणावयाचा असेल तर आधीं कांहीं कालपर्यंत वासवदत्तेचा व राजाचा वियोग घडवून आणला पाहिजे. शिवाय वासवदत्ता नाहींशी झाली किंवा राजाचें तिच्यावरलें प्रेम उडालें असें प्रसिद्ध झाल्याखेरीज पद्मावतीचा बाप आपली मुलगी उदयनाला देईल तरी काय म्हणून? कां कीं, कोणीही आपल्या मुलीचा विवाह करून दिला म्हणजे तिच्यावर तिच्या नवऱ्याचें पूर्ण प्रेम असावें असेंच इच्छितो. त्यांतून राजे तर आपल्या मुली अशाच हेतूनें कोणाही राजाला देणार. तेव्हां यौगंधरायणानें असा विचार केला कीं, आपला हेतु साधण्याला पहिला उद्योग 'वासवदत्ता नष्ट झाली आणि उदयन विधुर झाला असें जगांत प्रसिद्ध होईल अशी तजवीज करावयाची ' हा होय. ही तजवीज व्हावी कशी?

यौगंधरायणानें पुष्कळ विचार करून एक तोड काढली. वासवदत्ता अतिशय विचारी

आहे. राजा आपल्यामुळें राज्यकारभार
लक्ष्य घालीत नाहीं आणि त्यामुळें राज
लचके तोडण्याचें शत्रूंनीं आरंभलें आहे
सर्व गोष्टी आणि गेलेलें राज्य पुनः
ण्याला जो उपाय ह्मणून सिद्ध पुरुषानें
गितला आहे तो उपाय हीं वासवद
कानीं घालावीं. आणि तिच्या अनुमो
नेंच कांहीं ना कांहीं तरी युक्ति करून
उदयन राजाचा दुसरा विवाह घ
आणावा. असा विचार यौगंधराय
केला. त्याप्रमाणें वासवदत्तेला अनुकूल
न घेतलें, आणि दोघांनीं मिळून ती
गोष्ट घडवून आणण्याच्या उद्योगाला
केला. त्या उद्योगानें त्यांचा इष्ट हेतु
सिद्धीस गेला तें या नाटकांत दाखविलें

एके दिवशीं राजा उदयन मृगयेला
असतां त्याच्या पश्चात् राजवाड्याच्या
तःपुराला आग लागली आणि त्या अ
वासवदत्ता सांपडली. यौगंधरायणास तें
तांच त्या साहसी पुरुषानें तिला त्या अ
तून सोडविण्यासाठीं त्या आगींत उडी
तली. परंतु त्याच्या त्या साहसाचा कांह
पयोग झाला नाहीं. वासवदत्ता तर वां
नाहींच परंतु तो स्वतःही जळून मेला.
र्धातच सर्व राजधानीभर हाहाकार उड
राजा उदयनास हा दुःखकारक वृत्तांत
विण्यांत आला. तेव्हां त्याच्या दुःखाला
पारावारच नाहींसा झाला. राजाचें वास
त्तेवर अलोट प्रेम. त्याला तिच्याखेरीज
जगांत दुसरें कांहीं दिसत नव्हतें. तिच्य
सून तो आज कित्येक दिवसांत दूर झाले
नव्हता. आणि एक दिवस सहजीं मृग
गेला असतां मागें हा भयंकर प्रसंग झा
तो त्याच्या कानीं गेला मात्र, तो विल
शोक करूं लागला. आगींतून तिच्या अं
वरील ह्मणून जे कांहीं दागिने काढले गे

त्यांनाच मिठ्या मारून व त्यांचें चुंबन घेऊन त्यानें आकांत केला. ती दुःखद बातमी कानीं पडतांच पहिल्या झटक्यास तर तो मूर्छित होऊनच पडला. रुमण्वान् म्हणून त्याचा जो सेनामंत्रि होता, त्यानें त्याचें सांत्वन करण्यासाठीं पुष्कळ प्रयत्न केले. परंतु ते व्यर्थ झाले. वासवदत्ता गेली, आतां या पृथ्वीवर जगण्यांत कांहींच तात्पर्य नाहीं, असें म्हणून तो जीव देण्यासही उद्युक्त झाला. परंतु रुमण्वानानें आणि इतर मंत्रिमंडळांनीं त्याला आत्महत्येपासून परावृत्त केलें. तरी राजाचा शोक कांहीं त्यांच्यानें कमी करवला नाहीं. राजा एकसारखा जमिनीवर अंग टाकून "हा वासवदत्ते!" "हा अवन्तिराजपुत्रि!" "हा प्रिये!" "हा प्रियशिष्ये!" असें ओरडत दिवस कंठूं लागला. तें पाहून राजाचें वासवदत्तेवर किती प्रेम होतें हें लोकांना जितकें कळून आलें तितकें ती जिवंत असतांना आलें नव्हतें म्हटलें तरी चालेल. लोक म्हणूं लागले कीं, "चक्रवाकीचा विरह झाला असतां चक्रवाक फारच आक्रोश करतो असें ह्मणतात, परंतु राजाच्या शोकानें त्यालाही मागें टाकलें. स्त्रीविरहानें अशा प्रकारचें वेड कधींच कोणास लागलें नसेल. वासवदत्तेसारखी स्त्री खरी धन्य. ती दग्ध असूनही अदग्धच होय." रुमण्वानादिक मंत्रिमंडळीला तर असें वाटलें कीं, राजा कोण्या वेळीं काय साहस करील याचा अणुमात्र नेम नाहीं. तेव्हां आपण अगदीं एकसारखें जागृत राहून महाराजांच्या बरोबर असलें पाहिजे. रुमण्वानानें त्याप्रमाणें केलेंही.

राजाला वासवदत्तेच्या शोकाचा विसर पाडण्यासाठीं त्याच्या मंत्रिमंडळानें जे अनेक उपाय केले, त्यांत एक असा उपाय केला कीं, मगधदेशाचा राजा दर्शक याची भगिनी

पद्मावती इच्याशीं राजा उदयनाचा विवाह व्हावा असें योजिलें. वासवदत्ता जरी नष्ट झाली तरी आपण निपुत्रिक राहणें हें अनेक दृष्टींनीं श्रेयस्कर नाहीं, यास्तव तरी हा विवाह करावा. शिवाय पद्मावतीशीं विवाह झाल्याशिवाय आपल्या राज्याचा जो भाग शत्रूंनीं हरण केला आहे, तो माघारी मिळणार नाहीं असाच योगायोग आहे असें सिद्धांनीं सांगितलें आहे, तर तेंही मनांत आणलें पाहिजे. असें नानाप्रकारांनीं बोलून राजाचें मन वळविलें. पद्मावतीशीं विवाह झाला म्हणजे मगधदेशाच्या राजाशीं मैत्री होऊन त्याचें साहाय्यही मिळेल हाही एक हेतु असेलच. राजाची या गोष्टीस कशीबशी संमति मिळविली आणि पद्मावतीला मागणी घालण्याकरितां दूत पाठविला.

इकडे मगध देशाचा राजा दर्शक याला आपली भगिनी उपवर झाली आहे, आणि तिला योग्य असा वर एकटा उदयनच आहे असें वाटत होतें. शिवाय, पद्मावतीनें स्वतःही उदयन राजालाच मनानें वरलें होतें. यामुळें उदयनाकडून दूत येतांच राजास व सर्वांस फार आनंद झाला. पद्मावतीला उदयनाचें एकंदर चरित्र ऐकून माहिती होतें; त्यांत आणखी अशी गोष्ट झाली कीं, उदयनाची माहिती जिला होती अशी एक सखी तिला मिळाली. ती सखी तिला मिळाल्याची गोष्टही विलक्षणच होती. ती अशीः

पद्मावतीची आजी वृद्ध झाल्याकारणानें त्या काळच्या वहिवाटीप्रमाणें राजधानींत आपल्या नातवाजवळ न राहतां राजधानीपासून जवळच असणाऱ्या एका ऋषीच्या आश्रमांत तापसी होऊन राहण्यास गेली होती. तिचीं माणसें केव्हां केव्हां तेथें तिला भेटण्याला जात असत. पद्मावतीवर तिचें प्रेम फार व तिजवर पद्मावतीचेंही प्रेम अतोनात. यामुळें ती तर वारंवार जाई. ती याप्रमाणें गेली म्हणजे तेथें दानधर्मही बराच करी. एके दिवशीं ती याप्रमाणें गेली असतां नित्याच्या पाठाप्रमाणें तिनें आपल्या नोकरांकडून अशी द्वाही फिरविली कीं, त्या तपोवनांतल्या तापसतापसींना जें काय पाहिजे असेल तें राजकन्या पद्मावतीकडे येऊन निवेदन करावें म्हणजे त्यांची इच्छा ताबडतोब तृप्त करण्यांत येईल. अशी द्वाही फिरविण्याचा नेहमींचाच तिचा क्रम असल्यामुळें तापस व तापसी आपल्याला जें काय हवें असेल तें मागण्याला येत व पद्मावती त्यांच्या इच्छेप्रमाणें त्यांस दक्षिणादिक देऊन संतुष्ट करी. वर सांगितल्या दिवशीं एक नवीनच तापस आणि तापसी त्या वनांत आलीं होतीं. त्यांनीं ही द्वाही ऐकतांच तीं उत्सुकतेनें पद्मावतीकडे आलीं आणि तापसानें तिला विनंति केलीः "राजपुत्रि, मला धनद्रव्य किंवा दुसरें कांहीं नको. मला एकच गोष्ट पाहिजे आहे ती ही कीं, ही माझी बहीण तूं कांहीं दिवस आपल्याजवळ माझी तुझ्याजवळ ठेव म्हणून ठेव. हिचा नवरा कोठें प्रवासास गेला आहे. त्याच्या शोधाकरितां मला जाणें भाग आहे. तेव्हां मी अनेक तीर्थें वगैरे धुंडाळून त्याचा शोध लावून त्याला परत आणीपर्यंत हिला संभाळ. ही खरोखरी तुझी सखी होण्याला सर्वथैव योग्य आहे."

कोणाचीही ठेव ठेवावयाची म्हणजे महा कठिण काम, मोठी जबाबदारी असते. त्यांतून माणूस ठेव म्हणून ठेवून घ्यावयाचें ही तर फारच मोठी जोखीम. आणि तरुण स्त्री ठेव म्हणून ठेवून घ्यावयाची म्हणजे तर त्या जोखमीला कांहीं सीमा उरली नाहीं. परंतु पद्मावतीनें जर कोणाची कोणतीही इच्छा असली, तर मी ती पुरवावयाला तयार

आहे अशी द्वाहीच फिरविली होती, तर तिला आतां मागें घेतां येणें शक्यच नव्हतें. तिनें त्या तापसास तेव्हांच आश्वासन दिलें कीं, आपण आपल्या भगिनीला मजजवळ ठेवून खुशाल तीर्थयात्रा करावयाला जा आणि हिच्या पतीचा शोध लावून या. हिची अगदीं काळजी करूं नका.

इतकें राजपुत्रीचें आश्वासन मिळाल्यावर आणखी काय पाहिजे? तो तापस आपल्या बहिणीचा निरोप घेऊन तेथून निघून गेला. ती आवंतिका तापसी राजकन्येजवळ राहिली. नंतर एक दोन दिवसांत पद्मावती आजीचा निरोप घेऊन बापाकडे आली. तेथें येते तों इच्छेप्रमाणें तिचा उदयनाशीं विवाह ठरत होता. तिला तेंच इष्ट होतें आणि आवंतिकेकडून तिला राजाचें सौंदर्य, शौर्य वगैरे गुण उत्तमपणें कळल्यामुळें तिच्या आनंदास पारावार नाहींसा झाला. राजाचें आपल्या पहिल्या स्त्रीवर प्रेम होतें त्यापेक्षांही आपण आपल्यावर जास्त प्रेम करून घेऊं अशी तिची उमेद होती. विवाह ठरल्यावर राजा उदयन मगध देशांत आला आणि विवाह झाल्यानंतरही बरेच दिवस त्याचा मुक्काम सासुरवाडीसच होता.

राजा उदयनानें आपल्या मंत्रिमंडळाच्या आग्रहामुळें व त्यावांचून आपल्या राज्याच्या नष्ट भागाची पुनः प्राप्ति नाहीं म्हणून पद्मावतीशीं विवाह केला खरा, परंतु त्याला वासवदत्तेचें स्मरण झालें नाहीं असा क्षणही जाईना. बसतांउठतां, खातांपितां, हेलालीला करतांना 'वासवदत्ता! माझी वासवदत्ता नाहीं. तिच्यासारखी स्त्री मिळणें नाहीं,' असे उद्गार काढून त्यानें दीर्घ उच्छ्वास टाकावे. कोणी भेटलें तरी तिच्या गोष्टीवांचून गोष्टी बोलूं नयेत. खुद्द पद्मावतीशीं सुद्धां गोष्टी बोलावयाच्या त्याही वासवदत्तेच्या गुणांबद्दल! पद्मावतीही फार चांगली होती. मृतपत्नीबद्दल नेहमीं शोक करतां, तर माझ्याशीं विवाह केलात कशाला? असलीं दुरुत्तरें तिनें कधीं केलीं नाहींत. राजाच्या मनाला ज्यांत समाधान वाटे तेंच करण्यांत ती समाधान मानी, व वासवदत्तेच्या गुणांचें वर्णन तो करूं लागला म्हणजे तिच्यासंबंधानेंच माहिती विचारून ती आपणही हळहळे. ती असती तर तिच्या धाकट्या बहिणीप्रमाणें आपण मोठ्या आनंदानें राहिलों असतों. असें म्हणून निर्मत्सरी स्वभावामुळें राजाचें प्रेमही तिनें आपल्याकडे ओढून घेतलें.

असें चाललें असतां एके दिवशीं एक विलक्षण प्रसंग झाला:—

पद्मावतीचें डोकें दुखतें आहे तेव्हां आवंतिकेला तें सांगितलें असतां ती तिच्याजवळ बसून व दोन गोष्टी सांगून आणि औषधें वगैरे देऊन तिला बरी करील असें वाटून एका दासीनें आवंतिकेला तें सांगितलें. दुसऱ्या दासीनें राजाचा मित्र विदूषक याच्याकडून पद्मावतीच्या डोकें दुखण्याची गोष्ट राजाच्या कानीं घातली. तेव्हां राजा गर्दीगर्दीनें पद्मावतीच्या शयनागारांत गेला. पहातो तों पद्मावती तेथें निजलेली नसून शय्या तशीच रिकामी आहे. पद्मावती येईपर्यंत आपण येथें पडूं असें ह्मणून राजा त्या सुखशय्येवर पांघरूण घेऊन पडला व त्याला झोंप लागलीसें पाहून येथें थंडी वाजते आहे तर आपण आपलें पांघरूण घेऊन येऊन पुनः बसावें असें ह्मणून विदूषक निघून गेला. इतक्यांत पद्मावतीसाठीं आवंतिका तेथें आली, आणि कर्मधर्मसंयोग असा कीं त्याचवेळीं राजा उदयनाला वासवदत्तेचें स्वप्न पडत होतें. वासवदत्ता आपल्या जवळ आली आहे आणि आपल्याला उठवते आहे

असा त्याला भास झाला. इतक्यांत आवंतिकेनें त्याला पद्मावती समजून हालविलें. राजा अर्धवट स्वप्नांत, अर्धवट जागा अशा स्थितींत येऊन त्यानें डोळे उघडले आणि आवंतिकेला पाहतांच त्याला एकदम असा भास झाला कीं वासवदत्ता खरोखरीच आपल्याला उठविण्यास आली आहे!

आपण जिला उठवावयाला आलों ती पद्मावती पलंगावर नसून राजा उदयन आहे असें पहातांच आवंतिका अतोनात लाजली आणि पळाली. राजा उदयनाला अर्थातच वासवदत्ता आपल्याला टाकून पळते आहे तेव्हां तिला धरावी असें वाटून तो झट्कन् तिला पकडण्यासाठीं तिच्या मागोमाग धांवला. परंतु आवंतिका फार चपल व राजा अर्धवट स्वप्नांत व अर्धवट जागा यामुळें तो दाराशीं अडखळून पडला आणि आवंतिका निघून गेली.

इकडे राजा चांगला जागा झाला, तरी पण त्याला असें खास वाटे कीं, आपण वासवदत्तेला पाहिलें. ती तेथें आली होती. स्वप्न कीं सत्य ? भास कीं खास ? हें त्याला कांहीं कळेना. तो फारच खिन्न झाला आणि विदूषकाला आपलें स्वप्न वगैरे सांगत बसला. इतक्यांत त्याला असा भास झाला कीं, आपली घोषवती वीणा कोणी वाजवीत आहे. कोण वाजवीत आहे याचा शोध करितां पद्मावतीच्या विनोदनाकरितां आवंतिका वाजवीत आहे, असें त्याला कळलें. ती वीणा पहाण्यास आणा, असें सांगून त्यानें ती वीणा आणविली. पहातो तों खरोखरच आपली घोषवती. ही येथें कशी आली याचा शोध करितां असें कळलें कीं ती रानांत एका झाडाला अडकवून ठेवलेली कोणास सांपडली. ती पहातांच राजाला वासवदत्तेचें स्मरण अधिक उद्रेकानें झालें आणि तो त्या वीणेची निर्भर्त्सना करूं लागला. "हे वीणे, तूं हतभागिनी त्या सुभगसुंदरीला सोडून वनवास कां पतकरलास ? तूं माझ्या दृष्टीस पडतेस पण ती तुझी धनीण कोठें आहे ! " अशा प्रकारें त्या वीणेला संबोधून बोलत राहिला.

राजाचा शोक त्या वीणेच्या दर्शनानें याहून किती तरी अधिक वाढला असता, परंतु इतक्यांत त्याच्या सेनापतीकडून दूत आला. त्यानें आपल्या शत्रूंचा पूर्ण पराभव होऊन आपला देश गेला होता तो पुनः परत मिळाला हें सांगितलें, त्याचप्रमाणें वासवदत्तेचा बाप प्रद्योत याच्याकडूनही अभिनंदनपर निरोप आणि अंगारवती इच्याकडून वासवदत्तेची व राजाची विवाहसमयीं काढलेली तसबीर हीं घेऊन वासवदत्तेची दाई आली. ती वासवदत्तेची तसबीर पाहतांच पुनः राजाच्या शोकाला भरतें आलें. त्या वेळीं पद्मावती राणी त्याच्याजवळ होती, तिला साहाजिकच उत्सुकता झाली कीं जिच्या गुणानुवादांचें वर्णन राजा इतकें करतो आहे ती वासवदत्ता कशी होती, हें या चित्रफलकांत तरी पहावें. म्हणून ती पाहूं लागली तों तिला असें वाटलें कीं, आपल्याजवळ तापसानें ठेव म्हणून ठेवलेली आवंतिका आणि या चित्रफलकांतली वासवदत्ता यांचें फार विलक्षण रूपसादृश्य आहे. तथापि तें मनांत ठेवून ती राजास म्हणाली, "या चित्रांतली देवी वासवदत्ता हिचें खऱ्या देवी वासवदत्तेशीं अगदीं सादृश्य आहे काय ?"

**राजाः—**सादृश्य असें कां म्हणतेस ? तीच आहे असें म्हण. अगदीं हुबेहूब तीच आहे.

**पद्मावती:**—आपण आणि आपली ही तजवीर यांत ज्या अर्थीं फार साम्य आहे त्याअर्थीं तेंही साम्य आहेच असें म्हणण्याला हरकत नाहीं. पण आर्यपुत्रा अगदीं हुबेहूब या देवीच्या सारखी अशी एक आर्या माझ्या परिवारांत आहे.

**राजा:**—ती कोण ?

**पद्मावती:**—एका ब्राम्हणानें आपल बहीण ठेव म्हणून मजजवळ ठेविली. तिच नवरा कोठें प्रवासाला गेला असल्यामुळ त्याचा शोध करण्यास तो ब्राह्मण मजजवळ हिला ठेवून गेला. तिचें रूप या चित्रांतल्य देवीच्या रूपाशीं अगदीं तंतोतंत सार आहे.

**राजा:**—असें ? जगांत असें रूपसादृश दिसून येतें. पण त्या स्त्रीला आमच्या नजरे तरी पाड.

**पद्मावती:**—छे, छे, ती ब्राह्मणस्त्र तेव्हां आपल्यापुढें ती कशी येईल ?

अशीं भाषणें चाललीं आहेत, तों प्र हारीनें वर्दी दिली कीं, उज्जनीचा ए ब्राह्मण आला आहे, तो म्हणतो राजमहि पद्मावतीजवळ मीं आपली भगिनी ठेव म्ह ठेविली आहे ती परत न्यायला आलों आ

राजानें तें ऐकतांच त्या ब्राह्मणास अ त्यासमोर आणण्यास प्रतिहारीला सांगित आणि पद्मावतीला त्या ब्राह्मणाच्या भगिनी घेऊन ये म्हणून सांगितलें. पद्मावती ल लींच आवंतिकेस आणण्यासाटीं गेली. प्र हारीनें त्या ब्राह्मणास आंत आणलें. ब्राह्म पुढें झाला व "महाराजांचा जयजयक असो !" असें मोठ्यानें म्हणाला. तो श ऐकतांच राजा चकित झाल्याप्रमाणें प लागला. कारण तो शब्द तर त्यास ओ खीचा आहे असें वाटलें; परंतु ओळख पटेना. थोडें न्याहाळून पाहून तो त्या ब्राह्मणास म्हणाला:—"काय हो भटजी, आपण आपली बहीण पद्मावतीजवळ ठेव म्हणून ठेविली आहे काय ?"

**ब्राह्मण:**—होय महाराज.

**राजा:**—तर मग लवकर घेऊन यांच्या भगिनीला !

राजा असें प्रतिहारीस सांगतो व प्रतिहारी जाते तों पद्मावती आणि आवंतिका आल्या.

आवंतिका अवगुंठन घेऊन आली तरी तिला पहातांच तिची दाई एकदम म्हणाली:—अहो ही तर माझी वासवदत्ता !

तें ऐकतांच राजाची स्थिति फार चमत्कारिक झाली. त्यानें एकदम त्या आवंतिकेस आलिंगनच दिलें असतें, परंतु तिनें बुरखा घेतला होता. तेव्हां त्याची खात्री होईना म्हणून त्यानें आत्मसंयमन करून एवढेंच म्हटलें:—

" काय ? वासवदत्ता ! तर मग देवी, पद्मावतीला घेऊन तूं आंत जा."

तें ऐकतांच ब्राह्मण एकदम म्हणतो: "अहो हें काय ? ही माझी भगिनी."

**राजा:**—काय भलतेंच बोलतां ? ही प्रद्योतकन्या वासवदत्ता आहे असें तिचीच दाई म्हणत असून . . . . .

राजा असें बोलतो आहे तोंच ब्राह्मण त्यास म्हणतो, "राजा, तूं भरतकुलाचा श्रेष्ठ, तूं विनीत, तूं ज्ञानी आणि शुद्धचारित्र्य, तूंच राजधर्मांचा आचार्य, तेव्हां बळेंच एखाद्याच्या बहिणीचा अपहार करूं नयेस !

**राजा:**—बरें आहे. पाहूं रूपपरीक्षा करून भटजी, तिचें अवगुंठन दूर करा.

**ब्राह्मणः**--महाराजांचा जयजयकार असो.

**आवंतिकाः**--आर्यपुत्रांचा जयजयकार असो.

राजानें तें ऐकतांच "अरे, हा तर यौगंधरायण आणि ही वासवदत्ता!" असे उद्गार काढले आणि दोघांसही आलिंगन दिलें. नंतर पुनः म्हटलें:

"काय? हें स्वप्न कीं सत्य? हीच मला नुकती एकदां दिसून फसवून गेली."

**यौगंधरायणः**--महाराज, देवीला नेऊन हें सर्व कपट करण्यांत मीं मोठा अपराध केला तेव्हां मला क्षमा करावी.

**राजाः**--यौगंधरायणा, ऊठ. आम्ही संकटांत सांपडून बुडत असतां तूं वेड्याचीं सोंगें घेऊन, युद्धें करून व योग्य अशा युक्त्या क्लृप्त्या लढवून हजारों खटाटोपांनीं तूंच आम्हांला तारलेंस. तर ऊठ, मित्रा तूं वासवदत्तेला अनुकूल करून घेऊन आपल्या बरोबर नेलीस, ती दग्ध झाली, तूंही दग्ध झालास असें आम्हांला भासवून शोकांत पाडलेंस, हिला पद्मावतीजवळ ठेव म्हणून ठेवलेंस, आपण अज्ञातवासांत राहिलास. इतका जो खटाटोप केलास तो कां बरें?

**यौगंधरायणः**--महाराज, देवी वासवदत्ता जीवमान असतां आपण दुसरा विवाह करण्यास कधीं सिद्ध झालां नसतां. पुष्पकभद्रादि सिद्धांचें तर भविष्य असें कीं, राजकन्या पद्मावती उदयनपत्नी होईल आणि तसें झालें म्हणजे मग गतराज्यार्थ पुनः प्राप्त होईल. तेव्हां तो विवाह घडवून आणण्याला प्रयत्न करणें हें पहिलें कर्तव्य वाटलें. देवीचें मला या कामीं अनुमोदन व साहाय्य मिळालें. आणि त्या सिद्धांच्या भविष्याप्रमाणें सर्व कांहीं घडून आलें.

यौगंधरायणाचें चातुर्य, साहस व कल्पकता हीं पाहून सर्वांस फार मोठा विस्मय झाला. याप्रमाणें या नाटकांतील कथा आहे.

पहिल्या अंकांत पद्मावतीजवळ ठेव ठेवण्यांत आली.

दुसऱ्या अंकांत उदयनराजा हा पद्मावतीला वर निश्चित झाला.

तिसऱ्या अंकांत विवाह झाला व त्याचें कौतुक (कंकण) वासवदत्तेकडून (आवंतिकेकडून) गुंफण्यांत आलें.

चवथ्या अंकांत राजाचा वासवदत्तेबद्दल शोक आणि विदूषकादिकांचीं विनोदपर भाषणें.

पांचव्या अंकांत उदयनास स्वप्न पडत असतां वासवदत्ता दिसते.

सहाव्या अंकांत सर्व उलगडा होऊन गांठीभेटी होतात.

हें नाटक भासकवीच्या नाटकांत वैदग्ध्याच्या व रसपरिपोषाच्या दृष्टीनेंही उत्कृष्ट आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. ........

# अविमारक

प्राचीन नाट्यशास्त्रांत नाटकांचे अनेक भद सांगितले आहेत. साधारणतः सर्वच दृश्य काव्यांना आपण नाटक असें ह्मणतों. प्राचीन नाट्यशास्त्रांत नाटक हें दृश्य काव्यांना सामान्य नांव नाहीं. जुनी पौराणिक गोष्ट घेऊन तिजवर दृश्य काव्य लिहिलेलें असलें व त्याचे अमुक एक नियमितसंख्याक अंक असले म्हणजे त्याला नाटक म्हणतात. गोष्ट कवीनें आपल्या कल्पनेनें रचिलेली असली व त्या गोष्टीवर दृश्यकाव्य रचलेलें असलें तर त्याला प्रकरण म्हणतात. भवभूतीचें उत्तररामचरित हें नाटक आहे. मालतीमाधव हें प्रकरण आहे.

भास कवींच्या ज्या नाटकाचें येथें मी सविधानक देणार आहें, तें मालतीमाधवास रखें प्रकरण आहे. त्याचें कथानक कवीनें आपल्या कल्पनेनेंच रचलेलें आहे. तें फार मनोवेधक आहे.

आपली कन्या कुरंगी ही उपवर झाली, तेव्हां आतां हिच्या योग्य असा वर कसा शोधून काढावा याची कुंतिभोज याला फार चिंता पडली. कुरंगी रूपगुणांनीं अतिशय चांगली अर्थात् तिला तसाच पति पाहिजे. एखाद्या राजाला सुंदर व गुणवती मुलगी असली म्हणजे ती आपल्याला मिळावी किंवा आपल्या पुत्राला मिळावी म्हणून इतर राजांस वाटून ते दूत पाठवूं लागतात, त्याप्रमाणें राजा कुंतिभोजाकडे अनेक राजांकडून कुरंगीसाठी मागण्या येऊं लागल्या. परंतु त्या सर्व राजांत दोनच राजांचीं स्थळें त्याला आपल्या मुलीला योग्य अशीं वाटलीं. एक सौवीरराजाचा पुत्र व दुसरा काशीराजाचा पुत्र. पैकीं सौवीर राजानें अगदीं प्रथमच मागणी केली होती, तेव्हां कुंतिभोजास असें वाटलें कीं, त्याच्यापेक्षां बरें स्थळ आल्यावर मग विचार करावा; म्हणून त्यानें सौवीरराजाला अशा निरोप पाठविला कीं, मुलगी अजून लहान आहे करितां एव्हांच तिच्या विवाहाचा विचार कर्तव्य नाहीं. उरतांपैकीं उरला काशीराज. परंतु त्याचें स्थळ राजास योग्य वाटेना. परंतु त्यानें काशीराजाच्या दूताला नकार देऊन त्याची पाठवणी केली नव्हती. काय करावें कसें करावें असें त्याच्या मनांत होऊन तो विचारांत पडला होता. आतां त्याला इच्छा झाली कीं, "सौवीरराज पुनः आपल्यासाठीं कुरंगीला मागणी घालण्याला दूत पाठवील तर बरें होईल."

राजा कुंतिभोज व त्याची पत्नी देवी हीं दोघें याप्रमाणें चिंताव्याप्त असतां एके दिवशीं एक चमत्कारिक प्रसंग झाला:—

राजकन्या कुरंगी आपल्या परिवारासह वनविहार करण्यास गेली असतां एक उन्मत्त हत्ती तिच्या अंगावर चालून आला. परिवार विशेष नव्हता, तो भेदरून पळून गेला, किंवा राजकन्या स्वैर हिंडत हिंडत एके बाजूस गेली यामुळें असेल, पण ती मदोन्मत गजाच्या तडाक्यांत सांपडली. आतां तो हत्ती तिला आपल्या सोंडेनें उचलून तिचा प्राण घेणार इतक्यांत एक धीर वीर व सुंदर तरुण एका झाडीतून अगदीं ऐनप्रसंगीं पुढें येऊन त्यानें त्या हत्तीवर हल्ला केला. त्याबरोबर तो

हत्ती त्याच्या अंगावर चालून गेला, आणि राजकन्या कुरंगी सुरक्षित राहिली. त्या तरुणानें त्या हत्तीचा संताप आपल्यावर ओढूनच घेतला होता, त्यामुळें हत्तींचें व त्याचें चांगलेंच युद्ध सुरू झालें. त्यांत हत्तीला त्यानें जेरीस आणलें व मग तो हत्ती राजाच्या पीलखान्यांत बांधला. थोड्याच वेळांत राजकन्येचा परिवार तिच्याजवळ आला. त्या तरुण वीराचा तो शौर्यप्रताप पाहून मंडळींनीं त्याचा जयजयकार केला व राजाकडे जाऊन ती सर्व हकीकत सांगितली. त्या वेळीं त्या तरुण वीराच्या शौर्याचें फार वर्णन केलें. कांकीं, तो जसा शौर्यानें तसाच सौन्दर्यानें व तेजस्वीपणानेंही वर्णनीय होता. त्याबरोबर राजाच्या मनास एकदम वाटलें कीं, आपल्या कन्येला हाच वर योग्य आहे. लागलीच त्यानें आपली कन्या तिच्या रक्षणकर्त्यासच द्यावयाची असें योजिलें.

परंतु तसें करण्यास एक मोठीच अडचण आली. ती ही कीं, तो धीरवीर तरुण सुंदर पुरुष कोण याची त्याच्याजवळ चौकशी करतांना त्याच्याच तोंडून असें कळलें कीं, तो चांडालकुलांतला आहे. तें ऐकतांच राजा फार हताश झाला. परंतु त्या तरुण पुरुषाचें जें वर्णन त्यानें ऐकलें होतें, त्यावरून तो खरोखर त्या कुलांतला असावा हें कांहीं त्यास किंवा त्याच्या अमात्यासही खरें वाटेना. त्याचा एक अमात्य कौंजायन म्हणालाः—

"हा पुरुष सुंदर आहे परंतु त्याला त्या सौंदर्याचा अभिमान कांहींच वाटत नाही, तरुण असून त्याला अहंकार नाही. शूर असून मोठा सभ्य आहे, सुकुमार परंतु बलवान् असा आहे. आणि भय कसें तें त्याच्या गांवींही नाहीं.".

दुसरा अमात्य भूतिक म्हणालाः— "त्याचें सौंदार्य अलौकिक, त्याची वाणी ब्राह्मणासारखी, त्याचें तेज, त्याचें सौकुमार्य, त्याचें बल हीं क्षत्रियासारखीं आहेत. असें असून जर तो खरोखरीच चांडालकुलांतला असेल, तर आमचा शास्त्राभ्यास आणि आमची परीक्षा हीं अगदीं व्यर्थ होत."

सचिवांनी वर्णन केलेल्या त्याच्या या गुणांचें वर्णन ऐकून राजालाही तें सर्व खरेंच वाटलें आणि त्यानें त्यांना सांगितलें कीं, "तुम्ही त्याच्याबद्दल आणखी पूर्ण चौकशी करा. तुम्ही सांगतां असले गुण ज्याच्या अंगीं असतील तो चांडाल कसा म्हणावा? तो तशाच कांहीं कारणानें आपलें कुल लपवून ठेवीत असेल. चौकशीअंतीं सर्व खरा मजकूर समजून येईल. तोंपर्यंत आतां का शीराजाच्या दूताची पाठवणी करून देऊं. मुलगी अजून लहान आहे, तेव्हां सध्यांच तिचा व आमचा वियोग होणें इष्ट वाटत नाहीं म्हणून कळवूं."

अशीं बोलणीं होत आहेत तों राजाच्या स्नानाची वेळ झाली अशी नौकरांनीं वर्दी दिली. राजा उठला आणि "राजाची पदवी किती जबाबदारीची आहे! त्याला किती प्रकारें दक्ष रहावें लागतें! त्यानें,

पाळावा धर्म आधीं, कथिति सचिव तें
आत्मबुद्धी करावें,
झोंकावें रागलोभा सदय अदय वा
काळ पाहोनि व्हावें।
जाणावे लोकहेतू रिपुचरित तसें
चारनेत्रीं पहावें,
रक्षावे प्राण यत्नें परि रणिं रिघतां
तेहि वेळीं त्यजावे॥

अशी स्थिति आहे." अशा प्रकारचे उद्गार काढून राजा स्नानास गेला.

आपल्याला ज्या पुरुषानें मदमत्त हस्तिरूप काळाच्या दाढेंतून ओढून काढून त्या

काळाचा राग आपल्यावर ओढून घेतला त्या पुरुषाला कुरंगीनें मनानें वरिलें व ती त्याच्याकरितां झुरणीस लागली.

कुरंगी फार झुरणीस लागली हें पाहून तिच्या दाईस फारच वाईट वाटलें. त्याच प्रमाणें तिच्या विश्वासांतल्या कांहीं दासी होत्या त्यांनाही तिची फारच कींव आली. तेव्हां त्या सर्वांनीं मिळून असें ठरविलें कीं कांहीं तरी युक्ति करून त्या सुंदर पुरुषाला शोधून काढून कुमारीमहालांत आणून कुरंगीचा व त्याचा योग घडवून आणावयाचा. त्याचप्रमाणें कुरंगीची धात्री आपल्या कन्येला बरोबर घेऊन अविमारकाच्या शोधासाठीं निघाली.

इकडे अविमारकाची अवस्थाही कामानें फारच विव्हल झाली होती. तोही भ्रमिष्टासारखा होऊन आपल्याशींच शोक करी व आपल्या स्थितीबद्दल देवाची निंदा करीत काळ कंठीत होता. आपण चांडालकुलांतले, आणि कुरंगी राजकन्या तेव्हां आपली मनीषा पूर्ण व्हावी तरी कशी? होणें शक्य नाहीं. असें म्हणून निराशेनें शोकोद्गार काढीत असतां कुरंगीची धात्री त्याच्या घराचा तपास करीत करीत त्याच्या घरीं आली व त्याची गांठ घेऊन तिनें त्याला राजवाड्यांत कुमारीमहालांत रात्रीं येण्याविषयीं विनंति केली. वाड्यांत आल्यावर गुप्तपणें कुरंगीची व त्याची गांठ घालून देण्याचें आश्वासन दिलें. वाड्यांत त्या रात्रीं विशेषसे पहारे असणार नाहींत अशी वेळ तिनें त्याला सांगितली आणि त्या पहाऱ्यांतही कोणते शब्द उच्चारले असतां त्याचा प्रवेश होईल ते सांकेतिक शब्द तिनें त्याला सांगून दिले. मग अविमारकाच्या हर्षाला काय विचारतां! त्यानें आपण अगदीं नेमक्या वेळीं तेथें येतों असें धात्रीस अभिवचन दिलें. तें अभिवचन कसें पार पाडावयाचें याच्याबद्दल आपला मित्र विदूषका याबरोबर वाटाघाट केली, आणि चोराचा वेष घेऊन राजवाड्यांत प्रवेश करून घेण्याचें ठरविलें. अविमारक हा फार शूर व साहसी होता. आणि त्यांत कामानें अंध झालेला. मग काय विचारतां? त्यानें अगदीं जय्यत तयारी केली. त्याचा मित्र विदूषक याला त्याच्या साहसाचा परिणाम काय होईल याबद्दल भय वाटलें, म्हणून त्यानें आपण तुझ्याबरोबर येतों, एकास दोघे असलों म्हणजे बरें, असें आपल्या मित्रास सांगितलेंही. परंतु दुसऱ्याच्या घरांत गुप्तपणें शिरावयाचें असलें, तर तें एकट्यानेंच शिरलें पाहिजे. कांहीं गुप्त मसलत करावयाची असली तर ती दोघांनीं करावी, आणि लढाई मात्र अनेकांनीं करावी, अशी नीति सांगून व कुंतिभोज राजाचें सैन्य थोडें आणि तेंही बेताबाताचेंच शूर आहे, त्याचप्रमाणें साहसी पुरुषांनीं सहज त्यांत शिरावें असा त्याचा वाडाही आहे, हस्ताहस्तीची वेळ आली तरी पुष्कळांचा समाचार घेण्याला आपण समर्थ आहों, वगैरे बोलून विदूषकाची समजूत घालून त्यानें राजवाड्यांत संकेत केल्या वेळीं चोराच्या वेषांत प्रवेश करून घेण्याची तयारी चालविली.

इकडे अविमारकाचा ध्यास लागलेली कुरंगी अगदीं तिन्हीसांजा झाल्या असें पाहून शयनागारांत गेली. तिची इच्छा ही कीं, आपल्या शय्येवर पडून प्रियजनाच्या चिंतनांत काळ कंठावा. परंतु तितक्यांत तिला दोघी दासींच्या भाषणांत असें कळलें कीं, काशीराजाचा पुत्र जयवर्मा याला आपला पति नेमस्त करून वाङ्निश्चयसुद्धां झाला. मात्र "माझी मुलगी लहान आहे, तिचा व माझा वियोग क्षणभरसुद्धां मला सहन होणार नाहीं.

करितां जामातालाच इकडे आणवा." असें कुरंगीच्या आईनें म्हटल्यामुळें तशी व्यवस्था करण्यासाठीं अमात्य भूतिक जामातास इकडे आणण्यास मूळ म्हणून गेला आहे, असें कळल्याबरोबर आजचें मरण उद्यांवर गेलें, असें कुरंगीस वाटलें.

इतक्यांत तिच्या धात्रीची कन्या नलिनिका ही आपल्या आईचा निरोप कुरंगीस सांगण्यास आली. आपण अविमारकाचा शोध लावून त्याला तिची कामपीडित अवस्था सांगितली व त्यानें मध्यरात्रीच्या सुमारास कन्यांतःपुरांत प्रवेश करावा अशी सर्व व्यवस्था केली आहे, हा तो निरोप होता. तो तिनें कुरंगीच्या कानांत सांगतांच तिला आनंद झाला व खेदही झाला.आपली मनीषा पूर्ण होणार याबद्दल हर्ष, परंतु तो चांडालकुलांतला याबद्दल खेद. तथापि तो कांहीं खरोखर चांडाल नव्हे असें तिला व विश्वासांतल्या सर्व दासींना वाटत होतेंच. अशा गोष्टी चालल्या आहेत अशा समयालाच कुरंगीला थोडीशी झोंप लागण्याचा संभव दिसूं लागला. म्हणून त्या दासी थोड्या बाहेर चतुःशालेंत जाऊन बसल्या.

इतक्यांत हातांत तलवार व दोर वगैरे घेतलेला आणि चोरवेषांत असलेला अविमारक मोठ्या साहसानें आणि चातुर्यानें तेथपर्यंत तर येऊन पोंचलाच. त्यानें लागलीच हातांतले दोर एका कोंपऱ्यांत फेंकून दिले. आगला चोराचा वेष काढून टाकला आणि बरोबर आणिलेला चांगला पोषाख त्यानें अंगावर चढविला. तो अशा प्रकारें येणार म्हणून नलिनिका वाट पहातच होती, त्याला पाहिल्याबरोबर तिनें त्याला कुरंगी बसली होती तेथें नेलें व बाजूस उभें केलें. कुरंगीला झोंप कुठली? तिला नलिनिकेनें अविमारक येण्याची वेळ सांगून ठेविली होती यामुळें नलिनिका दृष्टीस पडतांच तिनें पहिला प्रश्न विचारला तो "किती प्रहर रात्र झाली?" हाच होय. अर्धरात्र झाली असें तिनें उत्तर देतांच तिची निराशा झाली आणि ती फार खिन्न झाली आणि "आतां तो येत नाहीं, मी तर थकून गेलें; आतां पडतें जरा. मला आलिंगन दे." असें नलिनिकेला म्हणाली.

ही वेळ अविमारकानें पुढें होण्याला योग्य असें समजून तिनें त्याला पुढें होण्याची सूचना केली. तो पुढें झाला. ही नलिनिकाच आहे असें समजून कुरंगीनें त्याला गाढ आलिंगन दिलें. त्याबरोबर ती दचकली आणि हा नलिनिकेचा स्पर्श नव्हे असें वाटून घाबरली. आपलें चारित्र्य भ्रष्ट झालें असें वाटून तिला खेद झाला; परंतु अविमारकानें तिची समजूत केली. तेव्हां तिनें झाल्या गोष्टीबद्दल पुढें विशेष विचार केला नाहीं. ती व तो आनंदांत लवकरच गढून गेलीं.

परंतु हा आनंद फार काळ टिकला नाहीं. कन्यांतःपुरांत कोणी तरी पुरुष शिरला आहे असें राजाच्या कानीं थोड्याच दिवसांत गेल्याकारणानें आतां आपणास येथें राहणें सुरक्षित नाहीं असें पाहून अविमारकास तेथून पळून जावें लागलें. अर्थातच कुरंगी अतोनात शोकविव्हल झाली. त्यांत आणखी असेंही झालें कीं, काशिराजाचा पुत्र जयवर्मा–राजानें ठरविलेला कुरंगीचा भावी पति–यास घेऊन अमात्य भूतिक परत आल्याची बातमी आली, तेव्हां आतां आपणांस मरणाखेरीज दुसरा कांहींही उपाय राहिला नाहीं असें कुरंगीच्या मनानें घेतलें.

इकडे अविमारकाचीही तशीच व्यवस्था झाली. आतां आपणही आपला जीव ठेवण्यांत तात्पर्य नाहीं असा मनाचा निर्धार

करून एका उंच डोंगराच्या कड्यावरून उडी टाकून प्राण द्यावा असा त्यानें बेत केला. व त्याप्रमाणें एका पर्वताच्या फा[illegible] भयंकर अशा कड्यावर जाऊन तेथून खालीं उडी टाकण्याची तयारी केली.

इतक्यांत त्या पर्वतावर वनविहार कर[illegible]ण्यास आलेलें एक विद्याधराचें (यक्षाचें) जोडपें तेथें आलें, त्याचें लक्ष्य त्याच्याकडे गेलें. कोण विचारा, काय दुःख झाल्यामुळे एवढा जिवावर उदार झाला आहे पहावें व त्याला विचारावें तरी, असें मनांत आणून तो विद्याधर त्या अविमारकाच्या जवळ आला अविमारक उडी टाकण्यासाठीं आपलें अं[illegible] पुढें झोंकून देण्याच्या अगदीं बेतांत होत[illegible] इतक्यांत विद्याधरानें त्याला मागें ओढलें [illegible] "कांरे बाबा इतका आपल्या जिवावर उदा[illegible] झालास ?" असें मोठ्या प्रेमानें व कळक[illegible]ळीनें त्यास विचारलें.

आपली कींव करून हा यक्ष आपल्या[illegible] एवढें विचारतो आहे, तर त्याच आपल[illegible] खरी हकीकत सांगावी असें मनांत येऊ[illegible] अविमारकानें त्याला सगळी हकीकत सांगि[illegible]तली. तेव्हां या साहसी पुरुषाला आप[illegible] साहाय्य करावें असें त्या विद्याधराला वाटू[illegible] त्यानें अविमारकास म्हटलें:—

"मित्रा, असा निराश होऊं नको, [illegible] तुला एक विलक्षण सामर्थ्याची अंगठ[illegible] देतों. या अंगठीचा असा गुण आहे कीं, ती उजव्या करांगुलींत घातलीस तर तूं कोणालाही दिसणार नाहींस आणि मग खुशाल जिथें वाटेल तिथें संचार कर. इतकेंच नव्हे तर ही आंगठी आपल्या हातांत घालून तूं ज्याला शिवशील तो व तो ज्याला शिवेल तो असे तुम्ही तिघेजण अदृश्य व्हाल. तेव्हां पुनः अंतःपुरांत जातांना आत्मसंरक्षणाकरितां आणखी दोघांना घेऊन गेलास तरी तेही तुझ्याप्रमाणेंच अदृश्य होतील, आणि जेव्हां अदृश्यरूपांत रहावयाचें नाहीं असें तुला वाटेल, तेव्हां ती आंगठी उजव्या हातची डाव्या हातांत घातलीस म्हणजे पुनः दृश्य होशील."

अविमारकास त्या अंगठीच्या या विलक्षण प्रभावाबद्दल एकदम विश्वास पटेना. तेव्हां विद्याधरानें त्याला तसा प्रयोगही करून दाखविला. तें पाहतांच अविमारकास आनंद झाला आणि त्यानें त्या अंगठीचा स्वीकार केला. लागलीच त्या अंगठीच्या साहाय्यानें आपण व मित्र विदूषक दोघेही अदृश्य होऊन कुरंगीच्या अंतःपुरांत गेले. इकडे तिला आपल्या प्रिय पतीचा विरह सहन होईना आणि बाप तर जयवर्म्याशीं लग्न लावून देण्याची तयारी करीत आहे असेंही कळलें, तेव्हां त्याच वेळीं तिनें आपल्या गळ्याला उत्तरीयाचा फांस लावून घेऊन आत्महत्या करण्याचा निश्चय केला. कांहीं ना कांहीं निमित्त काढून तिनें आपल्याजवळून आपल्या सर्व सख्यांना व दासींना दूर पाठविलें. आणि तिनें आपलें उत्तरीय घेऊन त्याचा फांस करून तो आपल्या गळ्याला बांधलाही. आतां क्षणांत तो घट्ट आंवळून ती प्राण देणार इतक्यांत अविमारक तेथें येऊन उभा राहिला आणि त्यानें तिला सोडवून आलिंगन दिलें ! पुनः एकदां आनंदीआनंद झाला.

इकडे असें झालें कीं, कुंतिभोजराजाचा म्हणजे कुरंगीच्या पित्याचा मेहुणा सौवीरराज जो आपल्या पुत्रासह कोणीकडे नाहींसा झाला होता तो प्रकट झाला. प्रकट झाला असें म्हणण्याचें कारण तो चांडालवेषांत रहात होता. तो वेष त्यानें टाकला हें होय.

तो व त्याचा पुत्र असे दोघे एका वर्षापूर्वी एकदां मृगयेला गेले असतां त्यांच्या

हातून दीर्घतपा नांवाच्या एका महा प्रभाव-वान् तपोनिष्ठ ऋषीचा कांहीं अपराध झाला होता. त्यामुळें संतप्त होऊन दीर्घतपा ऋषीनें त्याला शाप दिला होता कीं, 'तूं व तुझा पुत्र असे दोघेही चांडाल व्हाल.' तो शाप दिल्यावर राजा त्या ऋषीस शरण गेला असतां त्या ऋषीनें त्याला उःशापही दिला होता कीं, 'हा माझा शाप तुम्हांला एक वर्ष-भरच भोगावा लागेल.' तें वर्ष संपलें. तसें तें संपतांच तो पूर्ववत् राजा म्हणून प्रगट झाला. अविमारक हा त्याचा पुत्र, तो मात्र कन्यां-तःपुरांत जाऊन बसल्याकारणानें त्याचा पत्ता लागला नाहीं. आणि त्यामुळें आपला पुत्र कोठें नष्ट झाला अशी त्याची समजूत होऊन तो पुत्रशोकानें फार विव्हल झाला.

कुंतिभोज राजाचा पहिला विचार सौवीर-राजाचा मुलगा अविमारक यासच आपली कन्या कुरंगी द्यावयाची असा होता, परंतु त्याचा व त्याच्या बापाचा पत्ता नाहीं, या मुळेंच केवळ त्यानें आपला दुसरा मेहुणा काशीराज याच्या पुत्रास कुरंगी देण्याचें ठरविलें होतें.

आतां सौवीरराजा प्रकट झाला तेव्हां अविमारकही प्रकट होईल तर फार चांगलें होईल, असें त्याच्या मनास वाटलें. परंतु अविमारकाचा पत्ता नाहीं. यामुळें आतां काय करावें हें त्यास समजेना. तो फार विवंचनेंत पडला. सौवीरराजाला त्यानें आमं-त्रण करून आणलें आणि दोघेही अविमार-काचा शोध करूं लागले. परंतु कोठेंही पत्ता लागेना. तेव्हां ते अत्यंत निराश व दुःखित झाले.

इतक्यांत नारदऋषि तेथें त्यांच्याकडे आले व आपण अविमारकास आणून तुमची व त्याची भेट करवितों असें त्यांनीं सांगितलें. त्याप्रमाणें त्यांनीं केलेंही. कन्यांतः-पुरांतून त्याला बाहेर आणलें. कुंतिभोज राजास आनंद झाला हें सांगावयास नकोच. अविमारकास आपली कन्या द्यावयाची असा त्याचा मोठा हेतु, परंतु काशीराजाची मागणी मान्य करून त्याच्या पुत्रास विवा-हाकरितां आणविलेंही होतें. तेव्हां त्याला दूर सारावयाचा कसा, ही मोठीच विवंचना त्यांना पडली. परंतु त्याही संकटापासून नारदांनीं त्यांस सोडविलें. अविमारक हा वस्तुतः सौवीरराजाचा पुत्र नव्हे. काशी-राजाचा ज्येष्ठ पुत्र असें त्यांनीं सांगितलें. सौवीरराजाची पत्नी आणि काशीराजाची पत्नी या दोघी कुंतिभोजाच्या बहिणी-दोघींही एकाच वेळीं गर्भवती होत्या. सौ-वीरराजाची पत्नी प्रसूत झाली तेव्हां तिला झालेलें अपत्य जन्मतःच मृत्यु पावलेलें होतें. त्याच वेळीं काशीराजाची पत्नी प्रसूत झाली आणि तिला कांहीं कारणानें आपल्यास पुत्र झाल्याचें बाहेर कळूं द्यावयाचें नव्हतें, यामुळें तिनें आपला पुत्र आपल्या बहिणीस दिला. ही गोष्ट कोणास माहिती नव्हती, ती नारदांनीं आपल्यास माहिती आहे असें सांगून अविमारक हा जयवर्म्याचा वडील भाऊ, तेव्हां वडील भावाला देऊं केलेली कन्या धाकट्या भावास देणें हें अशास्त्र आहे असें सांगितलें. अर्थात् सर्व अडचणी दूर होऊन अविमारक आणि कुरंगी यांचा विवाह ठरला. राजा कुंतिभोज याला अ-त्यानंद झाला आणि नारदमुनींच्या आशी-र्वादांनीं तो विवाहसमारंभ उत्तम प्रकारें पार पडला.

पहिल्या अंकांत कुरंगीला हत्तीच्या तडा-ख्यांतून अविमारकानें वांचविलें. राजाला ही हकीकत समजल्यावर त्यालाच आपली मुलगी द्यावी असा त्यानें विचार केला. पण

तो चांडालकुलोत्पन्न असल्याचें ऐकून त्याला फार खेद झाला.

दुसऱ्या अंकांत कुरंगीच्या धात्रीनें अविमारकास भेटून त्याला कुरंगीचें तुझ्यावर प्रेम बसलें आहे असें कळवून तिला भेटावयाला त्याला बोलाविलें.

तिसऱ्या अंकांत अविमारक कुरंगीला जाऊन भेटला आहे.

चवथ्या अंकांत अविमारकाचा कन्यांतःपुरांतील निवास स्फुट झाल्यामुळें त्याला तेथून पळून जावें लागलें. नंतर निराश होऊन तो आत्महत्या करावयास सिद्ध झाला असतां एका विद्याधरानें त्याला एक गुप्त होण्याची अंगठी दिली, आणि त्या अंगठीच्या प्रभावावर अविमारक पुन्हां कुरंगीला भेटावयास गेला.

पांचव्या अंकांत कुरंगीही निराशेनें आत्मघातास प्रवृत्त झाली असतां अविमारक तिला भेटून आनंदित करितो.

सहाव्या अंकांत अविमारकाच्या चांडालत्वाचा काल संपून तो प्रगट होतो आणि कुरंगीशीं त्याचें यथाविधि लग्न होतें.

... ग्रंथ संग्रहालय ...

# चारुदत्त.

शूद्रक राजाच्या मृच्छकटिक नाटकामुळें चारुदत्त आणि वसन्तसेना हीं नांवें अजरामर झालीं आहेत. भासाचीं नाटकें प्रसिद्ध होईपर्यंत मृच्छकटिक नाटक हें कोणत्या तरी कवीनें स्वतंत्र कथानक रचून किंवा एखादी समकालीन कथा घेऊन तीवर रचिलेलें शूद्रकाचें म्हणून प्रसिद्ध केलेलें प्रकरण होय, अशी समजूत होती. मात्र दरिद्री चारुदत्त नांवाचें एक भासकविकृत नाटक आहे असे ग्रंथांतरीं उल्लेख होते. आतां तें नाटक प्रसिद्ध झालें आहे. त्यांतलें कथानक आणि मृच्छकटिकाचें कथानक एकच. फरक इतकाच कीं, चारुदत्त नाटक चार अंकी असून तें वसंतसेना चारुदत्ताच्या घरीं त्यास आपलें प्रेमभांडार अर्पण करण्यासाठीं जाण्यास निघाली आहे येथेंच तें संपलें आहे. परत जातेवेळीं ती चुकून शकाराच्या प्रवहणांत बसून जाते, शकाराच्या हातीं सांपडते, तो तिला मारून मृतवत् सोडून जातो, नंतर चारुदत्तावर वसंतसेनेचा खून केल्याचा आळ घालून त्यास शिक्षा करवितो, परंतु शूलारोपणाच्या ऐन वेळीं वसंतसेना मूर्तिमंत उभी राहिल्यामुळें शेवट गोड होतो; तितक्यांतच राज्यक्रांति होऊन पहिली बेबंदशाही मोडून चांगला राजाही येतो, इत्यादि पुढचे कथाभाग प्रस्तुत चारुदत्त नाटकांत नाहींत. यांत जितकें कथानक आहे तितकें आतां वाचकांस सादर करतों.

नाटकाचा प्रस्ताव कवीनें मोठ्या खुबीनें केला आहे. सूत्रधार मोठ्या पहांटेचा कांहीं कामासाठीं बाहेर गेला होता, तो आपलें काम करून थकून भागून घराकडे निघाला. त्याला अतोनात भूक लागली होती. घरीं आला तों तेथें त्यास निराळाच थाट दिसला. कांहीं तरी मोठा जेवणाखाणाचा समारंभ असावा आणि घरांतील माणसांची स्वयंपाक वगैरे करण्याची खूप धांदल उडून रहावी तशी त्याच्या घरांत अगदीं धांदल उडून राहिलेली दिसली. जिकडे तिकडे साखरभातादि पक्वान्नांचा घमघमाट सुटलेला आणि कढया इकडून तिकडे ओढीत नेल्यामुळें जमिनीवर काळे पट्टे उठलेले. तेव्हां हा आहे तरी काय थाट ? कुटुंबाला बोलावून विचारूं तरी या, असें म्हणून त्यानें आपल्या पत्नीस हाक मारिली व ती येतांच तिला विचारलें: “ प्रिये, कांहीं बाळरोटीची तजवीज आहे का आपल्या घरांत ? ”

नटीनें चटकन् उत्तर दिलें “ हो आहे. ”

**सूत्रधारः**—ठीक ठीक. अशीच सुंदर अन्नदात्री हो.

**नटीः**—आर्य, मी आपली वाटच पहात बसलें आहें.

**सूत्रधारः**—मीं विचारलं तें आहेना ?

**नटीः**—हो, आहे तर.

**सूत्रधारः**—तुझं देव भलं करो. काय काय आहे ?

**नटीः**—तूप आहे, गूळ आहे, दहीं आहे, तांदुळ आहेत.

**सूत्रधारः**—हें सगळं आपल्या घरीं आहे ?

**नटी**:—छे, छे! बाजारांत.

**सूत्रधार**:—आः! दुष्टे, तुझ्या आशांचा असाच उच्छेद होवो. मर. भयंकर वाऱ्याच्या जोरानें पर्वतापासून ढासळून पडणाऱ्या शिळे-सारखाच माझा प्रकार केलास.

**नटी**:—नका, भिऊं नका. क्षणभर वाट पहा. सगळं कांहीं घरीं आणलं आहे. आतां स्वयंपाक होईल. आज माझ्या उपासाचं पारणं आपण पार पाडलं पाहिजे.

**सूत्रधार**:—या तुझ्या उपवासाचं नांव काय?

**नटी**:—अभिरूपपति.

**सूत्रधार**:—या जन्मांत कीं पुढच्या असा पति मिळायचा?

**नटी**:—पुढच्या.

**सूत्रधार**:—हा उपास करण्याचा उप-देश तुला कोणीं केला?

**नटी**:—चूर्णगोष्टभटजींनीं.

**सूत्रधार**:—भले. चूर्णगोष्टभटजी भले!

**नटी**:—आर्या, आपली अनुज्ञा असली तर माझ्या मनांतून आपल्याजोगा एक ब्राह्मण जेवायला बोलवायचा आहे.

**सूत्रधार**:—धर्माचीच गोष्ट आहे. मला-ही खायला मिळेल. जा तर आंत तयारी कर. मी आपल्याला योग्य असा गरीब ब्राह्मण पाहून आणतों.

'बरें आहे' असें म्हणून नटी जाते आणि सूत्रधार आपल्याजोगा गरीबसा ब्राह्मण कोठें मिळेल याबद्दल विचार करीत चालला आहे तों त्याला चारुदत्ताचा मित्र मैत्रेय नांवाचा ब्राह्मण दिसला. चारुदत्तास दारिद्रावस्था आलेली, आणि त्याचा हा ब्राह्मण आश्रित. तेव्हां आपल्याजोगाच हा गरीब ब्राह्मण आहे, यालाच आमंत्रण द्यावें, असा विचार करून त्यानें त्यास मोठ्यानें हांका मारून म्हटलें, "मैत्रेयभटजी, अहो मैत्रेयभटजी, मी तुम्हांला आज भोजनाचें आमंत्रण देतों आहें. मी दरिद्री म्हणून माझ्या आमंत्रणाचा अव्हेर करूं नका, चांगलं चमचमीत भोजन मिळेल. तूप, गूळ, दहीं, भात सर्व कांहीं यथास्थित आहे. आ-णखी दक्षिणाही ठीक मिळेल."

मैत्रेय भटजींनीं दुरूनच त्याला म्हटलें, "बाबारे, तूं आपला दुसरा ब्राह्मण बघ. मला दुसरीकडचं आमंत्रण आहे."

सूत्रधार त्यावर त्यास म्हणतो, "तूप, गूळ, दहीं यांची चंगळ आहे. सुवासिक द्रव्यें ज्यांत घातलीं आहेत असा भात केला आहे. हें सारें चांगलें सत्कारपूर्वक वाढूं तें खायला ये."

असें म्हणून सूत्रधार जातो व आर्य मैत्रेय ऊर्फ विदूषक रंगभूमीवर येऊन म्हणतो "बाबारे, कां उगीच माझ्या तोंडाला पाणी सुटेल असें अन्नाचें वर्णन करून मला मोह घालायला पहातोस? चांगल्या दक्षिणेची आशा कशाला लावतोस? जा, मी दुसरीकडे गुंतलों आहें."

मैत्रेयभटजी चारुदत्ताच्या श्रीमंतीच्या दिवसांत त्याच्या घरीं नानाप्रकारचीं अन्नें खाऊन तुष्ट झालेला; परंतु आतां चारुद-त्ताला दारिद्र्य आलें यामुळें बाहेरचीं आमं-त्रणें घेऊन आपला निर्वाह करूं लागला होता. परंतु त्यानें त्याची मैत्री मात्र सोडली नव्हती. पारव्याप्रमाणें सारा दिवस कोठें तरी हिंडून भोजन वगैरे साधून तो चारुदत्ताच्या आश्रयाला येत असे. आपला भार चारुदत्तावर पडूं नये अशाबद्दल तो फार दक्ष असे. पण त्याचा आश्रय सोडून गेला नव्हता. त्याची

मित्रनिष्ठा फार जाज्वल्य होती. विदूषक सूत्रधारास भेटला, तो चारुदत्ताच्या घराकडेच चालला होता. या प्रस्तावनेंत सूत्रधाराकडून चारुदत्त जो नायक त्याच्या दारिद्र्याची गोष्ट श्रोत्यांस सहज सांगून दिली. असो.

एके दिवशीं सायंकाळीं आपल्या द्वाराबाहेर नित्याप्रमाणें बलि टाकण्यासाठीं चारुदत्त गेला असतां विदूषक त्याच्याबरोबर होता. तेथें उगवलेल्या गवताकडे पाहून त्याला आपल्या पूर्वींच्या वैभवाचें स्मरण झालें. पूर्वीं बलिहरण झालें म्हणजे तो खाण्यासाठीं म्हणजे त्याच द्वारापाशीं हंस, सारस वगैरे पक्ष्यांची अगदीं गर्दी उडून जावयाची, त्याच ठिकाणीं आपण किड्यामुंग्यांनीं खाल्लेल्या बीजांचा अंजलि देतों, असें मनांत येऊन चारुदत्त फार खिन्न झाला. पूर्वीं उत्तम प्रकारची श्रीमंती भोगली, आपल्या धनाचा सत्कार्यांत व सत्पात्रीं दान करण्यांत व्यय केला, आश्रयहीनांना आश्रय दिला, कोणालाही कधीं विमुख पाठविलें नाहीं, यामुळें जवळचें द्रव्य नाहींसें झालें, आणि दारिद्र्य प्राप्त झालें. चारुदत्त फार विचारी व सच्छील असा होता. त्याला दारिद्र्य आल्याचें कांहीं दुःख वाटत नसे. परंतु मनुष्य दरिद्री झाला कीं त्याची मानखंडना होते, आप्तजन त्याला सोडून जातात, इतर जन त्याची हेटाळणी करूं लागतात, नसते दोष त्याच्या अंगीं लावतात, इत्यादि गोष्टी मनांत येऊन त्याला फार दुःख होत असे. आज अशाच कांहीं कारणावरून त्याची वृत्ति फार खिन्न झाली होती. विदूषकानें त्यास आतां "उगीच खेद कशाला करतोस? तुला दारिद्र्य आलें आहे तरी तूं मन्मान्यच आहेस. ज्याप्रमाणें शरीराला त्याचप्रमाणें मनुष्याच्या स्थितीलाही क्षयादि आहेतच." अशा समाधानाच्या गोष्टी सांगितल्या.

तेव्हां चारुदत्तानें आपणास दारिद्र्याचें कांहीं वाईट वाटत नाहीं, वाईट वाटतें तेजोभंगाचें व स्वजनविरहाचें, असें विदूषकास सांगितलें. आणि त्याचसंबंधांत एकमेकांचीं भाषणें चाललीं असतां, बाहेर रस्त्यावरच्या दाराशीं वसंतसेना नांवाची उज्जयिनींतील वेश्या धांवत धांवत आली. तिच्या पाठीमागें राजाचा मेहुणा शकार व त्याचा सेवक विट हे तिला धरण्यासाठीं लागले होते.

शकार हा एक पक्का मूर्ख होता. त्याला वसंतसेना प्राप्त व्हावी म्हणून नाद लागला होता. वर सांगितल्या रात्रीं ती आकस्मिकपणें दिसली, त्याबरोबर त्यानें व त्याच्या विटानें तिचा पाठलाग सुरू केला.

हा पाठलाग करतां करतां तीं मंडळी चारुदत्ताच्या घरापाशीं आली तों चारुदत्तांचे घराचें दार उघडें दिसलें. चारुदत्त नुकताच आंत गेला होता, विदूषक व दासी हीं दोघें मात्र दारांत होतीं. वसंतसेना अंधारांत त्या घरांत शिरली ती थेट आंत कोठें तरी गेली. मागोमाग शकार व त्याचा विट हे आले. ते येतात, तों वसंतसेना पार गेलीच होती. परंतु दारांत चारुदत्ताची दासी उभी होती. तिलाच वसंतसेना समजून विटानें व शकारानें तिचे केंस धरून तिला ओढली, तेव्हां चेटी मोठमोठ्यानें ओरडूं लागली. हा स्वर वसंतसेनेचा नव्हे असें शकारास वाटलें व तें त्यानें आपल्या विटासही सांगितलें. परंतु विटानें त्याला म्हटलें:—

"अरे बाबा, हीं वसंतसेना अस्सल वेश्या. ही गायननृत्यादि कला आणि रंगभूमीवर सोंगें घेऊन नाटक करण्याचीही कला शिकलेली. तेव्हां तिला स्वर बदलण्याला काय अडचण आहे? ओढ तिला बाहेर, सोडूं नकोस."

तें ऐकतांच शकारानें तिचे केंस धरून तिला ओढलें. इतक्यांत विदूषकानें 'हें काय? हें काय?' असें म्हणून विटाला सांगितलें, "ही तुम्ही म्हणतां ती वसंतसेना नव्हे. ही आर्य चारुदत्ताची चेटी आहे. तुमची वसंतसेना दुसऱ्या कोठें शोधा." विट मैत्रेयास ओळखीत होता. तेव्हां त्यानें "झाली गोष्ट ही अगदीं गैरसमजुतीनें झाली. त्याबद्दल आपण क्षमा करा, आणखी झाला वृत्तांत चारुदत्ताच्या कानीं जाऊं देऊं नका." असें नम्रपणानें बोलून मैत्रेयाची माफी मागितली.

परंतु शकारास तें आवडलें नाहीं. तो विटास म्हणतो: "विटा, लेका तूं त्या भिकारड्याला इतका भितोस कां? ए भटा, तूं त्या तुझ्या भिकारड्या चारुदत्तास सांग, तुझ्या घरांत दागदागिन्यांनीं भरलेली अशी ती नायकिणीची पोरगी वसंतसेना शिरली आहे. तिला तावडतोब माझ्या वाड्यांत आणून पोंचती कर, नाहीं तर बघ, मी राजश्यालक शकार आहें."

इकडे वसंतसेना जेव्हां आंत गेली, तेव्हां चारुदत्तास वाटलें ही आपली दासी रदनिकाच आली, म्हणून त्यानें तिला विचारलें, "रदनिके, ठेवलाना बळी चतुष्पथावर?"

या प्रश्नानें वसंतसेनेस वाटलें कीं, "मी यांची दासीच आहें असें समजून हे बोलताहेत. हें एक ठीकच झालं. माझं रक्षण झालं."

चारुदत्त तिला रदनिकाच समजून आणखी पुढें म्हणाला, "आज या संध्याकाळीं फार उकडतं आहे, वारा व्यावासा वाटतो आहे, तर हा माझा शेला घे बरं!"

वसंतसेनेनें तो शेला मुकाट्यानें घेतला. त्याला अत्तरांचा वगैरे सुवास येत होता. त्यावरून ती समजली कीं हा रसिक आहे.

असा इकडे प्रकार चालला असतां चवाठ्यावर बळी नेऊन ठेवण्यास गेलेला विदूषक आणि रदनिका हीं परत आंत आलीं.

त्याबरोबर चारुदत्त चपापून म्हणतो, "मग ही दुसरी कोण? हिला मी तूंच समजून तिच्याजवळ शेला दिला." वसंतसेना चारुदत्ताकडे एकसारखी पहात होती. त्याच्यावर तिचें प्रेम जडलें होतें, परंतु त्याची आपली भेट कशी व्हावी, याबद्दल तिला विवंचना होती. ती विवंचना आज अशाप्रकारें दूर झाली.

चारुदत्तानें ही 'दुसरी कोण?' असें विचारण्याबरोबर विदूषक त्यास म्हणतो, "मित्रा, राजश्यालक शकार आतां बाहेर भेटला, त्यानं तुला असा निरोप सांगितला आहे कीं, वसंतसेना नांवाच्या नायकिणीला आह्मी बलात्कारानें ओढून नेत असतां ती तुझ्या घरांत शिरली आहे. तिच्या अंगावर दागदागिने आहेत. तिला तूं उद्यां सकाळींच माझ्याकडे पोंचीव."

आपण पुढें होण्यास ही संधि बरी आहे असें पाहून वसंतसेना पुढें झाली आणि चारुदत्ताच्या पायां पडून ह्मणते, "आर्या, मी आपल्या आश्रयाला आलें आहें. माझं रक्षण करावं."

चारुदत्तानें तिला भिऊं नको भिऊं नको म्हणून आश्वासन दिलें. त्यावर वसंतसेना त्याला ह्मणाली, "महाराज, परवानगी नसतां दार उघडें पाहून मीं आंत शिरण्याचं धाडस केलं याबद्दल मला क्षमा असावी."

**चारुदत्त**:—आणि मीही तुला न ओळखून माझ्या सेवकजनांपाशीं बोलल्याप्रमाणें बोललों त्याबद्दल तूं मला क्षमा कर. बरं तें असो. मी तर असा गरीब स्थितींत आहें तेव्हां माझ्याकडून तुला काय मदत होणार?

**वसंतसेनाः**–(आपल्याशींच) पहिल्यांनंच यांच्या घरांत अशा प्रकारानं येऊन रहाण्याची इच्छा करणं कांहीं ठीक नाहीं. तेव्हां अशी कांहीं तरी मागणी मागतें कीं, जिच्यामुळें मला यांच्याकडे पुनः यायला होईल.(उघड) आर्या, हे दुष्ट लोक दागिन्यांमुळें माझ्या मागें लागले आहेत. तेव्हां हे दागिने आपल्याजवळ ठेवावे आणखी मला घरीं पोंचविण्याची तजवीज करावी.

**चारुदत्तः**–ठीक आहे, मैत्रेया घे हे दागिने.

**विदूषकः**–नको बाबा. आपल्याला नाहीं विश्वास.

**चारुदत्तः**–घे मूर्खा.

**विदूषकः**–बरं तर आण बाई.

वसंतसेनेनें दागिने काढून दिले. चारुदत्तानें आपला एक नोकर व एक मशालजी तिच्याबरोबर देऊन तिला तिच्या घरीं पाठविलें.

वसंतसेना आपल्या घरीं आली खरी, परंतु तिला चारुदत्ताखेरीज कांहीं सुचेना. मनांत एकसारखा चारुदत्ताचा विचार. दुसरे दिवशीं ती अशीच विचार करीत बसली असतां तिची दासी तिच्याजवळ आली, तों वसंतसेना एकदम तिला म्हणाली, 'बरं मग पुढें काय झालं ?'

तें ऐकून दासीला फारच आश्चर्य वाटलें. आपण तर कांहीं यांना सांगत नव्हतों, आणि आपल्याला या असें काय विचारतात ? असें मनांत येऊन तिनें वसंतसेनेला म्हटलें, "बाईसाहेब, मी तर कांहीं बोललें नाहीं, आणि आपण पुढें काय झालं, असं काय विचारतां ?"

आपण आपल्या दासीला कांहीं विचारलें याचीसुद्धां वसंतसेनेला शुद्ध नव्हती. तेव्हां 'मीं तुला कुठें काय विचारलं ?' असेंच तिनें तिला उत्तर दिलें.

आपली यजमानीण कांहीं तरी विवंचनेंत आहे हें तर्कून दासीनें तिला म्हटलें, "बाईसाहेब, केवळ स्नेहामुळें विचारावंसं वाटतं. फाजीलपणा समजूं नका. आपल्याला कसली चिंता लागली आहे ?"

**वसंतसेनाः**–तूंच तर्क कर बरं !

**दासीः**–आपण गणिका वगैरे विचार मनांत न आणतां आपलं चित्त कोणाकडे तरी गेलं आहे.

**वसंतसेनाः**–ठीक तर्क केलास. माझी अशीच स्थिति झाली आहे.

दासीनें त्यावर तिला म्हटलें, "आपल्या वयाला हें अगदीं अनुरूपच आहे. भगवान् कामदेव म्हणजे तरुणांचा अनवगीत असा उत्सवच आहे. कोणी तरी उदार, रमणीय असा राजकुमारच आपल्या चित्ताला आला असेल ना ?"

वसंतसेनेनें यावर तिला खुबीदार उत्तर दिलें, "या प्रेमापासून मला आनंद व्हावा अशी इच्छा आहे. कोणाची सेवा करावी अशी नाहीं."

दासीनें पुढें तिला "कोणी विद्वान् ब्राम्हण आहे का ? वणिक्पुत्र आहे का ?" असे प्रश्न विचारले. शेवटीं वसंतसेनेनें तिला चारुदत्ताचें नांव सांगितलें.

दासीनें तें ऐकल्याबरोबर ती आश्चर्यचकित झाली; आणि म्हणते, "अहो, पण तो दरिद्री ! अति दरिद्री आहे !"

**वसंतसेनाः**–म्हणूनच माझं मन त्याच्यावर गेलं आहे. अशा पुरुषावर केलेलं प्रेम लबाडीचं आहे असं कुणी म्हणायचं नाहीं.

अशा प्रकारें भाषणें होतां होतां वसंतसेनेनें आपल्या दासीला आपण आपले दागिने चारुदत्ताच्या वरीं ठेवले, त्याचें कारण पुनः त्याच्याशीं दळणवळण करण्याला कांहीं तरी निमित्त सांपडावें हेंच होय असें सांगितलें. आणि आतां पुनः केव्हां जावें, कसें जावें, याचा दोघी विचार करीत बसल्या असतां दोन प्रसंग असे झाले कीं, ज्यांच्यायोगानें चारुदत्ताच्या गुणांचा विशेष उठाव होऊन वसंतसेनेच्या प्रेमादरांत भर पडली. चारुदत्ताजवळ असलेला चंपी करणारा एक पुरुष संकटांत पडून वसंतसेनेकडे कांहीं याचना करावयाला आला होता. त्याची हकीकत त्याला तिनें विचारली, तेव्हां त्यानें चारुदत्ताची सेवा आपण करीत होतों, वगैरे सांगतांना चारुदत्त किती चांगला माणूस आहे याबद्दल फार मनःपूर्वक वर्णन केलें. तो म्हणाला, “ तो सुंदर आहे, सरळ आहे, अभिमानरहित, ललित, निगर्वी, चतुर, मधुर, दक्ष असा आहे. दान करतो, परंतु त्याची कधीं बढाई मारीत नाहीं. कोणीं त्याच्यावर थोडा उपकार केला तरी त्याला फार कौतुक वाटतं. कोणीं मोठा अपकार केला तरी तो पार विसरून जातो. आणखी काय सांगू ? उन्हाळ्यांतल्या अतिशय मोठ्या दिवशीं त्याच्या गुणांचं वर्णन सारा दिवस करीत बसलों तरी त्याच्या गुणांच्या चवथ्या हिश्शाचंसुद्धां वर्णन व्हायचं नाहीं ! ”

हें वर्णन ऐकल्यामुळें तिचें मन चारुदत्ताच्या ठिकाणीं अधिकच जडलें; पुढें तिचाच चेट (दास) घाईघाईनें येऊन तिला म्हणाला, “ बाईसाहेब, आज मी मोठ्या अनर्थांतून वांचलों. माझ्या हातून आज संन्याशाची हत्या होत होती. आपला भद्रकपोतक हत्ती पुष्करिणीवरून धुऊन आणीत असतां एकदम बिथरला. त्याच्या गंडस्थलांतून मद वाहूं लागला. आणखी तो विलक्षण धांवत सुटला. तो भर पेठेंत शिरला. तेथें माणसांची गर्दी कोण ! मी माणसांना ‘ दूर व्हा ! दूर व्हा ! ’ असं पुष्कळ आरडून म्हटलं. माणसं दूर झालीं. परंतु एक अगदीं नवीं भगवीं वस्त्रं घातलेला परिव्राट् (संन्यासी) त्या हत्तीनं पाहिला आणि त्याच्या त्या भडक भगव्या वस्त्रांनीं हत्ती फारच भडकून एकदम त्याच्या अंगावर धांवला. आतां संन्यासी अगदीं चुरडला जाणार अशी स्थिति आली, तों मोठ्या धैर्यानं मीं पुढें होऊन हत्तीला परतविला आणि संन्याशाचा जीव वांचविला. हजारों लोक तें माझं कौशल्य पहात होते, आरोळ्या मारून त्यांनीं मला शाबासकी दिली. पण एकानं सुद्धां मला कांहीं बक्षीस दिलं नाहीं. एक उदार गृहस्थ मात्र माझ्याजवळ येऊन म्हणाला, ‘ गड्या, तूं या वेळीं फार शिताफी करून त्या संन्याशाचा प्राण वांचवलास, तुला याबद्दल जितकी शाबासकी द्यावी तितकी थोडीच आहे. आणखी बक्षीस द्यावं तितकंही थोडंच आहे. पण मी गरीब माणूस, माझ्याजवळ या अंगावरल्या शेल्याखेरीज कांहीं सुद्धां नाहीं. पण हा मी तुला मोठ्या आनंदानं देतों त्याचा स्वीकार कर. ’ असें म्हणून तो शेला माझ्या अंगावर टाकून चालता झाला. ”

हा उदार पुरुषही आर्य चारुदत्त असावा, असें वसंतसेनेच्या मनांत आलें आणि चौकशी करतां तेंच खरें ठरलें. वसंतसेनेच्या प्रेमाला आणखी उत्तेजनच आलें.

वसंतसेनेची दासी मदनिका म्हणून होती तिच्यावर सज्जलक नांवाच्या एका ब्राम्हणाचें प्रेम बसलें होतें. परंतु दासीबद्दल मागेल तितकें द्रव्य देऊन वसंतसेनेपासून तिला सोडविण्याला लागणारें द्रव्य त्याच्याजवळ

नव्हतें. प्रेम म्हटलें म्हणजे तें कोणास कोणचें कृत्य करण्याला प्रेरित करील याचा नेमच नसतो. आपणाजवळ मदनिकेला सोडविण्याइतकें द्रव्य तर नाहीं आणि मदनिकेचा लोभ तर सुटत नाहीं, तेव्हां कोणाचें तरी घर फोडून चोरी करून द्रव्य मिळवावें आणि तें द्रव्य वसंतसेनेला देऊन मदनिकेला सोडवावें, असा सज्जलकानें निश्चय केला. आणि त्याच रात्रीं त्यानें चोरी करण्यासाठीं एक मोठासा परंतु ज्यांत फार दासदासी नाहींत असा वाडा पाहिला. कर्मधर्मसंयोगानें तो वाडा चारुदत्ताचाच होता. सज्जलकानें मागील दारची भिंत फोडली व तो आंत शिरला. तो तडक ज्या ठिकाणीं गेला तेथें चारुदत्त आणि त्याचा मित्र विदूषक मैत्रेयभटजी हे दोघे नुकतेच कोणा चांगल्या गवयाचें गाणें ऐकून येऊन निजले होते. चारुदत्तास गाढ झोंप लागली होती. परंतु मैत्रेयभट झोंपेंत चावळत होता. वसंतसेनेनें ठेवलेले दागिने चारुदत्तानें त्याच्याजवळच ठेवायला दिले होते. "त्यांची काळजी वाहण्याचें हें काम आपल्यावर कां टाकतोस? घरांत कुटुंबाच्या स्वाधीन कां करीत नाहींस?" असें विदूषकानें चारुदत्ताला विचारलें. तेव्हां चारुदत्तानें त्यास म्हटलें, "अरे गणिकेचे दागिने अंतरंगांत कशाला?'

असलीं बोलणीं होऊन दोघेही निजले. सर्वांस झोंपा लागल्या. अशा स्थितींत सज्जलक मागील दारची भिंत फोडून चारुदत्त, विदूषक वगैरे मंडळी निजली होती तेथें आला. तों कर्मधर्मसंयोग, विदूषक अर्धवट झोंपेंत चावळतां चावळतां मोठ्यानें म्हणाला, "मित्रा, माझ्याजवळ नकोत बोआ हे दागिने, हे आपल्याजवळ नकोत."

सज्जलक प्रथम त्या चतुःशालेंत आला तेव्हां इकडे तिकडे त्यानें पाहिलें तों त्याला कांहींसुद्धां दिसलें नाहीं. आपल्यासारखाच कोणी कुलवान् पण दरिद्री झालेला हा गृहस्थ आहे, तर आपण याला पीडा देऊं नये, दुसरीकडे कोठें तरी जावें, अशा प्रकारच्या विचारांत तो होता. इतक्यांत मैत्रेयभटजींचे हे शब्द त्याच्या कानीं पडले. दागिने हे शब्द ऐकतांच त्याच्या तोंडाला पाणी सुटलें आणि तो विदूषकाजवळ जाऊन उभा राहिला. हा बोलतो आहे हा खरोखर झोंप लागली असून तींत स्वप्न पडून त्यांत चावळतो आहे कीं झोंपेचें सोंग घेऊन मला पकडण्यासाठीं कांहीं बडबडतो आहे? त्यानें विदूषकाकडे कांहीं वेळ सूक्ष्मदृष्टीनें पाहिलें, याला झोंप लागली हेंच खास असें पक्केपणें जाणलें, आणि आतां पुढें काय करावयाचें याचा विचार करणार तों विदूषक पुनः चावळतो, "अरे मित्रा, ही जबाबदारी माझ्यावर नको. पुष्कळसा पैसा घेऊन जात असतां चुकल्या रस्त्याला लागलेल्या वाण्याला जशी झोंप येत नाहीं तशीच या दागिन्यामुळें माझी स्थिति झाली आहे. तूं एकदां आपल्याजवळ घे म्हणजे मी सुटलों." ही वेळ आपणास पुढें होण्यास चांगली आहे असें पाहून सज्जलक पुढें झाला आणि विदूषकानें पुढें केलेले दागिने त्यानें हातीं घेतले. विदूषक अर्धवट झोंपेंत होता. त्यानें डोळे मिटूनच सर्व कारभार चालविला होता. चारुदत्तानेंच आपल्यापासून दागिने घेतले असें वाटून त्याला स्वस्थता वाटली. "बरं झालं. मी निर्घोर झालों. आतां आपल्या पैक्यासकट घरीं पोंचलेल्या वाण्याप्रमाणें मी सुखानं निजेन." असें पुटपुटत तो या कुशीचा त्या कुशीवर झाला. आणि पुनः घोरूं लागला.

सकाळच्या प्रहरीं दासी सडासंमार्जन करायला जाते तों तिला घराची भिंत फोडून एका माणसाला सहज आंत येण्याजोगें भोंक पाडलेलें दिसलें. अर्थातच तिनें लागलींच सर्वांस जागें करून घरांत रात्रीं चोर शिरल्याची बातमी सांगितली. ती ऐकतांच विदूषकाला आपण अर्धवट झोंपेंत असतांना केलेल्या कृत्याचें स्मरण झालें व तो एकदम चारुदत्तास म्हणाला कीं, "मित्रा, नेहमीं म्हणत असतोसना? मैत्रेय मूर्ख, मैत्रेय वेडा, आतां आज तर आम्हीं शहाणपणाची गोष्ट केलीना?"

**चारुदत्तः**—ती कोणची बोआ?

**मैत्रेयः**—ते आपले ठेवींचे दागिने तुझ्या स्वाधीन केले ही?

**चारुदत्तः**—अरे केव्हां?

**मैत्रेयः**—मध्यें एकदां जागा झालों होतों तेव्हां.

"उपटले तर मग ते दागिने चोरानं!" असें ह्मणून चारुदत्त विचार करूं लागला. आतां काय करावें? जी खरी गोष्ट घडली ती जर त्या गणिकेला सांगितली तर खरी वाटायची नाहीं. अर्थात् आतां तें त्या गणिकेला कांहीं कळूं न देतां तिची भरपाई तर केली पाहिजे. तो निर्द्रव्य झालेला, तेव्हां ती भरपाई कशी होणार? इकडे ही गडबड उडाली आहे आणि गणिकेनें ठेवलेले दागिने चोरानें नेले यामुळें आपल्या पतीस फार चिंता लागली आहे असें कळतांच चारुदत्ताच्या पत्नीनें आपल्या माहेराहून मिळालेल्या दागिन्यांपैकीं एक मोत्यांची माळ काढली आणि विदूषकास एकीकडे बोलावून त्याला म्हणाली, "गणिकेचे दागिने चोरानं नेले त्याची भरपाई करण्याची एवढी चिंता कां करावी? ही माळ त्यांच्याजवळ नेऊन दे आणि सांग कीं, ही त्या दागिन्यांच्या मोबदला पाठवून द्या."

विदूषकानें त्याप्रमाणें सांगितलें असतां चारुदत्तास फार वाईट वाटलें. इतकें दारिद्र्य आलें तरी बायकोच्या स्त्रीधनाला तो शिवला नव्हता. परंतु बायकोनें योग्य कालीं आपल्याला साहाय्य केलें याबद्दल कौतुक वाटून तो आपल्याला धन्यही मानूं लागला व ती माळ त्यानें मोठ्या कष्टानें घेतली आणि विदूषकाला लागलींच सांगितलें कीं, "तूं वसंतसेनेकडे जाऊन ही माळ तिला दे." "वसंतसेनेनें आपल्याजवळ ठेवलेल्या दागिन्यांपेक्षां माळ कितीतरी पट अधिक किंमतीची आहे आणि तूं त्या दागिन्याचा मोबदला म्हणून कसा देतोस?" असें विदूषकानें विचारलें असतां चारुदत्तानें त्याला म्हटलें, "बाबा, ज्याचा दागिना आपल्या हातून गेला, त्याला विश्वास येण्याकरितां अधिक किंमतीचा मोबदला द्यावा लागतो."

विदूषक ती माळ घेऊन वसंतसेनेकडे जाण्यास निघाला. इकडे सज्जलक विदूषक झोंपेंत असतां त्याच्या हातून वसंतसेनेचे दागिने घेऊन निघाला तो सकाळीं वसंतसेनेच्या घरीं आला. तेथें त्यानें आपली मैत्रिण मदनिका हिची भेट घेतली व सांगितलें कीं, "मी तुला सोडवून नेण्याची तजवीज करून आलों आहें. तुझें मूल्य म्हणून हीं कंकणं तुझ्या मालकिणीला दे आणि आपल्याला सोडवून घे. आपल्याला द्रव्य द्यायचं त्याच्या ऐवजीं ही कंकणांची जोडी तुमच्या हाताचं बरोबर माप घेऊन मुद्दाम आणली आहे, असं सांग." असें म्हणून सज्जलकानें तिला वसंतसेनेची रत्नकंकणें दाखविलीं. आपल्या यजमानणीचेच हे दागिने, असें

मदनिकेनें तेव्हांच ओळखलें. आणि ती एकदम त्याला म्हणाली, " हे दागिने आपल्या हातीं कसे आले ? "

त्यानें तिला उत्तर दिलें, "साहस केल्यावांचून कुठें संपत्ति मिळत असते ? "

कोठें साहस केलें, कसलें केलें या गोष्टी निवून सज्जलकानें चारुदत्ताच्या घरांत शिरून हे दागिने आणले हें तिला कळतांच तिला फार वाईट वाटलें. " कोणाला मारलं झोडलं नाहींतना—चारुदत्त व त्याची मंडळी सुरक्षित आहेना ? " अशी तिनें साहजिकच चौकशी केली. ही इतकी चारुदत्ताची काळजी कां करते हें सज्जलकास समजेना. त्याच्या मनांत भलताच संशय आला. चारुदत्ताबद्दल हिच्या मनांत प्रेम तर नाहीं ? परंतु लवकरच त्या संशयाचें निरसन मदनिकेनें केलें. आपल्या यजमानणीच्या मनांत चारुदत्ताबद्दल फार प्रेम उत्पन्न झालें आहे, आणि त्यामुळें आपल्यासही चारुदत्ताबद्दल इतकी काळजी वाटली. चेटीनें याप्रमाणें त्यास सांगितल्यावर दुसरा प्रश्न त्या दोघांपुढें उभा राहिला, तो हा कीं , आतां या दागिन्यांचें काय करावें ?

चेटीनें सज्जलकाला सांगितलें, " आतां उत्कृष्ट मार्ग म्हणजे तुम्ही हे दागिने घेऊन चारुदत्ताकडे जा व त्याला झालेली सारी खरीखरी हकीकत सांगून त्याची क्षमा मागा." परंतु ही युक्ति सज्जलकाला मानवली नाहीं. त्याला भय वाटलें कीं, आपण होऊन जाऊन चारुदत्ताजवळ चोरी केल्याचें कबूल केलें आणि त्यानें आयतेंच आपल्याला राजाधिकाऱ्यांच्या ताब्यांत दिलें तर ?

ही युक्ति त्याला मानवेना, तेव्हां चेटीनें त्याला दुसरी युक्ति सुचविली ती तर फार चांगली होती. " तूं वसंतसेनेला भेट आणि तिला सांग कीं, हे दागिने आपल्याकडे पोंचविण्याला मजजवळ चारुदत्तानें दिले. " ही युक्ति चांगलीच होती. त्याप्रमाणें करण्याचें त्यानें कबूल केलें. "आपल्या यजमानणीची व तुमची भेट करवितें. तुम्ही अंमळ एकीकडे तुम्हांला जागा दाखवितें तिकडे बसून रहा," असें म्हणून त्याला घेऊन ती बाजूला गेली.

या दोघांच—मदनिका व सज्जलक यांचें—हें भाषण चाललें असतां वसंतसेना पलीकडच्या बाजूनें जात होती. यांच्या बोलण्यांत चारुदत्ताचें व आपलें नांव आलेलें तिनें ऐकलें. यामुळें तिला हा परकी माणूस व आपली चेटी आपल्याविषयीं काय बोलताहेत हें जाणण्याविषयीं फार उत्सुकता झाली व तिनें त्यांचें सर्व भाषण आडून ऐकलें.

इतक्यांत दुसऱ्या एका चेटीनें वसंतसेनेला येऊन वर्दी दिली कीं, " आर्य चारुदात्ताकडून त्याचा मित्र मैत्रेय आला आहे त्याला आपली भेट घेण्याची इच्छा आहे. "

आर्य चारुदत्ताकडून त्याचा मित्र आपल्या भेटीला आला आहे असें ऐकतांच वसंतसेनेला अर्थातच फार आनंद झाला आणि तिनें लागलीच त्याला आपल्याकडे बोलावलें. विदूषकानें आंत आल्यावर वसंतसेनेच्या पुढें ती चारुदत्ताच्या बायकोनें चारुदत्तास दिलेली माळ ठेविली आणि तिला सांगितलें, " आपण माझ्या मित्राजवळ ठेविलेले दागिने त्यानें द्यूत खेळण्याच्या भरांत पणास लाविले आणि हरविले. परंतु आपल्या दागिन्यांचा मोबदला म्हणून ही फार किंमतीची माळ आपल्यास दिली आहे. "

वसंतसेनेनें ती माळ मुकाट्यानें ठेवून घेतली. तें पाहून मैत्रेय भटजीस फार आश्चर्य वाटलें. वसंतसेना ही खूप श्रीमंत अशी नायकीण आहे. तेव्हां आपल्या दोन दागिन्यांकरितां इतकी मोठ्या किंमतीची माळ ठेवून

घेईल असें त्यास वाटलें नव्हतें. माळ ठेवून घेतल्यानंतर वसंतसेनेनें विदूषकास जाण्यास सांगितलें. इतक्यांत सज्जलकास एका बाजूस बसवून ठेवणारी चेटी—मदनिका—आली आणि तिनें "चारुदत्ताकडून कोणी गृहस्थ कांहीं कार्यासाठीं आला आहे" असें वसंतसेनेस सांगितलें.

तिनें 'त्याला मजकडे घेऊन ये' असें सांगतांच मदनिकेनें सज्जलकास तिच्यापुढें आणलें. वसंतसेनेनें त्याला "आपण आर्य चारुदत्तांकडून काय निरोप आणला आहे?" असें विचारतां सज्जलकानें सांगितलें, "हे दागिने आपण आर्य चारुदत्ताजवळ ठेवण्यास दिले होते ते त्यांनीं आपल्याकडे पोंचविण्यास मला सांगितलें आहे. हे आपण घ्यावे."

वसंतसेनेनें तें ऐकून त्यास म्हटलें: "तर मग ही माळ आर्य चारुदत्तास पोंचवा."

**सज्जलकः**—( गडबडून ) पण मी आतां चारुदत्ताकडे परत जाणार नाहीं.

**वसंतसेना**ः—कां बरं ?

या आपल्या प्रश्नानें सज्जलक फार गडबडला असें पाहतांच वसंतसेना त्यास पुनः म्हणाली, "आर्य चारुदत्ताच्या घरीं साहस करून तर हे दागिने आपण आणले नाहींत ना? बरें असो. कोण आहे तिकडे? आपली गाडी जोडून आणायला सांग."

हें ऐकतांच सज्जलकाला वाटलें, आतां ही पुढें काय करणार कोणाला ठाऊक.

तो आपल्याशींच विचार करीत स्वस्थ बसला. गाडी जोडून आली, तेव्हां वसंतसेना उठली. तिनें आपले दागिने काढून मदनिकेला घातले. मदनिका तिला 'बाईसाहेब हें काय? हें काय?' असें करीतच होती. परंतु वसंतसेनेनें तिला बोलूं दिलें नाहीं. दागिने वगैरे घालून झाल्यानंतर ती सज्जलकास म्हणाली, "आर्य सज्जलक, ही आर्या मदनिका आपल्याला अर्पण केली आहे. हिला घेऊन या गाडींत बसून आपण आपल्या घरीं जावं."

मदनिका अगदींच गोंधळून जाऊन "बाईसाहेब, मला आर्या कां म्हणतां?" असें वसंतसेनेस विचारूं लागली, तेव्हां वसंतसेनेनें तिला म्हटलें, "तूं आतां आर्याच झालीस. तुला दास्यांतून मोकळी केली आहे."

याप्रमाणें त्या दोघांस संतुष्ट करून त्यांची रवानगी केल्यानंतर वसंतसेना आपल्या दुसऱ्या चेटीस म्हणाली, "आतां मी आर्य चारुदत्तांच्या घरीं त्यांच्या भेटीकरितां अभिसारिकावेष धारण करून जातें. तूं बरोबर चल."

त्या दोघीही निघाल्या.

याप्रमाणें या नाटकाचें संविधानक आहे. मृच्छकटिकांत याच्या पुढें कथानक आहे तें यांत नाहीं. परंतु हें चारुदत्त नाटक येथेंच संपलें असावें असें वाटत नाहीं. कारण कथा अपुरी राहते. पहिल्या अंकांत एकवार शकार जो दृष्टीस पडतो तो पुनः कोठेंच येत नाहीं. मात्र चवथ्या अंकाच्या प्रारंभीं वसंतसेना चारुदत्ताची प्रतिमा काढीत बसली असतां तिच्या आईची एक दासी आईचा निरोप म्हणून घेऊन येते कीं, "राजश्यालक शकार यानें हा अलंकार पाठविला तो धारण कर. आपला बुरखा घे, आणखी त्यानेंच गाडी पाठविली आहे, त्या गाडींत बसून त्याच्याकडे जा." हा एवढा दुसऱ्यानें उल्लेख आहे. तेव्हां जें पात्र मृच्छकटिकांत पुढें मुख्यच पात्र बनलें, त्याचा ह्या नाटकांत अगदींच नापत्ता व्हावा हें थोडें चमत्कारिक आहे.

मृच्छकटिक नाटकांत द्वितीयांकांत जुवेबाजांचा झगडा दाखवून त्यांतून एक हरलेला जुवेबाज संवाहक वसंतसेनेच्या घरांत तिचा आश्रय मागण्यास गेला. हा मूळ चारुदत्ताच्या घरीं नौकर होता. यामुळें वसंतसेनेला त्याला त्याच्या जुवेबाज लोकांकडून सोडवावें असें वाटलें. तिनें त्याला द्रव्य देऊन सोडविलें. त्याला पुढें पश्चात्ताप झाला व तो वृद्ध भिक्षु झाला. चारुदत्तनाटकांत जुवेबाजांच्या झगड्याचा प्रवेश नाहीं. परंतु चारुदत्ताच्या घरचा संवाहक जुवेबाजांच्या छळापासून सुटण्यासाठीं मदत मागण्यास वसंतसेनेकडे येतो व तिनें मदत केल्यावर संन्यासी होतो. बहुतकरून तोच संन्यासी पुढें हत्तीच्या तडाक्यांतून वसंतसेनेचा चेट मोठ्या शिताफीनें सोडवितो. हा संन्यासी झालेला पुनरपि रंगभूमीवर चारुदत्तांत येत नाहीं. मृच्छकटिकांत मृतवत् पडलेल्या वसंतसेनेस तो शुद्धीवर आणून दोवेंही चारुदत्ताला सोडविण्यासाठीं जातात. सगळ्यांत मोठी गोष्ट ही आहे कीं, चवथ्या अंकाच्या शेवटीं चारुदत्तांत वसंतसेना आणि तिची एक चेटी हीं दोनच पात्रें काय तीं आहेत. तेथेंच जर नाटकाचा शेवट असता तर निदान नायक तरी तेथें यावयास पाहिजे होता; तो आलेला नाहीं. या नाटकांत मुख्य रस शृंगार. त्याचा परितोष या चार अंकांत मुळींच झालेला नाहीं. व विप्रलंभशृंगाराचा तर कोठें मागमूसही नाहीं. तेव्हां याच्यापुढें आणखी कांहीं अंक तरी असले पाहिजेत. मृच्छकटिकांत दहा अंक केलेले आहेत. भासाची वाणी पाल्हाळिक नसल्यामुळें चारुदत्ताचे तितके अंक होणार नाहींत.

परंतु ते पुढले अंक अद्यापि उपलब्ध झाले नाहींत. तेव्हां सांपडलेला भाग अपूर्ण आहे असेंच मनास वाटतें. असा हा भाग अपूर्ण राहण्याला कदाचित् दुसरें कारण असेल तें हें कीं, भासकवीच्या हातून हें नाटक पूर्ण होण्याच्या आधींच त्याचें निधन झालें असावें. तें अपूर्ण नाटक पुढें शूद्रकासारख्या निपुण राजकवीच्या हातीं आल्यावर त्यानें विस्तृत करून पुरें केलें असावें. या विस्तारापैकींच पालक राजाला सिंहासनावरून दूर करून आर्यक राजा सिंहासनारूढ झाल्याची कथा आली आहे. या कथेचा उल्लेख चारुदत्तांत नाहीं.

दुसरी एक गोष्ट लक्षांत घेण्याजोगी अशी आहे कीं, ज्या दोन पोथ्यांवरून प्रस्तुत प्रत छापली आहे, त्यांपैकीं एकाच पोथींत 'अवसितं चारुदत्तम्' असे शब्द आहेत, दुसरींत नाहींत. भासाच्या सगळ्या नाटकांना भरतवाक्य असतें तें यांत नाहीं; आणि नाटकाला नांदीचा श्लोकही नाहीं. यावरूनही असा तर्क होतो कीं, हें नाटक अपुरें आहे. आणखी याचा शोध केला गेला तर याची पूर्ण प्रत कोठें तरी सांपडल्यास तींत पुढचा भाग—जो मृच्छकटिकांत सांपडतो तोही—सांपडण्याचा संभव आहे. मृच्छकटिक नाटकांत आणि यांत काय काय साम्य वैषम्य आहे हें आतां पाहूं. आतां प्रसिद्ध झालेल्या चारुदत्त नाटकांत एकंदर पंचावन्न श्लोक आहेत. त्यांपैकीं मृच्छकटिकांत एकंदर पसतीस श्लोक आले आहेत. हे सर्वच पसतीस श्लोक अक्षरशः उद्धृत केलेले आहेत असें नाहीं. त्यांतील कांहींत शब्दांचा फरक आहे. वृत्तांचा किंवा अर्थाचा फरक कांहीं नाहीं. संविधान अगदीं एक. मृच्छकटिकाच्या ज्या अंकांत जेथपर्यंत कथा आली आहे, त्याच अंकांत तेथपर्यंतच चारुदत्तांतही कथा आलेली आहे. मात्र मृच्छकटिकांत कित्येक ठिकाणीं उगीच विस्तार केला आहे. या विस्तारामुळें मृच्छकटिक नाटकाला

दृश्यापेक्षां श्राव्याचेंच अधिक स्वरूप आलें आहे. चारुदत्त नाटकास पूर्णपणें दृश्य स्वरूप आहे. भासाचीं सर्वच नाटकें निःसंशय दृश्य काव्यें होत. इतकेंच नव्हे तर तीं सर्व नाटकें रंगभूमीवर केलीं जात असलीं पाहिजेत असें मनास पक्कें वाटल्याखेरीज राहातच नाहीं. कोणच्या तरी उत्सवांत एखादें नाटक करवावयाचें असें मनांत येतांच राजानें आपल्या पदरच्या नाट्याचार्यास कांहीं तरी नवीन नाटक करून दाखविण्याविषयीं आज्ञा करावयाची आणि कवीनें व नाट्याचार्यानें नवीन नाटक रचून व बसवून तें त्या उत्सवांत राजापुढें करून दाखवावयाचें, हा प्रघात प्राचीन काळीं होता. भास हा कोणा तरी राजाच्या पदरीं असून त्यास नवीन नाटक तयार करण्याची नेहमीं आज्ञा होत असली पाहिजे. ह्मणूनच त्याचे हातून हें नाटकचक्र निर्माण झालें. त्या वेळीं महावीरचरित, मालतीमाधव, हनूमन्नाटक, मृच्छकटिक वगैरे प्रचंड नाटकें कवळ प्रयोगासाठीं म्हणून निर्माण होणें शक्यच नव्हे. प्राचीन काळ झाला तरी काय, मनुष्यस्वभाव जो आज आहे तोच तेव्हां होता. सामान्य लोक जरी सायंकाळीं सात वाजल्यापासून सकाळीं सात वाजेपर्यंत नाटकें पहाण्यास बसण्यास कंटाळले नाहींत, तरी राजे व श्रीमंत लोक कंटाळावयाचेच. तेव्हां ज्या नाटकांचे प्रयोग वारंवार व्हावयाचे तीं नाटकें या भासकृत नाटकांप्रमाणेंच अल्पकालांत होणारीं असलीं पाहिजेत.

भासाचीं जीं नाटकें आपल्या पुढें आहेत, त्यांत अविमारक किंवा प्रतिमा हींच काय तीं बरींच मोठीं, परंतु तीं सुद्धां तीन किंवा चार तासांपेक्षां अधिक लांबणाचीं नाहींत. नितक्याच बेताचें हें चारुदत्त असलें पाहिजे. याचा उत्तरार्ध सांपडला, तर ठीकच आहे. व तो जरी सांपडला नाहीं तरी भासानें त्याची पुढें फारशी लांबण केली नसती असेंच म्हणावें लागतें. आज आपल्या हातीं असलेल्या दोनही नाटकांतील चार अंकांची तुलना करून पाहिले तर मृच्छकटिकांतील लांबण अस्थानीं आहे असें म्हणावें लागतें.

पहिल्या अंकांत चारुदत्ताच्या तोंडीं आपल्या गतवैभवाबद्दल खेदोद्गार चारुदत्त नाटकांत आले आहेत, ते अगदीं यथायोग्य जितके असावे तितकेच आहेत असें वाटतें. मृच्छकटिकांत त्यांचा कंटाळवाणा विस्तार केला आहे.

तीच स्थिति शकाराच्या हास्योत्पादी भाषणांची व श्लोकांची झाली आहे. हास्योत्पादी भाषणांची काय किंवा शोकजनक भाषणांची काय लांबण झाली म्हणजे इष्टपरिणामकरता नष्ट होते.

दुसऱ्या अंकांत संवाहक व वसंतसेना यांची भेट होते. त्याच्यापूर्वीं मृच्छकटिकांत जुवेबाजांचा झगडा दाखविला आहे. हा चारुदत्तांत नाहीं.

तिसऱ्या अंकांत चारुदत्त व मैत्रेयभटजी गाणें ऐकून येतात, तेव्हां त्याच्यावर त्यांचें थोडेंसें भाषण होतें तें मृच्छकटिकांत एक दोन श्लोकांनीं तरी वाढविलें आहे. पुढें सज्जलक ( मृच्छकटिक नाटकांतील शर्विलक ) चोरी करण्यासाठीं येतो, त्याच्या आत्मगत भाषणाची लांबण मृच्छकटिकांत फारच कंटाळवाणी आहे. चारुदत्तांत त्याचें आत्मगत भाषण थोडक्यांत आहे. पुढें चोर निघून गेल्यानंतर ती चोरानें फोडलेली भिंत चारुदत्ताच्या दासीच्या दृष्टीस पडल्यावर तिनें सर्व मंडळीस वर्दी दिली त्या वेळच्या भाषणांतही अशीच लांबण मृच्छकटिकांत आहे. चारुदत्तांत नाहीं. चारुदत्त

नाटकांतला चारुदत्त अत्यंत धीरोदात्त; परंतु चोर घरफोडी करून घरांत शिरला असतां त्यानें भिंत फार शिताफीनें फोडली ह्मणून त्याचें कौतुक करीत बसणारा नाहीं; किंवा त्याला आपल्या घरांत कांहीं सांपडलें नाहीं, तो अगदीं निराश होऊन गेला असेल, आपल्या घरीं परत गेल्यावर आपल्या मित्रांना काय सांगेल ? चारुदत्तासारख्याच्या घरीं चोरीला गेलों, पण फुटका मणीसुद्धां मला लाभला नाहीं असें तो म्हणेल, याबद्दल शोक करणारा मूर्ख नव्हता. मृच्छकटिकाच्या कर्त्यानें त्याच्या औदार्याची कमाल करावयाची असल्यामुळें संभाव्य—असंभाव्य हा विचार न करितां त्यानें त्याच्या तोंडीं प्रथम, "अहो, भिंत किती सुरेख फोडली आहे ! काय भिंत फोडण्याची कर्तबगारी ही !" असले उद्गार, त्यांवर कर्तबगारीचें कौतुक करणारा एक श्लोक आणि पुढें त्या चोरानें इतके सायास केले असून त्याला आपल्या घरांत कांहीं मिळालें नाहीं म्हणून खेद दर्शविणारा एक लांबलचक श्लोक अशी लांबण घालून दिली आहे !

चवथ्या अंकांत सज्जलक चोरलेले दागिने आणि विदूषक ते दागिने चोरले गेले म्हणून त्यांच्या मोबदला वसंतसेनेस देण्याची माळ हीं घेऊन वसंतसेनेच्या घरीं जातात. चारुदत्त नाटकांत सज्जलकाचें व मदनिकेचें भाषण होतें, तें वसंतसेना ऐकते. परंतु लागलीच त्याची व तिची भेट होऊन वसंतसेना सज्जलकास मदनिका अर्पण करीत नाहीं, मदनिका सज्जलकास एके बाजूस नेऊन बसविते. मध्यें विदूषकाची व वसंतसेनेची भेट होते. तो "चारुदत्तानें तुझे दागिने द्यूतांत पणाला लावून हरविले, त्यांच्या बदला ही माळ त्यानें पाठविली आहे" असें म्हणून तिला ती माळ देतो. तो गेल्यावर सज्जलकाची व वसंतसेनेची भेट होते. त्या भेटींत ती सज्जलकास मदनिका अर्पण करिते.

मृच्छकटिकांत मदनिका अर्पण करण्याचा विधि झाल्यानंतर विदूषक रत्नमाला देण्यास येतो. या अंकांत मृच्छकटिकांतील शर्विलक मदनिकेच्या तोंडून चारुदत्ताची स्तुति ऐकून संशयग्रस्त होऊन वेश्यांच्या कापट्याबद्दल पुष्कळसे श्लोक म्हणतो. ती वेश्यानिंदेची लांबण चारुदत्तांत नाहीं.

चारुदत्तांतील चारुदत्त विदूषकास "मी तुझे दागिने द्यूतांत हरविले" असें वसंतसेनेस सांगण्यास सांगत नाहीं, चोरीस गेलेल्या मालाच्या दसपट माल मोबदला म्हणून दिला तरच कोणास तरी आपलें म्हणणें खरें वाटेल असें म्हणून त्यानें विदूषकास ती माळ घेऊन जाऊन वसंतसेनेजवळ देण्यास सांगितलें. दुसऱ्यानें ठेव ठेवलेला माल आपण जुवेबाजींत घालविला असें म्हणणें चारुदत्तास कसें शोभेल ? एक तर इतका चांगला माणूस जुवेबाजीने पछाडला आहे हें कोणासही भासविणें वाईट आणि त्यांत तें खोटें, यांत चारुदत्ताचा थोरपणा व सत्यनिष्ठा हीं काय दाखविलीं गेलीं? चारुदत्त नाटकांत चारुदत्ताच्या तोंडीं हा प्रकार नाहीं. मूर्ख मैत्रेय आपली शिताफी म्हणून द्यूतांत दागिने हरवल्याची सबब सांगतो ! मृच्छकटिकांतला चारुदत्त विदूषकास तसें सांग म्हणून पढवून ठेवतो ! हें त्याच्या शीलास उच्चत्व देणारें खास नव्हे. असो.

केलें आहे यापेक्षां जास्त चिकित्सकपणें दोनही नाटकांची तुलना करून कीस काढण्याचें काम या ठिकाणीं अस्थानीं होईल असें भय वाटतें म्हणून येथेंच थांबतो.

# मध्यमव्यायोग.

महाभारतांतील प्रसंग घेऊन भासानें बरींच नाटकें लिहिलीं आहेत त्यांतील पहिलें नाटक मध्यमव्यायोग हें होय.

पांडव वनवासांत असतांना घडलेल्या एका बारीकशा प्रसंगावर हें रचिलें आहे. कुंतीपुत्रांपैकीं मध्यम (मधला) पुत्र जो भीम त्याची एक पत्नी हिडिंबा नांवाची राक्षसी त्या वनांत राहत होती. आपला पति व आपले दीर आणि सासू हीं ह्या वनांत आलीं आहेत अशी तिला बातमी लागली. अर्थातच आपल्या पतीची भेट व्हावी अशी हिडिंबेला इच्छा झाली, तेव्हां तिनें पांडव कोठें आहेत ती बातमी काढण्याकरितां एक युक्ति केली; त्या युक्तीवर या नाटकाची रचना आहे.

गाई व ब्राह्मण यांचें संरक्षण करण्याची संधि; पांडव कधींही वांयां जाऊं देणार नाहींत हा पांडवांचा स्वभाव हिडिंबेस माहिती होता. तेव्हां आपण एखाद्या ब्राह्मणाचा छळ केला असतां ते त्याच्या संरक्षणाकरितां खास धांवून यावयाचेच हें मनांत आणून हिडिंबेनें आपला पुत्र घटोत्कच याला अशी आज्ञा केली कीं, या रानांतल्या खेड्यांतल्या एखाद्या ब्राह्मणाचा छळ करण्याचा घाट घालून त्याला धरून मजकडे आण. आईची ही आज्ञा ऐकून घटोत्कचानें एक ब्राह्मण गांठला. या ब्राह्मणाच्या कुटुंबांत एकंदर पांच माणसें होतीं; तो, त्याची बायको व तिघे मुलगे. तो एका ऋषीच्या आश्रमांत कांहीं कार्याकरितां सहकुटुंब गेला असतां तें कार्य उरकून परत चालला होता. घटोत्कचानें त्यांस अडविलें, अर्थातच बिचारा ब्राम्हण व त्याचें कुटुंब यांची त्रेधा उडाली. ब्राह्मणाला कोणीं सांगितलें होतें कीं, या वनांत पांडव रहाण्याला आले आहेत व ते गोब्राह्मणांच्या संरक्षणाविषयीं अत्यंत दक्ष असतात. यामुळें त्या ब्राह्मणास थोडासा धीर आला. परंतु लागलींच असेंही कळलें कीं, पांडव धौम्य ऋषींच्या आश्रमांत शतकुंभ नांवाचा यज्ञ चालू आहे त्या यज्ञाकरितां तिकडे गेले आहेत. तेव्हां पांडवांकडून आपलें रक्षण होईल याबद्दल त्याची अगदीं निराशा झाली.

इकडे घटोत्कचानें तर त्यांना सांगितलें कीं, 'माझ्या आईला काल उपास होता, तिला पारणें फेडावयाचें तें ब्राह्मण खाऊन फेडावयाचें आहे. जों जों उशीर होईल तों तों तिला राग चढेल; करितां लवकर चला.' तेव्हां ब्राह्मणानें त्याला विचारलें, 'तुझ्या तडाक्यांत सापडलों आहोंत हें तर खरेंच; पण यांतून सुटणूक आहे का? सुटणुकीचा कांहीं मार्ग असला तर तो तरी सांग."

घटोत्कचानें उत्तर दिलें: "सुटणुकीचा मार्ग एक आहे. तो असा कीं, तुमच्यापैकीं कोणी एकानें मजबरोबर माझ्या आईची क्षुधा शमविण्यास यावें. एक आला तरी पुरे, बाकीच्यांना मी सोडून देईन."

तें ऐकतांच त्या सच्छील कुटुंबांत बाकीच्यासाठीं कोणीं बळी जावें याबद्दल चढाओढ सुरू झाली.

**ब्राह्मणः**—मी जरठ झालों आहें. आतां माझें जगांत कांहीं कार्य राहिलें नाहीं, तेव्हां राक्षसीच्या जठराग्नींत आपल्या स्वतःचाच होम करून घेतों.

**ब्राह्मणीः**—छे, छे, माझं आतां कांहीं या जगांत व्हायचं उरलं नाहीं. तेव्हां सौभाग्यपणीं मरण, आणि तें पति आणि पुत्र यांच्या जीवनरक्षणाकरितां, यासारखं सुदैव कोणतंच नाहीं. मला आपण या राक्षसाला अर्पण करा.

**घटोत्कचः**—छे, छे. माझ्या आईला स्त्रीचें मांस मुळींच आवडत नाहीं.

तें ऐकून **पहिला मुलगा** पुढें झाला व म्हणतोः "अरे राक्षसा, माझे प्राण देऊन माझ्या वडील मंडळींचे प्राण राखावे अशी माझी इच्छा आहे, तर तूं मला घेऊन चल."

**दुसरा मुलगाः**—दादा असं करूं नका. लोकांत आणि कुलांत ज्येष्ठ तो श्रेष्ठ. तोच मातापितरांनाही प्रिय असतो, तर मला जाऊं द्या या राक्षसाबरोबर.

**तिसरा मुलगाः**—तुम्ही दोघेही वडील. ज्येष्ठ भ्राते हे पित्यासमान असतात. तेव्हां तुमच्या सगळ्यांच्या प्राणरक्षणाकरितां मीच आपला जातों.

**ज्येष्ठ मुलगाः**—असें नाहीं बाबा, पिता संकटांत सांपडला, तर त्याचं रक्षण ज्येष्ठ मुलाकडूनच होणं योग्य, तेव्हां मातापितरांच्या रक्षणासाठीं मीच जाणं योग्य.

तें त्यांचें बोलणें ऐकतांच वृद्ध ब्राह्मण पुढें होऊन म्हणतो, "छे, छे. ज्येष्ठ मुलगा सगळ्यांत प्रिय, त्याला मी सोडायचा नाहीं."

ब्राह्मणस्त्री पुढें होऊन म्हणते, "आपल्याला जसा ज्येष्ठ प्रिय वाटतो, तसा मला कनिष्ठ वाटतो. मी त्याला जाऊं द्यायची नाहीं."

मधला मुलगा तें ऐकून म्हणतोः "मातापित्यांनीं सोडल्यावर माझ्यावर प्रेम करायला राह्यलं कोण ?"

**घटोत्कचः**—अरे मी आहें ना ? मला तूं फार आवडतोस. चल लवकर माझ्या बरोबर.

**मधला मुलगाः**—खरें रे खरें. मी फार धन्य कीं मी आपले प्राण देऊन वडील मंडळीचे प्राण वांचवितों आहें. बंधुजनांच्या प्रेमापेक्षां काळाचें प्रेम फार दुर्लभ; चल मी येतों तुझ्याबरोबर.

असें म्हणून त्यानें आपल्या मातापितरांस नमस्कार केला. ज्येष्ठ बंधूस नमस्कार केला. त्याच्या धाकट्या भावानें त्याला नमस्कार केला, नंतर तो घटोत्कचाकडे वळून म्हणतो, "बाबारे, मला तुला एक विनंति करावयाची आहे. त्या तिथें सरोवर दिसतें आहे. मला तहान लागली आहे. तर पाणी पिऊन येईपर्यंत तूं इथें थांब." घटोत्कचानें विचार केला, जो आपल्या आप्तेष्टांचे प्राण वांचविण्यासाठीं सिद्ध झाला तो खोटें बोलून आपणास फसवायचा नाहीं. तेव्हां आपण याला जाऊं द्यावें. त्यानें त्याला 'लवकर परत ये' असें बजावून जाऊं दिलें.

मधला मुलगा निघून गेला. ब्राह्मण, त्याची पत्नी व दुसरे दोघे पुत्रही जाऊं न जाऊं करूं लागले. त्यांच्यानें त्या मुलास राक्षसाच्या जबड्यांत सोडून जाववेना. ती मंडळी तेथेंच उभी राहिली. त्यानें आपल्याबरोबर येण्यास सिद्ध झालेल्या ब्राह्मणपुत्राची बराच वेळ वाट पाहिली,

बराच वेळ झाला त्याचा पत्ता नाहीं. त्याला हांका माराव्या तर नांव माहिती नाहीं. तेव्हां त्या ब्राह्मणाच्या मुलांपैकीं तो मधला म्हणून त्यानें त्याला " अरे मध्यमा, ए मध्यमा, लवकर ये." अशा हांका मारण्याचा सपाटा सुरू केला.

इकडे असा चमत्कार झाला कीं, त्याच वनभागांत भीमसेन आपला सकाळच्या प्रहरचा व्यायाम करीत होता, त्याच्या कानीं त्या घटोत्कचाच्या हांका गेल्या. कुंतीपुत्रांपैकीं भीमसेन हा मध्यम, तेव्हां त्याला असें वाटलें कीं आपल्यालाच कोणी तरी हांका मारतो आहे. म्हणून तो नीट कानोसा घेऊन ऐकूं लागला. ब्राह्मणाचा पोरगा अजून येईना म्हणून घटोत्कचानें खूपच मोठ्यानें " मध्यमा, ए मध्यमा, अरे लवकर ये. " असें म्हटलें. निःसंशय आपल्यालाच कोणी तरी हांका मारतो आहे असें वाटून भीमसेन घटोत्कचाजवळ आला. त्याला पहातांच घटोत्कचास आश्चर्य वाटलें. परंतु त्याच्याकडे त्यानें लक्ष न देतां पुनः त्या ब्राह्मणपुत्राला उद्देशून " अरे मध्यमा, ए मध्यमा, लवकर ये म्हणतोना? उशीर झाला. आई फार रागावेल त्याचें मला फार भय वाटतें. " असें ओरडून म्हणाला.

तेव्हां भीमसेन त्याच्या अगदीं जवळ जाऊन म्हणतो, " मी तर आलों आहें. कोण, आणखी मला कां हांका मारतो आहेस, सांग. "

घटोत्कचानें तें ऐकून त्याला म्हटलें " काय? तूंही मध्यमच आहेस?"

**भीमः**—होय बुवा, मीही मध्यमच आहे. अनेक दृष्टींनीं मीही मध्यमच आहें. अवध्य पुरुषांपैकीं मध्यम आहें. मी आपल्या भावांत मध्यम आहें.

**घटोत्कचः**—असशील!

**भीमः**—अरे बाबा, आणखी सांगतों ऐक. मी पंचमहाभूतांतला मध्यम, राजांपैकीं मध्यम, भावांत मध्यम, सर्व कार्यांत मध्यमच, असा मी खरा मध्यम आहे.

हें त्याचें बोलणें ऐकून वृद्ध ब्राह्मणास थोडी आशा उत्पन्न झाली. हा पृथापुत्रांपैकीं मध्यम म्हणजे भीम असावा असा त्यानें तर्क केला. इतक्यांत ब्राह्मणपुत्र मध्यम तेथें आला व घटोत्कचाजवळ जाऊन म्हणतो: " तुला कबूल केल्याप्रमाणें हा मी आलों. तर आतां चल. "

घटोत्कच त्याला घेऊन निघणार इतक्यांत तो वृद्ध ब्राह्मण पुढें झाला आणि भीमाला म्हणाला: " मध्यम महाराज, कृपा करा. हा राक्षस आमच्या पाठीस लागला आहे. या माझ्या मधल्या पोराला आपल्या आईच्या पारण्यासाठीं म्हणून घेऊन जातो आहे, तर याला शिक्षा करा. आपण पांडवांपैकीं भीमसेन आहां हें मीं तर्कानें जाणलें आहे. ब्राह्मणाचें रक्षण करावयाचें हें आपलें ब्रीद आहे. "

भीमानें तें ऐकून ब्राह्मणास धीर दिला व घटोत्कचास म्हटलें:— " अरे पुत्रनक्षत्रांनीं युक्त व पत्नीरूप ज्योत्स्नेनें शोभित अशा वृद्ध विप्रचंद्राच्या मागें तूं राहूप्रमाणें कां लागला आहेस? "

**घटोत्कचः**—हो. लागलों आहें.

**भीमः**—लागलों आहें म्हणजे काय? बिचाऱ्याला सोड.

**घटोत्कचः**—नाहीं सोडणार.

**भीमः**—( आपल्याशीं ) अरे वा! हा कोणाचा पोरगा असावा बोआ! ह्याची ही बाळदंडली पाहून मला अभिमन्यूचें स्मरण होतें. अरे बाबा, सोड गरीबांना.

**घटोत्कचः**—नाहीं सोडणार. आपण तर काय, पण माझ्या बापानें जरी सांगितलें तरी देखील आईनें केलेली आज्ञा मी कधीं मोडणार नाहीं.

**भीमः**—अरे वा! मोठाच मातृभक्त दिसतोस! बाबारे, माता ह्मणजे दैवतांतलें दैवत! मातेची आज्ञा सदैव परिपालन करावयाची या व्रतामुळें तर ही दशा आम्ही भोगतों आहों. अरे, तुला एक विचारावयाचें आहे.

**घटोत्कचः**—विचारा विचारा.

**भीमः**—तुझी आई कोण?

**घटोत्कचः**—हिडिंबा नांवाची राक्षसी. पूर्णचंद्रानें जशी रात्र तशी जी कुरुकुलाचा दीप असा जो पांडव भीमसेन त्यानें सनाथ केली आहे.

**भीमसेनः**—( आपल्याशीं ) हं, तर मग हा हिडिंबेचा पुत्र! मग याचा हा अभिमान योग्यच आहे.

भीमसेनानें त्यास ओळख दिली नाहीं. घटोत्कचानें तर त्यास ओळखलें नाहींच. पुढें घटोत्कचाचें व त्याचें थोडें युद्धही झालें. शेवटीं भीमास बांधून नेण्यासाठीं घटोत्कचानें मायापाश सोडले, परंतु त्या मायापाशांचेंही भीमावर कांहीं चाललें नाहीं. मग भीमच त्या ब्राह्मणपुत्रास घेऊन हिडिंबेकडे गेला. हिडिंबेनें तेव्हांच भीमास ओळखलें व घटोत्कचास 'आपल्या पित्यास नमस्कार कर' असें सांगितलें. आपण आपल्या बापाशीं उद्धटपणानें वागलों याबद्दल घटोत्कचास वाईट वाटून त्यानें भीमसेनाची क्षमा मागितली. नंतर भीमसेनानें हिडिंबेस विचारलें, 'तूं या ब्राह्मणास काय म्हणून छळलेंस?' तिनें कारण सांगितलें तें भीमसेनाच्या कानांत सांगितलें. तें असेंच असावें कीं असा छळ केला असतां आपण त्याच्या रक्षणार्थ धांवून याल, आणि त्यामुळें आपली व माझी भेट होईल. ब्राह्मण आनंदानें आपल्या पत्नीस व मुलांस घेऊन घरीं गेला.

हेंही नाटक फार चांगलें, सरासरी पाऊण किंवा एक तासांत प्रयोग करतां येईल असें आहे. विद्यार्थ्यांस भाषादृष्टीनेंही फार चांगलें. नाटकाचें तात्पर्यही चांगलें आहे.

संग्रहालय ... नं. ... ठाणे

# पंचरात्र.

पंचरात्र नाटक हें महाभारतांतील कथा भाग घेऊन त्यावर रचलें आहे ही गोष्ट खरी परंतु त्यांत कवीनें आपल्या कल्पनेचा बरा भाग घातला आहे आणि त्यामुळें त्यांत मौ उत्पन्न केली आहे. पांडव वनवास संपवू विराटनगरींत अज्ञातवास करण्यास गे आहेत, तो त्यांचा अज्ञातवासाचा काल संपण्याच्या बेतांत आला आहे, अश स्थितींत इकडे हस्तिनापुरांत दुर्योधना नानाविध यज्ञ करून ते समाप्त केले. अव भृथस्नानें झालीं आणि सर्व ऋत्विजांना परिषदध्यक्षाला दक्षिणा देण्याचा सम आला. तेव्हां दुर्योधनानें आपले गुरु द्रोणाचार्य त्यांचेजवळ जाऊन त्यांस विनं केली: "गुरुमहाराज, माझीं यज्ञकर्मे सां घ साग्र उत्कृष्टपणें पार पडलीं. आतां सर्वां दक्षिणा द्यावयाची. आपण आमचे आद्यगुरु तेव्हां आपण मनास वाटेल ती दक्षिण मागावी आणि मीं ती द्यावी असा माझ फार फार हेतु आहे. तर कृपा करून आपण दक्षिणा मागावी."

ही आपल्या शिष्याची विज्ञप्ति ऐकतां द्रोणाचार्यांचा कंठ दाटून येऊन त्यांच्य नेत्रांत अश्रु उभे राहिले. आपण याच्य जवळ दक्षिणा मागावी आणि हा देईल त्यांना संभवनीय सुद्धां वाटेना. तथा दुर्योधनानें पुनः खात्रीपूर्वक बोलून आचार्यांस विनविलें कीं, "आपण असे अश्रु ढाळू नयेत. पाणी आणविलें आहे त्यानें त्यांच परिमार्जन करून माझा हेतु पुरवावा."

तेव्हां द्रोणाचार्य त्यास ह्मणतात: "मी सांगेन ती दक्षिणा तूं खरोखर मला दिलीस कीं, तेंच खरें अश्रुमार्जन होईल." या बोलण्यांत अर्थातच खोंच होती. निदान खोंच आहे असें दुर्योधनास वाटलें आणि तो लागलींच त्यांस म्हणतो:

"गुरुमहाराज, माझी पूर्वींची धकता मनांत धरून आपण जर क्षमा करीत नसाल आणि मी बोलल्याप्रमाणें करणार नाहीं असें जर आपल्याला वाटत असेल, तर आपण आपला शेंकडों बाण सोडून कठिण झालेला हात पुढें करा, मी त्याच्यावर आधींच दक्षिणोदक सोडतों."

इतकें निकराचें बोलणें झाल्याबरोबर द्रोणाचार्यांस विश्वास आला आणि त्यांनीं आपली दक्षिणाही अशी मागितली:

"झाले आश्रयहीन पंडुसुत ते
गेले वनालागुनी।
वर्षे द्वादश जाहलीं परि मुळीं
वार्ता न ये कोठुनी॥
त्यांतें शोधुनि आणुनी वितर वा
राज्यार्ध दुर्योधना।
मागें त्वद्विनतीवरूनि तुज ही
भिक्षा तशी दक्षिणा॥"

द्रोणाचार्य असली कांहीं विलक्षण दक्षिणा मागतील हें कोणाच्या स्वप्नांतसुद्धां आलें नाहीं. त्यांचें तें मागणें ऐकतांच शकुनि तर एकदम तिरीमिरीवर आला व ओरडून म्हणतो: "हं हं. भलतेंच बोलूं नका. आपण

गुरु म्हणून विश्वासानें सहज 'दक्षिणा मागा' झणणाऱ्या शिष्याला भलतेंच कांहीं तरी बोलून फसवणें बरें नाहीं."

शकुनीच्या त्या बोलण्याचा द्रोणास फार राग येऊन तो त्याला म्हणतो: "अरे गर्विष्ठा, तूं अनार्य—लबाड—म्हणून सगळ्यांनाच लबाड समजूं नकोस."

यावर बरीच बोलाचाली झाली, भीष्माचार्यही मध्यें पडून त्यांनीं दुर्योधनास ह्मटलें: "तूं शकुनीच्या नादीं लागूं नकोस. आजपर्यंत जें जें म्हणून तूं केलेंस, द्रौपदीसह सगळ्या पांडवांना रानावनांत वणवण करीत हिंडायला लावलेंस, त्यांचें व तुझें वांकडें आलें, त्या सगळ्याला कारण हा शकुनीच."

परंतु दुर्योधनाला तें पटेना. द्रोणाचार्य तर रागावले. तेव्हां कर्ण, भीष्म वगैरेंनीं त्यांची समजूत घालून दुर्योधनाला जरा समजावून सांगून त्याच्या हातून योग्य तें करवा वगैरे सांगितलें, त्याप्रमाणें द्रोणाचार्यांनींही जरा आपला राग बाजूला सारिला. दुर्योधनही थोडासा शांत झाला व त्यांस म्हणाला: "मी कांहीं मंडळींचा विचार घेऊन काय तें करतों."

"कोणाचा विचार घेतोस? भीष्माचार्यांचा, कर्णाचा, कृपाचा, जयद्रथाचा, अश्वत्थाम्याचा कीं विदुराचा? वडिलांचा कीं मातुःश्रीचा?" असें द्रोणाचार्यांनीं विचारल्याबरोबर मात्र दुर्योधनानें "शकुनिमामाचा" असें उत्तर दिलें.

तें ऐकतांच ह्याच्या हातून आतां प्रतिज्ञेप्रमाणें होणें शक्य नाहीं असें द्रोणाचार्यांस वाटलें. तथापि काय होतें तें पहावें म्हणून ते स्तब्ध झाले.

इकडे दुर्योधनानें शकुनिमामांशीं खलबत करतांना त्यांना म्हटलें: "माझ्या वचनाला तर बाध होऊं नये आणि राज्याचा भाग तर देण्याची पाळी येऊं नये अशी कांहीं युक्ति काढा."

तेव्हां त्यानें खोल विचार करून दुर्योधनास म्हटलें: "दुर्योधना, आतां अशी युक्ति कर. द्रोणास म्हण, आपल्या म्हणण्याप्रमाणें मी करतों, पण आजपासून पांच रात्रींच्या आंत पांडवांची राहण्याची जागा शोधून काढून पांडवांना येथें आणा, म्हणजे मग करतों."

दुर्योधनास ती युक्ति मानवली आणि त्यानें शकुनीकडून तसें द्रोणाचार्यांस सांगविलें. तें ऐकतांच द्रोणाचार्य फारच संतापले आणि दुर्योधनाला म्हणाले: "पोरा, माझी थट्टा आरंभली आहेस काय? आज बारा साडेबारा वर्षांत ज्यांचा पत्ता नाहीं, त्यांना तूं 'पांच रात्रींत शोधून आणा म्हणजे अर्धराज्य देतों' म्हणणें म्हणजे माझें वचन मी पाळीत नाहीं म्हणण्यासारखेंच नाहीं काय? यापेक्षां तसेंच स्पष्ट कां सांगत नाहींस?"

दुर्योधनानें यावर उत्तर दिलें नाहीं, परंतु तितक्यांतच विराटनगरांतून दूत येऊन त्यानें अशी बातमी दिली कीं, विराट राजाच्या दरबारांत कीचकानुकीचकादि वीरांना केवळ मल्लयुद्धानें कोणीं तरी ठार मारिलें. ती बातमी ऐकतांच भीष्मांनीं तेव्हांच तर्क केला कीं, हें कृत्य भीमावांचून दुसऱ्या कोणीं करणें शक्य नाहीं. तेव्हां पांडव विराटनगरींत असावेत, हा तर्क त्यांनीं करतांच द्रोणाचार्यांस एकीकडे असें सुचविलें कीं, "आतां आपण बेलाशक पांच रात्रींत पांडव शोधून आणून तुझ्यापुढें उभे करतों असें कबूल करा."

द्रोणाचार्यांसही त्यांचें तें म्हणणें बरोबर वाटून त्यांनीं तसें कबूल करून "पांच रात्रींच्या आंत पांडवांचा तपास करून आणतों. मग तर तूं आपल्या प्रतिज्ञेप्रमाणें—वचनाप्रमाणें—मला कबूल केलेली भिक्षा—दक्षिणा—देशील ना?" असें दुर्योधनास विचारलें.

दुर्योधनानें तें कबूल केलें. तेवढ्यानें द्रोणाचार्यांचें समाधान झालें नाहीं. त्यांनीं पुनः धीर गंभीर अशा वाणीनें सर्व राजमंडळास संबोधून म्हटलें: "अहो, यज्ञसमारंभार्थ आलेल्या राजांनो, ऐका. ऐका आपण. हा कुरुराज दुर्योधन–एकटाच नव्हे तर आपला मामा जो गांधारराज शकुनि त्याच्यासह–असें म्हणतो आहे कीं, आजपासून पांच रात्री उलटण्याच्या आंत जर पांडवांची नक्की बातमी कोणीं आणली, तर मी पांडवांना अर्धें राज्य देईन. वत्सा दुर्योधना, असेंच ना?"

**दुर्योधनः**—अगदीं निःसंशय असेंच.

आतां खरोखर पांडव विराट नगरांत आहेत का नाहींत हें पहाण्याचें कार्य पुढें उभें राहिलें. तेव्हां भीष्माचार्यांनीं एक युक्ति केली.

जर पांडव विराटनगरांत असले, तर विराट राजावर हल्ला केला असतां त्याच्या संरक्षणाकरितां ते आपलें शौर्य दाखविल्याखेरीज राहणार नाहींतच. आणि त्यांचें शौर्य दिसलें कीं, त्यांना ओळखण्यालाही मुळींच पंचाईत पडणार नाहीं. तेव्हां दुर्योधनाकडून विराटाच्या खिल्लारावर हल्ला करवावा असें ठरविण्याचा घाट त्यांनीं घातला. दुर्योधनास त्यांनीं म्हटलें "वत्सा दुर्योधना, विराटाला थोडा गर्व झाला आहे असें दिसतें. तुझ्या या यज्ञसमारंभाला सर्व राजे आले, परंतु विराट कांहीं आला नाहीं. तेव्हां त्याला कांहीं तरी शिक्षा केली पाहिजे. एवढ्याकरितां त्याच्या खिल्लारावर आपण हल्ला करावा." विराटाचें खिल्लार फार मोठें अशी ख्याति होती. अर्थातच या सूचनेमुळें दुर्योधनास असें वाटलें कीं, आपण त्या खिल्लारावर हल्ला केल्यानें आपणास गोधनाची चांगली लूट मिळेल.

हें मनांत येतांच लागलीच हल्ल्याची तयारी झाली. सर्वांनाच स्फुरण चढलें.

दुर्योधन म्हणालाः—

रथ हे सज्ज जहाले
यांहीं लुटूं या विराटगोधन तें।
घेतों गदा करीं या
यशीं विश्रांति घेत पडली ते॥

**द्रोणः**—"आणा मद्रथ जोडुनी पुरुषहो"

**शकुनिः**— "हत्तीहि माझा त्वरें।"

**कर्णः**—

"घोडे ते स्फुरती तयां मम रथा
जोडोनि आणा बरें॥

**भीष्मः**—

"जाण्या मत्स्यपुरासि उत्सुक असें
माझें धनू आणवा।"

**सर्वः**—

"ठेवा चाप, रहा गृहीं; रणमुखीं
या सेवकां पाठवा॥"

इतकी सर्व तयारी झाल्यावर लागलीच मत्स्यपुरास कौरवांचें सैन्य जाऊन विराटराजाचें खिल्लार लुटून आणण्याकरितां हल्ला करण्यांत आला. या गोग्रहणाच्या कामांत पुढाकार शकुनीस दिला होता.

विराट राजाला ही बातमी लागतांच त्यानें लढाईची तयारी केली. त्याच्याच राज्यांत धर्मभीमादि येऊन अज्ञातवासांत राहिले होते. अर्जुनानें बृहन्नटेचा वेष घेतला होता. त्याचे अज्ञातवासाचे दिवस भरले नव्हते, तरी पण ज्याच्या पदरीं राहून आपण ज्याचें अन्न खालें, त्याचें व त्याच्या मालमत्तेचें रक्षण करणें हें आपलें कर्तव्य आहे असें समजून अर्जुनानें विराट राजाच्या पुत्रास बरोबर घेऊन मोठा पराक्रम करून कौरवांना

मागें परतण्यास लाविलें. या गर्दींत अर्जुनाचा पुत्र अभिमन्यु हा धरला गेला. राजा विराटाच्या दरबारांत अभिमन्यूस नेल्यानंतर त्यानें आपल्या वडिलांस व चुलत्यास ओळखलें.

इकडे पराभव पावून माघारीं गेलेल्या दुर्योधनादिकांचीही खात्री झाली कीं, विराटनगरांतच पांडव आहेत. नंतर पांडव प्रगट झाले आणि द्रोणाचार्यांस कबूल केल्याप्रमाणें दुर्योधनानें त्यांस अर्ध राज्य दिलें.

असा कथाभाग या पंचरात्र नांवाच्या नाटकांत आहे. नाटक लहान आहे खरें, परंतु द्रोण, भीष्म, शकुनि, कर्ण, दुर्योधन, धर्म, भीम, अर्जुन, विराट, उत्तर वगैरे पात्रांत प्रत्येकाचा शीलविशेष त्यांच्या त्यांच्या भाषणांनीं फारच चांगल्या प्रकारें व्यक्त केलेला आहे. दुर्योधन हा हाडाचा दुष्ट नसून केवळ कुसंगतीनें त्याच्या मनांत दुर्विचार येत असत असें दाखविलें आहे. शकुनि जातीचाच दुष्ट. त्याला वैराखेरीज कशाचेंच प्रेम नाहीं असें त्याचें शील चितारलें आहे. कर्ण हा सरळ शिपाई, त्याला लबाड्या आणखी कावे यांचें मुळींच ज्ञान नाहीं. याप्रमाणें सर्व पात्रांत एकमेकांपेक्षां कांहीं ना कांहीं तरी निरनिराळेपणा दाखविला आहे आणि तो फार चांगल्या प्रकारें व्यक्त झाला आहे. दुर्योधनाच्या सरळ अंतःकरणाचें चित्र किती सुंदर आहे त्याचा एका प्रसंगावरून मासला समजेल.

अभिमन्यूला धरून नेला अशी बातमी कौरवांच्या छावणींत येतांच दुर्योधन म्हणतो:

"कोणीं ? कोणीं अभिमन्यूला पकडून नेलं ? मी जाऊन त्याला सोडवून आणीन. माझं त्याच्या वडील माणसांशीं वैर आहे, तेव्हां मीं बळेंच त्याला धरून नेऊं दिला असा माझ्यावर सहजच जनापवाद येईल. पण तो आधीं माझा पुत्र आणि मग पांडवांचा असं मी समजतों. घराण्याघराण्याचं जरी वैर असलं, तरी मुलांपर्यंत तें नेऊन पोंचवावयाचं नाहीं."

**कर्णः**—दुर्योधना, फार प्रेमळ व यथायोग्य बोललास. अभिमन्यूनं आपलेपणा धरून आपल्याबरोबर रणांगणांत गमन केलं तेव्हां त्याचं रक्षण आपण केलंच पाहिजे. तर चला, धनुष्यबाण घेऊन आपण त्याला सोडविण्याला जाऊं.

**शकुनिः**—अहो सुभद्रेचा पुत्र अभिमन्यु, त्याला रक्षण करणारांची काय उणीव ! विराट राजा पांडवाचा मित्र तो अभिमन्यूला आपणच सोडील !

असो. महाभारतांतल्या कथाभागांत थोडा परंतु फार महत्त्वाचा फरक कवीनें या नाटकांत केला आहे. तो असा कीं, अज्ञातवास संपतांच दुर्योधनाकडून पांडवांस राज्य देवविलें आणि शेवटीं आनंद केला आहे. द्रोणानें दक्षिणा मागितल्याचा प्रसंगही मोठा सुंदर आहे. त्यांत त्यांचें शील फार उदात्त दिसतें. एकंदरींत हें लहानसें नाटक फारच चांगलें आहे. यांत स्त्रीपात्र मुळींच नाहीं. यामुळें कॉलेज किंवा शाळा यांतून वार्षिक संम्मेलनास हें नाटक करविण्यास फार सोईचें आहे. भाषा फार सुंदर व सोपी. मुलांच्या तोंडीं बसल्यास त्यांना संस्कृत भाषेच्या अभ्यासास फार साहाय्य होईल. नाटकप्रयोग करण्यास काळही फार लागावयाचा नाहीं. दीड तास पुरेल.

# दूतवाक्य.

पांडवांचा वनवास संपला, अज्ञातवासही संपला, आतां एक लढाई करून तरी आपलें राज्य मिळवावयाचें किंवा कौरवांना सामोपचाराच्या गोष्टी सांगून त्यांच्याकडून पहिल्या वचनाप्रमाणें—वनवास व अज्ञातवास संपवून आलांत म्हणजे तुमचा राज्याचा भाग देऊं असें वचन दिलें होतें—त्याप्रमाणें करवावयाचें, एवढेंच काय तें राहिलें. तेव्हां कौरवांना सामोपचाराच्या गोष्टी सांगण्याचें काम पांडवांच्या विनंतीवरून श्रीकृष्णांनीं पतकरिलें. दुर्योधन व त्याचे सार्थीदार शकुनि वगैरे ऐकणार नाहींत, आपल्या सामोपचाराच्या गोष्टींचा कांहींएक उपयोग व्हायचा नाहीं, हें त्यांना पक्कें ठाऊक होतें परंतु एकवार यत्न करून पहावयाचा, असा श्रीकृष्णांनीं निश्चय केला; आणि ते दुर्योधनाकडे आले.

इकडे दुर्योधन दरबार भरविण्याच्या विचारांत होता. पांडव आतां मोकळे झाले—अर्थातच राज्याचा वांटा मागावयाला येणार तेव्हां त्यांना काय उत्तर द्यावें आणि पुढें काय करावें, हा प्रश्न त्यालाही पडलाच. यामुळें त्यानें असें मनांत आणलें कीं, दरबार भरवून सेनापतीची जागा कोणाला द्यावयाची हा विचार ठरवावयाचा. त्याप्रमाणें दरबारास येण्याविषयीं आज्ञापत्रें गेलीं होतीं आणि एकामागून एक मंडळी येऊं लागली होती. भीष्म, द्रोण, कर्ण वगैरे मंडळी आली तसतसें यथापदवी दुर्योधनानें त्यांचा आदर करून त्यांस योग्य स्थानीं बसविलें. नंतर सेनापति कोणास नेमावें हा विचार निघतांच "भीष्म असतांना हा प्रश्न कशाला?" असे उद्गार निघून त्यांचेचि त्या महत्त्वाच्या कामगिरीवर योजना करावयाची असें ठरलें. 'आपल्याही मनांत तेंच होतें' असें दुर्योधन उद्गारला.

इतक्यांत कंचुकीनें येऊन वर्दी दिली कीं, पांडवांच्या छावणींतून पुरुषोत्तम नारायण हे दूत म्हणून आले आहेत.

कृष्णाला 'पुरुषोत्तम' असें विशेषण कंचुकीनें दिलेलें ऐकतांक्षणींच दुर्योधनाच्या अंगाचा फार संताप झाला. आणि तो त्याच्या अंगावर ओरडून म्हणतो, "काय तो कंसाचा दास दामोदर? त्याला तूं पुरुषोत्तम म्हणतोस! गवळ्याला पुरुषोत्तम म्हणायचें? वा! राजांच्या नोकरांना फारच चांगला आचारविचार समजतो म्हणायचा! चल निघ येथून, काळें कर."

तें ऐकतांच कंचुकी घाबरला. 'चुकून मी तसें बोललों तर क्षमा असावी' असें म्हणाला. तेव्हां दुर्योधनानें त्याला माफ करून म्हटलें, "होतेच आहे चुकी. पण आतां सांग पाहूं कोण आला आहे तो?"

**कंचुकी**:--केशव नांवाचा दूत आला आहे.

**दुर्योधन**:--ठीक ठीक. हेंच नांव त्याला योग्य आणि असेंच म्हणावें. अहो सभास्थानीं बसलेले राजपुरुषहो, हा दूताची कामगिरी करायला केशव आला आहे, याला काय योग्य आहे? काय म्हणतां? त्याची पाद्यपूजा करावी? त्याला अर्घ्य वगैरे द्यावे? मला तर वाटतें कीं

त्याला पकडून ठेवावें. त्याला पकडून ठेविलें कीं, पांडवांचे हातपाय मोडले इतकेंच नव्हे तर ते गतिमतिरहित दुबळे होतील. आणखी ते असे झाले कीं, माझ्या हातीं सगळी पृथ्वी अगदीं निर्वेधपणें आलीच म्हणायची !"

इतकें बोलून तो सभासदांकडे वळला व त्यांस म्हणतो, "तो पांडवांकडून आलेला दूत सभेंत आला म्हणजे त्याला कोणीं खडी ताजीम देतां कामा नये. जो कोणी त्याला मान देण्यासाठीं उठेल, त्याला बारा भार सोनें प्रत्येकीं दंड करीन, कधीं सोडणार नाहीं."

त्यानें इतरांचेसंबंधानें हा बंदोबस्त केला, परंतु आपण स्वत: उठूं नये याला काय व्यवस्था करावी, याचा त्याला विचार पडला कारण एक तर श्रीकृष्णाचा प्रभावच असा होता कीं, त्याला पहातांक्षणींच उठून उभे राहून मान दि-ल्याखेरीज रहाणें शक्य नव्हतें; आणि दुसरें असें कीं, दुर्योधनाकडे वकील म्हणून तो येणार तेव्हां शिष्टाचारार्थ तरी त्यानें उठणें जरूर होतें. विचार करून त्यानें अशी युक्ति काढली. पांडवांना द्यूतांत जिंकल्यानंतर द्रौपदीकेशाकर्षण करून सभेंत तिची विटं-बना केली, त्या वेळच्या देखाव्याचा एक चित्रपट त्यानें तयार करविलेला होता, तो चित्रपट आणून आपण पाहण्यांत गुंतलों आहों असें दाखवावें, म्हणजे दुहेरी काम होईल असा त्यानें विचार केला. एक, आपण चित्रपट पहाण्यांत गुंतलों असल्यामुळें श्रीकृ-ष्णाकडे आपलें लक्ष्य गेलें नाहीं आणि त्यामुळें आपण अभ्युत्थान दिलें नाहीं असें म्हणतां येईल, आणि दुसरें, आपण पांडवांची कशी फजिती झाली व ते कसे येथून गेले तें विसरलों नाहीं हेंही श्रीकृष्णास दिसेल.

असा विचार करून त्यानें ताबडतोब आपल्या इच्छेप्रमाणें सर्व व्यवस्था केली. चित्रपट आणविला व स्वारी तो पहात बसली आणि कंचुकीला "तो पांडवदूत केशव आला आहे त्याला घेऊन ये" म्हणून हुकूम केला. आणि हंसून कर्णास म्हणतो: "मित्रा कर्णा !

दूतत्व ये करुं पहा आजि पांडवांचें
तैं बायकी मृदुल शब्द युधिष्ठिराचे ।
जे आपणां कथिल कृष्णमतीच कृष्ण
ऐकावया करिं पुढें निजकर्ण कर्ण ॥"

इतक्यांत कंचुकीनें श्रीकृष्णास आणलें. श्रीकृष्णाचे पाय सभागृहास लागले मात्र, सर्व दरबारी लोक एकदम खाडकन् उठून उभे राहिले. आपल्या राजानें त्यांस घात-लेल्या बारा भार दंडाचें त्यांना स्मरणसुद्धा राहिलें नाहीं. हें मांडलिकांचें व सरदारांचें करणें अर्थातच दुर्योधनास आवडलें नाहीं. तो त्यांस त्याबद्दल बोललाही. त्यानें त्यांस दंडाचें स्मरण दिलें. परंतु श्रीकृष्णानें त्याच्या बोलण्याकडे आपलें लक्ष्य नाहीं असें दाख विलें आणि त्याच्याजवळ जाऊन त्यास म्हटलें: 'दुर्योधना, बसूनचसा राहिलास ?"

ते कृष्णाचे शब्द कानीं पडले मात्र, त्याची त्रेधाच उडाली. आसनावरून तो उठण्याची धडपड करितांना पडला. आणि आपल्याशींच म्हणतो: 'या दूताची मायाच कांहीं विलक्षण आहे.

निश्चय करूनि बसलों
देइन कृष्णा न मान मी उठुन ।
चळलों परि हो सहसा
त्याच्या तेजेंच आसनावरुन ॥"

नंतर त्यानें श्रीकृष्णास बसण्यास सांगि-तलें. श्रीकृष्णांनीं इतरांसही बसण्याविषयीं विनंति केली आणि आपण स्वत: बसले. इतक्यांत त्यांचें लक्ष्य त्या चित्रपटाकडे गेलें. प्रथमत: तो चित्रपट पहावासें पाहून

त्यांनीं " वा ! चित्रपट फार चांगल दिसतो आहे. " असा उद्गार काढला, परं त्यांतील विषय पहातांच त्याचा तिरस्क येऊन ते ह्मणतात: " छे. छे. हा दृष्टीसमो सुद्धां नको. यांत द्रौपदीकेशाकर्षणा देखावा आहे. उचला इथून हा. ज्य स्वजनांचा अपमान केला आहे अ आपल्या पराक्रमांचीं चित्रें काढून तीं स पहात बसणें म्हणजे निवळ पोरकटप आहे ! " श्रीकृष्णाच्या आज्ञेप्रमाणें तो चि पट लागलीच कंचुकीनें न्यावा म्हणून दु धनानेंही त्याला आज्ञा केली. आणि श्री कृष्णास म्हटलें:

" तो यमधर्माचा पुत्र धर्म, वायूचा भीम, इंद्राचा पुत्र अर्जुन, अश्विनीकुमारां पुत्र नकुलसहदेव हे सगळे सहकुटुंब सहप वार बरे आहेतना ? "

बोलण्यांत अर्थातच खोंच होती. श्री ष्णानें त्यावर उत्तर दिलें:—" गांधारीपुत्र दुर्योधन त्यानें असे कुशल प्रश्न विचारणें योग्यच आहे. अगदीं अगदीं कुशल आहे आपलें, आपल्या राज्याचें, सर्वांचें कुश विचारून धर्मराजादिक पांडव माझ्या मुख विज्ञापना करिताहेत:—

भोगिलिं अनेक दुःखें
परि केल्या सर्वही अटी पूर्ण
द्यावी बंधु म्हणोनी
राज्याची वांटणी अतां तूर्ण

तें ऐकतांच दुर्योधन एकदम म्हणतो " काय ? काय ? बंधु म्हणून राज्याच वांटणी ? हे आमचे बंधु कसे ?

पंडू पितृव्य माझा
मृगयेसाठीं वनीं असे गेला ।
तेथें एक्या मुनिला
कोपवितां शाप कीं तयें दिधला ॥
तेव्हांपासुनि त्यातें
स्त्रीचा स्पर्शहि मुळींच हो त्याज्य ।
त्याला होति कसे सुत
भलत्यांला देउं मी कसें राज्य ? ॥ "

तें ऐकतांच कृष्ण त्याला म्हणाले, "सुयोधना, तुला पूर्वींच्या सगळ्याच गोष्टींचें चांगलें ज्ञान आहे. तेव्हां तुला विचारतों,

विषयी विचित्रवीर्य
क्षय लागुनियां अकालिं मृत झाला ।
व्यासें तत्क्षेत्रीं मग
धृतराष्ट्र न काय पुत्र निर्मियला ॥
तो हा तुझा जनक बच
राज्यप्राप्ती तयास कशि झाली ।
छीः छीः न मागलीं तीं
उकरावीं कुत्सितें अशा काळीं ॥
प्रेमानें पांडव जें
विनविति तें करिं सुयोधना शीघ्र ।
टाकुनि रोषहि सगळा
पूर्वींचा बा मनांतला उग्र ॥"

श्रीकृष्णाचें तें भाषण ऐकून दुर्योधन मनांत वरमला. परंतु मनांत वरमलेला माणूस स्वभावानें मत्सरी व दुष्ट असल्यास, आपण वरमलों, निरुत्तर झालों असें कधींही कोणास कळूं द्यावयाचा नाहीं. उलट जोरानें कांगाव करून आपणच खरे असें प्रतिपादूं लागा वयाचा. त्या कुटिल स्वभावाला अनुसरू दुर्योधन एकदम एकेरीवर येऊन श्रीकृष्णा म्हणतो: " अरे दूता, तुला राज्यव्यवह म्हणजे काय, आणखी ता कशाशीं खात हें कांहींच माहिती नाहीं !

शौर्यें शत्रुंसि जिंकुनी मिळविती
राज्यें नृपांचे सुत ।
राज्याची नच भीक मागत जगीं
कोणी न ती घालित ॥

९४२८

राजे होउं म्हणोनि हांव जरि त्यां
सांगा करा साहसें।
शांती व्हावि तरी मुनींसम सुखें
वन्याश्रमा जा कसे ॥

हें त्याचें अत्यंत कठोर भाषण ऐकून श्रीकृष्णांस वाईट वाटलें व ते त्यास म्हणाले "बा दुर्योधना, पुण्यसंचयामुळें प्राप्त झालेली राज्यश्री आपल्या आप्तजनांसमेत वांटून घ्यावी. त्यांची वंचना करूं नये. अशी वंचना करतो त्याचे सर्व श्रम विफल होतात."

परंतु असल्या नीतिबोधाचा त्याच्यावर काय परिणाम होणार? दुर्योधन अधिकच उद्दामपणानें बोलूं लागला. श्रीकृष्णांच्याच उखाळ्यापाखाळ्या काढूं लागला. तो त्यांस म्हणालाः "प्रत्यक्ष बापाच्या मेहुण्याचा म्हणजे आपला मामा जो कंस त्याचा घात करण्याला ज्या तूं मागें पुढें पाहिलें नाहींस, तो तूं आम्हांला आमच्या कट्ट्या शत्रूंवर— जे आह्मांला एकसारखे पाण्यांत पाहतात— त्यांच्यावर दया कर म्हणून सांगायला आला आहेस, याला म्हणावें तरी काय?"

असलीं उपरोधिक बोलणीं दुर्योधन बोलला, तरी श्रीकृष्णांनीं शांति सोडली नाहीं, पुनः त्याला शांतपणें ते ह्मणाले: "बाबारे, त्याच्या कृतकर्मामुळें कंसाला मृत्यूनेंच मारलें. माझ्या आईला त्यानें पुत्रवियोगाचें दुःख दिलें आणि आपल्या प्रत्यक्ष बापाला बंदींत घालून ठेविलें. तेव्हां त्याची गोष्ट काढून मला कशाला हिणवतोस?"

श्रीकृष्ण जों जों शांतपणें बोलूं लागले तों तों दुर्योधन अधिकाधिकच चिडला आणि पुनः उपरोधिकपणें त्यांस म्हणतो: "पुरे पुरे. आपण केवळ कपटानें कंसाचा घात केलात! उगीच आत्मप्रौढी नको आमच्यापुढें गाऊं. जांवयाचा कपटानें नाश झालेला पाहून अत्यंत उद्विग्न झालेला त्याचा सासरा जो मगधराजा तो जेव्हां संतप्त होऊन आपल्यावर चाल करून आला तेव्हां कां आपल्याला पळतां पळतां भुई थोडी झाली! तेव्हां आपलें शौर्य कोठें गेलें?"

**श्रीकृष्णः**—बाबारे, नीति जाणणारे लोक काळ वेळ पाहून शौर्य गाजवीत असतात. पण आमची चेष्टा करण्याचें सोडून देऊन सध्यां तुझ्यापुढें असलेल्या कार्याचा निकाल लाव. माझें ऐकः—

विसरुनि दोष तयांचे
भ्रात्यांशीं स्नेह तो करावा कीं,
बंधुस्नेहप्राप्ति
श्रेयस्कर सर्वथा उभय लोकीं ॥

तें ऐकून दुर्योधन एकदम तिरस्कारानें म्हणतो, "भ्राते? ते कुठले माझे भ्राते?

देवांच्या पुत्रांशीं
मनुजांची बंधुता कशी होय!
दळिलें कशास दळितां?
झालें भाषण पुरें न हो काय?॥"

याला सामोपचाराच्या गोष्टी सांगून याचें मन वळविणें अगदीं अशक्य, हें पाहून श्रीकृष्णांस फार वाईट वाटलें आणि त्यांनीं मनांत असा विचार केला कीं, कठोर भाषणें बोलून राग आणून कांहीं जमलें तर पहावें. म्हणून ते त्याला म्हणततातः—"बा सुयोधना, अर्जुनाचा प्रताप तुला माहीत आहेना? किरातांचें रूप घेतलेल्या शंकराशीं युद्ध करून त्यानें त्यास संतुष्ट केलें, खांडववन खाऊन फडशा पाडणाऱ्या अग्नीला त्यानें शमविलें, देवेंद्राला त्रास देणाऱ्या निवातकवचांचा त्यानें सहज नाश केला आणि विराटनगरीच्या बाहेर त्यानें

एकट्यानें भीष्मादिकांना दांतीं तृण धरावयास लाविलें. इतकेंच नव्हे तर तुझ्या स्वतःवर त्यानें केवढे उपकार केले ते स्मर. चित्रसेन गंधर्व तुला एखाद्या कोंकराप्रमाणें धरून आकाशांत नेत असतां तूं गयावया करून ओरडूं लागलास तेव्हां त्या संकटांतून तुला कोणीं सोडविलें ? तेव्हां बाबा त्यांच्याशीं विनाकारण वैर करूं नकोस. मी सांगतों त्याप्रमाणें पांडवांना अर्धें राज्य दे. नाहीं तर सागरान्त पृथ्वी ते पांडव तेव्हांच जिंकून घेतील ! ”

त्या बोलण्यानें दुर्योधन पुरा चिडला आणि म्हणतोः—

“ काय ? काय ? पांडव आपल्या बळानें माझें राज्य हरण करतील असें म्हणतोस ? तर मग होऊंच दे, भीम तर काय पण प्रत्यक्ष वायु जरी वीररूप घेऊन माझ्यावर प्रहार करूं लागला किंवा अर्जुन तर काय पण प्रत्यक्ष इंद्र वज्र घेऊन आला, तरी सुद्धां तुझ्या बोलण्यावरून मी पांडवांना एक गवताची काडी देखील देणार नाहीं. हें राज्य माझें आहे. माझ्या पित्यापासून मीं मिळविलेलें आणि शौर्यानें रक्षिलेलें आहे ! तूं गवळ्याचा पोर, तुझ्याशीं बोलायचें तर गवताची काडी मध्यें धरून बोलावें ही तुझी योग्यता ! कोठें एखादी अवध्य अशी स्त्री, एखादा अश्व, एखादा वृषभ, एखादा मल्ल यांची हत्या करण्यांत तुझें शौर्य, त्या तुला निर्लज्जपणें माझ्यासारख्या साधूशीं बोलण्याला कांहीं वाटत नाहीं ? जा. जा. तुझ्याशीं मी बोलत नाहीं. माझी योग्यता कोणीकडे, तुझी कोणीकडे !

**श्रीकृष्णः**—वाहवा ! वाहवा ! हे राजश्री माझ्याशीं बोलूं इच्छित नाहींत. तर मग भरलीच कुरुवंशाचीं शंभर वर्षें. ठीक आहे. राजेहो, आम्हीं आतां जातों.

**दुर्योधनः**—जातों ? जातोस कसा ? दुःशासना, दुर्मर्पणा, दुर्मुखा, उठा. दूताची पदवी सोडून वरचढ भाषणें करणाऱ्या या केशवाला बांधा. कायरे ? अरे खांबासारखे असे बसलां काय ? तुमची सगळी शक्ति गेली वाटतें ? दुःशासना, कुठें गेलें तुझें बळ ? मामा, उठा. धरा आणखी जेरबंदांनीं बांधा. तुमच्या हातांत बळ नाहीं का? बरें आहे मी बांधतों. ”

असें म्हणून दुर्योधन पुढें सरसावला. तें पाहून श्रीकृष्ण आपल्याशींच हंसले व त्यांनीं एकदम विराट्स्वरूप धारण केलें.

दुर्योधन अगदीं ऐटीनें उठला होता. परंतु श्रीकृष्ण पुढें नाहींत ! केशव गेला कोठें असें म्हणतो तों त्याला जिकडे तिकडे केशव दिसूं लागले. पुनः केशव अदृश्य व्हावा. पुनः जिकडे तिकडे केशवच केशव दिसावे, अशी दुर्योधनाची मोठी त्रेधा उडून गेली. शेवटीं पुष्कळ केशव दिसूं लागले, तेव्हां तो मोठ्यानें सर्व राजांस हांका मारून म्हणतोः “ अरे एकेकजण एकेक केशव धरून त्याला बांधून टाका, पहातां काय ! ” परंतु उपयोग काय ? जो राजा केशवाला धरण्यास उठे तोच बांधून पडल्याप्रमाणें खालीं पडे. शेवटीं अशी विलक्षण स्थिति झालेली पाहून दुर्योधन फार संतापून म्हणतोः “ बरें आहे. आतां मी आपले धनुष्यबाण आणतों व तुझा कसा निकाल लावतों. ते तुझे भक्त पांडव आपल्या अश्रुपूर्ण नेत्रांनीं पाहूं देत. ” असें म्हणून तो तेथून निघून गेला.

दुर्योधनाच्या उपमर्दकारक भाषणांनीं श्रीकृष्णास इतका संताप आला कीं, त्यांनीं त्या संतापाच्या भरांत आपल्या सुदर्शनास आव्हान केलें. तें आव्हान करतांच सुदर्शन

मूर्तिमान् त्यांच्यापुढें उभें राहून 'काय आज्ञा आहे' म्हणून विचारूं लागलें. परंतु पुनः श्रीकृष्णांनीं विचार करून असें ठरविलें कीं, दुर्योधनाचे पूर्ण अपराध भरेपर्यंत त्याला जिवंत ठेविलें पाहिजे. म्हणून त्यांनीं सुदर्शनास पुनः अंतर्हित होण्याची आज्ञा केली. पुढें त्यांनीं आपल्या शार्ङ्ग धनुष्याला, कौमोदकी गदेला वगैरे तशीच आज्ञा करून स्वस्थानीं बसण्याची आज्ञा केली. इतक्यांत श्रीकृष्ण आल्याचें अंध धृतराष्ट्रास समजलें. तेव्हां तो पूजाद्रव्यें घेऊन तेथें आला. त्यानें श्रीकृष्णाची पूजा केली. आपल्या पोरानें केलेल्या अपराधांबद्दल क्षमा मागितली आणि नंतर त्यास आशीर्वाद देऊन कृष्ण पांडवशिबिरास गेले.

# दूतघटोत्कच.

हें नाटक लहान आहे. याचा प्रारंभ भारतीय युद्धांत अभिमन्यूच्या वधाच्या वेळचा आहे. अभिमन्यूवर पुष्कळ वीरांनीं एकदम हल्ला करून त्याचा प्राण घेतला, हें अत्यंत दुःखप्रद वृत्त अर्जुनानें ऐकलें, तेव्हां त्यानें जयद्रथाचा वध करण्याची व ज्यांचें ज्यांचें अभिमन्यूच्या वधांत अंग होतें त्यांच्या त्यांच्यावर सूड घेण्याची प्रतिज्ञा केली. या प्रतिज्ञेमुळें काय अनर्थ ओढवतील आणि काय नाहीं याचा नेम नाहीं, असें वाटून श्रीकृष्णानें दुर्योधनास व धृतराष्ट्रास ती बातमी कळविण्यासाठीं घटोत्कचाकडून निरोप कळविला. तो निरोप दूत म्हणून घटोत्कचानें कौरवशिबिरांत येऊन दुर्योधनास व धृतराष्ट्रास सांगितला. एवढेंच या नाटकाचें संविधानक आहे. या नाटकाचा प्रारंभश्लोक फार सुंदर आहे. त्याचा अर्थ असा:—

"जो सर्व त्रिभुवन व्यापून राहिला आहे, जो संकटकाळीं देवांना युक्ति सुचवून त्यांचें संरक्षण करतो, जो लोकत्रयांत चाललेल्या नाटकाचा प्रस्ताव व परिसमाप्ति करणारा सूत्रधार, तो तुमचें संरक्षण करो."

हा आशीर्वादात्मक श्लोक म्हणून प्रेक्षकांस सूत्रधार विज्ञापना करीत असतां "अहो सांगा, अहो सांगा" असे शब्द कोठून तरी ऐकूं आले. हे शब्द कौरवपांडवांच्या रणांगणांतून कोणी वीर उच्चारीत रंगभूमीवर आला. तो अभिमन्यूच्या वधामळें झालेला रणक्षेत्रांतला प्रकार धृतराष्ट्राच्या कानावर घालण्यासाठीं आला होता. त्याचा हेतु असा होता कीं, अर्जुनानें केलेली प्रतिज्ञा धृतराष्ट्राच्या कानीं गेली, तर पुढचा सगळा भयंकर नाश टाळण्यासाठीं तो आपल्या दुर्बुद्धि पुत्राला उपदेशाच्या चार गोष्टी सांगून कदाचित् भांडण मिटवील. तो धृतराष्ट्राच्या शिबिरास येऊन मोठ्यानें ह्मणाला, "अहो, ज्यानें आपल्या शौर्यानें सर्व कौरवसेनेंत नुसती भयंकर खळबळ उडवून दिली, अशा एकाकी अभिमन्यूवर शेंकडों शूर वीर तुटून पडले, आणि त्यांनीं त्याचा प्राण घेतला."

धृतराष्ट्रास हें भाषण ऐकूं आलें व तो गडबडीनें बाहेर येऊन म्हणतो: "मला प्रिय वाटेल असें समजून हा कोण मला अत्यंत अप्रिय असें वृत्त कळवून दुःख देत आहे? अर्भकाचा वध केल्याच्या पातकानें दूषित झालेला माझा वंश समूळ नष्ट होईल असें हा कोण सांगत आहे?".

धृतराष्ट्राबरोबर गांधारी होतीच, तिलाही तें ऐकून फार दुःख झालें. धृतराष्ट्रानें तिला स्पष्टपणें सांगितलें कीं, "आपल्या कोंवळ्या पोरावर लांडग्याप्रमाणें तुटून पडून ज्यांनीं त्याचा वध केला, त्यांचा नाश तो श्रीकृष्णानें ज्याचें सारथ्य पत्करिलें आहे असा अर्जुन पूर्णपणें केल्याखेरीज कधींच राहणार नाहीं हें उघड आहे."

धृतराष्ट्रकन्या दुःशला त्याच्याजवळ होती तीही घाबरली व म्हणाली, "ज्यांनीं अल्पवयी उत्तरेला अशा प्रकारें वैधव्यांत ढकललें

त्यांनीं आपल्या पक्षाच्या सगळ्याच युवतींन वैधव्यांत ढकललें असें होणार."

नंतर अभिमन्यूच्या वधाची वार्ता ज्याः आणली त्याला जवळ बोलावून त्याच्याकडूः धृतराष्ट्रानें अभिमन्युवधाची व तदनंतः अर्जुनानें केलेल्या प्रतिज्ञेची सर्व हकीकत विस्तारानें वदवून घेतली. धृतराष्ट्रानें त्याल विचारलें:—

"बाबारे, अभिमन्यूचा वध कोणीं केला! कोणाला असा आपल्या जीविताचा कंटाळा आला? पांच पांडवरूप पंचाग्नींना कोणीं आत्मा सर्पणाप्रमाणें वाहिला?"

तेव्हां त्या वीरानें त्यास उत्तर दिलें, 'पुष्कळ वीरांनीं एकदम अभिमन्यूवर हल्ला-करून त्याला ठार केलें. परंतु त्यांत जयद्रथ विशेषतः निमित्त झाला."

'जयद्रथ निमित्त झाला' हें ऐकतांच धृतराष्ट्राला अत्यंत खेद झाला व तो म्हणाला, "तर मग आतां जयद्रथाचें भरलेंच म्हणावयाचें."

दुःशला तर मोठमोठ्यानें रडूंच लागली. तें ऐकून धृतराष्ट्रानें तिचें शांतवन करण्याचा प्रयत्न केला. परंतु दुःशला आपल्या बापाला म्हणते, "बाबा, मी आतां उत्तरेकडे जातें."

"तूं उत्तरेकडे जाऊन तिला काय म्हणणार?" धृतराष्ट्रानें विचारलें.

दुःशला त्यावर म्हणते, "मी तिच्याकडे जाऊन तिला म्हणेनः 'आजपासून मीही तुझ्याबरोबर वैधव्यवेष धारण करतें."

तें ऐकून गांधारीच्या अंगावर कांटा उभा राहिला आणि ती म्हणते, "पोरी, असलें अमंगळ भाषण अगदीं करूं नकोस. तुझा पति अजून जिवंत असून असलें अमंगळ काय बोलावें?"

"आई," दुःशला लागलीच म्हणते, "कृष्णाची ज्याच्यावर पूर्ण कृपा अशा अर्जुनाला एकदम पुत्रवियोगांत ढकलणारानें आतां आपल्या जीविताची आशा कशाला करावी? आतां सर्वांचे तो बळी घेणार याबद्दल शंका कशाला पाहिजे?"

धृतराष्ट्राला दुःशलेचें म्हणणें अगदीं यथार्थ वाटलें. तो म्हणाला, "श्रीकृष्णानें आपल्या भुजांच्या उशा करून ज्याला त्यांवर निजवून वाढविलें, बलरामाला ज्याच्याबद्दल विलक्षण अभिमान वाटत असे, देवांप्रमाणें ज्यांचें वीर्य त्या पांडवांच्या प्रेमाचें जो केवळ स्थान, त्या अभिमन्यूचा वध करण्याचें दुष्कृत्य ज्यांनीं केलें, त्यांनीं आपल्या जीविताची आशा कशाच्या आधारावर करावी? जयत्राता, हा अभिमन्यूचा वध पाहून अर्जुनानें काय बरें केलें?"

जयत्रातानें उत्तर दिलें: "महाराज, अर्जुन जवळ असतांना का हा त्याच्या पुत्राचा वध झाला?"

**धृतराष्ट्रः**—काय? अर्जुन तेथें नव्हता?

**जयत्रातः**—महाराज, नव्हता. अर्जुन दुसरीकडे पराक्रम करण्यांत गुंतला आहे ही संधि साधूनच हा कुमार अभिमन्यूचा वध झाला.

**धृतराष्ट्रः**—बरोबरच आहे. वाघ गुहेंत बसला असतांना त्याच्या पोराला हात लावायची तरी कोणाची छाती होणार आहे? बाकीच्या पांडवांनीं काय केलें?

**जयत्रातः**-बाकीच्या पांडवांनीं काय करायचें आहे? त्यांनीं अभिमन्यूचें प्रेत दहन करण्यासाठीं चितेवर ठेविलें आणि अर्जुन त्याचें

शेवटलें दर्शन घेण्याकरितां येईपर्यंत वाट पहात बसले होते. आणि कोणीं कोणीं त्या एकाकी मुलावर प्रहार केला त्यांचीं नांवें आठवीत होते.

**धृतराष्ट्र**:—तर मग गांधारी, आपण गंगातटाकाला जाऊं.

**गांधारी**:—तेथें जाऊन काय आपण स्नान करणार ?

**धृतराष्ट्र**:—आणि आजच आपल्या पोरांना तिळांजळि देणार. कारण ते आतां पांडवांच्या हातून खास मरणार.

इतक्यांत तेथें दुर्योधन, दुःशासन, शकुनि वगैरे मंडळी हंसत खिदळत आली. दुर्योधनाला तर वाटलें कीं, आज आपण मोठा जय मिळविला. तो दुःशासनास म्हणालाः— ‘ आतां युद्ध संपलें. शत्रु हटले. श्रीकृष्णाची गुर्मी जिरली आणि आपण पुरे विजयी झालों. ”

दुःशासन त्यांतलाच. त्याच्याही हर्षाला पारावार नाहींसा झाला होता. केवळ प्रति अर्जुन अशा अभिमन्यूला मारलें तेव्हां आतां त्या शोकानें होरपळलेले अर्जुनादिक वीर लढतात कसले आणि काय कसले ?

त्यांनीं सर्वांनीं जयद्रथाची फार फार स्तुति केली. त्यानें आज अलौकिक शौर्य गाजविलें. पांडवांची शेखी उतरली ! अशीं नानाप्रकारचीं त्यांचीं बोलणीं चाललीं. इतक्यांत दुर्योधनाला वाटलें कीं, आपल्या वडिलांना वंदन करून ही हकीकत सांगावी. म्हणून त्यानें शकुनीमामाला म्हटलें, “मामा, आपण बाबांना वंदन करूं या. ”

तेव्हां शकुनि त्याला म्हणतोः “ बाबारे, त्या भानगडींत तूं पडूं नकोस. आपण करतों आहोंत हें त्यांना कांहीं आवडत नाहीं. त्यांना पांडव प्रिय आहेत, यामुळें ते नेहमीं आपली निंदा करितात. आपण हा एवढा जय मिळविला, पण तो त्यांना बिलकूल आनंदकर होणार नाहीं. ते आपल्यालाच दुरुत्तरें बोलतील. ”

मामाचें हें बोलणें दुर्योधनास रुचलें नाहीं. तो आपल्या वडिलांजवळ गेला व त्यांना त्यानें नमस्कार केला. त्याच्या पाठोपाठ सर्वांनीं केला. परंतु धृतराष्ट्रानें कोणाला आशीर्वाद म्हणून दिला नाहीं. तेव्हां सर्वांनीं त्यांना म्हटलें:—“आपण आम्हांला आशीर्वाद देत नाहीं हें काय ? ”

धृतराष्ट्र म्हणतो “बाबांनो,तुम्हीं श्रीकृष्ण व अर्जुन यांचा जो केवळ प्राण अशा अभिमन्यूला मारलेंत, तेव्हांच तुम्हीं आपल्या जिवाची आशा सोडलीत. आतां तुम्हांला आशीर्वाद दिल्याचा उपयोग काय ? ”

दुर्योधनानें तें ऐकून म्हटलें: “ बाबा, तुमच्या जिवाला इतका उद्वेग कशामुळें झाला ? ”

**धृतराष्ट्र**:—बाबांनो, माझ्या एकुलत्या एक पोरीवर—जी मला शंभर पुत्रांपेक्षांही अधिक वाटते तिच्यावर तुमच्यासारख्या बांधवांच्या कृपेनें उद्यां वैधव्याचा भयंकर प्रसंग येणार म्हणून खेद. दुसरा कशानें होणार ?

अशाच प्रकारें धृतराष्ट्रानें अनेक भाषणें करून दुर्योधनादिकांची निंदा केली. परंतु त्यांना त्याचें कांहीं वाटलें नाहीं. ते उलटे आपल्याच तोऱ्यांत भाषणें करून धृतराष्ट्राला तुम्ही आतांपर्यंत नेहमीं असलीं नाउमेदीचीं भाषणें करून आमचीं मनें खट्टू करीत आलां यापलीकडे तुम्हीं केलें काय ? असें म्हणून त्याला टाकून बोलूं लागले.

इतक्यांत पांडवांच्या शिबिरांतून श्रीकृष्णाचा निरोप घेऊन घटोत्कच आल्याची वर्दी

आली. यानें कांहीं तरी आश्चर्यतेचा निरोप आणला असेल, तेव्हां याची चेष्टा करावी असें मनांत आणून त्यांनीं त्याला आंत आपल्यासमोर बोलावलें, आणि त्यानें गंभीर स्वरानें जेव्हां सांगितलें कीं, "मी हिडिंबा-पुत्र घटोत्कच श्रीकृष्णाचा निरोप घेऊन तो धृतराष्ट्रआजोबांना सांगायला आलों आहें."

तेव्हां दुर्योधन त्याला म्हणतो: "ये. ये. बाबा, आपल्या शत्रूच्या घरांत ये. काय तुझ्या जनार्दनानें निरोप सांगितला आहे तो ऐकण्याला मी फार उत्सुक झालों आहें!"

इतकें म्हणून त्यांनीं त्याचा उपहास चालविला. तो हिडिंबेचा पुत्र याबद्दल त्याची चेष्टा चालविली. तो धृतराष्ट्राला मोठ्या आदरानें नमस्कार करून त्याला पांडवांकडली हकीकत सांगत असतां दुर्योधनादिक मध्येंच त्याला म्हणतात: "हंसण्यासारखीच मौज आहे बोआ म्हणायची!"

घटोत्कचानें विचारलें, "हंसण्याजोगी मौज ती कोणती?"

**दुर्योधन**:–हीच कीं, तूं दूत आणि श्रीकृष्णाचा निरोप. तो काय? तर पांडवां-सारखे धनुर्धर–त्यांतून अर्जुनासारखा धनुर्धर तर जगतीतलावर नाहीं. तुझा तो कृष्ण साऱ्या मुलखाचा मत्सरी, त्याला देवांनीं सगळीं हितगुजें सांगितलीं आहेत."

तें उपरोधिक बोलणें ऐकून घटोत्कच त्याला म्हणाला, "तूं मला हंसतो आहेस. परंतु श्रीकृष्णांनीं सांगितलेला निरोप तुला सुद्धां ऐकण्याजोगा आहे."

त्यावर दुर्योधन फारच चिडून त्याला म्हणतो, "श्रीकृष्ण यःकश्चित् यादव. मी राजा. तेव्हां राजाला यःकश्चित् माणसाचा निरोप सांगतोस कसला? आणि इथें ऐकायला कोण बसला आहे?"

यावरून बरीच हमरीतुमरी झाली. घटोत्कच बाहुयुद्ध करण्यास उठला. दुर्योधनानें त्याला राक्षस म्हणून त्याची निर्भर्त्सना केली. घटोत्कचानें त्याला प्रत्युत्तर दिलें कीं, "तुम्ही राक्षसांहूनही क्रूर कर्में करणारे. कारण तुम्ही मोठमोठे वीर मिळून एकट्या पोरावर तुटून तुम्ही त्याला ठार मारलें."

अशीं भाषणें होतां होतांच घटोत्कचानें त्यांची निर्भर्त्सना करून काय निरोप सांगायचा तो मोठ्यानें सांगून तेथून तो चालता झाला.

निरोप हाच कीं, अर्जुनानें **जयद्रथवधा**-ची प्रतिज्ञा केली आहे. येथें हें छोटें नाटक संपलें.

---

# कर्णभार.

शाळांतून मुलांना मूळ संस्कृतांत किंवा भाषांतररूपानें पाठ करून घेतां येण्याजोगीं जीं भासाचीं नाटकें आहेत त्यांत माझ्या दृष्टीनें हें कर्णभार नाटक उत्तम आहे. याचें कथानक अगदीं साधें आहे. यांत एक उत्तम नीतितत्त्व पढविलें आहे. पात्रें थोडीं. स्त्रीपात्र मुळींच नाहीं.

कौरवपांडवांचें युद्ध खूप जोरानें चाललें आहे, अर्जुनानें कौरवसेनेचा नुसता संहार आरंभला आहे, हें पाहून व ऐकून दुर्योधन अगदीं गोंधळून गेला आणि त्यानें समरांगणांतून कर्णाला निरोप पाठविला कीं, तूं आतां अर्जुनाला तोंड देण्याला ये. तूं आल्याखेरीज आतां निभाव लागत नाहीं. हा निरोप घेऊन येणारा वीर कर्णाच्या छावणीजवळ येऊन त्याच्या द्वारपालास म्हणतो, "अहो अंगराज जो कर्ण त्याला लवकर कळवा कीं युद्धकाल जवळ आला."

हा निरोप सांगा असें म्हणतो आहे तोंच कर्ण व त्याचा सारथी शल्य असे दोघे बोलत बोलत समोरून आले. कर्णाच्या मुखावर वीरश्रेष्ठाचें तेज तर तळपतच होतें; परंतु त्यांतल्या त्यांत सेनापतित्वाची जबाबदारी आतां आपल्यावर आली आहे, असें मनांत येऊन वाटणारी चिंताही दिसत होती. तें पाहून तो निरोप घेऊन येणारा सैनिक आपल्याशींच म्हणतो:—

"ग्रीष्म ऋतूंतला सूर्य मेघांनीं आच्छादिला तरी आपल्या स्वाभाविक अशा अत्यंत उग्र तेजानें जसा तळपत असतो, तसा हा कर्ण कौरवसेनेच्या आधिपत्यानें चिंताव्याप्त झाला आहे तरी आपल्या स्वाभाविक शौर्याच्या अत्युग्र तेजानें तळपतोच आहे. हा रणांगणांत जाण्यासाठींच निघाला आहे, तेव्हां आपण कशाला पुढें जावें? येथून पाय काढावा तेंच बरें." असें म्हणून सैनिक निघून गेला.

इकडे कर्ण शल्यास म्हणाला: "मला इतर राजांशीं काय करायचें आहे! जेथें तो धनंजय अर्जुन असेल, तेथें माझा रथ घेऊन चल. मला कौरवांना जें अत्यंत इष्ट तें करायचें आहे."

शल्यानें ठीक आहे म्हणून रथ त्या बाजूस चालविला.

कर्ण आपल्याकडून मोठ्या उत्साहानें चालला होता. परंतु त्याच्या मनांत कांहीं कांहीं गोष्टींचें त्याला स्मरण होऊन विषाद वाटूं लागला होता. आपण कुंतीचेच पुत्र आणि पांडव हे आपले धाकटे भाऊ हें त्यास आठवलें, त्याचप्रमाणें आपण शस्त्रास्त्रविद्या परशुरामापासून शिकलों, आणि त्या विद्येचें आज चीज करून दाखविण्याची उत्कृष्ट संधि आलेली असून आपल्या आईनें ऐन वेळीं आपल्याकडे येऊन "अर्जुनाला मारूं नकोस" म्हणून आपलें निवारण केलें आहे हेंही आठवलें. त्यावरून आपण परशुरामापासून शस्त्रास्त्रविद्या कशी मिळविली तें आठवून तो ती हकीकत शल्यास सांगूं लागला. तो म्हणाला, "जमदग्निशिष्य जो परशुराम त्याच्याकडे मी गेलों. त्याच्या

मस्तकावर विद्युद्वर्णाप्रमाणें आरक्त पीत अशा जटांचा भार आणि हातांत अतिशय देदीप्यमान असा परशु. क्षत्रियांना केवळ यमच आणि जो भृगुवंशाचा केतु अशा त्या मुनिश्रेष्ठाजवळ जाऊन मीं अत्यंत नम्रपणें नमस्कार केला व अगदीं स्वस्थपणें उभा राहिलों. तेव्हां त्या ऋषीनें मला आशीर्वाद देऊन विचारलें: ' तूं कोण? इकडे कां आलास ? '

" तें ऐकतांच मीं त्यांस म्हटलें: ' भगवन्, सकल शस्त्रास्त्रांचें शिक्षण आपल्यापासून मला मिळावें अशी माझी इच्छा आहे. '

"त्यांनीं म्हटलें: ' मी ब्राह्मणांना तें शिक्षण देतों, क्षत्रियांना देत नाहीं. '

"मीं त्यांना म्हटलें ' मी क्षत्रिय नाहीं. ' त्याना तें खरें वाटून त्यांनीं मला आपल्याजवळ ठेवून घेतलें आणि विद्यादान करण्यास आरंभ केला.

"पुढें एके दिवशीं फळेंमुळें, समिधा, दर्भ वगैरे आणण्यासाठीं हिंडत असतां गुरुमहाराज थकले आणि माझ्या मांडीवर डोकें ठेवून निजले. त्यांस गाढ झोंप लागली. इतक्यांत दुर्दैवानें वज्रमुख नांवाच्या किड्यानें खालून माझ्या मांड्यांना भोंक पाडलें. मी जर हाललों, तर गुरुमहाराजांच्या निद्रेचा भंग होईल असें भय वाटून मीं त्या वेदना सहन केल्या. परंतु किड्यानें भोंक पाडल्यामुळें त्या जखमांतून रक्त वाहूं लागलें तें गुरुजींच्या अंगाखालीं जाऊन ते जागे झाले. आणि तो प्रकार पाहून मी क्षत्रिय आहें हें ओळखून अत्यंत संतप्त होऊन त्यांनीं मला शाप दिला कीं, ऐन प्रसंगीं तुला या माझ्यापासून लाभलेल्या अस्त्रविद्येचा कांहीं सुद्धां उपयोग होणार नाहीं. बरें आहे. पाहूं आतां काय होतें तें. परंतु चिन्हें कांहीं ठीक दिसत नाहींत. आणि रणांगणांत पराभव पावून आपले लोक परत येताहेत असें दिसतें आहे. हे पहा घोडे डोळे मिटून अडखळत अडखळत परत येताहेत ! त्याचप्रमाणें हे हत्तीही मावार खाल्ल्याचेंच सांगत आहेत. शंख आणि दुंदुभि यांचे शब्द बंद झाले."

तें ऐकून शल्यानें सुस्कारा टाकून "अरेरे फारच वाईट झालें !" असे उद्गार काढले. तेव्हां कर्ण त्याला म्हणतो:

" तथापि विषाद मानून स्वस्थ बसतां उपयोगी नाहीं. कां कीं, रणांगणांत पडलों तर स्वर्ग लाभेल, जिंकलों तर यशःप्राप्ति होईल. दोन्ही गोष्टी लोकांना मान्य अशाच आहेत. रणांत निष्फलता नाहींच. तर शल्यराज, आपण खिन्न होऊं नका. हे माझे गरुडासारखे कांबोज देशांत उत्पन्न झालेले जातिवंत घोडे योग्य वेळीं आपलें रक्षण करतील. युद्धांत जाण्याची त्यांची अद्यापि पुष्कळच उत्कंठा आहे. गोब्राह्मणांना, पतिव्रतांना, रणांगणांतून जे कधींही पराङ्मुख झाले नाहींत अशा योद्ध्यांना अक्षय्य सुख मिळो. या ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं मलाही अक्षय्य सुखप्राप्ति होवो. मी आतां अगदीं निश्चिंत व प्रसन्न झालों आहें. हा पहा, मी असह्य अशा पांडवांच्या समरमुखांत शिरून प्रथम सकल-गुणाढ्य असा जो धर्मराज त्याला पकडतों, नंतर आपल्या वेगवान् शरांनीं अर्जुनाला नष्ट करून सिंह मारून टाकल्यावर निर्धोकपणानें या समरांगणरूप वनांत मिरवीन. तर चल, रथावर आरूढ होऊन आपण तिकडे जाऊं या. "

इतक्यांत पडद्यांतून शब्द ऐकूं आले ते असे:

" अरे कर्णा, तुझ्याजवळ मी एक मोटी भिक्षा मागतों आहें. "

तें शब्द ऐकतांच कर्ण चकित झाला आणि म्हणतो: " शब्द तर मोठा वीर्यवान् असा ऐकूं येतो. हा कोणी तरी महा प्रभाववान् ब्राह्मण असावा यांत शंका नाहीं. कारण एरवीं माझे घोडे त्याचा तो धीर मधुर शब्द ऐकून चित्रांत काढल्याप्रमाणें तटस्थ झाले नसते. पहा यांनीं कान उभारले आहेत, डोळे स्तिमित आणि संकुचित केले आहेत, आपलीं तोंडें मानेवर टाकल्याप्रमाणें मागें वळवून हे कसे तरी चालले आहेत. बोलवारे त्या विप्राला--अथवा मी स्वतःच बोलावतों. भगवन् इकडे यावें. "

तें ऐकतांच ब्राह्मणरूप धारण करणारा इंद्र आपल्या मेघरूप वाहनास परत जाण्याची आज्ञा करीत पुढें आला आणखी कर्णाला म्हणतो: " अरे कर्णा, तुझ्याजवळ एक मोठी भिक्षा मागतों आहें. "

कर्ण त्यावर उत्तर करतो: "भगवन्, आपण मागाल तें देण्याला मी सिद्ध आहें. आपल्या आगमनानें आजपासून मी कृतार्थ लोकांत गणला गेलों. ज्या माझ्या चरणावर कित्येक राजे मस्तक ठेवतात त्या माझें तें मस्तक आपल्या पायांवर ठेवल्यामुळें त्या पायांच्या धुळीनें पवित्र होऊन गेलें आहे. मी आपल्याला नमस्कार करतों."

**इंद्र**:-( आपल्याशीं ) काय बरें याला उत्तर द्यावें ? दीर्घायु हो म्हणावें, तर हा दीर्घायु होईल. बरें तसा आशीर्वाद न द्यावा तर हा ब्राह्मण मूर्ख आहे असें म्हणून आपला हा अनादर करील. तेव्हां दोनही टाळून तिसराच मार्ग काढूं. ठीक आहे. (मोठ्यानें) अरे कर्णा, सूर्याप्रमाणें, चंद्राप्रमाणें, हिमालयाप्रमाणें, सागराप्रमाणें तुझी कीर्ति अचल असो.

**कर्ण**:-भगवन् ' दीर्घायु हो' असा आशीर्वाद आपण कां देत नाहीं ? किंवा आपण देतां हाच आशीर्वाद विशेष चांगला. कांकीं मनुष्यानें नेहमीं धर्म साध्य करण्यासाठीं झटत असावें. राज्यश्री काय ? सर्पाच्या जिव्हांप्रमाणें चंचल असतात. तेव्हां प्रजापालनाचीच तेवढी बुद्धि धरून जो आपलें कर्तव्य करीत देहत्याग करील त्याची कीर्ति अजरामर होईल. भगवन्, आपली काय इच्छा आहे ? काय देऊं आपल्याला ?

**इंद्र**:-मोठी भिक्षा मागतों आहें.

**कर्ण**:-मोठी भिक्षा मागा. ती मी देईन. माझें वैभव कमी नाहीं. आपली इच्छा असल्यास ज्यांचें दुग्ध अमृताप्रमाणें गोड आहे, ज्यांस वत्स आहेत, पवित्र आणि कनकानें शृंगारलेल्या आहेत अशा गाई देईन.

**इंद्र**:- गाई ? काय करायच्या बाबा गाई ? दूध पिऊन क्षणभर संतोष होणार इतकेंच कीं नाहीं ? गाई नकोत मला.

**कर्ण**:-गाई नकोत ? मग काय पाहिजे ? घोडे पाहिजेत ? तेही हवे असले तर देतों. सूर्याच्या घोड्यांप्रमाणें वेगवान् असे कांबोज देशींचे जातिवंत घोडे मजजवळ आहेत. हजारों घोडे देतों. दिग्गजांशीं टक्कर मारतील असे हत्ती देतों.

**इंद्र**:-घोडेन् हत्ती घेऊन मला काय करायचे ? चार घटका बसेन त्यांच्या पाठीवर इतकेंचना ? पण मला ते नकोत.

**कर्ण**:-तर मग सुवर्ण देतों.

**इंद्र**:-सुवर्ण ?--बरें तर घेऊन जाईन--पण नको तेंही.

**कर्ण**:-तर मग पृथ्वी जिंकून ती आपल्या चरणीं वाहतों.

**इंद्र**:-पृथ्वी ? पृथ्वीरे मला ब्राह्मणाला काय करायची ?

**कर्ण**:-अग्निष्टोमफल देऊं ?

**इंद्र**:—अग्निष्टोमफल घेऊन मी काय करूं ?

**कर्ण**:—मग मी आपलें डोकें देतों.

**इंद्र**:—छे. छे. छे. भलतेंच काय हें ?

**कर्ण**:—महाराज, भिऊं नका. दुसरेंही कांहीं हवें का विचारतों. माझ्या देहाच्या रक्षणार्थ जन्मतःच माझ्या अंगाला हें देवांना व दानवांनाही अभेद्य असें कवच आलें आहे. तशींच हीं कुंडलें आहेत. हीं कवचकुंडलेंसुद्धां तुम्हांला हवीं असल्यास देतों.

**इंद्र**:—( हर्षित होऊन ) दे, दे, तीं दे.

**कर्ण**:—( आपल्याशींच ) हीच याची इच्छा दिसते आहे किंवा अनेक कपटें करण्यांत पटाईत अशा कृष्णाचें तर हें कारस्थान नसेल ना ? असें ना ? 'देतों' असा शब्द उच्चारल्यानंतर त्याबद्दल पश्चात्ताप करणें अगदीं अयोग्य. ( मोठ्यानें ) घ्या.

**शल्य**:—कर्णा, देऊं नको, देऊं नको.

**कर्ण**:—शल्यराज, आपण माझें या वेळीं निवारण करूं नका. कालेंकरून विद्या नष्ट होते. चांगलीं खोल पाळेंमुळें गेलीं असलीं तरी मोठमोठाले वृक्ष नष्ट होतात. जलस्थानांतलें जलही शुष्क होतें. परंतु हुत आणि दत्त—यज्ञांत अग्नीस अर्पिलेलें आणि दान दिलेलें—हीं मात्र चिरकाल टिकतात.

असें म्हणून कर्णानें आपल्या अंगावरलीं कवचकुंडलें काढून त्या ब्राह्मणवेषानें आलेल्या इंद्रास दिलीं.

इंद्रानें तीं घेतलीं व तो आपल्याशींच म्हणाला, " अर्जुनाला समरांगणांत विजय यावा म्हणून जें मीं करावें अशी सर्व देवांनीं प्रार्थना केली होती तें मीं केलें. आतां ऐरावतावर बसून अर्जुनाचें व कर्णाचें युद्ध कसें काय होतें ती मौज पाहूं या. " असें म्हणून तो तेथून गेला.

इंद्रानें अशा प्रकारें कर्णाचीं कवचकुंडलें नेलेलीं पाहून शल्य त्याला म्हणतो: 'अंगराजा, तुला फसविलें.' .

**कर्ण**:—कोणीं ?

**शल्य**:—इंद्रानें.

**कर्ण**:—नाहीं रे बाबा. उलट इंद्राला मीं फसविलें. हजारों ब्राह्मण अनेक यज्ञ करून असंख्य आहुति देऊन ज्याला तृप्त करण्यासाठीं प्रयत्न करीत आले त्या किरीटिमान् दानवशत्रु इंद्राच्या हातावर—ऐरावताला अंकुश मारून घट्टे पडलेल्या त्याच्या हातावर उदक घालून मीं त्या पाकशासनाला तृप्त केलें. आणखी काय पाहिजे !

कर्ण असें म्हणतो आहे तों ब्राह्मणरूपानें एक देवदूत आला व त्यास म्हणाला: " कर्णा, तुला फसवून कवचकुंडलें घेतल्याबद्दल इंद्राला पश्चात्ताप होऊन त्यानें ही तुला देण्यासाठीं 'विमला' नांवाची अमोघ शक्ति पाठविली आहे. पांडवांपैकीं एकाला कोणाला तरी हिच्या योगानें मारतां येईल. "

**कर्ण**:—छट्, ज्याला दान दिलें, त्यापासून प्रतिदान मी कधींच घेत नाहीं.

**देवदूत**:—पण ब्राह्मणाची आज्ञा म्हणून घे.

**कर्ण**:—ब्राह्मणाची आज्ञा म्हणून ? हं. ती कधीं मीं मोडली नाहीं. बरें त्या शक्तीचा मला केव्हां उपयोग होईल ?

**देवदूत**:—जेव्हां स्मरण करशील तेव्हां होईल.

**कर्ण**:—ठीक आहे. मजवर अनुग्रह झाला. आपण आतां यावें.

देवदूत निघून गेल्यानंतर कर्ण शल्यास म्हणतो, 'चला आतां आपण रणांगणांत जाऊं.' इतक्यांत भयंकर असा शंखध्वनि ऐकूं आला. धर्माचा पराजय झाला म्हणून संतप्त झालेल्या अर्जुनाचाच हा शंखध्वनि असावा असें मनांत येऊन त्यालाच तोंड देण्यास जावें अशा विचारानें कर्ण रणांगणांत गेला.

मराठी ग्रंथ संग्रहालय

# ऊरुभंग.

महाभारतांतील एखादा प्रसंग घेऊन लिहिलेल्या नाटकांपैकीं प्रस्तुतचें ऊरुभंग नाटक हें शेवटलें होय, आणि त्याचें संविधानक भारतीय युद्धांतल्या प्रसंगींही शेवटल्या प्रसंगावरच बसविलें आहे. कौरवपक्षाकडील सर्व मुख्य वीर नष्ट झाले. फक्त दुर्योधन राहिला. पांडवपक्षाकडील वीर म्हणजे खुद्द पांडव तेवढे राहिले. दोन्ही पक्षांकडील दुय्यम तिय्यम प्रतीची काय मंडळी राहिली असतील ती इतस्ततः संग्रामभूमिवर संचार करीत होती. दुर्योधनाचा वध करण्याकरितां भीमार्जुन व कृष्ण शोधाशोध करीत होते. शेवटीं दुर्योधन सांपडला. भीमाच्या हातून त्याच्या मांडीवर गदाघात करवून श्रीकृष्णानें तो पांडवांचा मुख्य शत्रु दूर करविला. तेव्हां ऊरूंचा ( मांड्यांचा ) भंग झाल्या स्थितींत दुर्योधनानें कांहीं काळ काढला आणि शेवटीं तो स्वर्गवासी झाला. ही लहानशी कथा या छोटेखानी नाटकांत आहे. प्रथमतः नांदीच्या श्लोकांत भारतीय युद्ध संपून पांडव जय पावले हें सुंदर तऱ्हेनें सुचविलें आहे. तो श्लोक असाः—

" ज्या शत्रुनदीचे भव्य तट भीष्म व द्रोण होत; जयद्रथ हें जिचें जल, गांधारराज जींतला डोह, कर्ण, अश्वत्थामा, कृप इत्यादि वीर ज्या नदींत लाटासुसरीमगरांप्रमाणें संचार करीत होते; दुर्योधन हा जिचा मुख्य प्रवाह; धनुष्यें व बाण ह्यांचा खच हींच जिचीं पुलिनें; अशी भयंकर शत्रुनदी ज्या श्रीकृष्णरूप नौकेच्या साहाय्यानें अर्जुन तरून गेला, तोच भगवान् श्रीकृष्ण तुह्मांलाही तुमच्या शत्रुनदींतून तरून जाण्यास नौकेप्रमाणें होवो. "

या श्लोकांत भारतीय युद्धांतील कौरवपक्षाचे सर्व वीरप्रवीर पांडवांनीं श्रीकृष्णाच्या साहाय्यानेंच केवळ मारले असें सूचित केलें आहे. प्रस्तुत नाटकांत भीमानें दुर्योधनाचा वध केला तोही श्रीकृष्णाच्याच साहाय्यानें केला आहे. तेव्हां नांदीचा श्लोक अर्थगर्भ असावा तसाच आहे.

सूत्रधार नांदीपठन करून प्रेक्षकांची प्रार्थना करणार तोंच पडद्यांतून "हे पहा आह्मी " असे शब्द त्याच्या कानीं पडले, व पारिपार्श्वकानें पडद्यांतून बाहेर येऊन " दादा, युद्धांत ज्यांनीं पराक्रम गाजवून हजारों जखमा अंगावर खाल्ल्या आहेत, ते हे वीरपुरुष कोठून आले आणि कोण आहेत ? "

सूत्रधारानें त्याला सांगितलें कीं, "हे सारे दुर्योधनाचें व भीमाचें महायुद्ध चाललें आहे तिकडे चालले आहेत."

इतकी प्रस्तावना करून सूत्रधार व पारिपार्श्वक दोघेही गेले, आणि त्यांच्या मागोमाग तीन वीर आले. या तीन वीरांचीं भाषणें भारतीय युद्धांत झालेल्या प्रसंगांच्या वर्णनपर व समारंगणांत जो भयंकर देखावा दिसला होता त्याच्या वर्णनपरच आहेत. प्रथम आपण रणांगणांत आलों आहों हें रणांगण कसें आहे, याचें एकानें वर्णन केलें आहेः—

ज्यांत वैर उतू येतें, बल कसोटीला लागतें, मानप्रतिष्ठांचें जें केवळ घर, युद्धकालीं

अप्सरांचा जणूं काय जें स्वयंवरमंडपच, पुरुषाच्या शौर्यप्रतिष्ठेचें मुख्य स्थान, राजांच्या अंतिमशय्येचें स्थल, प्राणरूप आहुति ज्याला अर्पण होतात अशा अग्नीचा होम. याचें नांव रणांगण असें आहे.

रणांगणाचें वर्णन करण्यांत त्या सैनिकांनीं एकमेकांवर जणूं काय ताण करण्याचें मनांत आणिलें होतें. जिकडे तिकडे मृत वीरांचीं प्रेतें कशीं विखरलीं होतीं, रथ कसे अस्ताव्यस्त झाले होते, हत्ती व घोडे यांच्या प्रेतांचा ठिकठिकाणीं कसा खच पडला होता, पक्षी त्यांवर व वीरांच्या प्रेतांवर कसे ताव मारीत होते, यांचीं वर्णनें निरनिराळ्या उत्प्रेक्षा वगैरे करून त्यांनीं केलीं आहेत. त्यांनीं योजिलेल्या उत्प्रेक्षांपैकीं एकच उत्प्रेक्षा येथें मासल्याकरितां उतरून घेतों. एक वीर म्हणतो: " मित्रा, हे युद्ध नव्हे, हा एक महायज्ञच झाला. हें पहा मृत हत्तींचे शुंडादंड यूपांप्रमाणें दिसत आहेत. वीरांनीं सोडलेले बाण हेच इतस्ततः पसरलेले दर्भ होत; सर्व रथध्वज मिळून जणू काय प्रचंड मंडप घातला आहे; आणि यांत मनुष्यें आणि पशु दोघांचेही देवांस हवि अर्पण करण्यांत आले आहेत. "

अशा प्रकारें रणभूमींत दृष्टीस पडलेल्या देखाव्याचें वर्णन करीत ते चालले असतां त्यांना कोठें तरी फार मोठी गडबड उडाल्यासारखा शब्द ऐकूं आला. तो शब्द येवढ्या मोठ्यानें निघाला होता कीं, तो ऐकतांच एक आपल्या सोबत्यास म्हणतो: " अरे, हें आहे तरी काय? मेघांचा गडगडाट तर नव्हे? पर्वतावर वज्राचे आघात पडून त्यांचें चूर्ण तर होत नाहीं? पृथ्वी तर कोणी दुभांगत नाहीं? किंवा मंदराचलाच्या दरींत आपल्या भयंकर लाटा हापटून सागर तर शब्द करीत नाहीं? पाहूं बरें काय आहे तें! "

असें म्हणून ते इकडे तिकडे पाहूं लागले तों त्यांस दुर्योधन व भीम या दोघां क्रुद्ध झालेल्या वीरांचें गदायुद्ध चाललेलें दिसलें! द्रौपदीकेशाकर्षणाचा संताप ज्याच्या अंतःकरणांत भडकून राहिला आहे असा भीम, आणि भ्रातृशतवधामुळें क्रुद्ध झालेला दुर्योधन त्यांचें युद्ध, आणि व्यास, बलराम, कृष्ण, विदुर इत्यादि मंडळींच्या समक्ष! मग काय विचारतां! पिवळ्या रसरशित सोन्याच्या शिळेप्रमाणें पीन व प्रस्फालित अशा भीमाच्या उरःस्थलावर दुर्योधनाच्या गदेचा, आणि प्रत्यक्ष ऐरावताच्या सोंडेप्रमाणें कठीण अशा दुर्योधनाच्या स्कंधावर भीमाच्या गदेचा असे प्रहार चालले आहेत, त्यांचा शब्द होत आहे, हें त्यांस प्रत्यक्ष पाहून व ऐकून समजलें. असें युद्ध चालतां चालतां भीमानें युद्धनीति सोडून दुर्योधनाच्या मांडीवर आपल्या गदेचा तडाखा मारला आणि त्यासरसा दुर्योधन पडला. तें पाहून दुर्योधनपक्षपाती जो बलराम त्याला संताप आला. बलराम त्या संतापांत भीमाचें काय करील आणि काय नाहीं असें मनांत येऊन व्यासांनीं ' भीमाला आतां येथून हलवा, ' अशी कृष्णादिकांस खूण केली. त्याबरोबर कृष्णानें भीमाचा हात धरून आणि बाकीच्यांनीं त्याच्या भोंवतीं त्याच्या संरक्षणार्थ गराडा घालून रणांगणांतून त्याला काढून नेलें. सर्व युद्ध लबाडीचें झालें असें बलरामास दिसून आल्यावर त्याचा संताप झाला. आणि त्या संतापाच्या भरांत तो " राजेहो, झालें हें युद्ध अत्यंत कपटाचें झालें. यांत दुर्योधनाच्या ऊरूंवर गदेचा प्रहार केला खरा, परंतु त्याबरोबरच भीमानें आपल्या कुलशीलावरही त्याच गदेचा आघात केला. " असें मोठमोठ्यानें म्हणत सर्व रणांगणभर

हिंडत राहिला. शेवटीं त्याचा संताप त्याला अनावार होऊन त्यानें दुर्योधनास असेंही म्हटलें, "दुर्योधना, एक क्षणभर तूं आपला जीव ठेव. त्या क्षणांत मी माझा हा तीक्ष्ण टोंकाचा-जणूं काय त्याच्या टोंकाला महासुर-प्राकारांचें कूटच अंकुश म्हणून बसविलें आहे. कालिंदीजलाप्रमाणें सतेज कृष्ण, रिपुसैन्याच्या प्राणांचा नजराणा ज्याला अनेकवार मिळून ज्याची अर्चा झाली आहे असा हल (नांगर) भीमाच्या उरःस्थलावर चालवून त्याची नांगरलेल्या शेताप्रमाणें अवस्था करून टाकतों पहा!"

दुर्योधन त्याच्या मागोमाग येतच होता, त्यानें तें ऐकून त्यास म्हटलें, "छेः छेः आपण आतां क्रोध करूं नका."

दोनही मांड्यांचें अगदीं चूर्ण झालें आहे, असा तो दुर्योधन आपल्यामागून येत आहे हें पाहून बलरामास फार वाईट वाटलें. त्यानें त्याच्याकडे पाहून म्हटलें:—"अरे, रणांगणांतलें चंदन जें रुधिर त्यानें माखल्यामुळें ज्याची शरीरकांति विशेष शोभत आहे, ज्याला आतां बालकाप्रमाणें भूमीवर सरपटत रांगावें लागल्यामुळें ज्याचे सगळे हात धुळीनें भरले आहेत, तो हा दुर्योधन—अमृतमंथनसमयीं सुरासुरांनीं मंदर पर्वताभोंवतीं गुंडाळून मंथन झाल्यावर व सोडून दिलेल्या व त्यांच्या ओढण्यामुळें थकून गेलेल्या आपल्या शरीराला कसा तरी सरपटवीत नेणाऱ्या वासुकीप्रमाणें दिसत आहे!"

इतक्यांत दुर्योधन खुरडत खुरडत बलरामाजवळ आला व त्याला पुनः म्हणाला: "भगवन् हलायुध, रणांगणांत पतित झालेला मी आपल्याला नमस्कार करीत आहें. आतां आपण राग सोडा. कुरुकुलाला निवापांजलि देणारे ते मेत्र आतां जिवंत राहूं द्या. आतां आम्ही नष्ट झालों आणि त्याबरोबर आमच्यांतील वैर आणि विग्रह (भांडण) हीं नष्ट झालीं."

**बलराम**:—दुर्योधना, एक क्षणभर जीव धरेर, म्हणजे ....

**दुर्योधन**:—आपण काय करणार?

**बलराम**:—एक काय करणार तें. या माझ्या लांगलानें (नांगरानें) ज्यांचीं शिरें विदारण झालीं आहेत आणि मुसलप्रहारांनीं ज्यांचे स्कंध व हृदयें यांचे तुकडे तुकडे झाले आहेत असे पांडव तुझ्याबरोबर स्वर्गाच्या मार्गावर सेवक म्हणून देतों!

**दुर्योधन**:—छे, छे, आपण आतां असें करूं नये. भीमाची प्रतिज्ञा सत्य झाली, माझे शतभ्राते स्वर्गाला गेले, माझी अशी अवस्था झाली, आतां तंट्याचें कारण उरलें नाहीं.

**बलराम**:—अरे पण माझ्यादेखत लबाडी करून तुझा घात केला! ह्यामुळें मला संताप आला आहे!

**दुर्योधन**:—आपलें मत माझा लबाडीनें घात केला असें आहे?

**बलराम**:—यांत काय संशय?

**दुर्योधन**:—वाहवा! तर मग माझ्या प्राणांचें चीज झालें. पेटलेल्या जतुगृहांतून युक्तीनें बाहेर पडणारा, युद्धांत डोंगराएवढाल्या शिलांच्या वेगांना दाद न देणारा, हिडिंबासारख्या राक्षसाला मारणारा अशा भीमानें माझ्याशीं युद्ध करतांना सरळपणा सोडून लबाडी केली असें आपल्यासारख्यांनीं म्हटल्यावर मग त्यांत माझा पराजय कसला? माझा जयच झाला म्हणायचा!

**बलराम**:—अशी माझ्यासमक्ष तुझी वंचना करून भीम जिवंत राहील म्हणतोस?

**दुर्योधन**:—भीमसेनानें माझी वंचना केली असें आपलें मत आहे?

**बलराम**:—मग कोणीं केली ?

**दुर्योधनः**—ऐका, कोणीं केली ती, ज्यानें इंद्राचा मान आणि पारिजात यांचें बरोबरच हरण केलें, ज्यानें दिव्य वर्षसहस्रपर्यंत लीलेनें सागरांत शयन केलें, जो सर्व जगाला प्रिय आणि निष्कपट युद्धाचा पक्षपाती अशा त्या हरीनें भीमाच्या तीव्र गदेंत प्रवेश करून मला मृत्युमुखांत लोटलें !

दुर्योधन बलरामाचें हें बोलणें चाललें असतां दुरून दुःखाविष्ट धृतराष्ट्र येतांना दिसला. दुर्योधनपुत्र दुर्जय त्याला मार्ग दाखवीत होता. त्याच्याबरोबर अंतःपुरांतील स्त्रिया येत होत्या. धृतराष्ट्र पुत्राला एकदां शेवटलें आलिंगन द्यावें म्हणून आला होता. "बाळा कोठें आहेस ? बाळा कोठें आहेस ?" असें एकसारखें तो ओरडत होता. आपण आधींच अंध, त्यांत आपला शेवटला पुत्र दुर्योधन गेला यामुळें ज्यास्तीच अंध झालों, असें त्याचें त्याला वाटत होतें. त्या वृद्ध मातापितरांचा शोकसंवाद फारच हृदयद्रावक होता. त्यांना दुर्योधन कोठें आढळेना; यामुळें त्यांनीं दुर्योधनाला हाका मारण्याचा सपाटा चालविला होता. दुर्योधनास ती मंडळी दिसली, तेव्हां तो त्यांना नमस्कार करण्याकरितां उठूं लागला. तेव्हां पाय नसल्यामुळें तो खालीं पडला. इतक्यांत धृतराष्ट्रानें आपल्याला वाट दाखविणाऱ्या आपल्या नातवाला—दुर्जयाला म्हटलें: "तुझा जनक दुर्योधन येथेंच रणांगणांत कोठें पडला आहे. दिसला तर पहा." दुर्जय अगदीं लहान बालक परंतु त्यानें शोध चालविला. इकडे तिकडे पहातां त्याला तो दिसला. दुर्जय लागलींच आपल्या पित्याजवळ गेला आणि त्याच्या अंकावर बसण्याकरितां हट्ट करूं लागला. तें पाहून दुर्योधनास फार वाईट वाटलें व तो म्हणाला: "पोरा, आतां माझ्या अंकावर बसण्याची आशा सोडून दे. आतां तें तुझ्या नशीबीं नाहीं !"

**दुर्जयः**—कां बरें ? तुम्ही कोठें जाणार ?

**दुर्योधनः**—तुझे चुलते जिकडे गेले तिकडे जाणार.

**दुर्जयः**—मग मला तिकडेच न्या.

**दुर्योधनः**—तें काम भीमसेनाला सांग.

**दुर्जयः**—महाराज, अंजोबा, आजीबाई, आई, माई, सर्व मंडळी तुमचा शोध करीत हिंडत आहेत. त्यांचेकडे चला.

**दुर्योधनः**—माझ्यानें येववत नाहीं रे बाळा !

**दुर्जयः**—मी आपल्याला उचलून नेऊं ?

तें ऐकून दुर्योधनास फार कौतुक वाटलें आणि अश्रु गाळीत तो त्यास म्हणाला: "बाळा, तूं लहान आहेस."

इतक्यांत धृतराष्ट्रादिक सर्व मंडळी तेथें आलीच. बलराम जवळ एके बाजूस उभे होते. दुर्योधनास पहातांच त्या मंडळींच्या शोकास पारावार नाहींसा झाला. दुर्योधन मात्र खरा धीराचा. त्यानें सर्वांस धीर देण्याचीं भाषणें केलीं. त्यानें आपल्या मातापितरांस नमस्कार करून म्हटलें, "बाबा, आई, युद्धांत तोंड फिरवून परत न येतां प्राणान्त होईपर्यंत लढलों याबद्दल आनंद माना. कारण ज्या सुदैवानें आपल्या उदरीं मीं जन्म घेतला, त्याच सुदैवानें मी आज स्वर्गाला जातों आहें."

दुर्योधनाची हीं भाषणें ऐकून धृतराष्ट्राला फार शोक झाला. इतका कीं, तें पाहून बलरामास आपण यांना काय बोलून त्यांचें समाधान करावें हेंच सुचेना. म्हणून आपण येथें आहोंत हें त्यांना समजूंच देऊं नये, असें त्यास वाटलें. इकडे दुर्योधन गांधारीला

उद्देशून म्हणालाः "मातुःश्री, आपल्याला एकच विनंति आहे. या जन्मीं जर मीं कांहीं पुण्य केलें असेल तर त्याच्यामुळें पुढच्या जन्मीं आपल्याच पोटीं मीं यावें अशी माझी उत्कट इच्छा आहे."

आपल्या स्त्रियांनाही उद्देशून त्यानें अशींच भाषणें केलीं, तीं त्याचीं भाषणें धीरोदात्त अशा नायकास शोभण्यासारखींच आहेत.

आपल्या पत्नीस तो म्हणालाः—

झाले भीमगदाप्रहार शतशा
भ्रूभाग हा भंगला।
हारांचें स्थळ ऊर हाहि बघ गे
रक्तें कसा माखला॥
हे माझे व्रणरूप भूषणगणें
बाहू किती शोभती।
क्षत्रस्त्री! रडसी कशास? लढुनी
युद्धीं पडे त्वत्पती॥
केले यज्ञ किती स्वबांधवजनां
प्रेमेंच सांभाळिलें।
शत्रूंच्या वरि छाप ठेविलि सदा
ना आश्रितां त्यागिलें॥
शौर्यें त्रासविले असंख्यबल ते
राजे हजारों युधीं।
त्या माझ्यासम शूर वीर पतिची
पत्नी रडे कां कधीं?॥

इतकें आपल्या पत्नीस सांगून दुर्योधन आपल्या मुलास म्हणतो, "वत्सा दुर्जया, आतां माझ्या ठिकाणीं तुला पांडव आहेत. त्यांची माझ्याप्रमाणेंच सेवा कर. माझ्याप्रमाणेंच त्यांचा मान राख. कुंती आजीबाईच्या आज्ञेंत रहा आणि अभिमन्यूची जननी सुभद्रा व द्रौपदी या दोघींना आपल्या मातेप्रमाणें मान देत जा. मुला, आपला बाप दुर्योधन मोठा श्लाघ्य, मोठा मानी असा होता, आणि रणांगणांत आपल्याबरोबरीच्या योध्याशीं युद्ध करून पडला, हें मनांत आणून शोक सोडून दे. माझें नांव घेऊन पांडुसुत जेव्हां मला तिलांजली देतील, तेव्हां धर्मराजाच्या उजव्या बाजूस बसून त्याच्या हाताला हात लावून मला तिलांजलि दे."

बलराम हें सर्व ऐकतच होता. तो हें ऐकून आपल्याशींच उद्गारलाः "अरे याच्या मनांतील वैर जाऊन याला पश्चात्ताप झालासें दिसतें?"

हा सर्व प्रकार चालला असतां अश्वत्थामा दुर्योधनाचा शोध करीत तेथें आला. दुर्योधन पडला यायोगानें त्याला फार संताप आला होता, 'अर्जुन मी उरलों आहे. तेव्हां पांडवांचा सूड घेतल्याशिवाय राहणार नाहीं.' अशी त्याची बडबड चालली होती. दुर्योधनाला पाहून त्याला तो म्हणालाः "दुर्योधना, कायरे ही तुझी अवस्था?"

दुर्योधन म्हणाला "बाबारे, हें असंतोषाचें फळ."

त्यावर अश्वत्थामा त्याला म्हणाला "मी आतां सगळ्या पांडवांचा निःपात करून टाकतों. कृष्ण, अर्जुन, युधिष्ठिर, भीम इत्यादिकांवर रात्रीं छापा घालून सगळ्यांचा पार निकाल लावतों."

दुर्योधनानें त्याला म्हटलें "त्या नादांत तूं आतां पडूं नको. आतां शस्त्रत्याग कर."

असें पुष्कळ सांगितलें परंतु अश्वत्थाम्यानें त्यास उलट उपरोधिकपणें म्हटलें: "अरे तुझा तो मानी स्वभाव गेला कुठें? ऊरूंच्या नाशाबरोबर त्याचाही नाश झाला काय?"

परंतु दुर्योधनाला आतां खरा पश्चात्ताप झाला होता. त्यानें त्यास म्हटलें, "बाबारे, त्यांची पत्नी द्रौपदी हिला वेणी धरून सभेंत

ओढून आणली; लबाडीनें द्यूत खेळून त्यांना रानावनांतून हिंडावयास लावलें; बाल असून अभिमन्यूचा वध केला. त्या मानानें त्यांनीं माझ्या दर्पहरणाकरितां जें केलें तें कांहींच नाहीं."

पण अश्वत्थामा म्हणाला: "तूं कांहींही ह्मण, मी प्रतिज्ञा करून चुकलों आहें."

तो म्हणाला:—

घेतों शपथ तुझी मी
माझी तैशीच वीर लोकांची।
घालिन छापा रात्रीं
साधिन छळणूक पूर्ण पांडूंची ॥

बलरामांनीं तें ऐकलें व मनांत संतोष वाटून ते म्हणाले: "गुरुपुत्र अश्वत्थाम्याचेंच हें भाषण ना?"

**अश्वत्थामा:**—आपण हलायुध बलराम त्याला साक्षी.

**धृतराष्ट्र:**—साक्ष ठेवून ही वंचना होणार ना?

**अश्वत्थामा:**—दुर्जया ये इकडे.

पितरीं शौर्यें वहिलें
जनक पुन्हां जे स्वबाहुंनीं जिंकी।
अभिषेकाविण राजा
होई त्या राज्यिं विप्रवचनें कीं ॥

आतां दुर्योधनाचें लक्ष त्यांच्या भाषणाकडे नव्हतें. त्याची तंद्री परलोकाकडे लागली होती. तो आपल्याशीं म्हणतो: "अहाहा! शेवटीं जें करावें जें बोलावें असें वाटलें तें झालें. आतां माझे प्राण चालले. हे पहा. माझे शंतनुप्रभृति पितृपितामह! हे पहा कर्णाला पुढें घालून माझे शंभर बंधु मला सामोरे येताहेत. हा पहा ऐरावताच्या शिखरावर बसलेला बाळ अभिमन्यु इंद्राच्या हातांत हात घालून माझ्याकडे रागानें पहात आहे. ह्या पहा उर्वश्यादि अप्सरा माझ्याजवळ आल्या. हे मूर्तिमान् महासागर! या गंगाप्रभृति महानद्या! हे पहा हजारों हंसांनीं चालविलेलें विमान काळानें माझ्यासाठीं पाठविलें आहे. आलों, आलोंच मी."

स्वर्गस्थ होतो. त्याच्या अंगावर पांघरूण टाकतात.

**धृतराष्ट्र:**—(शोकानें)

जें सज्जना धनसमान तपोवना त्या।
जातों कशास मज राज्य निपुत्रवंत्या॥

**अश्वत्थामा:**

निद्रिस्तपांडववधास्तव हा निघाला।

(भरतवाक्य)

**सर्व पात्रें:**

रक्षो प्रनष्टरिपु भूपति या महीला।

हें नाटक लहानच आहे. यांत दुर्योधनाचें चारित्र्य कवीनें फार चांगलें दाखविलें आहे. देहावसानाच्या वेळीं त्याला पश्चात्ताप झाला अशी कल्पना करून त्याच्या तोंडीं घातलेले विचार किती सुंदर आहेत! शेवटीं त्याची तंद्री स्वर्गाकडे लागली असतां त्याला पितर वगैरे दिसूं लागले. त्या वेळचे त्याचे उद्गार शेक्सपिअरी पद्धतीचे आहेत यांत संशय नाहीं.

भारत नाट्यशास्त्राच्या कृत्रिम नियमांना भास फारसें मानीत नसे; किंबहुना याच्या वेळीं नाटकाला शास्त्रत्व दिलें गेलें होतें किंवा नाहीं याविषयीं संशय उत्पन्न होतो. परंतु त्या विषयावर येथें कांहीं लिहावयाचें नाहीं. भरतशास्त्राच्या पद्धतीप्रमाणें रंगभूमीवर मृत्यु होऊं नये, परंतु या नाटकांत तर प्रत्यक्ष नायकाचाच मृत्यु आहे. दुर्योधन मरतो व त्यावर यवनिकास्तरण पडतें! असो.

# प्रतिमा.

भासकवीच्या मोठ्या नाटकांपैकीं प्रतिमा नाटक हें सर्वांत मोठें नाटक होय. रामचरित्रावर या कवीनें लिहिलेलीं दोन नाटकें उपलब्ध झालीं आहेत. एक हें प्रतिमा नाटक व दुसरें अभिषेक नाटक. प्रतिमा नाटक हें रामकथेच्या पूर्वार्धापैकीं उत्तरांशावर आधारलें आहे. अभिषेक नाटकांत उत्तरार्धांतील कथा घेतली आहे. रामायणांतील कांडांच्या विभागांत बोलावयाचें झालें तर असें म्हणतां येईल कीं, प्रतिमा नाटकांत रामकथा घेतली आहे ती अयोध्याकांड व अरण्यकांड यांत आलेली कथा आणि अभिषेक नाटकांत घेतलेली कथा किष्किंधा, सुंदर व युद्ध या कांडांत आलेली कथा होय.

रामकथा आबालवृद्धांना माहिती आहे. परंतु अशी माहिती असलेली कथा सुद्धां सत्कवीच्या वाग्विलासांनीं अधिक मनोहर होऊन जनमनोरंजन कशी करूं शकते हें ज्यास पहावयाचें असेल, त्यानें हें नाटक अवश्य वाचावें. ज्यांस हें मूळांत वाचणें शक्य नाहीं त्यांचेसाठीं आमच्या उपक्रमास अनुसरून आम्हीं कथानक देतों. या नाटकाचा पहिला अंक विशेष मोजेचा आहे. त्याचा सारांश थोडा विस्तृतपणें द्यावा असें वाटतें. प्रारंभीं सूत्रधार पुढील श्लोकाच्या गायनानें मंगलाचरण करून नटीच्या साहाय्यानें कथेची प्रस्तावना करतो:--

सीताभवः पातु सुमन्त्रतुष्टः
सुग्रीवरामः सहलक्ष्मणश्च ।
यो रावणार्यप्रतिमश्च देव्या
बिभीषणात्मा भरतोऽनुसर्गम् ॥

" सीतेचा रक्षणकर्ता, सुमंत्रांनीं संतुष्ट, सुग्रीव ( चांगली आहे ग्रीवा म्हणजे कंठ ज्याचा असा ) आणि राम ( सुंदर ), लक्ष्मणानें युक्त, रावणाचा शत्रु, अप्रतिम, देवी सीतेनें युक्त, ( पातकी लोकांस ) बिभीषणात्मा ( फार भिवविणारा ) आणि भरत (जगाचें भरण--रक्षण करणारा ) असा रामचंद्र जन्मोजन्मीं सर्वांचें रक्षण करो ! "

या मंगलाचरणाच्या श्लोकांत मुद्रालंकार योजून नाटकांतील सर्व पात्रांचा नामोच्चार केला आहे. तीं पात्रें अशीं:- सीता, सुमंत्र-( दशरथाचा प्रधान ), सुग्रीव, राम, लक्ष्मण, रावण, प्रतिमा ( दशरथादिकांचे पुतळे ), बिभीषण आणि भरत. मुद्रालंकाराच्या योजनेंत केवळ शब्दयोजनेचाच चमत्कार असतो. अर्थचमत्कृति अर्थात् साधणें फार कठिण असतें. तसाच प्रकार या श्लोकांत झाला आहे. यांत अर्थचमत्कृति कांहींच नाहीं. मात्र रामाला अनुलक्षून विशेषणांची योजना अशी केली आहे कीं, या प्रतिमानाटकांतील सर्व पात्रांचा नामोच्चार व्हावा.

याप्रमाणें मंगलाचरणाच्या श्लोकाचें गायन झाल्यावर पडद्याकडे पाहून सूत्रधारानें नटीला " आर्ये, इकडे ये बरें " असें ह्मणून पाचारण केलें आणि 'या शरत्कालाला अनुलक्षून असणारें एखादें गीत गा ', म्हणून आज्ञा केली. त्याप्रमाणें नटीनें गीत गाइल्यावर सूत्रधार ह्मणतो, " या शरत्कालीं

साकी

काशतृणाचें धवल वस्त्र जणुं
नेसुनि मानसिं हृष्ट,
इकडुनि तिकडे पुलिनांमधुनी
धांवे हंसी पुष्ट !

इतक्यांत नेपथ्यांत "आर्य, आर्य" असे धाईधाईनें उच्चारलेले शब्द त्याच्या कानीं पडतात व ते ऐकून तो पुढें म्हणतो: "हं समजलों,

हर्षे राजगृहीं । धांवे प्रतिहारी तशि ही ॥"

याप्रमाणें पुढें येणाऱ्या पात्रांची सूचना करून सूत्रधार व नटी जातात.

राजमंदिरांत फारच मोठी गडबड उडाली होती. राजा दशरथानें श्रीरामचंद्रास अभिषेक करून आपण वानप्रस्थाश्रम स्वीकारण्याचा निश्चय केला होता व वसिष्ठमुनींस तत्संबंधीं सर्व तयारी करण्याची विनंति केली होती. प्रतिहारीनें कंचुकीला तीच राजाज्ञा सांगितली. त्यानेंही राजाज्ञेप्रमाणें अभिषेकासंबंधीं सर्व संभार तयार करून वसिष्ठ मुनि पुढील विधि करण्यास उत्सुक होऊन बसले आहेत असें तिला सांगितलें. तेव्हां प्रतिहारीनें कंचुकीस "तर मग पुढच्या तयारीला लागण्यासाठीं गर्दी करा." असें म्हणून दुसऱ्या सेवकमंडळीस आपापलीं कामें योग्य प्रकारें करण्याविषयीं बजावण्यासाठीं याला हांक मार, त्याला हांक मार असा हांका मारण्याचा व त्यांनीं काय कामें करावयाचीं तीं सांगण्याचा सपाटा चालविला. संभवक नांवाच्या सेवकाला तिनें सांगितलें, 'उपाध्ये मंडळींना तूं घाई कर.' सारसिका दासीला सांगितलें, 'तूं लवकर संगीतशाळेंत जा आणि तेथल्या कुशीलव मंडळींना सांग कीं, या मंगलप्रसंगाला सर्वथा योग्य असा कांहीं नाटकप्रयोग करण्याची उत्तम तयारी ठेवा.' नंतर सर्व कांहीं तयारी आहे असें महाराजांना निवेदन करण्यासाठीं ती गेली.

इकडे देवी जानकीच्या मंदिरांत कोणाला कांहींच खबर नव्हती. सीतेला सुद्धां अद्यापि आपल्या पतीस अभिषेक करण्याची राजाज्ञा झाल्याचें वर्तमान समजलें नव्हतें. ती आपल्या दासींशीं विनोदभाषणें करीत होती. अवदातिका नांवाच्या एका दासीनें नाट्यशाळेंतील आर्यरेवा नांवाच्या आपल्या एका मैत्रिणीची चेष्टा करण्याच्या हेतूनें तिच्या पेटींतून वल्कलें चोरून आणलीं होतीं; व आपलीं वल्कलें नाहींशीं झाल्याचें समजतांच आर्यरेवेची काय गडबड उडेल याबद्दल विचार मनांत आणून आपल्याशींच हंसण्याच्या बेतांत ती होती. इतक्यांत सीता तिला न कळत तेथें आली. तिची दृष्टि अवदातिकेवर गेली व ती आपल्याबरोबर असलेल्या एका दासीस म्हणते, "ही अवदातिका अशी मुग्धपणानं कां बरं उभी राहिली आहे ?"

**दासी**:—तिनं कांहीं तरी चूक केली असेल, आणखी आतां ही चूक उमगल्यावर आपलं काय होईल या विचारांत ती असेल. नोकरांच्या चुका म्हणजे काय पावलोपावली व्हायच्या!

**सीता**:—छे. छे. चूक झाल्यासारखी नाही तिची चर्या. कांहीं तरी हंसण्याजोगी गोष्ट तिच्या मनांत आली आहे आणखी ती हंसण्याच्या बेतांत आहे.

सीतेचें व तिच्या दासीचें याप्रमाणें बोलणें होतें आहे तों अवदातिकेचें लक्ष्य त्यांच्याकडे गेलें, आणि ती चटकन सीतेजवळ येऊन तिला वंदन करून म्हणते, "बाईसाहेब, माझ्या हातून चूकबीक कांहीं झाली नाहीं हो!"

**सीता**:—तुला विचारतं आहे कोण चूक झाली आहे कीं काय ती? पण काय ग अवदातिके, हें तुझ्या डाव्या हातांत काय आहे?

**अवदातिका**:—बाईसाहेब हीं वल्कलं आहेत.

**सीता**:—कुठून आणलींस?

**अवदातिका**:—नाट्यशालेंतलं सामान संभाळणाऱ्या आर्यरेवेजवळ मीं सहज अशोक-वृक्षाचा एक पल्लव मागितला. नाटकाकरितां तिनं पुष्कळ पल्लव आणले होते. त्यांचा उपयोगही होऊन गेला होता. परंतु तिनं कांहीं मला एकसुद्धां घेऊं दिला नाहीं. तेव्हां तिची खोड मोडण्यासाठीं मीं तिचा डोळा चुकवून हीं वल्कलं आणलीं आहेत!

**सीता**:—छे. छे. अगदीं गैर केलंस. जा. तिचीं तिच्याकडे परत कर.

**अवदातिका**:—बाईसाहेब, मीं हीं केवळ थट्टेनं आणलीं आहेत.

**सीता**:—वेडे पोरी, थट्टेनं थट्टेनं होतां होतांच पुढें खऱ्या चोरीपर्यंत मजल जाते. जा, आधीं नेऊन दे तिचीं तिला परत.

अवदातिका "बरं तर नेऊन देतें" असें म्हणून तेथून जाऊं लागली, तों सीतेच्या मनांत काय आलें, तिनें तिला परत बोलावलें व ती जवळ येण्याबरोबर तिला म्हटलें. "काय ग? यांतलं एक वल्कल मी नेसलें तर मला कसं काय शोभेल?"

**अवदातिका**:—बाईसाहेब, हें काय विचारतां? मूळच्या सुरूप माणसांना सारं कांहीं शोभतं. आपण पहा नेसून!

सीतेनें लागलींच तिच्या हातून एक वल्कल घेतलें आणि ती तें नेसली, व म्हणते "सखे, पहा बरं कसं काय शोभतं तें."

**अवदातिका**:—कसं काय शोभतं तें पाहूं? अहो बाईसाहेब, आपण नेसल्यामुळें या वल्कलालाच अतिशय शोभा आली आहे!

तें ऐकून सीतेला सहजच अशी इच्छा झाली कीं, या वल्कलधारणानें आपण कशा दिसतों हें आरशांत पहावें; म्हणून तिनें आरसा आणण्यास आपल्या दासीस पाठविलें. दासी आरसा घेऊन आली तेव्हां तिची चर्या कांहीं निराळीच दिसली. आपल्या यजमानणीला कांहीं तरी आनंदाची वार्ता सांगण्याची उत्कंठा तिला झाली असावी असें दिसलें. परंतु एकदम कांहीं न बोलतां तिनें "बाईसाहेब हा आरसा" असें म्हटलें. सीतेनें तिच्या चर्येकडे पहातांच ती आपल्याला कांहीं सांगण्याविषयीं उत्कंठित आहे हें जाणलें व तिला म्हटलें, "आरसा असूं दे. पण तूं काय सांगण्याविषयीं उत्सुक आहेस तें बोल पाहूं."

**चेटी**:—बाईसाहेब, कंचुकी "अभिषेक! अभिषेक!" असं कायसं बोलत होता.

**सीता**:—कोणी तरी राजा व्हायचाच.

इतक्यांत दुसरी एक दासी घाईघाईनें येऊन म्हणते, "बाईसाहेब, आवडती गोष्ट! आवडती गोष्ट!"

**सीता**:—काय आवडती गोष्ट बनवून सांगते आहेस?

**चेटी**:—बाईसाहेब, भर्तृदारक रामचंद्रांना अभिषेक होणार!

**सीता**:—मामंजींची प्रकृति बरी आहेना?

**चेटी**:—तर. तर. महाराज स्वतःच अभिषेक करणार!

**सीता**:—असं असलं तर दुष्ट आव- डती गोष्ट तूं मला सांगितलीस असं झालं. तूं आपली ओटी पुढें कर.

चेटीनें आपली ओटी पुढें केली व सीतेनें आपले दागिने काढून तिच्या ओटींत टाकले.

**चेटी**:—बाईसाहेब, नगारे वाजूं लागले.

**सीता**:—ही अभिषेकाची गोष्ट एकदम कशी झाली ? पण राजकुलांत काय, किती तरी गोष्टी एकाएकीं घडत असतात.

**चेटी**:—बाईसाहेब, मीं ऐकलं कीं, राम- चंद्रास अभिषेक करून महाराज स्वतः वनाला जाणार.

**सीता**:—असं असेल तर तो अभिषेक नव्हे, तें आमच्या अश्रुमलिन मुखाचं प्रक्षा- लन करण्याचं उदकच होय.

अशा प्रकारचीं भाषणें चाललीं आहेत तों श्रीरामचंद्र तेथें आले. त्यांना सीतेनें "लोक अभिषेक अभिषेक असं म्हणताहेत तें काय ?" म्हणून विचारलें, तेव्हां त्यांनीं तिला सांगितलें, "महाराजांनीं आज मला उपाध्याय, अमात्य आणि इतर जन यांच्या- समक्ष अंकावर बसवून मी आतां तुझ्यावर राज्य सोंपविणार असें म्हटलें."

सीतेनें त्यावर त्यांना विचारलें "मग आपण काय म्हणालां ?"

**राम**:—काय म्हटलें असेल तूंच तर्क कर बरं !

**सीता**:—आपण त्यांच्या चरणावर लोटां- गण घातलं असेल.

**राम**:—अगदीं बरोबर तर्क केलास. एक- शीलाचीं दंपत्यं थोडींच निपजतात. मीं लोटांगण घातलं तेव्हां माझ्या अश्रूंनीं न्हालेल्या पितृपादांवर मी पडलों आणि त्या माझ्या शिरावर महाराजांचे अश्रु पडले ! मला राज्य नको वगैरे आग्रहानं मी सांगत असतां त्यांनीं आपल्या प्राणांची शपथ घालून राज्य स्वीकारण्याविषयीं मला आज्ञा केली.

**सीता**:—पुढें मग ?

**राम**:—मग मला अभिषेक करण्यासाठीं,
शत्रुघ्न लक्ष्मण उभे घट घेउनी जों,
प्रेमाश्रु ढाळित धरी नृप छत्रही जों,
तों मंथरा त्वरित ये, नृपकर्णि कांहीं
बोले, क्षणींच मग त्या अभिषेक राही.

**सीता**:—मला हवं होतं तेंच झालं. महाराजांनीं महाराजच रहावं; आणि आर्य- पुत्र ते आर्यपुत्रच असावेत.

**राम**:—जानकी, तूं अलंकार कां बरं काढून टाकलेस ?

**सीता**:—आतां घालणारच आहे.

**राम**:—छे. घातलेले नुकतेच काढल्या- प्रमाणें दिसताहेत. बरं पण घाल, मी तुझ्या- पुढें आरसा धरतों. अरे, पण हीं वल्कलं कुठलीं ? हीं तूं कशाला नेसली आहेस ? इक्ष्वाकुकुलांत यांचं परिधान वृद्धपणीं करितात.

**अवदातिका**:—उगीच कशीं काय दिस- तात तें पहाण्यासाठीं बाईसाहेबांनीं हीं परि- धान केलीं.

**राम**:—असं का ? अवदातिके, तें दुसरं आण पाहूं. मीही परिधान करून पहातों बरं मला शोभतं कीं नाहीं तें !

सीता त्याला 'हें अमंगल कां करतां ?' म्हणून त्याचें निवारण करूं लागली. परंतु राम ऐकेना. इतक्यांत पडद्यांत "हा हा महाराज !" असा शब्द झाला. तो शब्द बायकापुरुषांचा एकवटलेला शोकध्वनि होता.

या शब्दाचें कारण काय म्हणून शोध करण्यास राम कोणाला पाठविणार तों कंचुकी त्यांच्यापुढें आला व 'रक्षण करा! रक्षण करा!' असें ओरडला.

"रक्षण कोणाचें करायचें बाबा?" असें रामानें पुसतांच त्यानें 'थोरल्या महाराजांचें.' असें उत्तर दिलें, आणि कोणापासून असें विचारतांच 'स्वजनापासून' असें सांगितलें.

**राम**:—स्वजनापासून? मग मात्र इलाज नाहीं. कारण

हाणी शत्रु शरीरीं,
हृदयावरि घाव घालितो स्वजन।
हा कोण स्वजन असे?
ज्याच्या कृतिनें सलज्ज होय मन॥

कोणच्या स्वजनापासून महाराजांचं रक्षण करायचं?

**कंचुकी**:—अंबा कैकेयीपासून!

**राम**:—कैकेयीपासून? तर मग त्याचं पुढें कांहीं तरी चांगलं फळ असेल.

**कंचुकी**:—तें कसं काय?

**राम**:—तूंच विचार कर.

इंद्रासम पति जीचा
अमुच्यासम पुत्रही जिला असती।
आशा कवण फलाची
कीं जेणें ती अकार्य करिल सती?॥

**कंचुकी**:—महाराज, स्वभावतः कुटिल अशा स्त्रीबुद्धीच्या ठिकाणीं आपण आपला सरळपणा कल्पूं नये. कैकेयीच्या सांगण्यामुळें आपला अभिषेक राहिला!

तें ऐकून राम म्हणाला, "मग तर फार चांगलं झालं. त्यांत किती तरी गोष्टी एकदम साधल्या.

वनगमन टळे कीं मत्पित्याचें पहा हें।
पितृवश अम्हि राहूं, आमुचें बाल्य राहे॥
नव नृपति कसा हो हे न भीती प्रजांला।
नच मनिं अनुजा ये आपुला हक्क गेला॥

**कंचुकी**:—कुमारा, तिनं आपण होऊन येऊन महाराजांना सांगितलं कीं भरताला राज्य द्या. त्याला अभिषेक करा. हा निर्लोभीपणाच का?

**राम**:—आर्या, तूं आमचा पक्षपाती म्हणून तुला तें तसं दिसलं. तूंच पहा.

वर दिधला पूर्वीं जो
मागे पुत्रार्थ आज, राज्याचा
हा लोभ तिचा कैसा?
. नच अमुचा भ्रातृराज्यलोभ्यांचा

**कंचुकी**:—पुढें..

**राम**:—पुरे. पुरे. यापुढें मी मातृनिंदा ऐकूं इच्छीत नाहीं. महाराजांचं वर्तमान सांग काय असेल तें!

**कंचुकी**:—काय सांगूं? महाराजांना अत्यंत शोक झाला आणि त्यांना बोलवेना, तेव्हां मला त्यांनीं हातानंच जाण्याची खूण केली आणि थोड्या वेळांत त्यांना मूर्च्छा आली!

**राम**:—काय? मूर्च्छा आली?

अशीं इकडे बोलणीं चाललीं असतां दुसरीकडे कैकेयीच्या या कृतीमुळें दशरथ राजाला मूर्च्छा येऊन पडल्याचें वर्तमान लक्ष्मणाला समजलें व त्यामुळें त्यास फार संताप चढला. त्यानें धनुर्बाण घेऊन त्रिभुवनांतील सर्व स्त्रियांचा संहार करण्याचा निश्चय करून तो रामाकडे आला. तेथें येण्याबरोबर सीतेनें त्याला म्हटलें "भाऊजी, शोक करण्याची ही वेळ, आणखी अशा

वेळीं आपण धनुष्यबाण हातीं घेऊन सज्ज झालां आहां, हें काय ? ”

रामानेंही त्यास विचारलें “ सुमित्रानंदना, हें काय हें ? ”

लक्ष्मण त्यावर त्रासून म्हणाला: “ काय ? हें काय म्हणून मलाच आपण विचारतां ?

पतिला महिवरि लोळवि
हरुनि तुला राज्य जें क्रमें आलें,।
तरिही शंका कसली ?
क्षांती कीं निर्बलत्व मनिं मुरलें ?॥

**रामः**—लक्ष्मणा, आमचं राज्य गेलं म्हणून तुला कां बरं संताप ? अरे तूं अगदींच अजाण !

राजा भरत असो वा
आह्मी तुजलागिं सारखे दोघे।
श्लाघा धनुची तुजला
तरि त्याच्या रक्षणार्थ तें करिं घे॥

**लक्ष्मणः**—मला कांहीं बोआ माझा राग आवरत नाहीं. मी आपला जातों इथून.

तें पाहून रामानें त्यास जवळ बोलावलें आणि म्हटलें, “ अरे बाबा, तुझं मन स्थिर व्हावं म्हणून मीं तुला हें म्हटलं. बोल. संतापून आतां काय काय करूं मी ?

सत्यव्रती मम पित्यावरि बाण सोडूं ?
घे राज्य त्या जननिचें शिर काय तोडूं ?।
निर्दोषि बंधु भरता वधुं काय हातें ?
पापत्रयींत वद आचरुं कोणचें तें ?॥

त्या भाषणानें सगद्गद होऊन लक्ष्मण म्हणाला: “ रामचंद्रा, माझें म्हणणें बरोबर न समजून तूं मला दोष देतो आहेस. मला जो राग आला तो तुझें राज्य गेलें म्हणून नव्हे; तर तुला चवदा वर्षें वनवास घडला पाहिजे असें तिनें तात दशरथापासून मागणें मागितलें आहे ह्मणून ! ”

**रामः**—असं काय ? यामुळें महाराजांना मूर्च्छा आली ? जानकी, तीं वल्कलं इकडे आण पाहूं ! आजपर्यंत कोण्याही दुसऱ्या राजांनीं जो धर्म अशा वयांत आचरला नाहीं किंवा जो त्यांना लाभला नाहीं तो मी आचरतों.

**सीताः**—आर्यपुत्र, हीं घ्या.

**रामः**—जानकी, तूं काय चालविलं आहेस ?

**सीताः**—काय म्हणजे ? मी आपली सहधर्मचारिणीच आहें.

**रामः**—मी एकटाच वनांत जाणार.

**सीताः**—म्हणूनच मी आपल्यास अनुसरणार.

**रामः**—अरण्यांत राहायचं आहे. लक्षांत ठेव.

**सीताः**—तोच माझा राजवाडा.

**रामः**—तुला सासूसासऱ्यांची सेवा कर्तव्य आहे.

**सीताः**—त्यांचं स्मरण करून देवतांना वंदन करीत जाईन.

**रामः**—लक्ष्मणा, हिचं निवारण कर.

**लक्ष्मणः**—अशा योग्य प्रसंगीं यांचं मन फिरविण्यास मला मुळींच उत्साह नाहीं. कारण,

राहुग्रस्त शशी तरी अनुसरे
तारा न भी अंतरीं।
खालीं वृक्ष पडे तयासह लता
येतेच भूमीवरी ॥
पंकीं जो गढला गजेंद्र न तया
टाकील हत्तीण ती,
धर्मा आचरु ही तुझ्यासह वनीं,
स्वामी स्त्रियांना पती.॥

इतक्यांत आर्यरेवेकडून एक दासी तेथें आली व जानकीस ह्मणाली, "देवि, अवदातिकेनें आणलेलीं वल्कलं जुनीं वापरलेलीं आहेत. तीं परत द्या. आपल्याला पाहिजेत तर हीं नवीं कोरीं पाठविलीं आहेत."

तें ऐकतांच राम तिला ह्मणतो, "जानकी वल्कलं नेसलीच आहे. आतां आह्मांला त्यांची जरूरी आहे तर तीं मला दे."

दासी तीं देऊन तेथून गेली. रामानें त्यांतलें एक घेऊन परिधान केलें, तेव्हां लक्ष्मण त्यास ह्मणतो, "आर्या,

अन्नीं पानीं भूषणिं
माल्यीं अर्थे सदैव मज देसी,
वल्कलधारणिं मात्रचि
या समयीं कां प्रतारणा करिसी?"

रामानें तें त्याचें भाषण ऐकलें आणि तो समजला कीं, याच्या मनांतून आपल्याबरोबर वनवास करावयाचा आहे, ह्मणून त्यानें सीतेस म्हटलें, "तूं त्याचं मन फिरव."

सीता लक्ष्मणास "भाऊजी, तुम्ही इथेंच रहा; आमच्याबरोबर वनांत कशाला येतां?" असें म्हणते तों लक्ष्मण तिला म्हणतो, "आर्ये,

गुरुपदसेवा लाभो
एकटिला हें मनी तुझ्या वागे।
दक्षिणपद तूं सेवीं
डावा मातें चुरावया दे गे॥"

लक्ष्मण व सीता या दोघांत रामचरणसेवेबद्दल चढाओढ लागली व तीं दोघेंही पौरजनांच्या हृदयांत वियोगाग्नि पेटवून व त्यांचीं अंतःकरणें द्रवून त्यांच्या डोळ्यांवाटे अश्रुरूपानें बाहेर येऊं लागलीं असतां त्यांचा निरोप घेऊन रामचंद्रासह अरण्यवासास गेलीं.

राम, सीता व लक्ष्मण तिघें अरण्यवासास गेल्यावर दशरथ राजाची मूर्च्छा उतरून तो रामाला परत आणण्यासाठीं धांवत जावें म्हणून उठूं लागला. परंतु त्याच्या अंगांत अणुमात्र त्राण राहिलें नव्हतें. यामुळें उठायला गेला कीं पुनः पडे. पडला तरी पुनः उठण्याची धडपड करी, आणि राम ज्या दिशेनें गेला त्या दिशेकडे एकसारखा पहात राही. 'हा रामा, हा सीते, हा लक्ष्मणा!' अशी एकसारखी जपमाळ त्यानें चालविली. शोकानें त्याला वेडच लागलें. "अरे सत्यप्रतिज्ञा, अरे जितक्रोधा, अरे मत्सरहीना, जगत्प्रिया, गुरुजनांची सेवा करण्यांत नेहमीं तत्पर असणाऱ्या रामा! बोल, मी हांका मारतों आहें मला उत्तर दे." असें रामाला उद्देशून ह्मणे. मध्येंच लक्ष्मणालाही हांका मारून ह्मणे: "अरे भावावर प्रेम म्हणून पित्यावर राग करून त्याला सोडून गेलास का!" सीतेलाही तो म्हणे: "काय! रामानें मला टाकलें, लक्ष्मणानेंही माझी अवहेलना केली, म्हणून तूंही पण मला सोडून गेलीस! मी म्हणजे एक अपेक्षाचें पात्र आहें. कोणी मला प्रत्युत्तर म्हणून देत नाहीं!" अशा प्रकारचीं व याच्याहीपेक्षां शोकपूरित अशीं कितीक तरी भाषणें करीत तो राजवाड्यांत वेड्यासारखा हिंडूं लागला. "सूर्याप्रमाणें राम गेला, सूर्यामागोमाग दिवस जातो तसा लक्ष्मण गेला आणि सूर्य व दिवस हे नाहींसे झाले कीं छायाही नष्ट होते तशी सीता गेली. आतां कुठली सीता?" असें सीतेला उद्देशून म्हणे. पुनः रामाचें स्मरण करून म्हणे: "अरे रामा, माझ्यासारख्या वृद्ध व पंगु पित्याला सोडून कुठला भलताच धर्म म्हणून तूं आग्रहानें वनांत निघून गेलास?"

नंतर तो काळाला शिव्या द्यायला लागला. तव्हां अत्यंत शोकानें डोकें भडकून गेलें असें पाहून कौसल्या त्याच्या जवळ

गेली व त्याचें समाधान करण्यासाठीं म्हणाली: " महाराज, शोकग्रस्त होऊन आपण आपली अशी दीन अवस्था करून घेऊं नका. हां हां म्हणतां चौदा वर्षें निघून जाऊन तीं तिघेंही आपल्याला पुनः भेटतील. "

परंतु राजाचें चित्त ठिकाणावर कोठें होतें? आपली ज्येष्ठ पत्नी आपल्याशीं बोलते आहे याचें त्याला भान न राहून तो एकदम तिच्याकडे वळून म्हणाला: "तूं कोण बाई?"

तिनें उत्तर दिलें " कठोरहृदयी पुत्राला जन्म देणारी मी. "

**राजा:**– कोण? सर्व जनांच्या हृदयांला व नयनांला सुख देणाऱ्या रामाची आई कौसल्या तूं?

**कौसल्या:**– होय, मीच ती अभागिनी.

**राजा:**– कौसल्ये, रामाला गर्भांत धारण करणारी तूं खरोखरीच मोठी बलवती. मी तर अगदींच दुबळा झालों आहें. रामाच्या वियोगामुळें झालेलें हें अग्नीसारखें भयंकर असह्य दुःख मला मुळींच सोसवत नाहीं आणि तो शोक मला आवरतही नाहीं. बरं पण ही दुसरी कोण?

**कौसल्या:**– महाराज, वत्स लक्ष्मणा..

**दशरथ:**– कुठें आहे? कुठें आहे तो लक्ष्मण? तो तर कुठें दिसत नाहीं. हा! काय दुःख हें!

असे शोकोद्गार काढून राजा पुनः मूर्च्छित पडतो कीं काय असें भय पडलें. म्हणून त्या दोघींनीं त्याला सांवरून धरून त्याचें समाधान चालविलें. परंतु राजाला वेड एक-राम, लक्ष्मण! तो सुमित्रेला उद्देशून म्हणाला: " सुमित्रे, तुझाच पुत्र सत्पुत्र खरा. तो आज अरण्यांत अहर्निश त्या रघुकुलश्रेष्ठ रामाची सेवा करीत आहे. "

अशीं भाषणें चाललीं असतांच रामाला पोंचविण्यास पाठविलेला सुमंत्र परत आल्याची बातमी कंचुकीनें येऊन सांगितली, त्याबरोबर राजा एकदम उल्हसित होऊन विचारतो: " काय, रामाला घेऊन आला सुमंत्र? "

कंचुकीला त्या प्रश्नाचें उत्तर देण्यास जड पडलें व कांहीं तरी उत्तर द्यायचें म्हणूनच काय, तो म्हणतो: " नाहीं, रथ मात्र घेऊन सुमंत्र आला. "

" रथ मात्र " असे शब्द ऐकतांच राजाला पुनः मूर्च्छा आली. आणि तींतून शुद्धीवर आल्यावर त्याची बडबड आणखीही वाढली. व तो म्हणतो:

घेवोनि आला शून्य रथ
भग्नचि केले तयें मम मनोरथ।
घेवोनि जावया दशरथ
काळें रथ पाठविला॥

जा आण त्याला आंत. "

कंचुकी सुमंत्राला आणण्याला गेला असतां राजा आपल्याशींच बडबडत होता:–

" नदीतटाकीं वेगें वाहती
ते वनीं वारे खरे धन्य होती।
जे माझिया रामा स्पर्शती
यथेच्छ वनामाझारी॥ "

त्याच्या अंतःकरणाला रामाखेरीज कांहीं दिसत नव्हतें. सुमंत्र येतांच त्यानें त्याला उच्च स्वरांत विचारलें:

" अरे सुमंत्रा! तूं तरी माझा मुलगाच. पण तुझा तो ज्येष्ठ बधु राम कोठें आहे? ती जनकराजाची कन्या वडील माणसांच्या सेवेंत तत्पर असे ती सीता कुठें आहे? तो लक्ष्मण कुठें आहे? मरणाच्या द्वारीं असलेल्या या नष्ट पित्याला त्यांनीं कांहीं निरोप सांगितला का? "

सुमंत्रानें त्याचें एकदम उत्तर न देतां म्हटलें, " महाराज, असलें अमंगळ कां बोलतां ? लवकरच त्यांची आपली भेट होईल. "

**राजाः—** खरंच खरंच, तपस्वी होऊन अरण्यवास करण्याला गेलेल्या त्यांना असे प्रश्न कसे करावे ? करूं नयेत. बरं पण त्यांचं ठीक चाललं आहेना ? सीतेला अरण्यांत संचार करितांना कांहीं त्रास होत नाहींना ? त्यांचा कांहीं आम्हांला निरोप आहे का ?

" हो, " सुमंत्र म्हणाला, " सर्वांनीं निरोप सांगितला आहे. "

**राजाः—** सर्वांनीं असं नको सांगूं. एकेकाचीं नांवं घेऊन सांग.

सुमंत्रानें ' ठीक आहे महाराज ' असें म्हणून निरोप सांगण्यास सुरुवात केली. "आयुष्मान् राम—"

पण राजा वेडा झालेला, तो त्याला पुढें बोलूं देतो कोठें ? तो मध्येंच म्हणाला: " हो. हो. आयुष्मान् राम हे शब्द ऐकतांक्षणींच असं वाटतं कीं राम आपल्याला भेटायला आला असून अगदीं आलिंगनच देतो आहे. बरं पुढें ?

**सुमंत्रः—** आयुष्मान् लक्ष्मण.

**राजाः—** हो. हो. आयुष्मान् लक्ष्मण. बरं पुढें ?

**सुमंत्रः—** आणखी आयुष्मती सीता जनककन्या.

**राजाः—** हो, ती वैदेही. अरे पण राम लक्ष्मण सीता हा क्रम कांहीं बरोबर नाहीं.

**सुमंत्रः—** मग क्रम कसा असावा ?

**राजाः—** क्रम असा कर. राम सीता लक्ष्मण. म्हणजे पहा, एका बाजूला राम, दुसऱ्या बाजूला लक्ष्मण, आणखी मध्यें सीता. म्हणजे ती खरी खरी सुरक्षित राहील. अरे बाबा रानांत भयें म्हणजे काय विचारतोस ?

इतकें बोलून पुनः राजानें सुमंत्राकडून राम सीता लक्ष्मण अशा क्रमानें नांवें घेववलीं. पुनः त्याला वाटलें कीं आपलीं मुलें आपल्याजवळ आलीं आहेत. म्हणून तो त्यांना ' या रे या मला आलिंगन द्या ' असें ओरडून सांगूं लागला. मध्येंच म्हणे; "एकदां राम मला दिसतो, एकदां मी त्याला आलिंगन देतों असा मला भास होतो, आणखी त्यामुळें असें वाटतें कीं मृत झालेला मी अमृताच्या योगानें पुनः जिवंत होतों आहें ! "

तीं दशरथाचीं बोलणीं ऐकून सुमंत्रानें त्यावर त्यास कांहीं उत्तर दिलें नाहीं. तो काय सांगत होता तेंच पुढें सांगूं लागलाः " शृंगवेरपुरास पोंचल्याबरोबर रथांतून उतरून अयोध्येकडे तोंड करून महाराजांना नमस्कार करून तिघेंही कांहीं तरी निरोप सांगण्याच्या विचारांत बराच वेळ होतीं. तो सांगण्यासाठीं त्यांचे ओंठही हलताहेत असें दि[illegible]; परंतु दुःखानें कंठ भरून आल्यानें शब्दोच्चार होईना. शेवटीं कांहीं न बोलतांच वनाकडे तोंड फिरवून ते निघून गेले.* "

तें ऐकतांच " काय ? कांहीं न बोलतां तिघेही मुकाट्यानें निघून गेले ? " असे राजाच्या मुखांतून उद्गार निघून तो एकदम

---

* कांहीं मनांत योजिलें
तें सांगाया तदोष्ठही स्फुरले ।
परि कंठ दाटला ते ।
शब्द न वदतां तसेच वनि गेले॥

मूर्च्छित पडला. यावेळीं त्याला फारच जोराची मूर्च्छा आली.

आतां राजा यांतून जिवंत राहणें शक्य नाहीं असें वाटून सुमंत्रानें सर्व अमात्यांना निरोप पाठविला. परंतु राजा अर्धवट शुद्धीवर आल्यासारखा होऊन कौसल्येस म्हणाला, " देवि, माझ्या अंगाला स्पर्श कर, आतां माझ्या डोळ्यांपुढें अंधारी आली. तूं मला डोळ्यांनीं दिसत नाहींस. रामाकडे माझी बुद्धि गेली. ती अजून परत येत नाहीं. पुत्रा रामा, मीं काय काय एकसारखं चिन्तलं, आणखी हें काय भलतंच झालं ! तुला राज्यावर बसवून प्रजाजनांना चांगल्या नृपाचा लाभ करून देईन, आपल्या वैभवाप्रमाणेंच आपल्या बंधूंचंही वैभव राख असा तुला उपदेश करीन; आणखी मी आपला तपोवनाला जाईन. असा नित्य विचार माझ्या मनांत घोळत होता. परंतु या कैकेयीनं एका क्षणांत तें सगळं निःशेष करून टाकलं. असो. सुमन्त्रा, जा आणखी कैकयीला सांग ' राम वनाला गेला, तुझी इच्छा पूर्ण झाली. माझेही प्राण मला सोडून चालले. आपल्या पुत्राला लवकर आणीव. पापाचीं फळं एकदां पुरीं होऊं देत."

इतकें दशरथ बोलला आणि त्याची तंद्री मरणाकडे लागली. तो पाणी मागूं लागला. त्याला त्याचे पितर दिसूं लागले. " रामा, सीते, लक्ष्मणा, मी आता पितरांकडे जातों. तो पहा दिलीप, तो रघु, तो माझा पिता अज हे इकडे कशाला बरं आले ? माझीच त्यांच्याकडे जाण्याची वेळ झाली. आलों हो आलों— " असें म्हणत त्यानें देह ठेविला. जिकडे तिकडे हाहाकार झाला.

इकडे राम वनास गेले. त्यावेळीं भरत अयोध्येंत नव्हता. तो आपल्या आजोळी गेला होता. दशरथाचा काळ होतांच त्याला आणण्यासाठीं रथ गेला तो भरताला घेऊन अयोध्येच्या जवळ येऊन पोंचला. आपल्या पित्याला काय झालें आहे, आपल्याला एकाएकीं कां बोलावलें, वगैरे प्रश्न त्यानें आपल्या सारथ्यास विचारलें. परंतु सारथी काय सांगणार ? त्यानें टाळाटाळीचीं उत्तरें दिलीं. त्यानें विचारलें, " महाराजांना व्याधि तरी काय झाली आहे ? " त्यानें उत्तर दिलें, 'हृदयसंताप.' "वैद्य काय म्हणतात ?" तर " त्यांचें कांहीं चालत नाहीं. " " पथ्याचें घेतात काय ? झोंप चांगली येते का ? " तर " भूमीवर पडले आहेत, कांहीं खात नाहींत. आतां दैव एवढीच कायती आशा उरली आहे. " असें सूतानें त्याला सांगितलें. बरोबरच आहे. तुझ्या आईचा फार भयंकर ऐश्वर्यलोभ, त्यामुळें तुझा ज्येष्ठ भ्राता राम वनवासास गेला आणि तुझा पिता त्यामुळेंच मरण पावला या तीन गोष्टी एकदम त्या कुमार भरताला सांगण्याला कोणाचें अंतःकरण धजावणार ! अशा प्रकारें बोलत बोलत व घोडे जलद चालविण्यासाठीं सूताला घाई करीत भरत अयोध्येच्या अगदीं नजीक आला. त्या वेताला घोडे फारच दमले, त्यांना ताजेतवाने करण्याकरितां व पाणी पाजण्याकरितां विसांवा घेणें जरूर होतें, म्हणून तेथेंच एका देवळाजवळ तो उतरला व सारथ्याला त्यानें घोड्यांस थोडी विश्रांति देऊन ताजेतवाने करून आणण्याला रवाना केलें.

हें देऊळ फार भव्य व सुंदर होतें. तें आपण आंतून पहावें अशी जिज्ञासा भरतास झाली. तितक्यांत त्याला उपाध्यायांकडून निरोपही आला कीं, अमुक वेळानंतर अमुक नक्षत्र लागतें तेव्हां आपण नगरप्रवेश करावा. भरताला दशरथ राजाचें दर्शन घेण्याची

जरी गर्दी झाली होती तरी उपाध्यायांचा असा निरोप आल्यानंतर तो काय करणार ? त्या जवळच्या देवळांत जाऊन देवदर्शनही घेऊं आणि विश्रांतिही घेऊं असें म्हणून तो त्या देवळाजवळ गेला. तेथें त्यानें पाहिलें तों देऊळ चांगलें शृंगारलें आहे. जिकडे तिकडे लाह्या व फुलें पडलीं आहेत. भिंतीवर चंदनाचे पंजे उठविले आहेत. सुंदर पुष्पमालांचीं तोरणें बांधलीं आहेत. कोण्या देवाची प्रतिमा आंत असावी बरें ? इथें कांहीं आयुध दिसत नाहीं. ध्वज नाहीं. बाह्य चिन्ह कांहींच दिसत नाहीं. असा तो आपल्याशींच विचार करीत करीत, आंत गेल्यानंतर सगळें समजेल असें म्हणून आंत गेला. तों तिथें फारच सुंदर व भव्य अशा पाषाणप्रतिमा त्याच्या दृष्टीस पडल्या. त्या प्रतिमांचें सौंदर्य व मानुषता पाहून त्याला फार कौतुक वाटलें. जणू काय आतां बोलताहेत अशी त्यांची भावगति दिसली ! 'हें चार देवतांचें देऊळ कोणाचें ? हीं दैवतें कोण... पण कोण का असेनात, त्यांना पाहून माझ्या मनाला हर्ष झाला आहे खरा, तेव्हां आपण आपला नमस्कार करावा. कोणाच्याही पुढें शिर नमविण्याला काय हरकत आहे ? "

असें म्हणून भरत त्या चार प्रतिमांना प्रणाम करणार तों देवळाचा राखणदार ( देवकुलिक ) तेथें आला. व ' हां. हां. नमस्कार करूं नका. " असें म्हणाला. भरतानें त्याला लागलींच विचारलें· " हा निषेध मलाच विशेषतः आपण करितां ? कीं येथला नियमच असा आहे म्हणून करितां ?"

देवकुलिकानें उत्तर दिलें " तसें कांहीं नाहीं. या प्रतिमा क्षत्रियांच्या आहेत, देवप्रतिमा समजून ब्राह्मणानें नमस्कार करूं नये म्हणून निषेध करतों. "

**भरतः**— असं ? हे क्षत्रिय आहेत ? हे कोण हे ?

**देवकुलिकः**—हे इक्ष्वाकुकुलांतले राजे.

**भरतः**— काय ? इक्ष्वाकुकुलांतले राजे ? अयोध्येचे स्वामी ? वा ! **यांच्या प्रतिमांचं** मला दर्शन झालं हा मला **मोठाच लाभ** झाला. सांगा पाहूं मला हे कोण कोण आहेत तें ? ।

**देवकुलिकः**— हे **प्रज्वलितधर्मप्रदीप** महाराजे दिलीप. यांनींच सर्व पृथ्वींतील रत्नांचा वगैरे संग्रह करून मग विश्वजित नांवाचा महायज्ञ केला.

**भरतः**— माझा यांना नमस्कार असो. हे कोण ?

**देवकुलिकः**— हे महाराज रघु. यांनीं तर इतका पुण्यसंचय केला कीं, उठतां बसतां हजारों ब्राह्मणांनीं पुण्याहवाचन शब्दांची नुसती गर्दी करून सोडावी !

**भरतः**— यांनाही माझा नमस्कार. हे कोण ?

**देवकुलिकः**— प्रियपत्नी मृत्यु पावतांच ज्यांनीं राज्यत्याग केला व नंतर अवभृथस्नानानें आपल्या चित्ताची जे शांति करून घेत ते अज होत.

**भरतः**— त्यांनाही नमस्कार असो.

पुढली प्रतिमा राजा दशरथाची होती. ती पहातांच भरताला एकदम कसेंसेंच झालें. हे कोण हा प्रश्न करण्याचें धैर्य त्याला होईना. आणि आपली ही मनःस्थिति बाहेर तर दिसूं नये म्हणून त्यानें त्या देवकुलिकाला म्हटलें, " अहो चित्त बरेंच उद्विग्न झालें असल्यामुळें मला सगळी नांवें नीटशीं ध्यानांत आलीं नाहात. तर पुनः एकदां सांगा पाहूं." देवकुलिकानें पुनः दिलीप, रघु व अज यांचीं

नांवें सांगितलीं. भरत नांवें विचारीत येई, देवकुलिक सांगे, हा दिलीप, हा रघु, हा अज. दशरथाच्या पुतळ्यापर्यंत आल्याबरोबर भरत घुटमळत पुन: विचारूं लागे. परंतु दशरथाचा पुतळा इथें कां ? असा प्रश्न त्याला विचारवेना. शेवटीं त्यानें त्या देवकुलिकाला (गुरवाला) विचारलें, " काय हो ! या ठिकाणीं जिवंत राजांच्याही प्रतिमा स्थापन केल्या जातात ? "

**देवकुलिकः**— छे. छे. फक्त मृतांच्याच.

**भरतः**— तर मग मी येतों. आपला निरोप घेतों.

**देवकुलिकः**—थांबा. ज्यांनीं स्त्रीला देणगी म्हणून कबूल केली ती देण्यासाठीं आपले प्राण आणि राज्य यांचा परित्याग केला त्या दशरथ महाराजांच्या प्रतिमेबद्दल आपण कांहीं विचारीत नाहीं हें कसें ?

तें ऐकतांच " हा तात ! " म्हणून भरत मूर्च्छित पडला. थोड्याच वेळांत सावध होऊन म्हणतो: " हृदया ! जें वृत्त ऐकायला तूं भीत होतास तें तुझ्या पित्याच्या मरणाचं वृत्त तू ऐक. तुझं धैर्य जाऊं दे, परंतु ' स्त्रीला दिलेली देणगी ' या शब्दांचा संबंध मला लागू असेल, तर मग मला हा माझा देह शुद्ध करूनच घेतला पाहिजे. "

भरताचें तें बोलणें ऐकून देवकुलिक एकदम चमत्कारला व भरतास म्हणतो: " काय ? आपण कैकेयीपुत्र भरत ? "

भरतानें अत्यंत उद्वेगानें उत्तर दिलें, " हो हो. दशरथाचा पुत्र. मी कैकेयीचा नव्हे. "

तें ऐकतांच तो देवकुलिक तेथून जाऊं लागला. परंतु भरत त्याला जाऊं देईना. त्याला सर्व हकीकत विचारूं लागला. आपण सर्व सांगितल्याखेरीज गत्यंतर नाहीं, असें पाहून त्यानेंही सर्व हकीकत सांगितली. आपल्याला राज्य मिळावें म्हणून आपल्या आईनें श्रीरामचंद्राला व जानकीला वनवासास धाडलें, लक्ष्मण त्यांच्याबरोबर निघून गेला, आणि त्या सर्वांच्या वियोगदु:खामुळें व श्रीरामाला राज्याभिषेक करून आपण तपोवनांत जाण्याची आपली फार दिवसांची उत्कट इच्छा एकदम नष्ट झाली म्हणून हताश होऊन आपल्या वृद्ध पित्यानें प्राणत्याग केला, ही सर्व हकीकत ऐकतांच भरत अत्यंत उद्विग्न झाला. आणि म्हणतो.

नाहीं पिता, मम न बंधु जिथें तसा त्यां
झ.ली भयाण अटवी मज ती अयोध्या ॥
झालों तृषार्त तरि धावुं बळें कशास
पाणी न थेंबहि अशा कुनदीकडेस ! ॥

देवकुलिक भरताला अयोध्येंत घडलेली हकीकत सांगत असतां ती ऐकून भरताला पुन: एकदां मूर्च्छा आली. इतक्यांत त्याच्या आया आणि सुमंत्र ही मंडळी तेथें आली. त्याबरोबर त्या देवकुलिकास मोठा हर्ष झाला. आपण या हकीकती भरताला इतक्या लवकर सांगून भलतेंच करून बसलों असें त्याला आधींच वाटत होतें. त्यांत आणखी तो भरत मूर्च्छित होऊन पडलेला. तेव्हां कौसल्यादि त्याच्या माता येतांच तो उद्गारला:—

हा बाळ मूर्च्छित पडे, करुं काय आतां !
झालें बरें समयिं येति तदीय माता ।
पाणी नसो तरिहि केवळ मातृपाणी
स्पर्शेंचि शुद्धिवरि आत्मसुतासि आणी ॥

देवकुलिकानें चट्कन् पुढें होऊन हा कुमार भरत येथें मूर्च्छित पडला आहे असें दाखवून आपण तेथून पाय काढला. इतक्यांत भरत शुद्धीवर आला व त्यास सुमंत्रानें आपण त्याला अयोध्येंत घेऊन जाण्यासाठीं आलों असें सांगितलें. माझ्या

मातांची स्थिति कशी आहे असें विचारत त्यांनीं ही पहा आमची अशी स्थिति अ असें त्याला सांगितलें. तेव्हां त्यानें कौसल्ये आदरानें नमस्कारीत म्हटलें "आई, मी अग निरपराधी आहें." तें ऐकून कौसल्येनें त्या "तूं अगदीं खेद करूं नकोस, तुझ्या काय आहे ?" असें म्हणून त्याचें समाधा केलें. सुमित्रेचें अभिवंदन करितांना त्य तिला म्हटलें, "लक्ष्मण ज्याला फसवून गे तो मी भरत आपल्याला वंदन करतों. तिनें त्याला आशीर्वाद दिला. नंतर कैके कडे वळतांच त्याला अत्यंत राग आल तो एकदम तिला म्हणतो,

या दोघी मम माता
यांच्यामध्यें न शोभसी मुळिंही।
गंगायमुनांमध्यें
घुसविलि कुनदी तशीच गे तूं ही

कैकेयीच्या कानीं हे शब्द पडतांच चकित झाली व तिनें त्याला विचारलें "मीं काय बाबा केलं ?"

भरतानें उत्तर दिलें: "काय केलं म्हण विचारतेस? तूंच विचार कर. मला अपकी रामाला वल्कलें, महाराजांना घरांत मृ सगळ्या अयोध्येला एकसारखा शो लक्ष्मणाला वन्य पशूंची संगति, पुत्रावर ज्या अत्यंत प्रेम अशा मातांना शोक, सीतादेवी वनप्रवासाचे श्रम, आणि स्वतःला धिक्क धिक्कार असे कठोर शब्द अशी जोड कर दिलीस, आणखी काय करायचें राहिलें ?

कौसल्येनें त्याला कैकेयीला वंदन कराय सांगितलें असतां त्यानें केलें नाहीं. "ति वंदन केलेंच पाहिजे, ती तुझी आई," अ म्हटलें असतां "ती एक वेळ माझी आ होती, आतां नाहीं. ज्यांनीं स्नेह सोडल ज्यांनीं शीलत्यागाचा दोष अंगिकारला अ पुत्र असले तरी ते अपुत्रच असें समजलें जातें. लोकांत आधीं मी हा धर्म स्थापित करतों कीं भर्त्याचा द्रोह करणारी माता ही अमाताच होय."

इतकें बोलून तो कैकेयीकडे पुनः वळला व तिला म्हणाला: "राज्याच्या लोभापुढें तुला महाराजांच्या प्राणांचें कांहीं वाटलें नाहीं; ज्येष्ठ पुत्राला 'तूं रानांत जा' म्हणून घालवून दिलास. जानकी वल्कलं नेसली हें पाहून जें विदीर्ण झालं नाहीं तें तुझं हृदय वज्रासारखं कठिण आहे !"

सुमंत्रानें त्याला मध्येंच म्हटलें: 'प्रजांच्या सांगण्यावरून वसिष्ठवामदेवादि ऋषि आपल्याला अभिषेक करण्यासाठीं खोळंबले आहेत."

त्यावर तो म्हणाला, "प्रजांनीं माझ्या पाठीमागून यावं."

**सुमंत्रः**— अभिषेक सोडून आपण कुठें जाणार ?

**भरतः**—अभिषेक ? अभिषेक हिला करा.

**सुमंत्रः**— आपण कोठें जाणार ?

**भरतः**— मी ? तो लक्ष्मणाचा प्रिय बंधु जेथें आहे तेथें जाणार. जेथें राघव ती अयोध्या, त्याच्यावांचून अयोध्या ती अयोध्याच नव्हे.

असा विचार करून भरत रथांत बसून श्रीरामचंद्राला भेटण्याला गेला. वनांतल्या आश्रमांत भावांभावांची भेट झाली. भरतानें रामाला निक्षून सांगितलें कीं, "मला राज्य कर्तव्य नाहीं. मी आपल्या सेवेसाठीं येथें राहणार." रामानें त्याला पुष्कळ प्रकारानें सांगितलें कीं, माझी शुश्रूषा करावयाची तर ती राज्य संभाळून कर. परंतु भरत तें ऐकेना.

शेवटीं तो भरताला म्हणाला, " भरता, असं करूं नकोस. मीं कांहीं गर्वानं, भ्रमानं किंवा भयानं राज्यत्याग केला नाहीं. पित्याची आज्ञा म्हणून केला. आपल्या कुलांत सत्य हेंच धन आहे, असं असून तूं भलताच मार्ग कसा धरतोस ? असं करूं नकोस. आपल्या पित्याच्या वचनाला हरताळ लागूं देऊं नकोस. तूं राज्य केलें पाहिजेस. माझी तुला शपथ आहे. " हें रामानें इतक्या प्रेमानें व आग्रहानें सांगितल्यावर भरतानें राज्य चालविण्याचें कबूल केलें. परंतु त्या कबुलीला दोन अटी घातल्या. त्या अटी अशा. एक ही कीं, रामचंद्राचा वनवास संपवून तो परत येतांच भरतानें राज्य सोडावें आणि रामचंद्रानें तें चालवावें. दुसरी ही कीं, रामानें आपल्या पादुका द्याव्या आणि त्या सिंहासनावर ठेवून भरतानें राज्य चालवावें. तेंही रामानें कबूल केलें. शेवटीं भरतानें रामास म्हटलें, " तुला मी परत घेऊन येईन, या आशेनें सर्व प्रजाजन बसले असतील. त्यांना तुझा हा चरणप्रसाद दाखवून संतुष्ट करीन. " आणि निरोप घेतला.

पुढें राम, सीता व लक्ष्मण हीं एका वनांत जाऊन आश्रम करून राहिलीं. आश्रम झाडणें, सारवणें, नानाप्रकारें आश्रमभूमि सुशोभित करणें, मुद्दाम लाविलेल्या पुष्पवृक्षांना व फलवृक्षांना पाणी घालणें इत्यादि सर्व कामें सीता स्वतः करीत असे. तिला आणि रामाला आपल्यावर आलेल्या संकटांचें कांहीं वाटत नसे असें नाहीं. परंतु तें सर्व मागें सारून तीं दोघें मोठ्या आनंदानें कालक्रमणा करूं लागलीं. लक्ष्मण तर काय त्यांच्या शुश्रूषेंतच गर्क असे. त्याचा आनंदच तो. असें चाललें असतां एके दिवशीं सीता संमार्जनादि विधि करून झाडांना पाणी घालण्यांत गुंतली होती, इतक्यांत श्रीरामचंद्र बाहेरून आले. आणि सीतेला म्हणाले, " जानकि, कांहीं काम नसलें तर अंमळ बस इथें. "

" आर्यपुत्रांची आज्ञा प्रमाण आहे, " असें म्हणून सीता बसली, तेव्हां राम तिला म्हणाले: " सीते, कांहीं तरी विचारावं असं तुझ्या मनांत दिसतं आहे. काय बरं बोलायचं आहे ? "

**सीता:**– कांहीं तरी खेद उत्पन्न होऊन मनाला शून्यता यावी असा एकंदर आपल्या मुद्रेवर रंग दिसतो आहे. कशाबद्दल बरं खेद असावा हा ?

**राम:**– सीते, तूं बरोबर ओळखलंस. आधींच नानाप्रकारचे क्लेश आणि चिंता आहेत, आणखी त्यांत नवीन नवीन चिंतांची भर पडते.

**सीता:**– आर्यपुत्रांना आतां कोणची चिंता उत्पन्न झाली आहे ?

**राम:**– उद्यां वडिलांचं वर्षश्राद्ध. कांहीं विशेष प्रकारानं श्राद्धकर्म व्हावं अशी पितरांची इच्छा असते. तें यथास्थितपणें आपल्या हातून कसं व्हावं ? पण त्यांची तृप्ति अशी तशीही होईल. कारण त्यांना माझी स्थिति काय आहे हें दिसतंच आहे. तरी पण आमच्या वडिलांच्या नांवाला आणि माझ्या नांवाला साजेल अशी ही पूजा झाली पाहिजे.

**सीता:**–आर्यपुत्र, भरत यथासांग मोठ्या ऐश्वर्यानें श्राद्धविधि करील. आपण आपल्या स्थित्यनुरूप नुसत्या फलावर आणि उदकावर भागवून घ्यावं.

**राम:**– सीते, दर्भ पसरून त्यांवर नुसतीं फलं ठेवलीं, तर स्वर्गांत तात दशरथाला आमच्या वनवासाचं स्मरण होऊन तेथें सुद्धां तो शोक करीत राहील.

असें दोघांचें संभाषण चाललें आहे तों रावण संन्याशाचा वेष घेऊन तेथें आला. त्यानें 'आश्रमांत कोण आहे हो ?' असें मोठ्यानें विचारलें. रामानें 'अतिथीला स्वागत असो !' असें मोठ्यानें प्रत्युत्तर दिलें. रावण आंत आला. रामाच्या धीर गभीर स्वरानें चकित झालेला रावण रामाचें रूप पहातांच अधिकच चकित झाला.

राम त्याचें स्वागत करून त्यास म्हणाला:– "हें आसन आहे यावर बसावें."

सीतेला पाहून तो एकदम आत्मस्वरूप प्रकट करण्याला उत्सुक झाला. परंतु आत्मसंयमन करून तो तसाच बसला. नंतर रामाला म्हणतो, "आपल्या भाषणानेंच माझं पूर्ण पूजन झालं. आपण आतां बसा."

'बरं तर' असें म्हणून राम बसला. रावणानें मनांत आतां पुढें काय बोलावें याचा विचार करून ठरविलें कीं, आपण ब्राह्मण आहोंत असें सांगून योग्य असें भाषण करावें. नंतर रामास म्हणतो: "अहो, मी कश्यपगोत्री आहें. वेदांचं सांगोपांग अध्ययन केलं आहे. त्याचप्रमाणें मानवधर्मशास्त्र, माहेश्वरयोगशास्त्र, बृहस्पतीचं अर्थशास्त्र, मेधातिथीचं न्यायशास्त्र आणि प्राचेतसश्राद्धकल्प इत्यादि सर्व ग्रंथांचं व विषयांचं मीं अध्ययन केलं आहे."

रामाच्या मनांत सध्यां सगळा श्राद्धाचा विचार चालला होता. अर्थातच श्राद्धकल्प हा विषय ऐकण्याबरोबर त्यानें त्या संन्यासवेषधारी रावणाला विचारलें: "काय काय ? श्राद्धकल्पाचं आपण अध्ययन केलं आहे ?"

"सगळे विषय टाकून श्राद्धकल्पाबद्दलच आपण उत्कंठेनें प्रश्न विचारला, याचं कारण काय ?" असें रावणानें विचारलें, तेव्हां पित्याच्या मरणामुळें त्याचीच अवश्यकता आहे असें रामानें सांगितल्यावर रावणानें आपली काय पृच्छा असेल ती आपण करावी असें सांगितलें.

रामानें त्याला विचारलें: "तर मग श्राद्धासाठीं काय पदार्थ तयार केले म्हणजे पितरांची तृप्ति होईल ?"

रावण त्यावर म्हणाला: "बाबारे, जें श्रद्धेनें अर्पण केलं तें श्राद्ध."

रामानें पुनः म्हटलें: "श्राद्ध करणारांच्या मनांत आदर नसला तर तें श्राद्ध न होतां परित्यक्तच होणार. मी तें विचारीत नाहीं. पितरांना विशेष प्रिय काय तें सांगा."

**रावण** :– ऐका, विरूढांत दर्भ, औषधींत तिल, शाकांत कलाय (वाटाणा), मत्स्यांत महाशफर, पक्षांत वाध्र्राणिस, पशूंत गौ व गेंडा किंवा— मनुष्यांत विहित मानले आहेत.

**राम**:–आपण शेवटीं किंवा शब्द घालून थांबलांत तेव्हां आणखी कांहीं पदार्थ आहेत.

**रावण**:– आहेत. परंतु ते सामर्थ्यानें मिळविले पाहिजेत.

रामानें त्यावर म्हटलें:– ते जर कोठें संनिध असले तर मी त्यांची प्राप्ति खचित करून घेईन.

रावणानें तें ऐकल्यावर म्हटलें:– ठीक आहे. हिमपर्वताच्या सातव्या शिखरावर प्रत्यक्ष शिवाच्या शिरावरून पडणाऱ्या गंगेचें पाणी पिणारे, वैडूर्याप्रमाणें ज्यांच्या पाठी काळ्या आहेत असे, वायूसारखे वेगवान् कांचनपार्श्व नांवाचे मृग आहेत. ते श्राद्धान्न म्हणून फार योग्य. पितरांना फार संतोषकारक.

रामानें तें ऐकतांच एकदम म्हटलें:– आम्हीं तर मग हिमपर्वतावरच रहाण्याला जाऊं.

त्याप्रमाणें सीतेला त्यानें येथून निघण्याची तयारीही करण्यास सांगितलें. परंतु रावणानें पुनः त्याला म्हटलें:—अहो पण ते मृग मनुष्यांना दिसत नाहींत.

**रामः**— हिमालयावर असतात ना ते ?

**रावणः**— होय.

**रामः**— मग आपण पहा तर खरे. एक तो मला सुवर्णमृग दाखवील तरी किंवा माझ्या बाणाच्या वेगानें छिन्नविच्छिन्न तरी होईल.

ही दर्पोक्ति ऐकून रावणाला फार मत्सर वाटला.

तितक्यांत तेथें वीज चमकल्याप्रमाणें झालें. तेव्हां रावण रामास म्हणतोः— अहो हिमवान् पर्वत आपली येथेंच पूजा करतो आहे. हा पहा एक सुवर्णमृग.

**रामः**— आपल्यासारख्यांचा आशीर्वाद आणि माझ्या वडिलांचं भाग्य यामुळेंच हा प्रसाद झाला. ठीक आहे. जानकी, लक्ष्मणाला सांग कीं, वडिलांच्या श्राद्धाला याचीच योजना करावयाची.

परंतु लक्ष्मणास दुसऱ्या कांहीं कार्यासाठीं आपणच पाठविलें आहे, असें त्यांस सीतेनें स्मरण देतांच राम स्वतःच त्या मृगाला मारून आणण्याला निघाला. सीतेनें विचारलें मी काय करूं ? रामानें जातां जातां उत्तर दिलें: " अतिथींची सेवा कर. "

राम निघून गेल्यानंतर सीतेला भय वाटूं लागलें. रावण मनांत म्हणतोः —मायामृग उत्पन्न करून रामाला तर येथून दूर नेला. आतां मंत्र न म्हणतां जशी आहुति उचलायची तशी सीतेला उचलावी झालें.

असा विचार करून त्यानें एकदम आपलें खरें स्वरूप प्रकट केलें आणि "मी तुला घेऊन जाणार, तूं रामाप्रमाणेंच माझी सेवा कर असें म्हणूं लागला."

"धांवा ! आर्यपुत्रा धांवा !" असा सीतेनें पुष्कळ आक्रोश केला. परंतु राम त्या मृगाच्या पाठीमागें दूर गेलेला आणि लक्ष्मण कांहीं कामासाठीं आधींच बाहेर गेलेला. तेव्हां तिच्या ' धांवा धांवा ' म्हणून ओरडण्याचा रावण उपहास मात्र करूं लागला. " रामाला हांक मार, लक्ष्मणाला हांक मार किंवा स्वर्गस्थ दशरथालाही हांक मार. त्या भ्याडांना हांका मारून उपयोग काय ? वाघापुढें कुठें हरणें युद्धाला उभीं राहिलीं आहेत ?" असले आत्मश्लाघेचे उद्गार काढून तिचा त्यानें उपमर्द चालविला. शेवटीं संतापून तिनें त्याला शपथ घातली, त्यामुळें मात्र त्या पतिव्रतेपुढें तो थोडा दबकला. परंतु मदांध झालेला तो किती वेळ दबकून रहाणार ? लागलीच पूर्वरंगावर येऊन तिला उचलून घेऊन मोठ्यानें ओरडून म्हणाला " अहो जनस्थानवासी तपस्विजनांनो, ऐका, ऐका तुम्हीः

> हा दशकंठ बलात्कारें
> सीतेसि घेवोनि चालला त्वरें ।
> प्रेम क्षात्रधर्मी जरि खरें
> रामें करावा पराक्रम ॥ "

सीता 'धांवा धांवा' म्हणून ओरडतच होती. इतक्यांत प्रचंड पक्षवेगानें सगळें रान हलवून सोडणारा जटायु भयंकर चोंच सरसावून आपल्यावर तुटून पडण्यासाठीं येतो आहे असें रावणाला दिसलें. आणि त्याच्याशीं लढून त्याला जर्जर करण्यासाठीं तो धांवला.

रावणाचें व जटायूचें घनघोर युद्ध झालें. जटायूनें आपल्याकडून रावणाला ठार मारण्यासाठीं शिकस्त केली. परंतु शेवटीं तो स्वतःच जर्जर होऊन पडला. त्याचा पराभव

झाला आणि त्याला तसाच मरणाच्या द्वारीं टाकून रावण सीतेसह लंकेकडे चालता झाला. हा सर्व प्रकार जनस्थानांतील दोघां तापसांनीं पाहिला व त्यानें तो लागलीच रामास भेटून कळविला.

सुमंत्र कधीं कधीं जनस्थानांत रामादिकांचा समाचार घेऊन येत असे. त्याप्रमाणें या सुमारासही गेला होता, तेव्हां त्याला ही सीताहरणाची हकीकत कळली, त्याबरोबर ती भरतास कळविण्याकरितां तो परत अयोध्येस आला. भरताला भेटून त्याला ती अत्यंत शोकप्रद हकिकत सांगण्याचें त्याच्या फार जिवावर आलें. भरताच्या समोर जातांच त्याला वेड्यासारखें झालें. तोंडांतून शब्द निघेना. भरत तर रामाचें कुशल वृत्त ऐकण्याला अत्यंत उत्सुक झाला होता. त्यानें प्रश्नावर प्रश्न विचारले. सुमंत्र कांहीं बोलेना. तेव्हां प्रतिहारीनें त्याला "महाराज, आपल्याला प्रश्न विचारताहेत" असें बोलून जागृत करावें लागलें. भरतालाही असें वाटलें कीं, याला फार फार वाईट वाटलें असावें. त्यामुळें याचें चित्त ठिकाणावर नाहीं. म्हणून त्यानें त्याला म्हटलें, "आपण अर्ध्या वाटेंतूनच परत आलां काय ?"

"आपण रामचंद्राचा समाचार घेऊन येण्याला सांगितल्यावर अर्ध्या वाटेंतून मी परत कसा येईन ?" सुमंत्रानें उत्तर दिलें.

**भरतः**— मग काय रागामुळें किंवा लज्जेमुळें त्यांनीं आपली भेट घेतली नाहीं ?

**सुमंत्रः**— कुमारा, ते विनीत. त्यांना क्रोध कुठला ? आणि ज्यांचा एकदां निश्चय झाला त्यांना लज्जा तरी कसली ? परंतु तें तपोवन मला शून्य दिसलें. ती मंडळी तेथें नाहींत.

**भरतः**— कोणीकडे गेली म्हणून कळलें ?

**सुमंत्रः**—किष्किंधा नांवाची एक वानरनगरी आहे तिकडे गेली अशी बातमी लागली.

**भरतः**— कशा प्रकारचे ते वानर आहेत कोणास ठाऊक. आमच्या मंडळींना फार त्रास होत असेल.

**सुमंत्रः**— पशु झाले तरी उपकाराची किंमत समजतात.

---

**भरतः**— तें कसें काय ?

**सुमंत्रः**— वडील भाऊ जो वाली, त्यानें सुग्रीवाला राज्यावरून हुसकून लावलें, त्याच्या पत्नीचाही अपहार केला. तेव्हां तो एका पर्वतावर राहिला. समदुःखी म्हणून रामचंद्रानें त्याला साहाय्य करून त्याच्या दुःखाचा परिहार केला.

**भरतः**— समदुःखी म्हणून ? समदुःखी कसा ?

याचें उत्तर देण्याला सुमंत्राला धैर्य होईना; आणि शब्द तर असे बाहेर पडले. तेव्हां तो म्हणतो, "ऐश्वर्यापासून भ्रंश झाला एवढ्याचपुरता समदुःखीपणा मीं म्हटला."

परंतु भरताला तें खरें वाटलें नाहीं. सुमंत्राचा एकंदर रंगच त्याला निराळा दिसला. तेव्हां तो त्याला एकदम म्हणाला:

"लपवालपवी कां करतोस बाबा ? माझ्या स्वर्गस्थ पित्याच्या चरणाची शपथ घालून तुला विचारतों कीं खरें काय तें सांगच."

**सुमंत्रः**— आतां गत्यंतर काय ? ऐकावें. रावणानें कपट करून सीतेचें हरण केलें.

**भरतः**— काय सीतेचें हरण केलें ?

त्यानें हा प्रश्न विचारिला आणि त्याला मूर्च्छाच आली.

सुमंत्रानें त्याला शुद्धीवर आणल्यावर तो पुढें काय करावें याचा विचार करूं लागला. तितक्यांत त्याला कांहीं सुचलें आणि तो सुमंत्राला घेऊन कैकेयीकडे जावें म्हणून राणीवशांत गेला. त्यानें कैकेयीला आपण भेटीसाठीं आलों म्हणून निरोप पाठविला. रामास वनवासास व त्यामुळें दशरथास स्वर्गास पाठविल्या दिवसापासून भरत कैकेयीला उपरोधिक शब्दांखेरीज कधींच कांहीं बोलला नाहीं. यामुळें आतांही तसेंच कांहीं तरी बोलण्यासाठीं हा आला असावा असें कैकेयीस वाटलें. त्यांत रामाच्या समाचाराला पाठविलेल्या सुमंत्राला घेऊन भरत आला आहे असें कळल्यावर तर तसें भय तिला विशेषच वाटलें, तथापि तिनें त्याला आंत घेऊन येण्याला प्रतिहारीला सांगितलें. भरत आला. तेव्हां ती त्याला म्हणते:—" वत्सा, रामाकडून समाचार घेऊन सुमंत्र आला आहे असें मी ऐकतें. "

**भरत**:— म्हणून तर मी तुला फार प्रिय अशी गोष्ट झाल्याचें सांगायला आलों आहें.

**कैकेयी**:— तर मग कौसल्या आणखी सुमित्रा यांना नको का बोलवायला ?

**भरत**:— नको नको. त्यांना ऐकवण्याजोगी नाहीं.

कैकेयीला अचंबा वाटला कीं, अशी गोष्ट तरी काय असावी ? आणि तिनें भरताला काय असेल ती सांग असें सांगितलें.

त्याबरोबर भरत तिला म्हणतो: " ऐका आईसाहेब.

तव आज्ञेनें राज्यहि
सोडुनि रानीं रहावया गेला ।
तत्पत्नी राक्षस नें;
तृप्त मनोरथ तुझा पुरा झाला !॥"

तें ऐकतांच कैकेयीनें दीर्घ असा सुस्कारा टाकला. भरत पुढें तिला म्हणतो:

इक्ष्वाकुवंशिं राजे
शूर तसे सत्त्वधीर बहुमानी ।
तत्कुलिं होउनि तूं वधु
तव वधुला दैत्य दुष्ट अवमानी ॥

कैकेयी त्या त्याच्या भाषणानें फारच खिन्न झाली व आपल्याशींच म्हणाली, "आतां याला सगळी खरी हकीकत सांगतेंच." नंतर उघड म्हणाली, "वत्सा, महाराजांना काय शाप झाला होता तें तुला माहिती नाहीं. "

**भरत**:— काय महाराजांना शाप झाला होता ?

**कैकेयी**:— होय. शाप झाला होता. सुमन्त्रा, सांग सगळी हकीकत.

कैकेयीनें अशी आज्ञा करितांच सुमन्त्रानें दशरथ राजा एकदां मृगयेस गेला असतां त्याच्या हातून एका मातृपितृभक्त ऋषिकुमाराचा कसा वध झाला तें सांगितलें. हा ऋषिकुमार आपल्या अंध मातापितरांस कावडींत बसवून ती कावड खांद्यावर घेऊन काशीयात्रेस चालला होता. वाटेंत त्या मातापितरांस तहान लागली म्हणून त्यानें कावड एका झाडाखालीं ठेवली व झारी घेऊन तो एका सरोवरावर पाणी भरण्यास गेला. झारी सरोवरांत बुडवितो, तों एखादा हत्ती पाणी पिण्यासाठीं गेला असतां सोंड पाण्यांत घालून जसा आवाज करतो तसा आवाज झाला. राजा तेथून लांब दृष्टीच्या टप्प्याबाहेर परंतु शब्द ऐकूं जाईल इतक्या अंतरावर होता. तो शब्द ऐकतांच रानहत्ती सरोवरावर पाणी पीत आहे असें त्यास वाटलें आणि त्यानें शब्दवेधानें बाण मारला, तो ऋषिकुमाराच्या वर्मीं लागला. आपली शिकार पहाण्यासाठीं म्हणून

राजा येतो तों त्यानें हा प्रकार पाहिल
राजाला पश्चात्ताप झाला. ऋषिकुमार त्याल
कांहीं बोलला नाहीं. फक्त माझ्या माताि
तरांना एवढें पाणी पाज आणि मग त्यां
माझ्या मृत्यूची बातमी सांग एवढेंच म्हणू
त्यानें प्राण सोडला. राजा त्याप्रमाणें झा
घेऊन त्या अंध मातापितरांजवळ गेला. परं
ही आपल्या मुलाची चाहूल नाहीं हें त्यां
तेव्हांच ओळखलें. शेवटीं राजानें त्यां
झालेली खरी हकीकत सांगितली, तेव्हां त्
दोघांनीं " बाबारे, हातीं तोंडीं आलेल
पुत्राच्या वियोगानें तळतळत जसा आम
प्राण जातो आहे तसाच तुझा पुत्रवियोगा
प्राण जाईल ! " असा महाराजांस शाप दिल

ती हकीकत ऐकून भरत फारच क
झाला. तेव्हां कैकेयी त्याला म्हणाली
" बाळा, या नेमानेमाप्रमाणेंच माझ्या हातू
रामवनवासाचा प्रकार घडला. ऋषीचा शा
खरा झाल्याखेरीज राहायचा नाहीं. तेव
पुत्रवियोग हा व्हायलाच पाहिजे होता. "

**भरतः**— मग मला कां नाहीं अरण्यां
पाठविलास ?

**कैकेयीः**— तूं नेहमींच आपल्या आजोळ
रहात असस. तेव्हां तुझा वियोग नित्याचा
असल्यासारखा होता.

**भरतः**— बरं मग पण चवदा वर्षे वनवा
साचा वर कां मागितलास ?

**कैकेयीः**— आपल्या वर मागण्याच
परिणाम काय होणार हें मनांत ठाऊक अस
ल्यामुळें व्याकुळ झालेली मी चवदा दिव
म्हणायच्या ऐवजीं चवदा वर्षे बोलून गेलें !

**भरतः**— एकंदरींत विचार करण्याजो
गाच प्रकार झाला खरा. पण हें सारं गुरु
जनांना विदित आहे का ?

**सुमंत्रः**— वसिष्ठवामदेवांना विदितच नव्हे तर अनुमतही आहे.

**भरतः**—ते त्रैलोक्यसाक्षी महात्मेच आहेत. बरं झालं. माझ्या मातेकडे दोष नाहीं. आई, रामचंद्राच्या ठिकाणीं असलेल्या प्रेमामुळें संतप्त होऊन जें काय आपल्याला आजपर्यंत वेडंवाकडं बोललों तें सर्व पोटांत घालून क्षमा करावी. आपल्याला मी साष्टांग प्रणिपात करतों.

**कैकेयीः**—बाळा, ऊठ. ऊठ. कोणची माता आपल्या मुलाच्या अपराधांची क्षमा करणार नाहीं ?

भरत उठला. त्यास एकप्रकारें समाधान झालें. आणि तो म्हणाला, " तर मग माते, आतां मी तुझा निरोप घेतों आणखी आपलें व आपल्या मांडलिक राजांचीं सैन्यें घेऊन श्रीरामचंद्राच्या साहाय्याकरितां जातों. "

इतक्यांत सीताहरणाची वार्ता समजल्यामुळें कौसल्या मूर्च्छा येऊन पडल्याचें वर्तमान आलें तेव्हां सर्व मंडळी तिकडे गेली.

इकडे रामाचा व सुग्रीवाचा स्नेह जमल्यानंतर थोड्याच दिवसांत वालीचें रामानें निर्दलन केलें व आणखीही अनेक लोकांचें साहाय्य रामास मिळालें. त्या सर्वांच्या साहाय्यानें आणि आपल्या दुष्ट बंधूच्या वर्तनाचा वीट आलेला रावणबंधु बिभीषण याच्याही साहाय्यानें रामानें रावणाचा व तत्पक्षीयांचा वध केला. सीतेची सुटका केली आणि तो पुनः जनस्थानांत आला. तेथें पूर्वींच्या सर्व गोष्टींचें स्मरण काढून मंडळी सुखदुःखाच्या गोष्टी सांगत असतां भरतही आपलें प्रचंड सैन्य घेऊन आल्याची वर्दी आली. त्याच्याबरोबर त्याच्या आयाही होत्या. सर्वांच्या गांठीभेटी झाल्या. भरतानें रामास आतां

आपलें राज्य परत घे, म्हणून विज्ञापना केली. नेमानेम होता तो सर्व पूर्ण झाला, तेव्हां आतां राज्याभिषेक करून राज्यकारभार पहाण्याला कांहींच प्रत्यवाय नाहीं असें सर्व उपाध्यायांनीं सांगितल्यावर सर्व मंडळी अयोध्येला जाण्यास निघाली.

येथपर्यंतचा कथाभाग या नाटकांत आहे. रामायणांतल्या कथा आतां बहुतेकांना माहिती असतातच. तेव्हां कवीनें नाट्यकलेच्या दृष्टीनें कोठें काय फरक केला आहे, कोठें काय खुबी केली आहे, राम, लक्ष्मण, भरत, कैकेयी या पात्रांचें चित्र कशाप्रकारें रंगवून आपल्यापुढें मांडलें आहे हें निराळ्या शब्दांनीं वर्णन करून सांगावयास नको. म्हणूनच नाटकाचें संविधानक जसें नाटकांत आहे तसें दिलें आहे.

पहिल्या अंकांत अभिषेकाची तयारी व रामाचें वनवासास प्रयाण.

दुसऱ्यांत दशरथाचा शोक व मृत्यु.

तिसऱ्या अंकांत भरताला दशरथाच्या प्रतिमेचें दर्शन व भरताकडून कैकेयीची निर्भर्त्सना.

चवथ्यांत भरतानें जनस्थानीं जाऊन रामदर्शन घेतलें. रामानें मी परत येईपर्यंत तूं राज्य चालविलेंच पाहिजे अशी त्याला आज्ञा केली. आपल्या पादुकांचा सेवक म्हणून मी राज्य चालवीन असें म्हणून भरत अयोध्येस परत येतो.

पांचव्यांत रावणानें कपटवेषानें रामाच्या आश्रमांत शिरून सीतेचें हरण केलें.

सहाव्यांत भरतास सीताहरणाची वार्ता कळते, त्यामुळें तो फारच दुःखी होऊन या सर्वांला मूळ कारण आपली आई कैकेयी, तेव्हां तिच्याकडे जाऊन तिची निर्भर्त्सना करतो; तितक्यांत त्याला ठरलेला नेमानेम—दशरथाला ऋषिशाप—कळून तो मातेची क्षमा मागतो. व सीतेच्या मुक्ततेकरितां रामाला साहाय्य करावें म्हणून प्रचंड सैन्यें घेऊन निघतो.

सातव्यांत सुग्रीवादिकांच्या साहाय्यानें रावणवध करून सीतेला घेऊन राम जनस्थानांत येतो. तों भरतही अयोध्येकडून तेथें येतो. सर्वांच्या गांठी पडतात आणि रामाला राज्याभिषेक करण्यासाठीं सर्व मंडळी अयोध्येला जायला निघतात. जिकडे तिकडे आनंदी आनंद होतो !

# अभिषेक.

श्रीरामचंद्रांनीं जनस्थानांत येऊन अ-
ण्यवासास आरंभ केला. तेथें बरींच व
काढलीं. पुढें रावणानें कपटानें सीतेचें हर
केलें. येथपर्यंतचीच कथा खरोखर भास
प्रतिमा नाटकांत घेतली आहे. आणि तेथू
पुढची सर्व कथा अभिषेक नाटकांत रंगवि
आहे. अभिषेक म्हणजे कैकेयीच्या अट
प्रमाणें चौदा वर्षें वनवासांत काढल्यानंत
रामचंद्र परत अयोध्येस आले व त्यां
भरतानें पुनः राज्य अर्पण केलें, त्या वेळ
झालेला अभिषेक. तो अभिषेक होईपर्यंत
कथा प्रस्तुत नाटकांत आहे.

सीतेला रावणानें हरण करून नेल्यानंत
जटायूकडून ती अत्यंत शोककारक वा
रामलक्ष्मणांना समजली. अर्थात् जनस्थानां
यापुढें रहाण्यांत कांहीं तात्पर्य नव्हतें. सीतेच
शोधाकरितां दक्षिणेकडे जाणें भाग झालें आ
त्याप्रमाणें ते दोघेही निघाले. सीतेच
शोधाकरितां ते अनेक मार्गांनीं अनेक स्थळ
शोध करीत होते. या शोधांत त्यांना ए
मोठा लाभ झाला. किष्किंधा नांवाची ए
वानरनगरी होती, या नगरींत वाली नांवाच
वानरांचा राजा राज्य करीत होता. त्याचा
सुग्रीव नांवाचा भाऊ होता. या सुग्रीवाची पत्न
फार सुंदर होती. आणि तिच्या अभिलाषा
वालीनें सुग्रीवास हद्दपार केलें. त्याच्या वांटणी
राज्य हिसकावून घेतलें. तेव्हां तो बिचार
एका पर्वतावर लपून छपून दिवस काढीत
असे. रामचंद्र आपल्या पत्नीचा शोध करीत
असतां सुग्रीवाची भेट झाली. दोघेहीं समदुःखी
असल्यामुळें दोघांची तेव्हांच मैत्री जमली

परस्परांना परस्परांनीं साहाय्य करण्याचीं
वचनें झालीं. पहिलें काम अर्थातच सुग्रीवास
वालीचें राज्य मिळवून देण्याचें होय.
त्याप्रमाणें प्रयत्न करण्याचें ठरलें. रामाचें
धनुःकौशल्य फारच विलक्षण. तेव्हां आपल्या
भावावर तो विजय मिळविणार याबद्दल
सुग्रीवाला शंका राहिली नाहीं. आपल्या
भावाला चिडवून रणांगणावर आणण्याचें
काम सुग्रीवानें आरंभलें आणि तसा उद्घोष
करून त्यास आव्हानही दिलें.

नसतां लव अपराधहि
राज्यांतुनि घालवोनि मज दिधलें ॥
आतां युद्धीं ये तव
सेवक सुग्रीव चुरिल चरण भले ॥

हे सुग्रीवाचे उद्घोषणेचे शब्द वालीच्या कानीं गेले. त्याला ते अर्थात् सहन झाले नाहींत. या गुलामाची खोड मोडून टाकूं दे म्हणून तो तत्काळ उठला आणि सुग्रीवाशीं द्वंद्वयुद्ध करण्याला सिद्ध झाला. सुग्रीवाला कोणातरी आर्यक्षत्रियाचें पाठबळ मिळालें आहे, तेव्हां आपण आतां एकटे त्याच्याशीं युद्ध करण्याला जाऊं नका, असें वालीची पत्नी तारा हिनें त्याला विनविलें. परंतु तो कुठला ऐकायला ! " सुग्रीवाला कोणाचेंही पाठबळ असलें तरी माझ्यापुढें कोणाचें कांहीं चालायचें नाहीं. मी अमृतमंथनाच्या वेळीं सर्पांचा राजा जो शेष त्याला असा जोरानें ओढला कीं त्याच्या डोळ्यांत प्राण आले. तो माझा पराक्रम पाहून सगळे देव आणि दानव अतिशय विस्मित झाले. माझ्यापुढें तो कारटा सुग्रीव करणार काय ? " अशा

बढाया त्यानें मारल्या. तथापि तारेला कांहीं सुरक्षितपणा वाटत नव्हता. तिनें पुनः त्याला युद्धाला जाण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. पण तो कसला ऐकतो ? त्यानें अखेरीस तिला " तूं माझें ऐक. तूं आपली घरांत जाऊन बैस. " अशी आज्ञा केली. मग बिचारीचें काय चालणार ? " ही मी हतभागिनी जातें" असें म्हणून ती अंतःपुरांत गेली.

" बरें झालें ही गेली. आतां त्या सुग्रीवाला भग्नग्रीव करून टाकतों. " असें उद्गारून वालीनें आपल्याकडूनही मोठी उद्घोषणा करून सुग्रीवास लढावयास बोलाविलें. '

"इंद्राचा विष्णूचा
आश्रय तुजला असो कुणाचाहि।
माझ्या दृष्टिसमोरुनि
सजिव कधींही न जासि निजगेहीं॥
तर चल हो सिद्ध युद्धाला."

सुग्रीवानें " ठीक आहे महाराज " असें प्रत्युत्तर दिलें आणि दोघांचें युद्ध जुंपलें. दोघेही पराक्रमी. त्यांत वाली विशेष प्रबळ. त्यानें सुग्रीवास अगदीं जर्जर करून सोडलें. आतां सुग्रीव जगतो अशी आशा नाहींशी झाली. तेव्हां मारुति फारच सचिंत झाला आणि रामाला म्हणतोः—

"रामचंद्रा, हा वाली फार बलवान्. आमचा स्वामी सुग्रीव फार दुर्बल. ही स्थिति आपल्याला दिसतेच आहे. आणखी त्याला साहाय्य करून किष्किंधेचें राज्य व त्याची पत्नीही आमच्या सुग्रीव महाराजांना मिळवून देण्याची आपण शपथ वाहिली आहे, तिचेंही स्मरण करा. ही वेळ आहे."

हनुमानाचे हे शब्द ऐकतांच रामानें त्याला " आतां पहा काय चमत्कार होतो तो. तुला त्याची काळजी नको. " असें आश्वासन देऊन वालीवर नेमका बाण मारला. त्या बाणानें आपलें काम पक्केंच केलें. वाली मृतप्राय होऊन पडला. त्याला मूर्च्छा आली. थोड्या वेळांत तो सावध झाला आणि त्यानें अंगांतील बाण उपसून काढून त्यावरचें नांव वाचलें. तों नांव श्रीरामाचें. तेव्हां रामाला उद्देशून तो म्हणालाः " लोकांना छलापासून मुक्त करण्याचें कंकण बांधलेल्या रामचंद्रा ! तूं मला अशा प्रकारें मारलेंस हें योग्य केलेंस ना ? छे. छे. तुझें रूप सौम्य. तुझी कीर्ति उज्वल. परंतु मला कपटानें मारल्यानें आपल्या कीर्तीची अपकीर्ति मात्र करून घेतलीस. राघवा, तूं तापसाचा वेष धारण केला आहेस, आणखी मी आपल्या भावाशीं युद्ध करीत असतांना मला कपटानें मारलेंस!"

रामानें त्याला उत्तर दिलें, " मृगांना पाशांत गुंतवून घेऊनच मारणें योग्य. तसाच तूं वध्यही आहेस, आणि मृग ( पशु—वानर ) ही आहेस. म्हणून तुला कपटानें मारण्यांत तुला योग्य दंड केला."

**वालीः**— काय मी दंड्य आहें ! तो कसा ?

**रामः**— अगम्यगमनामुळें.

**वालीः**— तो तर आमचा धर्माचार.

**रामः**— तेंच तर चमत्कारिक. तूं वानरांचा अधिपति. धर्म कोणचा, अधर्म कोणचा हें तुला चांगलें समजतें. असें असून तूं भ्रातृजायेचा अपहार केलास.

**वालीः**— या संबंधांत आम्ही दोघेही सारखेच दोषी आहों. पण मला मात्र शिक्षा आणखी त्याला कांहीं नाहीं ?

**रामः**— जो शिक्षेला पात्र, त्याला शिक्षा केली. जो शिक्षेला पात्र नाहीं त्याला शिक्षा कशी करायची ? सुग्रीव लहान, तूं वडील.

वडिलानें असा धाकट्या भावाच्या भार्येचा अभिलाष केला तर तो दंड्य.

**वाली:-** बरें चला, तुझ्या हातून मला शिक्षा झाली तेव्हां आतां मी पापमुक्तच झालों.

आपला भाऊ रामाकडून मारला जाऊन आपल्याला किंष्किधेचें राज्य मिळावें अशी जरी सुग्रीवाची इच्छा होती तरी प्रत्यक्ष भाऊ मारलेला पाहिल्याबरोबर त्याच्या मनांत फार दुःख झालें. व तो मोठ्यानें शोक करूं लागला. परंतु वालीनें त्याचें समाधान केलें, "ही लोकयात्रा अशीच असायची."

वाली मरणोन्मुख होऊन पडला आहे, असें किष्किंधेस राजवाड्यांत कळल्याबरोबर वालीचा पुत्र अंगद त्याच्याकडे आला आणि पित्याची अवस्था पाहून शोक करूं लागला. तेव्हां वालीनें त्याचें समाधान करून सुग्रीवास म्हटलें:—

"सुग्रीवा, आतां तूं वानरांचा राजा झालास. आतां माझ्यावरला सगळा राग सोड. माझे दोष विसरून जा. धर्माप्रमाणें वाग आणि हा आपल्या कुलाचा अंकुर अंगद तुझ्या हातांत देतों याचें रक्षण कर."

सुग्रीवानें त्यास "आपली आज्ञा प्रमाण आहे" असें उत्तर दिलें. नंतर वाली श्रीरामचंद्राकडे वळला आणि त्याला म्हणाला: "या दोघांनाही आपल्या पदरांत टाकतों, यांच्या हातून कांहीं अपराध झाले, तरी त्यांना क्षमा करीत जा." शेवटीं त्यानें सुग्रीवाला पुनः जवळ बोलावलें आणि "हें आपल्या कुलाचें धनसर्वस्व घे." म्हणून आपल्या गळ्यांतली हेममाला काढून त्याच्या गळ्यांत घातली. इतकी सगळी निरवानिरव केल्यानंतर त्यानें एकवार पाणी मागितलें. मारुतीनें तें आणून दिलें. थोड्याच वेळांत वालीची तंद्री स्वर्गलोकाकडे लागली. त्याला गंगायमुना दिसूं लागल्या, देव दिसूं लागले, ऊर्वशी आदिकरून अप्सरा दिसूं लागल्या. नंतर वीरांना स्वर्गांत घेऊन जाण्यासाठीं काळ विमान पाठवितो तें विमानही त्याला दिसूं लागलें. आणि अशा स्थितींतच त्याचें प्राणोत्क्रमण झालें. पुढें त्याचें और्ध्वदेहिक झालें आणि थोड्या अवकाशानें सुग्रीवाला किष्किंधेच्या सिंहासनावर अभिषेक झाला.

सुग्रीव किष्किंधेचा राजा झाल्यानंतर लागलीच त्यानें श्रीरामचंद्राला साहाय्य करण्याच्या उद्योगाला प्रारंभ केला. हा प्रारंभ अर्थातच सीता आहे कोठें याचा शोध आणवावयाचा येथपासून होय. रावणानें सीतेला अमुकच स्थळीं ठेवली आहे असें पक्कें समजल्याखेरीज तिच्या मुक्ततेचा उद्योग कसा होणार? असा विचार करून सुग्रीवानें आपले सगळे प्रजाजन लक्षानुलक्ष वानर एकत्र जमवून त्यांना आज्ञा केली कीं चारही दिशांच्या प्रांतांतून व देशांतून शोध आणण्यासाठीं सर्वांनीं दिशा वांटून घ्याव्या आणि आपापल्या वांट्याला आलेल्या दिग्भागांत सीतेचा अतिशय सूक्ष्मपणानें शोध करावा. त्याप्रमाणें दिशा वांटून घेऊन चार दिशांना चार वानरसेना गेल्या. हनुमान, अंगद वगैरे दक्षिण दिशेला गेले. त्यांना यश आलें. हनुमानानें अतिशय पराक्रम करून सागर ओलांडून लंकेंत पाऊल घातलें. तेव्हां आपलें अर्धें अधिक कार्य झालें असें त्यास व त्याबरोबर दक्षिण दिशेस आलेल्या इतर वानरांस वाटलें.

रावणाची नगरी पाहून आणि तिची श्रीमंती, तिचा थाटमाट, तिची व्यवस्था हीं पाहून मारुति अतोनात विस्मित झाला. परंतु या विस्मयाच्या आधीन फार वेळ न होतां त्यानें सीतेच्या शोधासाठीं सगळी लंका

धुंडाळली. एकसुद्धां कानाकोंपरा ठेवला नाहीं. शेवटीं आतां आपले सगळे श्रम व्यर्थ झाले असे निराशेचे उद्गार काढून त्यानें आणखी शेवटला प्रयत्न करून पहावयाचा असा निश्चय केला. तो प्रयत्न असा कीं, सगळ्यांत उंच अशा शिखरावर जाऊन तेथून सर्व दिशांकडे सूक्ष्म नजरेनें पहावयाचें. त्याप्रमाणें त्यानें केलें. तों रावणाच्या प्रमदवन नांवाच्या एका बागेंत एका स्थळीं राक्षसींनीं वेढलेली अशी एक अत्यंत क्षीण परंतु तेजस्वी अशी आकृति दिसली. आणि ती पहातांच त्याला आशा उत्पन्न झाली. म्हणून तो वनांत शिरून त्या आकृतीपासून जवळच्याच एका अशोकाच्या झाडावर जाऊन बसला. तेव्हां सीतेची मूर्ति त्याला दिसली. ती अत्यंत क्षीण झाली आहे. तिनें एकच वेणी घालून पाठीवर केश तसेच सोडले आहेत. आपल्या पतीच्या चरणीं चित्त देऊन ध्यानस्थ बसली आहे. उपास करून राहिल्यामुळें अत्यंत कृश झाली आहे. अश्रूंनीं तिचें मुख अगदीं मलिन झालें आहे. तिला पहातांच हीच ती सीता असें मनाला पक्कें वाटून तिच्या समोर जाऊन तिला वंदन करून रामाचें कुशल कळवून तिला धीर देण्याचा त्यानें विचार केला, व त्याप्रमाणें तो करणार तों पुढें मशाली लावून कोणी तरी येतें आहे असें त्यानें पाहिलें. तो रावण होता. हा आतां येथें येऊन काय करतो तें पहावें म्हणून मारुति त्याच वृक्षाच्या एका कोटरांत शिरून पहात बसला.

रावण पुढें झाला व 'काय करावें, मी इतकी इची मनधरणी करतों, परंतु ही त्या मनुष्य पतीचा नाद सोडून माझ्याकडे ढुंकून सुद्धां पहात नाहीं,' असें आपल्याशींच उद्गारला. ते उद्गार ऐकतांच मारुतीची खात्री-च झाली कीं हीच जनकतनया रामपत्नी सीता. इतक्यांत रावण सीतेपुढें गेला व "आपल्याला वश हो. त्या दुर्बल मनुष्याचा नाद सोड. तो मेल्यासारखाच आहे." असें अनेक प्रकारांनीं तिला बोलूं लागला. तें ऐकून मारुतीला अतिशय संताप आला. इतका कीं रामाचें रावणवधाचें कार्य आतांच्या आतां आपणच करावें असें त्याच्या मनांत आलें. परंतु लागलीच त्यानें विचार केला. मीं आतां याच्याशीं युद्ध केलें आणि त्यांत रावण मारला मेला, तर ठीक. परंतु मीच मारला गेलों तर रामकार्याची केवढी हानि होईल ?

इकडे रावण आपलीं कामांध भाषणें करून सीतेला आळवीत होता. शेवटीं तो पुढें होऊन तिच्या अंगाला स्पर्श करणार तों तिनें संतापानें त्याला "हं शपथ आहे पुढें येशील तर !" असें म्हटलें. त्याबरोबर त्या पतिव्रतेच्या तेजानें तो दबकला आणि आपल्याशींच उद्गारतो:

"ज्या मीं इंद्रादि देवांना
दानवांसहि जिंकिलें ।
त्या मला पूर्ण दौर्बल्य
सतीशब्दींच आणिलें ॥"

इतक्यांत त्याच्या बंदिजनांनीं त्याला स्नानाची वेळ अतिक्रांत होत चालली आहे म्हणून सुचविलें. तो मोठा दुष्ट परंतु कर्मनिष्ठ होता. यामुळें स्नानाचा विघात होऊं नये म्हणून तेथून चालता झाला. इकडे कर्मधर्मसंयोगानें सीतेवर पहारा करण्याला बसलेल्या राक्षस स्त्रियांनाही झोंप लागली. तेव्हां सीतेची भेट घेऊन तिला रामाचें कुशल कळवायला ही फार चांगली वेळ आहे असें योजून मारुति त्या वृक्षाच्या कोटरांतून खालीं उतरला. आणि सीतेच्या जवळ जाऊन वंदन करून म्हणतो: 'आपल्यावरील प्रेमामुळें ज्याचें चित्त अगदीं विह्वळ झालें आहे आणि आपली अवस्था

काय झाली असेल तेंही ज्याला पूर्ण माहिती आहे अशा रामचंद्रानें मला आपल्या दर्शनाला पाठविलें आहे. ''

हनुमान् असा एकदम तिच्या पुढें उडी टाकून उभा राहिल्याबरोबर प्रथम सीता म्हणाली: '' हा कोण हा ? कोणी तरी राक्षस वानराचं सोंग घेऊन मी आर्यपुत्राकडून आलों आहें म्हणून सांगतो आहे. मी आतां एक अक्षर देखील बोलत नाहीं म्हणजे झालं. ''

मारुति तें पाहून तिला म्हणतो: '' काय, माझा आपल्याला भरंवसा येत नाहीं ? आपण मुळींच शंका घेऊं नका. रामचंद्र आणखी आमचा राजा सुग्रीव या दोघांमध्यें सख्य जुळून मला त्यांनीं आपल्या शोधाकरितां इकडे पाठविलें. माझें नांव हनुमान्. ''

तें ऐकून सीतेला किंचित् धीर आला. आणि तिनें मनांत विचार केला. कोणी का असेना ! आपल्या पतीचें नांव घेतो आहे तर याच्याशीं बोलावेंच. नंतर त्याला म्हणते: '' आर्यपुत्रांकडून काय समाचार आणला आहेस ? ''

मारुतीनें रामाची सगळी हकीकत तिला सांगितली: विरहानें त्याची मानसिक, शारीरिक आणि इतर सर्व स्थिति किती वाईट झाली आहे तें सांगून पुढें त्यानें सीताशोधाकरितां आजपर्यंत काय काय प्रयत्न केले, वालीचा वध कसा केला, सुग्रीवाशीं स्नेह कसा संपादिला; नंतर सुग्रीवानें आपली सगळी वानरसेना दाही दिशांकडे कशी पाठविली; आपल्याला संपाति भेटला, व त्यानें मार्ग सांगितल्यामुळें आपण समुद्र ओलांडून इकडे कसे आलों तें सर्व सांगितलें.

आपल्याकरितां आपल्या पतीला आणि त्याच्या मित्रांना किती त्रास होतो आहे हें पाहून सीतेला अत्यंत खेद झाला. परमेश्वराला आपली करुणा अद्यापि कशी येत नाहीं असा उद्गार काढून ती शोक करूं लागली. तेव्हां मारुतीनें तिला,

खिन्न नको होउं सती
तव पति लंकेस शीघ्र येईल ।
घेउनि वानरसेना
धरुनि धनू रावणासि मारील ॥

अशा शब्दांनीं खूप धीर दिला.

तें ऐकून सीतेला असें वाटलें कीं, आपण स्वप्नांत तर नाहीं ? आणि ती मारुतीला म्हणते, '' खरेंच का येतील आर्यपुत्र आणि मला सोडवतील ? कसचें असें होणार ! ''

ते तिचे निराशेचे उद्गार ऐकून मारुतीला फारच वाईट वाटलें. आपला पति कसा आहे हें या पतिव्रतेला पूर्ण माहिती असून केवळ शोकार्ततेमुळें तिला विश्वास येत नाहीं. तिला जणूं काय देहान्तर प्राप्त झालें आहे अशीच तिची अवस्था झाली आहे. असें आपल्याशींच बोलून तो तिला म्हणाला, '' सीतादेवी, मी आतां जाऊन त्या एकधनुर्धर अशा तुझ्या पतीला येथें घेऊन येतों. तो येथें येऊन रावणाचा वध करून तुझी मुक्तता त्यानें केली म्हणजे तर तुझ्या संशयाचें आणि शोकाचें पूर्ण निरसन होईल ना ? मी आतां जातों. ''

सीतेनें त्याला निरोप देतांना म्हटलें, '' माझी अवस्था कशी झाली आहे तें अशा बेतानें आर्यपुत्राला सांग कीं, त्याच्या मनाला धक्का बसूं नये. ''

**मारुतिः**—आपल्या आज्ञेप्रमाणेंच करीन.

**सीताः**—जा, कार्यसिद्धि उत्तम प्रकारानें होऊं दे.

**मारुतिः**— हा आशीर्वाद म्हणजे अनुग्रहच आहे.

आपण येथें आलों होतों ही बातमी रावणाला पक्की कळायला काय करावें? हाही विचार जातां जातां मारुतीच्या मनांत आला आणि त्यानें मनांत योजना केली कीं, रावणाचें हें आवडतें प्रमदवन, ही अशोकवनिका, हीं सारीं नाचून मोडून तोडून जाळून पोळून उध्वस्त करून टाकतों. यायोगानें आमचें येणें जसें रावणाला समजेल, तसें कशानेंच समजणार नाहीं. वानरांचा सेनापति तो, त्याच्या मनांत असें आल्यावर काय विचारतां? क्षणाचाही विलंब लागला नाहीं. अशोकवनिकेची रावणासाठीं शोकवनिका त्यानें बनविली आणि तेथून तो निघून गेला.

अशोकवनिकेची अशी भयंकर दुर्दशा झालेली रावणाला कळवावी कशी ही तेथला रक्षक जो शंकुकर्ण त्याला मोठी चिंता पडली. रावणाचा जीव त्या वनिकेवर इतका होता कीं, प्रत्यक्ष मंदोदरी–तिला पल्लवभूषणांची फार आवड असतांना त्यांतल्या पल्लवांना हात लावीत नसे. त्या अशोकवनिकेची अशी दुर्दशा झाली असें कळविण्याची छाती होणार कोणाची? परंतु तीं कळविल्याखेरीज तरी कसें रहावें म्हणून तो वनिकारक्षक प्रतीहारीला ही अनिष्ट बातमी रावणाच्या कानीं घाल असें सांगूं लागला. प्रतीहारीला तरी एवढें धैर्य कोठलें? " आपल्यासारखे महाराजांच्या चरणाजवळ नेहमीं असणारे, त्यांची इतकी त्रेधा कां उडावी? " असें तिनें शंकुकर्णाला उलट विचारलें.

शंकुकर्णानें त्याचें उत्तर देण्याचें सोडून उलट तिलाच म्हटलें, " हें काम लांबणीवर टाकण्याचें नव्हे. लवकर जाऊन सांग. "

'बरें तर' असें म्हणून प्रतीहारी गेली परंतु रावणच तितक्यांत तेथें आला. त्याला पाहून शंकुकर्ण म्हणतो: " हा पहा जसा कांहीं सृष्टीचा प्रलय करण्याच्या वेळचा सूर्यच असा संतप्त लंकेश्वर अगदीं धांवतच इकडे येतो आहे. "

रावण जो आला तो " कोणीं आपल्या जीवावर उदार होऊन माझ्या या वनिकेची दुर्दशा करून मला चिडविलें आहे? कोण कोण हा असा स्वताला निर्भय समजणारा? " असें मोठमोठ्यानें विचारीतच आला.

**शंकुकर्णः**— महाराज, कोण जाणे कोणीकडून केव्हां आणि कसा आला तो, पण एक वानर या वनिकेंत शिरून त्यानें संतापानें हिची अशी दुर्दशा केली.

**रावणः**—काय? कोण्या वानरानं हा नाश केला? जा त्याला पकडून आण.

शंकुकर्ण बिचारा गेला. रावण आपल्या गुर्मीतच होता. तो आपल्याशींच म्हणाला "आजकाल सगळ्या त्रिभुवनाला पाचरवून सोडलेला मी, त्या मला उद्वेग आणणारें हें कृत्य देवांनीं जरी केलें असलें तरी अमृत पिणाऱ्या त्यांनासुद्धां आपल्या द्वांडगाईचीं फळें कशी असतात तीं अनुभवायला लावीन."

शंकुकर्ण परत आला आणि त्याला म्हणतो: " महाराज, तो वानर अतिशय बलवान्. त्यानं साल वृक्षाचे बुंधे कमळाच्या देंठासारखे उपटून टाकले. दारुपर्वत तर बुक्क्या मारून छिन्नविच्छिन्न केला. नुसत्या चापट्या मारून लतागृहें जमीनदोस्त केलीं. आणखी नुसत्या भुभुक्कारानें राखणदारांना मूर्च्छित पाडलें. त्याला पकडून आणणं सोपं नाहीं. मोठं थोरलं सैन्यच पाठवलं पाहिजे. आपण आज्ञा द्यावी म्हणजे पाठवतों. "

**रावणः**— जा, हजार सैनिक घेऊन जा.

शंकुकर्णानें पुनः येऊन रावणास सांगितलें:

" महाराज, आपल्या वनिकेंतूलेच महावृक्ष उपटून त्यांच्या तडाक्यानं आपलं सारं सैन्य त्या वानरानं मारून टाकलं. "

त्यावर रावणानें त्याला म्हटलें: "कुमार अक्ष याला माझी आज्ञा सांग कीं त्या वानराला धरून आण. "

परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. कुमार अक्षही वानरानें मारला, पांच सेनापति मारले. शेवटीं इंद्रजितानें त्या वानराला धरल्याचें वर्तमान शंकुकर्णानें येऊन सांगितलें तेव्हां रावणास थोडेंसें समाधान झालें व तो म्हणाला: " इंद्रजितानें त्याला धरलें यांत नवल काय ? "

इतक्यांत रावणाच्या मनांत काय आलें, त्यानें एका सेवकास " बिभीषणाला बोलावून आण " म्हणून सांगितलें. आणि शंकुकर्णाला सांगितलें, "तूं त्या वानराला घेऊन ये." शंकुकर्ण जातांच रावण किंचित् वेळ एकटाच आपल्याशीं विस्मय करीत बसला. देवांना आणखी दैत्यांना जिचें नांव सुद्धां काढण्याला मोठी धास्ती वाटते त्या माझ्या लंकेंत यःकश्चित् एका वानरानें शिरून असा तिचा अपमान करावा काय ? पण कदाचित् असें तर नसेलना ? देवदानवांचा पराभव करून मी शंकराकडे गेलों, तेथें पार्वतीचा व नंदीचा अपमान केला त्यावेळीं त्यांनीं मला शाप दिला त्या शापाचाच तर हा परिणाम नसेल ? वानराच्या रूपानें तो मला भोगावा लागत नसेल कशावरून ? रावणाचे हे विचार चालले असतां बिभीषण तेथें आला. रावणाचें हें परदारापहरणाचें दुष्कृत्य त्याला आवडत नव्हतेंच. त्यानें त्याला अनेक वेळा सांगितलें होतें कीं "तूं रामाची पत्नी रामाला परत दे." परंतु तो कसला ऐकतो ? बिभीषण आतां रावणाकडे आला, तेव्हां तरी त्याला हाच खेद होता कीं, इतक्या वेळां आपण याला चांगला उपदेश केला पण तो ऐकतच नाहीं. सर्वांना शोकमग्न करायचें असाच नेमानेम असावा झालें.

रावणाजवळ जाऊन त्यानें रीतीप्रमाणें " महाराजांचा जयजयकार असो " असें म्हटलें.

रावणानें त्याला जवळ बसण्याची आज्ञा केली. व "तूं असा खिन्न कां दिसतोस ! " म्हणून विचारलें. बिभीषणानें उत्तर दिलें: "महाराज, आपण हिताच्या गोष्टी सांगत असतां स्वामी ऐकत नाहीं असें पाहिलें म्हणजे सेवकजनांना खेद व्हायचाच."

रावण तें ऐकतांच म्हणतो: " तें राहूं दे. तूंही त्या वानराला धरून आणायला आधीं जा पाहूं. "

बिभीषण 'ठीक आहे' म्हणून निघून गेला. आणि राक्षसांनीं धरून आणलेला हनुमान् तेथें आला. खरोखरी त्याला धरून आणला असें नव्हतेंच. एकदां रावण कसा आहे तें आपल्याला पाहण्याला तरी सांपडेल म्हणून त्यानें आपल्याला पकडून घेऊन रावणाच्या समोर आणूं दिलें होतें. रावणाच्या समोर जातांच त्यानें रावणाला "कसें काय महाराज, कुशल आहे ना ? " असें विचारलें.

रावणानें तिकडे दुर्लक्ष्यच केलें. आणि बिभीषणास विचारलें: " या माझ्या वनिकेचा विध्वंस केला तो यानेंच का ? "

बिभीषणानें त्यावर उत्तर दिलें, याच्याहीपेक्षां आणखी कितीक गोष्टी त्यानें केल्या आहेत. "

नंतर रावण मारुतीकडे वळला व त्याला त्यानें 'तूं कोण ? काय ? आमच्या अंतःपुरांत येण्याचें काय म्हणून धाडस केलेंस ?' असें विचारलें.

मारुतीनें उत्तर दिलें, " मी अंजनीच्या पोटीं झालेला वायूचा औरस पुत्र. माझें नांव हनुमान्. मला रघुपति रामचंद्रानें पाठविलें. "

"कशाला पाठविलें?" असा प्रश्न झाल्यावर मारुति म्हणाला: "रामाची आज्ञा ऐक." रामाची आज्ञा हे शब्द ऐकतांच रावण फार चिडला, संतापला व म्हणतो: " काय म्हणतोस रामाची आज्ञा? याला ठार मारून टाकारे ताबडतोब. "

बिभीषण पुन: मध्यें पडून म्हणाला:— "महाराज दूतांनीं कितीही अपराध केला तरी त्यांचा वध करणें अगदीं अशास्त्र. शिवाय रामाचं सांगणं काय तें ऐकून मग काय करायचं तें करा. "

रावण त्यावरून पुन: त्या वानराकडे वळला व म्हणतो: " त्या मनुष्यानें काय निरोप पाठविला आहे ? "

मारुतीनें उत्तर दिलें, " ऐका. 'आश्रयश्रेष्ठ असा जो शंकर त्याच्या संनिध जा किंवा सगळ्यांत अतिशय दुर्गम असें जें रसातळ त्या रसातळांत जा. माझ्या अचूक बाणांनीं तुझें शरीर छिन्नविच्छिन्न करून मी तुला यमसदनाला खचित पाठवितों.' हा त्यांचा निरोप."

तो निरोप ऐकून रावण अति विकटपणें ह ह ह करून हंसला, आणि मोठ्या आढ्यतेनें म्हणतो, " मीं दिव्यास्त्रांनीं सर्व देव जिंकले. सगळे दानव माझ्या आज्ञेंत असतात. पौलस्त्याचा पराभव करून मीं त्याचें पुष्पक विमान हिरावून घेतलें. त्या मला हा राम यःकश्चित् मनुष्य का जिंकायला येणार ! "

**मारुतिः**—असा जर तुझा पराक्रम होता, तर मायावी वेष धरून अतिथि म्हणून रामाच्या घरीं जाऊन सीतेचें हरण कपटानें कां केलेंस ?

**बिभीषणः**— अगदीं योग्य प्रश्न विचारलास. रावणानें भिक्षूचा वेष घेऊन रामाला दूर पाठवून सीतेचें हरण केलें खरें.

**रावणः**— काय तूंही शत्रूचा पक्ष धरून बोलतोस ?

**बिभीषणः**— राजा, प्रसन्न हो. मी सांगतों हें हिताचें आहे. श्रीरामचंद्राची पत्नी परत पाठवून दे. तूं राक्षसश्रेष्ठ, तेव्हां तुझ्या दुष्कृतीनें आपलें कुळ नष्ट व्हावें अशी माझी इच्छा नाहीं.

**रावणः**— बिभीषणा, पुरे, पुरे. तसलें भय बाळगूं नकोस. ज्याची आयाळ लांबलडक आहे अशा सिंहाचा पराभव कोठें हरिणानें केला आहे? अत्यंत प्रमत्त अशा महागजाला कोल्हा कधीं मारूं शकेल काय?

मारुतीनें त्यावर रावणास म्हटलें, " तो राम मोठा वीराग्रणी, प्रतिदेव, त्याच्यासंबंधानें तुला अशीं दुर्वचनं काढायची बुद्धि होते आहे तेव्हां तुझा पुण्याचा सांठा संपला, तुझा काळ भरत आला असंच समज."

**रावणः**— काय? काय म्हणतोस? करारे याला ठार. पण तो दूत आहे, वध्य नाहीं! शंकुकर्णा, याची शेपटी पेटवून याला दे सोडून. पण अरे, थांब जरा. रामाला जाऊन तूं सांग. ' तुझी पत्नी हरण करून मीं तुझा अपमान केला आहे. आपण धनुर्धारी म्हणून तुला कांहीं चाड असली, तर माझ्याबरोबर युद्ध करायला ये.' "

**मारुतिः**— ठीक आहे. लवकरच रामानें पराभूत केल्यावर सर्वतोपरी दुर्दशा पावलेली अशी लंका तुला दिसेल.

**रावणः**— घारे द्या याला घालवून.

राक्षसांनीं मारुतीला तेथून नेल्यानंतर बिभीषण रावणाला म्हणाला, " आपल्या हिताचे दोन शब्द बोलावे अशी इच्छा आहे."

**रावणः**— बोल. श्रेयस्कर अशा गोष्टी ऐकायला मी तयारच आहें.

**बिभीषणः**—राक्षसकुलाचा नाश अगदीं समीप आला असं मला वाटतं.

**रावणः**—कोणच्या कारणामुळें ?

**बिभीषणः**—आपण ओढून आणलेल्या संकटामुळें.

**रावणः**— मीं आणलेलं संकट कोणचं ?

**बिभीषणः**— सीताहरण हेंच तें संकट.

**रावणः**-सीताहरणांत काय दोष झाला ?

**बिभीषणः**— अधर्म आणि—

**रावणः**— आणि शब्द योजला आहेस तेव्हां आणखी कांहीं तरी सांगायचें आहे असें दिसतें.

**बिभीषणः**— तेंच दुसरं कांहीं नाहीं.

**रावणः**— बिभीषणा, लपवालपवी कां करतोस ? बोल काय असेल तें. माझी शपथ आहे बोलला नाहींस तर.

**बिभीषणः**— अभय असेल तर बोलतों.

**रावणः**— अभय आहे. बोल.

**बिभीषणः**— फार जबर भांडणही.

**रावणः**— फार जबर भांडणही ? शत्रूचा पक्ष धरून तूं माझ्याशीं भांडणार ? कोण आहेरे. हा माझा भाऊ वगैरे कांहींएक मनांत न आणतां याला आतांच्या आतां येथून घालवून द्या. हा माझ्या दृष्टीसमोर नको.

**बिभीषणः**— प्रसन्न व्हा. प्रसन्न व्हा महाराज. मीच जातों. आपली आज्ञा म्हणून जातों. त्यांत माझा दोष नाहीं. आतां राग लोभ सोडून आपण वाटेल तें करा. मी तर

ज्याचे नेत्र विशाल पद्मसम कीं
सत्यान्विता वैखरी
ज्यानें रावण मारितों म्हणुनियां
केली प्रतिज्ञा खरी ।
जो देतो शरणागतां अभयता
हे कीर्ति ज्याची निता
त्या लोकैकधनुर्धरा शरण मी
जातों कुलाच्या हिता ॥

इतकें स्पष्टपणें बोलून बिभीषण तेथून निघून गेला.

रावणास त्याच्या जाण्यानें अर्थातच वाईट वाटलें. परंतु आतां लंकेचें रक्षण करणें आपल्यावर येऊन पडलें हें जाणून तो त्या तयारीला गेला.

इकडे मारुति सीतेची वार्ता घेऊन परत आल्यानंतर सुग्रीवादिकांनीं लागलीच लंकेवर स्वारी करण्याचें ठरविलें. आणि त्या हेतूनें त्यांनीं आपली वानरसेना एकत्र जमविण्याचे हुकूम सोडले. त्याप्रमाणें वानरसेना जमली आणि मंडळी समुद्रतीरावर येऊन थडकली. इतक्यांत रावणाशीं भांडून बिभीषण रामाकडे येण्यास निघाला होता तोही तेथें येऊन पोंचला. आपण रावणाचे बंधु आणि आपण होऊन रामाकडे आलों आहोंत तेव्हां राम आपल्याला काय म्हणेल? आपल्याबद्दल संशय घेईल कीं काय ? असें त्याला वाटलें. परंतु लागलीच त्यानेंच आपल्या शंकेचें निरसन केलें. रामाला धर्मार्थतत्त्व चांगलें समजतें. शरणागताचा तो आश्रयदाता. तेव्हां ज्या माझ्या मनांत कांहीं सुद्धां पाप नाहीं त्यानें श्रीरामाबद्दल शंका तरी कां घ्यावी ?

असें म्हणून तो रामाच्या वानरसैन्याचा तळ पडला होता तेथें आला, आणि आतां आपण आल्याचा निरोप पाठवावा अशा विचारांत तो होता इतक्यांत मारुतीची दृष्टि सहज त्याच्याकडे गेली. आणि त्यानें "बिभीषणराज, आपण इकडे कसे आलां ? " असा प्रश्न केला.

बिभीषणानेंही त्याच्याकडे पाहिलें व त्याला म्हटलें, "मारुते, मी आपल्या आश्रयाला आलों आहें असें श्रीरामचंद्रास निवेदन कर. "

हनुमानानें लागलीच रामाला म्हटलें, "महाराज, रावणानें विनाकारण ज्याला हद्दपार केलें तो हा बिभीषण आपल्या आश्रयाकरितां आला आहे. "

**रामः**— काय बिभीषण शरण आला आहे ? वत्सा लक्ष्मणा, त्याला मोठ्या सन्मानानें इकडे घेऊन ये.

लक्ष्मण तसें करण्यासाठीं गेला. तेव्हां सुग्रीव रामास म्हणतो, "महाराज, बिभीषणाला आपण सन्मानपूर्वक आणण्याला पाठविलें खरें, परंतु राक्षस हे मोठे मायावी असतात. कोणच्या वेषानें कसे येतील, काय कपट करतील, आणि केव्हां कसा घात करतील, याचा नेम नाहीं. या सगळ्याचा नीट विचार करून बिभीषणाचा अंगीकार करावा. "

मारुतीनें तें ऐकून एकदम म्हटलें:" महाराज, असें म्हणूं नका. देव रामचंद्राच्या चरणीं जशी आपली भक्ति आहे, तशीच बिभीषणाचीही आहे. त्याला आपला पक्ष घेऊन प्रत्यक्ष आपल्या बंधूशीं ( रावणाशीं ) भांडतांना मीं पाहिलें आहे. "

**रामः**— असें जर आहे तर त्याचा सत्कार करून त्याला इकडे घेऊन ये.

थोड्याच वेळांत बिभीषणाला लक्ष्मण व हनुमान् दोघे घेऊन आले. बिभीषणानें पुढें होऊन रामाला वंदन केलें. रामानेंही त्याला 'कुशल आहेस ना ? ' असा प्रश्न विचारला.

**बिभीषणः**— होय, आज कुशल झालों खरा. शरणागतांना अभय देणारा, कमलाक्ष असा जो तूं भगवान् त्या तुझ्या दर्शनानं माझं सगळं पाप नष्ट झालं. तेव्हां आतां मी पूर्णपणें कुशलयुक्तच झालों.

**रामः**— माझ्या वचनानें आजपासून तूं लंकेचा स्वामी हो.

**बिभीषणः**—आपला हा अनुग्रहच आहे.

**रामः**— बिभीषणा, तुझ्या येण्यानें आमचें कार्य सिद्ध झालेंच म्हणायचें. पण समुद्र तरून कसें जावें याला उपाय सुचत नाहीं.

**बिभीषणः**—देव, त्यांत काय सुचायचें आहे ? समुद्र मार्ग देणार नाहीं तर दिव्यास्त्राची योजना करा.

**रामः**—ठीक. बिभीषणा ठीक. आतां, असंच करतों.

इतकें बोलून श्रीराम संतापानें उठले. परंतु वरुणानें तितकी पाळी येऊं दिली नाहीं. आपण होऊन पुढें येऊन मार्ग दाखवून दिला. आणि आपण पुनरपि अंतर्धान पावला. वरुणानें दाखविलेल्या मार्गानें प्रथम हनुमान् पुढें झाला. मागून रामसुग्रीवादि मंडळी आणि त्यांच्या मागोमाग ती प्रचंड वानरसेना चाललेली. दुतर्फा विस्तीर्ण असा समुद्र पसरलेला असून मधून ती मंडळी लंकेकडे जात असतां समुद्राची विचित्रता पाहून त्यांना फार कौतुक वाटलें. राम तरी सुग्रीवाला म्हणाला, "महाराज सुग्रीव, हनुमान्, पहा पहा ही या सागराची विचित्रता ! कुठें खूप फेंस

उसळतो आहे तर कुठें अगणित मासे खेळताहेत; कुठें शंखांनीं भरला आहे तर कुठें जलानें डबडबलेल्या मेघाप्रमाणें त्याच्या जलांचा वर्ण झाला आहे; कुठें असंख्य लाटा उठताहेत, तर कुठें भयंकर मगरी सैरावैरा धांवताहेत; कुठें प्रचंड असा भोंवरा झाला आहे तर कुठें पाणी अगदीं स्तब्ध झालें आहे. ”

तो सर्व चमत्कार पहात पहात मंडळी लंकेंत येऊन पोंचली. हनुमानानें “ हीच लंका ” असा उद्गार काढला. रामानें त्या नगरीच्या देखाव्याकडे पाहिलें आणि खिन्न होऊन आपल्याशींच म्हटलें: “ अहो या राक्षसनगरीचें ऐश्वर्य लवकरच नष्ट होणार ना ? रावणरूप मूर्ख नावाड्याच्या हातीं सांपडल्यामुळें या लंकारूप नौकेचे माझ्या शरवर्षावानें आणि वानरांच्या सैन्याच्या तडाक्यांनीं तुकडे तुकडे होणार ना ? असो. सुग्रीवा, या सुवेल पर्वतावर सैन्याचा तळ दे. ”

सुग्रीवानें त्याप्रमाणें लागलींच नीलाला आज्ञा केली. नीलानें त्याप्रमाणें तजवीज चालविली असतां त्याला दोघे कोणाच्या ओळखीचे नाहींत असें वानर सांपडले. ते त्यानें रामापुढें आणून उभे केले. त्यांना तुम्ही कुठले म्हणून प्रश्न विचारतांच त्यांनीं आम्ही कुमुद नामक वानराधिपाचे सेवक म्हणून उत्तर दिलें. परंतु बिभीषणानें त्यांना न्याहाळून पहातांच त्याला ते शुक आणि सारण नांवाचे राक्षस आहेत असें तेव्हांच दिसलें. हे आपले सैनिक नाहींत आणि वानरांपैकींही नाहींत, हे रावणानें आपले गुप्त दूत म्हणून पाठविलेले आहेत असें बिभीषणाच्या मनांत येऊन त्यांना तो ओळखतो तों त्या दोघांनींही ओळखलें कीं बिभीषणानें आपल्याला ओळखलें. तेव्हां त्यांनीं दुसराच बहाणा केला. ते म्हणाले: “ महाराज, आम्ही राक्षस खरे, पण राक्षसराजाच्या दुराग्रहीपणामुळें राक्षसकुलावर संकट आलें आहे तें पाहून आपल्या आश्रयाकरितां वानररूप घेऊन आलों आहों. ”

रामानें तें ऐकून बिभीषणाकडे वळून म्हटलें “ मित्रा बिभीषणा, तुझें कसें काय म्हणणें आहे ? ”

बिभीषणानें तत्काळ उत्तर दिलें, “ महाराज, हे रावणाचे फार विश्वासांतले मंत्री, यांच्यावर प्राणांतिक संकट आलें तरीसुद्धां हे त्याला कधीं सोडणार नाहींत. तेव्हां आपण यांना यथायोग्य शिक्षा करण्याबद्दल आज्ञा करावी. ”

**रामः**— बिभीषणा, छे, छे, असं म्हणूं नकोस. यांना शासन केल्यापासून मला कांहीं विशेष यश मिळणार आहे असं नाहीं. किंवा रावणाला कांहीं कमीपणा येणार आहे असंही नाहीं. तेव्हां यांना सोडून दे झालं.

**लक्ष्मणः**— महाराज, यांना सोडायचंच असेल, तर एकवार सगळ्या छावणींत हिंडवा, फिरवा, यांना काय कुठें आहे तें नीट परीक्षा करून पाहूं द्या आणखी मग सोडा.

**रामः**— लक्ष्मण म्हणतो तें बरोबर आहे. नील, तसं कर; किंवा असें नको. इकडे यारे. राक्षसेंद्राला माझा निरोप म्हणून सांगा: ‘ माझ्या पत्नीचा अपहार करून तूं भांडण उकरून काढलेंस आणि मी रणातिथि होऊन तुला भेटण्याला आलों असून अजून तुझें दर्शन नाहीं हें कसें ? ’

त्या दोघांना असें झालें होतें कीं, आपण येथून निसटतों कसे ! तो निरोप ऐकतांच त्यांनीं ठीक आहे म्हणून पाय काढला.

राम बिभीषणाला घेऊन आपल्या सैन्याची अंतर्व्यवस्था पहाण्यासाठीं गेला.

चार दिवस गेले. युद्धाला आरंभ झाला. रामचंद्रानें राक्षसांकडले प्रहस्तादि वीर, कुंभकर्ण इत्यादि मारले. शेवटीं इंद्रजित् रणांगणावर आला. तथापि रावणाचे डोळे उघडत नाहींत, त्याचा मद उतरत नाहीं, याबद्दल राजवाड्यांतल्या चाकरांनोकरांपासून प्रत्येकाला खेद उत्पन्न झाला. इतकी स्थिति झाली तरी रावण निराळ्याच कल्पना योजण्यांत गर्क होता. विद्युज्जिव्ह नांवाचा एक त्याचा पुतळे करणारा फार कुशल कारागीर शिल्पी होता. त्याला त्यानें राम आणि लक्ष्मण या दोघांच्या शिरांच्या हुबेहूब प्रतिमा करण्यास आज्ञा केली. आणि आपण सीतेशीं बोलत आहोंत तेथें तीं शिरें रणांगणांत इंद्रजितानें आतांच दोघांना वधून तीं तोडलीं म्हणून आपल्यास दाखविण्याला आणावीं असा जम बसवून ठेवला.

इकडे सीता बिचारी अत्यत शोकविव्हल होऊन बसली होती. आपला पति लंकेंत येऊन पोंचला आहे, परंतु आतां पुढें काय ? चिन्हें तर अनिष्ट होताहेत. परमेश्वर केव्हां सुटका करील ती करो, असें आपल्या मनाशींच म्हणत बसली होती. इतक्यांत रावण तेथें आला. तो निराळ्याच तंद्रींत होता. त्याला असा भास झाला होता कीं, लंका नगरी नारीरूप धारण करून आतां रामाकडे चालली आहे. तेव्हां त्या लंकेला उद्देशूनच तो बोलत होता, " तूं जाऊं नकोस. मला सोडून कोठें चाललीस ? पौलस्त्यापासून तुला जिंकून घेतली ती उगीच का ? मला सोडून जायला ? उभी रहा. उभी रहा. जाऊं नकोस. काय म्हणतेस ? रामाकडे जातें ? वैश्रवणाच्या घरांतून तुला बलात्कारानें ओढून आणली. आतां रामाला ठार मारून बलात्कारानेंच तुला आणीन. पण हिच्याशीं काय करायचं आहे ? सीतेला मोह घालूं म्हणजे झालं. "

सीतेला पहातां क्षणींच त्याला वाटलें, काय हा या कुसुमबाण मदनाचा पराक्रम !

सीतेचें मुख पाहुनी विसरले
मन्नेत्र निद्रा खरी
सीतालिंगनिं मात्र हेत धरुनी
झाली तनू पांढरी ।
पाहोनी रमणीय वस्तु चढतो
संताप चित्तांतरीं
जिंकीं मी भुवनत्रयास, मजला
पुष्पेषु जिंकी परी ॥

असें गुणगुणत तो सीतेजवळ आला व म्हणतो, " कमलाक्षि सीते, त्या मनुष्याच्या ठिकाणीं चित्त ठेवून कसली बसली आहेस ? आज पहा रणांगणांत त्या तुझ्या प्रियकराचें व त्याच्या भावाचें निर्दलन करून टाकतों."

**सीता**:– मूर्खा रावणा, कसल्या बढाया मारतो आहेस ? मंदर पर्वत हातावर धरावच्या गोष्टी बोलतोस कसल्या ?

इतक्यांत एक राक्षस रामाचें व लक्ष्मणाचें अशीं दोन शिरें घेऊन आला व म्हणतो:–

तुमचें प्रिय साधाया
इंद्रजितें बहु करोनि कहर रणीं ।
मारुनि त्या मनुजांतें
पाठविलीं हीं शिरेंहि तव चरणीं ॥

वेळींच शिरें आलेलीं पाहून रावण फारच आनंदला व सीतेला म्हणतो, " सीते, पहा पहा हीं त्या माणसांचीं शिरें. आतां तर कांहीं शंका नाहीं ?"

सीता तें पहातांच मूर्च्छा येऊन पडली. तथापि हा दुष्ट तिला म्हणतो:

" त्या मनुजाच्या ठायीं
कसली प्रीति धरूनि बससी गे ।
ये मम वक्षःस्थलिं ये
श्रीही तत्क्षणिं तुझ्या करीं लागे ॥

सीता लागलीच शुद्धीवर आली व शोक करूं लागली: "मी केवढी अभागिनी मला या अशा दुःखसागरांत लोटून आर्य पुत्रा कोणीकडे हो गेलां? आणखी मी क जगलें? पण हें सारं याचं कपट नसेल ना अहो, ज्या खड्गानं माझ्या आर्यपुत्रांच असा वध केला त्यानं माझाही वध करा."

रावण आवेशानें तिला म्हणाला:—

"इंद्रजितें बंधूसह
मारियलें ज्या नराधमा त्याला।
मारिसि हांका उगि कां!
सोडविण्या कोण येइ गे तुजला!॥"

रावणाच्या तोंडून हा प्रश्न बाहेर पडतो न पडतो तों "राम! राम!" असें जणूं काय त्याला उत्तरच आलें! त्याबरोबर सीतेच्या तोंडून 'चिरंजीव!' असा आनंदोद्गार निघाला. तितक्यांत एक बावरलेला राक्षसही राम राम असें ओरडत आंत आला. रावणानें त्रासून त्याला ह्मटलें "राम राम ह्मणून शंख करीत कां आलास?"

**राक्षसः**— महाराज, प्रसन्न व्हा. प्रसन्न व्हा. भयंकर दुःखाची वार्ता सांगण्याची त्वरा झाल्याकारणानें मी कुठें आहें कोणापुढें आहें याचें भान राहिलें नाहीं.

**रावणः**—बोल. बोल, त्या रामाचं काय?

**राक्षसः**— महाराज, मी अभागी काय सांगूं. त्यानें आपल्या प्रिय सुताचा आतांच वध केला.

रावणाला तें खरें कोठलें वाटायला? तो एकदम त्या राक्षसाच्या अंगावर जाऊन ह्मणतो, "भ्याडा, रणांगणांतून पळून येऊन मला कांहीं तरी भलतंच सांगतोस?

इंद्रादि देव जिंकी
पळवुनि लावी रणांत दैत्यांसी।
त्या इंद्रजिता वधिलें
क्षुद्र मनुष्यीं असें कसें कथिसी?॥"

**राक्षसः**— महाराज क्षमा करा. कुमार इंद्रजिताच्यासंबंधानें मी खोटें कसें कांहीं सांगेन!

रावण "हा वत्सा मेघनादा!" असें ह्मणून मूर्च्छित पडला. राक्षसानें त्याला शुद्धीवर आणलें. मग तर तो फारच शोक करूं लागला. इंद्रजिताच्या ठिकाणीं त्याचें प्रेमच तसें होतें. असा शोक चालला असतां आणखीही भयंकर बातम्या रणांगणांतून आल्या. त्यांवरून इंद्रजिताच्या वधाबद्दल रावणाची खात्री झालीच. इतक्यांत राम आपला शोध करीत चाल करून येतो आहे अशी बातमी त्याच्या कानीं पडली. तेव्हां आतां आपल्या खड्गाच्या फट्कार्‍यानें त्याला मारून टाकतों अशी बढाई मारून तो निघाला. जातां जातां सीतेकडे त्याची नजर गेली. आणि एकदम त्याच्या मनांत दुष्ट विचार आला कीं जिच्या योगानें माझ्या बंधूंचा व बांधवांचा घात झाला, आपल्या सर्वस्वाचा नाश झाला, तिला ठार मारून टाकावें. परंतु स्त्रीवध करणें अत्यंत अनुचित असें राक्षसानें सुचविल्यामुळें तो तिला उद्देशून एवढेंच ह्मणाला कीं, माझ्या बाणांनीं ठार झालेला राम तुला आतां लवकरच दिसेल.

सीता बिचारी मुकाट्यानें शोक करीत राहिली.

रावणाची व रामाची आणि रावणसेनेची व रामसेनेची गांठ पडल्यानंतर काय विचारतां! भयंकर युद्धाला सुरुवात झाली. राक्षससेनेकडून वानरांवर बाणांची व वानरसेनेकडून राक्षसांवर दगडांची वृष्टीवर वृष्टि होऊं लागली. हजारों वानर व हजारों राक्षस मरून त्यांच्या प्रेतांचा नुसता खच पडला. रामाचें व रावणाचें युद्ध झालें. त्यांत शेवटीं रावण पडला. देवदानवांना—ज्यांना ज्यांना म्हणून रावणापासून थोडाबहुत तरी त्रास

ग्रं. क्र. ९६२७



पोंचला होता त्या सर्वांना फार आनंद झाला. रामानें रणांत आपल्या बाणांच्या सपाट्यानें रावणास मारलें, सद्बुद्धीनें आपल्या साहाय्य करण्यास आलेल्या बिभीषणाला लंकाधीश केलें, आपली प्रतिज्ञा पूर्ण केली. आतां सीतेचें समाधान करण्याला जावें असें रामाच्या मनांत आलें. परंतु ती सीता आपल्याकडेच येत आहे असें लक्ष्मणानें कळविल्याबरोबर त्याच्या मनांत निराळाच विचार आला. शत्रूच्या घरांत इतके दिवस राहिलेल्या तिला एकदम भेटण्याला मला धैर्य होत नाहीं असें लक्ष्मणाला त्यानें सांगितलें. तेव्हां लक्ष्मण मुकाट्यानें गेला. परंतु बिभीषणानें पुनः त्याला म्हटलें: " रामा, ही तुझी धर्मपत्नी, तुझ्या बाहुबलामुळें आज तिचें दुःख नाहींसें झालें आहे, तर तूं हिचा स्वीकार कर. "

परंतु रामानें त्याचें निवारण केलें. त्याला म्हटलें: " तिचा राक्षसानें अपहार केल्यामुळें ती मलिन झाली आहे, तिच्यामुळें इक्ष्वाकुकुलाला कालिमा लागला, तिनें माझ्या दर्शनाला येऊं नये. इकडे पहा, तूं या कामीं मला जास्त त्रास देऊं नकोस.

करण्या अकार्य उद्यत
झाला त्याचें करी निवारण जो।
मित्र म्हणावें त्यातें,
नांव रिपू हें दुज्यास नित साजो ॥"

राम बिभीषणास असें बोलतो आहे तों लक्ष्मण पुनः परत येऊन रामास म्हणाला: " आर्यांचा जयजयकार असो. महाराजांचा हेतु मनांत समजून सीता देवी अग्निप्रवेश करण्यास सिद्ध झाली आहे. "

**रामः**– लक्ष्मणा, ती पतिव्रता आहे, तिच्या छंदानेंच वाग. तिला तयारी करून दे.

तें ऐकतांच लक्ष्मणाला फार वाईट वाटलें. तो आपल्याशींच म्हणाला,

साकी.

देवी सीता पूर्ण शुद्ध परि रामाज्ञा हे ऐशी।
प्रेमें धर्में आकर्षिलि मति झोंकें खाते कैशी॥

रामाच्या आज्ञेप्रमाणें करण्यास लक्ष्मणाला धैर्य होईना, तेव्हां तो मारुतीला म्हणतो, " हनुमंता, तुला शक्ति असली तर ही आज्ञा परिपालन कर. "

**हनूमान्ः**– आपला काय तर्क आहे ?

**लक्ष्मणः**– अरे बाबा आमचा तर्क उपयोगी काय ? आपण आज्ञेचे सेवक. चल जाऊं.

असें म्हणून दोघेही गेले. परंतु लक्ष्मण लागलींच म्हणतो " प्रसन्न व्हा महाराज, आश्चर्य, अत्यंत आश्चर्य ! ही पहा देवी सीता कमलमालेप्रमाणें नाजूक परंतु जीविताची आशा सोडून केवळ एखादी हंसी पद्मवनांत मजेनें शिरते तशी अग्नींत प्रवेश करते आहे. आपण आज इतकीं वर्षें केलेले श्रम व्यर्थ जाणार."

तें ऐकतांच रामाला अर्थातच फार वाईट वाटलें व तो लक्ष्मणास म्हणाला, " जा. जा. तिला परत फिरव. तिचें निवारण कर.'

जशी आपली आज्ञा, असें म्हणून लक्ष्मण जाणार तों मारुति आला आणि म्हणतो:

साकी.

सुवर्णमालेसमान जीची कांती पावकतप्ता।
विकृत न होतां अधिक वाढली ती ही देवी सीता॥

**रामः**– ( आश्चर्यानें ) काय ? काय ?

**लक्ष्मणः**– अहो आश्चर्य !

**सुग्रीवः**– महाराज, हा जनककन्येला अग्नींतून जिवंत बाहेर काढून इकडे घेऊन कोण येतो आहे ?

**लक्ष्मणः**— अहो हा तर प्रत्यक्ष अग्निनारायण आर्येला घेऊन येतो आहे!

**रामः**—खरेंच, हा अग्निनारायणच. याला आपण उत्थापन देऊन सामोरे जाऊं.

त्याप्रमाणें सर्व मंडळी सामोरी गेली व सीतेला घेऊन अग्नि तेथें आला व राम त्याला नमस्कार करीत असतां त्याचें निवारण करून म्हणाला:

साकी.

" सकल जनांनीं नमस्कृता
ही सीता स्वीकारावी ।
अपाप अक्षत शुद्ध हिची मीं
कीर्ती काय वदावी ॥ "

त्यावर राम अग्नीस म्हणाला:

" जनककन्यका परम विशुद्धा
ठाउक होतें मजला ।
परी जनांला प्रत्यय यावा
त्रास दिला हा तिजला ॥ "

याप्रमाणें सर्वांची खात्री झाल्यानंतर रामचंद्रानें सीतेचा अंगीकार केला. सर्व यक्षगंधर्व—किन्नर—सुरगणांना आनंद झाला व ते रामाच्या स्तुतिपर गीतें गाऊं लागले. शेवटीं तर सर्वांनीं आपल्यास येथेंच अभिषेक करतों म्हणून आग्रह धरिला. तेव्हां राम आणि सीता यांना उत्तम प्रकारें अभिषेक झाला. प्रत्यक्ष अग्नीनें पुढाकार घेतल्यावर काय होणार नाहीं.

इतक्यांत भरतशत्रुघ्नादि मंडळीही तेथें आली. सर्वांस अत्यंत आनंद झाला, शेवटीं अग्नीनें आशीर्वाद दिल्यावर भरतवाक्य झालें.

हें नाटक सहा अंकी आहे. अंकशः सारांश येणेंप्रमाणें: —

**पहिल्यांतः**— वालीचा वध आणि सुग्रीवाचा अभिषेक.

**दुसऱ्यांतः**— सीताशुद्धीसाठीं मारुति लंकेस जाऊन सीतेची भेट घेतो.

**तिसऱ्यांतः**— बिभीषणाचा रावणास उपदेश, तो त्यानें न ऐकल्यामुळें त्याचा लंकात्याग.

**चवथ्यांतः**—राम लंकेवर स्वारी करितो.

**पांचव्यांतः**— रावण सीतेला फसविण्याचा प्रयत्न करीत असतां इंद्रजित् मारला गेल्याचें वर्तमान येतें व रावण रामाला मारण्याची बढाई मारून रणांगणीं जातो.

**सहाव्यांतः**— सीतेची अग्निशुद्धि व रामास अभिषेक वगैरे.

... ग्रं. क्र. ... मुंबई शाखा

# बालचरित.

## मंगलाचरण.

शंखा दुग्धासम वपु कृतयुगिं
नारायण ज्या म्हणतीं
त्रिपदें त्रिभुवन व्यापी
विष्णू सुवर्णकांती त्रेतीं ।
दूर्वाश्यामलवर्ण द्वापारिं
राम रावणा मारी
कज्जलकांती दामोदर नित
कलियुगिं तव कैवारी ॥

हें या नाटकाचें मंगल. या नाटकांत कृष्णाच्या जन्मापासून तों कंसवधापर्यंत कथा आलेली आहे. कृष्णजन्माची वेळ झाली; हें त्रिकालज्ञ नारदाला पूर्ण माहिती, तेव्हां नव्या अवताराच्या प्रारंभकालींच आपण श्रीविष्णूचें दर्शन घ्यावें म्हणून नारद अंतरिक्षांतून खालीं आला होता. येतां येतां आपल्याशींच तो पुटपुटत होताः

" ब्रह्मपदाहुनि निघुनी
गगनीं हिंडत महीस आलों कीं ।
कलहप्रिय मी नारद
विश्रुतकीर्ती असे तिन्ही लोकीं ॥
" देवां दैत्यांचीं तीं
युद्धें सारीं समाप्त होऊन ।
झालें जिकडे तिकडे
शांत अशा अंतरिक्षिं करमे न ॥
" वेदाध्ययनामधुनी
उरतो अवकाश त्यांत मी. सतत ।
वाजवितों वीणा वा
वाढवितों वैर विश्वि विख्यात ॥

" कंसाचा वध करण्यासाठीं श्रीविष्णूंनीं देवकीच्या उदरीं जन्म घेतला हें एक कलहाला चांगलेंच मूळ झालें. तेव्हां आतां त्या श्रीविष्णूचें दर्शन घ्यावें म्हणून इथें आलों. धन्य धन्य मी. ही पहा बालरूप धारण करणाऱ्या त्रिलोकेश्वराला घेऊन देवकी वसुदेवाबरोबर हळूच घराच्या बाहेर पडते आहे. हा भगवान् नारायण किती प्रभाववान्. परंतु हिनें त्याला आपल्या हातावर धरून चालविलें आहे. त्याला नमस्कार केला, प्रदक्षिणा घातली, आपलें काम झालें. आतां जावें. "

नारदानें वर्णन केल्याप्रमाणें देवकी आपल्या नवप्रसूत पुत्राला आपल्या पतीच्याजवळ देण्यासाठींच खरोखरी चालली होती. तिच्या मनांत विचार चालला होताः " हा माझा पुत्र मोठा महात्मा आहे असें दाखविणारीं सगळीं चिन्हें प्रत्यक्ष दिसताहेत, तेव्हां त्याला भय नसावें. परंतु त्या मेल्या कंसानें आजपर्यंत जो दुष्टपणा केला तो मनांत उभा राहून मला कसला सुद्धां विश्वास येत नाहीं. बरं पण आर्यपुत्र कां अजून येईनात ? वा, हे पहा आले. आनंदानं यांचं मुख किती प्रफुल्लित झालं आहे ! "

वसुदेव आला तो आश्चर्य करीतच आला. कीं या ठिकाणीं आज प्रत्यक्ष श्रीविष्णु सर्व असुरांचा हंता लोकरक्षणाकरितां जन्माला आला, आणि आकाशांत विजा चमकताहेत, भयंकर वाऱ्यांच्या सोसाट्यांनीं फोडल्या जाणाऱ्या नवमेघांच्या गडगडण्यानें सर्व पृथ्वी दणाणते आहे हें काय ?

इतक्यांत त्याची देवकीकडे दृष्टि गेली. आणि तो ह्मणतोः "ही पहा देवकी, आजपर्यंत

कंसानें हिचे सहा पुत्र मारले तेव्हां आतां हा सातवा तरी रक्षण करावा म्हणून श्रमांकडे न पहातां इकडे येते आहे. याच्या जन्मकाळीं विलक्षण चिन्हें होताहेत यामुळें या पोराला जतन करण्याबद्दल ती अधिकच काळजी वहाते आहे. हा सातवा मुलगा नव्हे प्रत्यक्ष कंसाचा मृत्युच ती हातावर धरून आणते आहे."

दोघांची भेट होतांच देवकी वसुदेवाला म्हणाली:" आर्यपुत्रा, आपला जय असो."

**वसुदेवः**— देवकि, अर्धी रात्र उलटून गेली आहे. सगळ्या मथुरा नगरींत मंडळी अगदीं गाढ निजली आहे. तेव्हां कोणी पहायला नाहीं तोंपर्यंत या मुलाला घेऊन मला जाऊं दे.

**देवकीः**— आपण याला कुठें नेणार ?

**वसुदेवः**— बरं विचारलंस. माझाही अजून निश्चय झाला नाहीं. परंतु या दुरात्म्या कंसाचें राज्य सर्व पृथ्वीभर पसरलें आहे. तेव्हां याला न्यावं तरी कुठें हा प्रश्नच आहे. पण जाऊं दे इथून, दैव वाट दाखवील तिकडे तिकडे बालकाला घेऊन जाईन.

**देवकीः**— आर्यपुत्रा, याची दृष्ट काढावी असं मनांत आहे.

परंतु तसें हिला करूं दिलें तर वेळ निघून जाईल म्हणून त्यानें तिला म्हटलें, " अगे अति पुत्रवत्सले, दृष्ट कसली काढतेस ? राहूच्या मुखांत पडलेल्या चंद्राप्रमाणें याची स्थिति आहे. तूं याची दृष्ट काढण्यांत वेळ घालविलास कीं कंस आयताच येऊन त्याचा घात करील."

**देवकीः**— असं कधींच व्हायचं नाहीं.

**वसुदेवः**— सर्व देवांची अशीच कृपा होवो.

इतकें बोलणें झाल्यावर देवकीनें 'घ्या तर मग याला' असें म्हणून तो बालक वसुदेवा-पुढें केला व श्रीवसुदेवानें तो घेतला. त्याला तो बराच जड वाटला. तेव्हां सहजच त्यानें उद्गार काढले:— " विन्ध्यमंदरादि पर्वतांचें जणूं काय सार असा हा कमलाक्ष बाल हिनें इतका काळ गर्भांत धारण केला? अहो काय ही स्त्रियांची सहनशीलता!" नंतर त्यानें तिला परतण्यास सांगितलें.

**देवकीः**— जातें बिचारी अभागिनी. काय करणार !

ती जाऊं लागली खरी, परंतु तिचें चित्त सगळें त्या मुलाकडे. तें पाहून वसुदेव म्हणतो:

" हृदयें बालकापाशीं
शरीरें जातसे गृहीं ।
चंद्रलेखा द्विधा जेवीं
नभीं आणि जलांतहीं ॥

गेली. आतां आपणही आपला मार्ग काढावा." असें म्हणून नगरद्वारांतून तो मथुरानगरीच्या बाहेर पडला. त्यावेळीं अंधकार मी म्हणत होता.

तम अंगा लेपाचि दे
नभ वर्षी काजळास हें काय !।
दुर्जनसेवा जैशी
तैशी दृष्टीहि निष्फला होय ॥

अशी स्थिति झाली होती. त्याला प्रत्येक पाऊल पुढें टाकायचें अवघड जाऊं लागलें. आतां पुढें जाणें शक्य नाहीं असें त्याला वाटलें. तो थबकला. इतक्यांत कोठून तरी उजेड आल्याचा त्याला भास झाला. अर्थात् कंसाला आपला सुगावा लागून तो आपल्या मागोमाग आला असें त्याला वाटलें, त्वेष आला.' बरं आहे पाहून घेतों' असें म्हणून त्यानें एकदम आपला खड्ग उपसला. परंतु

तो कोठला. दुसरीकडला दीपप्रकाश नसून त्याच्या हातावर असलेल्या बालकाची अंगप्रभाच होती. त्याला अंधकारामुळें मार्ग सांपडेना तो दाखविण्यासाठीं त्या बालकानेंच तो प्रकाश पाडला. आणि त्याच्या साहाय्यानें तो पुढें जातो तों त्याला यमुना लागली. अर्थात्च त्याला वाटलें आतां आपण अडलों. आतां पुढें जाणें शक्य नाहीं. परंतु मी आपल्या हातानें पाणी दूर सारून पाहतों. असें म्हणून तो तसें करायला जातो तों यमुना नदीच आपोआप दुभंगली आणि त्याला पलीकडे जाण्याला वाट मिळाली. अर्थात्च त्याला मोठा आनंद झाला. थोडा पुढें जातो तों त्याच्या कानीं कांहीं शब्द पडला. तेव्हां त्याला एकदम स्मरलें कीं "तेथें जवळ गौळीवाडा आहे. त्यांत आपला मित्र नंदगोप राहतो. त्याला कंसाज्ञेवरून एकदां मीं बिड्या घालून ठेवला होता व चाबकानें मारलाही होता. तेव्हां...पण आपण जावें तर खरें गौळीवाड्यांत. पण नको. आपल्याला गोपाळांनीं पाहिलें तर शंका येतील, कीं हा एवढ्या रात्रीं इकडे कां आला! तेव्हां आपण आतां बाहेरच प्रभात होईपर्यंत वाट पहात बसूं. हा बाळ जर कंसाच्या वधासाठींच वृष्णिकुलांत जन्मला असेल तर कोणी तरी येईल. तो माझा मित्र नंदच आला तर फार चांगलें होईल."

असा विचार करून एका न्यग्रोध (वड) वृक्षाच्या खालीं वसुदेव बसला. कर्मधर्मसंयोग, त्याच रात्रीं नंदगोपाची पत्नी यशोदा प्रसूत झाली आणि तिला एक जातमृत (जन्मतांच मृत झालेली) कन्या झाली. दुसरे दिवशीं गौळीवाड्यांत इंद्रयज्ञ नांवाचा उत्सव होता. तेव्हां आपलें हें दुःख कोणाला कळून त्या उत्सवांत विघ्न येऊं नये म्हणून झालेला प्रकार गुप्त ठेवावा, तें जातमृत अपत्य

त्यानें बाहेर नेऊन त्याची व्यवस्था
ची, असा नंदाचा बेत झाला. यशोदेला
ारीला आपल्याला मुलगा झाला का
ी हें सुद्धां समजलें नव्हतें. ती मूर्च्छित
ी होती. अपत्य मृत आहे असें कळतांच
नें कोठें तरी न्यावें असें ठरविलें आणि
नेवाला. त्याला अपत्य नव्हतें आणि
तें असें, यामुळें तो दुःखच करीत
ला होता. येतां येतां वसुदेव उभा होता
तों आला. वसुदेवानें त्याला त्याच्या
स्वरावरून ओळखलें. आणि 'मित्रा
ोपा,' अशी त्याला हांका मारली.

ती ऐकतांच बिचारा नंद घाबरून गेला.
ओळखीच्या स्वरासारखा स्वर काढून
चा भयंकर रात्रीं कोणी पिशाच किंवा
स तर मला हांक मारीत नसेल ?
या हातांत ही मृतकन्या. आतां करावें
च !" या विवंचनेंत तो पडला.

वसुदेवानें तें ताडलें व त्याला हांक मारून
तलें कीं, "तूं मनांत कांहीं शंका धरूं
स. मीच तो तुझा वयस्य वसुदेव तुला
मारतों आहें."

वसुदेवाचा स्वर तर आतां त्यानें पूर्णपणें
ळखला व त्याच्याजवळ जाणार, तों
आपल्याशींच म्हणतो, "मला काय
न करायचं आहे ? यानं कंस राजाची
ा ऐकून मला कोरडे मारले व माझ्या
ांत शृंखला घातल्या. तेव्हां त्याच्याकडे
याचं कांहीं कारण नाहीं. पण हें मी काय
ासारखं करतों आहें ? आजपर्यंत माझ्यावर
ं किती उपकार केले. नेहमीं माझं कुशल
ारतो. मी दुःखी असलों तर त्याला
व होतं. मला सुख झालं तर त्याला
नद होतो. तेव्हां केवळ राजाज्ञेमुळें जें
ला करावं लागलं त्याबद्दल मीं कशाला

रागवावं? तें कांहीं नाहीं. त्यानं हांक मार आहे, तर जावंच. पण ही पोरगी? पोरगीचं काय करावं? अशी लपवूं म्हण झालं. त्याच्या हातांत मुलगा दिसतो आहे.

**वसुदेवः**— वयस्या नंदगोपा, तु खिलार सगळं खुशाल आहेना?

**नंदगोपः**—हो खुशाल आहे.

**वसुदेवः**—तुझी कुटुंबांतली मंडळी नोकर लोक, सगळे कुशल?

**नंदगोपः**—अगदीं कुशल.

**वसुदेवः**—पण हें तूं लपवतो आहे काय?

**नंदगोपः**—कांहीं नाहीं बोवा.

**वसुदेवः**—माझ्या प्राणाची शपथ आहे खरं काय आहे तें सांग.

**नंदगोपः**— आतां काय इलाज? सांगत महाराज. हें पहा. आज मध्यरात्रींच्य सुमाराला माझी पत्नी— आपली दासी— यशोदा प्रसूत झाली. तिला ही पोरगी झाल आणखी लागलीच मेली. उद्यां आमच इंद्रयज्ञोत्सवाचा दिवस. तेव्हां सगळ्य बांधवांना हें कळलं तर त्यांचा विरस होणार म्हणून मी आपला मुकाट्यानें हिची व्यवस्थ लावण्यासाठीं आलों आहें. झालं मूल हे मुलगी का मुलगा यशोदेला कांहींच माहित नाहीं

**वसुदेवः**—अरेरे! काळापुढें कोणाचे कांहीं चालत नाहीं. या लाकडाचं करणार काय? दे आतां पोरीला मातींत घालून.

**नंदगोपः**— मन होत नाहीं हो.

**वसुदेवः**— अरे बाबा ही लोकरीतच आहे. कर मी सांगतों तसं.

नंदगोप "पोरी, पोरी, क्षणभर देखील जगली नाहींस आमच्या घराला शोभा याय-ला!" असें म्हणून शोक करूं लागला. तेव्हां वसुदेवानें त्याचें समाधान केलें. नंतर त्याला म्हटलें, "नंदगोपा, माझे सहा मुलगे कंसानं आजपर्यंत दुष्ट बुद्धीनं मारले. आतां हा सातवा झाला. हा दीर्घायु आहे. माझ्या नशिबानं कांहीं पोरं जगत नाहींत. तेव्हां तुझ्या पदरीं टाकायला हा आणला आहे. तुझ्या दैवानं तरी तो जगेल."

नंदानें त्यावर उत्तर दिलें: "महाराज, मला त्या कंसाचं भय वाटतं, फार भय वाटतं. वसुदेवाचा सातवा मुलगा नंदानं आपल्या घरीं वाढण्यासाठीं लपवून ठेवला आहे इतकं त्या दुष्टाला कळलं पुरे कीं माझं डोकं उडवलंच त्यानं."

वसुदेवाला प्रथम वाटलें कीं आपली योजना सगळी हुकली. पण शेवटला उपाय म्हणून त्यानें त्याला म्हटलें: "नंदगोपा, मी जर कधीं तुझ्या उपयोगी पडलों असेन आणखी तें स्मरून त्याची फेड करायची तुला बुद्धि असेल, तर हीच वेळ आहे."

त्या बोलण्यानें काम झालें. नंदगोपानें उपकाराची फेड करण्याचे शब्द ऐकतांच तो एकदम म्हणाला: "कंस येवो कीं कंसाचा बाप येवो, मी त्यांना भीत नाहीं. आणा त्या बालकाला इकडे."

वसुदेवानें श्रीकृष्ण त्याच्या हातांत दिला. तो फार जड लागला. तेव्हां सहजच नंद म्हणतो: "काय हो हा मुलगा जड! माझ्या हातांत त्याला उचलायचं सामर्थ्यच नाहीं."

वसुदेवानें त्याच्या पराक्रमाची स्तुति करून त्याला उत्तेजन दिलें. इतक्यांत श्री-विष्णूचीं आयुधें शंख, चक्र, गदा, पद्म, शार्ङ्ग, नंदक हीं व त्याचें वाहन गरुड तेथें अवतीर्ण झालीं. त्यांनीं श्रीकृष्णाची स्तुति केली. नंतर गोपबालकें होऊन

आपणही गोकुळांत अवतार घेऊं म्हणजे नेहमीं श्रीकृष्णाच्या संनिध रहाण्यास सांपडेल असें म्हणून तीं सर्व गुप्त झालीं. हा प्रकार या दोघांस कांहीं दिसला नाहीं. परंतु श्रीकृष्णाला घेतांच नंदगोपाच्या शृंखला एकदम तुटून पडल्या, हा सर्व त्या भगवान् गोपालकृष्णाचा प्रभाव आहे हें जाणून नंदगोप आनंदित झाला व जाण्यास निघाला. तेव्हां वसुदेवानें त्याला मोठ्या प्रेमादरानें म्हटलें:

स्वभावें तूं मित्रा
  असिसि अमित प्रेमळ परी
पित्याचें राहेना
  हृदय; विनती हे तुज करीं ।
यदूंच्या वंशाचें
  बहुतकरुनी बीज जळलें।
उरे हें रक्षावें
  म्हणुनिच तुझ्या हातिं दिधलें ॥

व पुढें विचारलें:– " बरें पण तूं या मुलाला कसा काय वाढविणार ? "

नंदानें उत्तर दिलें: " त्याची हो आपल्याला कशाला काळजी ? तो एका घरीं दूध पिईल दुसऱ्या घरीं दहीं खाईल. तिसऱ्या घरीं जाऊन लोण्यावर ताव मारील. आणखी कुठें खीर खाईल. एकंदरींत आमच्या गौळीवाड्याचा तो राजा होईल असं समजा. आपल्याला कांहीं काळजी नको. "

असें म्हणून त्यानें वसुदेवाचा निरोप घेतला. वसुदेवानें आतां आपणही परत जावें असा विचार केला. इतक्यांत त्याला मूल रडल्याचा आवाज ऐकूं आला. पहातो तों नंदानें प्रेत म्हणून टाकलेली ती कन्या रडते आहे. तेव्हां त्यानें विचार केला, एका परीनें बरेंच झालें. आतां या पोरीला देवकीजवळ देऊन हीच आज जन्माला आली असें सांगून कंसाला फसवूं. पोरगा नाहीं रगी आहे असें पाहून तो कांहीं तिचा प्राण णार नाहीं. हा विचार करून वसुदेवानें पोला उचलून घेतलें. तीही त्याला जड वाटली. तक्यांत पहाट होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं णून तो लगबगीनें मथुरेस आला आणि वकीला त्यानें ती कन्या दिली.

दुसरा दिवस उजाडला. तों कंसाच्या ष्टीस भयचिन्हें पडलीं. हें काय आहे बद्दल तो विस्मय करीत बसला आहे तों हीं चांडालकन्यका त्याच्या जवळ येऊन ला उद्देशून म्हणतात: " ये जांवईदादा, , आमच्या पोरीशीं तुझं लग्न लावून देतों."

तें ऐकतांच कंस दचकला. " या माझ्या ड्यांतले सगळे द्वारपाळ, रक्षक वगैरे झाले री काय ? गेले कुठें ? या चांडाळणी थें इतक्यांत आल्या कशा ? आणखी ज्या झ्या नुसत्या क्रोधानें शत्रु पार नाश वतात, सूर्य, चंद्र, अग्नि हे ज्या माझ्या ब्यांत आहेत, जो मी यमाचा यम, याला भय त्या माझ्यापुढें या चांडालस्त्रिया येऊन मला वेडेंवांकडें बोलतात याचा अर्थ तरी काय ? " असें आपल्याशींच तो हणत होता. त्याचा असा विचार चालला असतां त्या चांडालस्त्रिया त्याला पुनः हणतात: " ये. ये. जांवईदादा ये. "

**कंस**:–चला व्हा चालत्या. नाहीं तर .. काय एकदम नाहींशा झाल्या ? तेव्हां आतां आपण अंतर्गृहांत जावं.

असें म्हणून तो उठणार तों एक चांडाल याच्या नजरेस पडला व त्याला म्हणतो:

" अरे कुठें चाललास ? हें घर आतां माझं झालं बाबा. "

कंस त्याला पाहून पुनः दचकला आणि म्हणतो: "हा कोण आणखी माझ्या घरांतून बाहेर येतो आहे ? याच्या हातांत उल्का

आहेत, याचा वर्ण काजळाच्या राशीसारखा आहे. याच्या भयंकर दाढा आणि पिंगट डोळे, पाहून वाटतं जणूं काय शंकराचा मूर्तिमान् क्रोधच पृथ्वीवर आला आहे. ''

कंसाला जो हा भयंकर पुरुष दिसला, तो त्याला म्हणतो, "अरे तूं मला ओळखतोस का ? मी मधूक ऋषीचा वज्रबाहु नांवाचा शाप. मी चंडालाचा वेष घेऊन गळ्यांत माणसाच्या डोक्याच्या कवट्यांची माला घालून स्मशानांतून येथें आलों आहें. कशाला? तर राजा कंसाचें जें विद्रूप आणि भयंकर हृदय आहे त्यांत प्रवेश करायला. ''

**कंसः**— तर मग तूं अगदीं अशक्य असाच हेतु धरून आला आहेस. अरे बाबा, ज्याच्यावर सोन्यांचीं शिखरें आणि सुवर्ण-वृक्षांचेच कुंज तो पर्वत कावळ्याच्या पंखांच्या झपाट्यानें कुठें हदरतो काय ? ज्याच्या उदरीं हजारों मकर आणि ज्याच्या लाटा भयंकर त्या समुद्राला ओंजळीनें पिऊन टाकण्यासारखाच तुझा हा हेतु आहे. तुझें यामुळें हंसूं मात्र होईल.

**शापः**— बरं आहे. योग्य वेळीं येईल समजून काय आहे तें.

**राजाः**—"हं. काय गेला एकाएकीं ? मी आतां आंथरुणावर जाऊन पडतों कांहीं वेळ. '' असें म्हणून पडला तों त्याला झोंप लागली. तेव्हां त्या चांडालानें आपल्या त्या चांडालस्त्रियांना बोलावून राजगृहांत प्रवेश करण्याचा उपक्रम केला. परंतु राजाची राज्यश्री पुढें आली व ती त्यांना आंत शिरण्याला मनाई करूं लागली. तों शापानें तिला सांगितलें कीं, "लक्ष्मी, आतां तूं या कंसाचा त्याग करून निघावेंस अशी श्रीविष्णूचीच तुला आज्ञा आहे. '' तेव्हां लक्ष्मीचा नाइलाज झाला आणि पुष्कळ दिवस याच्या संगतींत काढल्यामुळें मला याला सोडून जाणें जिवावर येतें, पण श्रीविष्णूच्या आज्ञेपुढें कोणाचें काय चालणार ? असें म्हणत ती तेथून चालती झाली.

इकडे शापानें पुनः त्या चांडालस्त्रियांना जवळ बोलावून तुम्ही आतां वाटेल तसा या राजवाड्यांत धिंगाणा घाला, अशी आज्ञा केली आणि आपण कंसाला उद्देशून म्हटलें,

मुनिचा शाप असें मी
धर्मविहीना तुलाच कडकडुनी ।
देतों आलिंगन कीं,
झडकरि जाशील नाश पावोनी ॥

इतकें बोलून तो शाप अंतर्धान पावला.

लागलीच राजा जागा झाला. रीतीप्रमाणें प्रतीहारीनें त्याचा जयजयकार केला. तेव्हां त्यानें तिला विचारलें " यशोधरे, आतां येथें चंडालस्त्रिया आल्या होत्या त्या तूं पाहिल्यास ? ''

प्रतीहारीनें विस्मयानें उत्तर दिलें, "महाराज, आपल्या चरणाचे नित्याचे सेवक सुद्धां आज्ञेवांचून इथें येण्याचें अशक्य, मग चंडालस्त्रिया कोठून येणार ?''

कंस तें ऐकून फार विस्मय पावला आणि म्हणतो, " मग काय मला तें स्वप्न पडलें ? '' भास झाला ? नंतर त्यानें लागलीच वर्षफळ करणारे ज्योतिषी व पुरोहित यांना विचारण्याला पाठविलें कीं, या वावटळी सुटल्या आहेत, भूमिकंप होताहेत, उल्कापात होताहेत याचें कारण काय ? कंचुकी जोशी व उपाध्ये यांना विचारून आला आणि म्हणतोः " सरकार, जोशी व उपाध्ये यांचें म्हणणें कीं ' आकाश, स्वर्ग वगैरे ठिकाणीं सदा वास करणारी एखादी अमानुष व्यक्ति कांहीं कार्याकरितां जर पृथ्वीवर अवतार घेईल तर त्यावेळीं आकाशदुंदुभि वाजतात,

भूमिकंप होतात, अशा प्रकारचे चमत्कार होतात. "

राजानें पुनः कंचुकीला सांगितलें:"पहा रे, कोणाला पुत्र झाल्यामुळें पर्वतांसह ही भूमि इतकी कंपित झाली ? आणि असा पुत्र जन्माला येण्याला कारण तरी काय?"

कंचुकी पुनः जाऊन आला व म्हणतो: " देवकीबाई प्रसूत होऊन त्यांना मुलगी झाली. "

**राजा**:–खरें का हें ?

**कंचुकी**:–महाराज, मी आजपर्यंत कधीं असत्य बोललों नाहीं. ती मुलगी मीं धात्रीच्या हातीं पाहिली. तिच्याभोंवतालीं आपली सर्व सेवकमंडळी होती.

**राजा**:–बरं आहे. ब्राह्मणाचं बोलणं खोटं असलं, तरी खरंच आहे असं धरून चालतों. जा वसुदेवाला बोलावून आण.

अशी आज्ञा करून कंस आपल्याशींच म्हणतो: " वसुदेव मोठा धर्मशील, सत्यवादी आहे. आणि माझ्यासमोर कधीं खोटं बोलत नाहीं. पाहूं आतां काय म्हणतो तें."

वसुदेव येतांच कंसानें त्याला विचारलें: " देवकी प्रसूत झाली का ? "

वसुदेवानें उत्तर दिलें "हो झाली." कंसानें पुढें विचारलें, "काय झालें ?" त्याबरोबर क्षणमात्र वसुदेव चमकला. पण पोराच्या रक्षणासाठीं खोटें बोलणें प्राप्त आहे असा विचार करून म्हणतो: " मुलगी झाली."

कंस तें ऐकतांच म्हणतो: " खरोखर कन्या होवो किंवा पुत्र होवो. तें पोर आपण आपल्या हातानें मारून टाकावें तेंच चांगलें. पुरुषास योग्य अशा प्रयत्नांनीं दैवाला पुरतें-च फसवून टाकतों. "

इतक्यांत प्रतीहारीनें येऊन कंसाला विनंति केली, " महाराज, आमची स्वामिनी देवकी विनंति करते आहे कीं, एकतर कन्या आहे आणि अगदीं तान्ही, तेव्हां दया करा."

तें ऐकतांच वसुदेवही म्हणतो, "शौरसेनी-पुत्रा कंसा, बिचाऱ्या देवकीचं वचन ऐक. मुलींवर बायकांचा जरा अधिक जीव असतो. "

वसुदेव असें बोलतांच कंस म्हणतो " मधूक ऋषीचा शाप झाला त्यावेळीं तुझें आमचें काय ठरलें, तूं काय कबूल केलेंस, तें स्मरतें का ? देवकीचे गर्भ मी तुझ्या स्वाधीन करीन म्हणून कबूल केलेंसना ? "

वसुदेव लागलीच म्हणतो, " हो. असें मीं कबूल केलें खरें. तेव्हां आतां कांहीं बोलत नाहीं. "

इकडे प्रतीहारीनें पुनः विचारलें, "दे-वकीबाईंना मी काय सांगूं ?"

**कंस**:–विजये देवकीला म्हणावें, असली मागणी मागूं नकोस. दुसरी कांहीं अधिक प्रिय गोष्ट असली तर सांग, मी करीन.

असें म्हणून कंस उठला. तेव्हां वसुदेवास फार वाईट वाटलें. एक तर त्याच्या मनांत आलें, आपल्या पोराचें संरक्षण करण्यासाठीं मीं दुसऱ्याच्या अपत्याचा वध होऊं द्यावा काय ? का जाऊन त्या पोराला आणून याच्या स्वाधीन करूं? पण कशाला? धडधडीत आपण पाहिलें कीं या पोरीचा बाप ती मृत म्हणून तिच्या प्रेताची व्यवस्था लावण्यासाठीं आला होता. तें प्रेत टाकून देऊन तो गेल्यानंतर ती जिवंत झाली. तेव्हां नंदाला त्याच्याबद्दल कांहीं वाटायचें नाहीं. शिवाय ती तेव्हां त्या बालकाच्या माहात्म्यामुळें सजीव झाली. अर्थात् आतां सुद्धां तिचा वध होईल हें संभवत नाहीं.

तर आतां मी देवकीचें समाधान करण्याला जातों.

असें म्हणून तो निघून गेला. राजा कंसानें यशोधरेला त्या पोरीला घेऊन ये म्हणून आज्ञा केली. मग काय उशीर? एका दाईच्या हातांत ती मुलगी आणि सभोंवतालीं पहारेकरी शिपाई अशी मंडळी आली.

दाईच्या हातांतली ती रूपवती व सतेज मुलगी पाहून राजाला सुद्धां कौतुक वाटलें; परंतु " इलाज नाहीं. स्त्रीवधही करणें भाग आहे. " इतकें बोलून तो कंसशिलेजवळ गेला. हा देवकीचा सातवा गर्भ. ऋषीच्या शापामुळें हा सगळा भयंकर प्रकार होतो आहे. या गर्भाचा एकदां नाश झाला म्हणजे आपल्याला शांति मिळेल, असें त्याच्या मनाला खात्रीनें वाटत होतें. यामुळें त्यानें त्या पोरीला धरलें आणि त्या शिळेवर हापटलें. त्याबरोबर काय चमत्कार! त्या गर्भाचा—त्या तान्ह्या बालिकेचा—अर्धा अंश खालीं जमिनीवर पडला आणि दुसरा अंश आकाशांत उडून गेला. मात्र त्या याप्रकारें उडून गेलेल्या अंशांतून त्या दुष्टापुढें कात्यायनी देवी स्वतः उभी राहिली. तिला पहातां क्षणीं तो विस्मित होऊन म्हणतो: " तीक्ष्ण अग्रांचा शूल हातांत धरून रौद्रवेष करून ही माझ्यापुढें कोण उभी राहिली आहे? विनाशकाल आला असतां येणाऱ्या कालरात्रिप्रमाणेंच ती मला भासते आहे."

असेच आणखीही भास त्याला झाले. कुंडोदर, शूल, नील, मनोजव इत्यादि त्या देवीचीं सहायकर्तीं आयुधें व गण हेही त्याला दिसल्याचा भास झाला आणि तो प्रभात होतांच या सर्व दुःस्वप्नांची शांति—भासांची शांति करण्याकरितां यज्ञशाळेंत निघून गला.

इकडे वसुदेवपुत्र नंदाच्या गौळवाड्यांत दिवसमासांनीं वाढत चालला. त्याच्या बाललीलांनीं सर्व गौळ्यांना त्रास होई; परंतु त्याबरोबर त्यांच्या मनानें असेंही घेतलें होतें कीं, हा मुलगा आपल्या घोषांत जन्माला आल्यापासून आपल्या गाईंच्या खिल्लारांना रोग म्हणून होईनासा झाला. धान्याची काय, तृणाची काय, फुलांची काय, दूर्वांची काय, अगदीं रगाडी होऊन दूधदुभत्याची अगदीं चंगळ उडूं लागली. त्याचप्रमाणें त्या मुलाच्या अद्भुत पराक्रमाच्या गोष्टीही लोकांत पसरूं लागल्या. कंसानें त्याला मारण्यासाठीं पाठविलेल्या पूतनेला त्यानें मारलें, यशोदेनें गोपींच्या गाऱ्हाण्यांमुळें त्याला उखळाशीं बांधलें असतां त्यानें यमलार्जुन नांवाच्या राक्षसांचा वध केला. तेव्हांपासून त्याला भर्तृदामोदर या नांवानेंच सर्व गोप हांक मारूं लागले. पुढें त्यानें प्रलंब नांवाचा दैत्य मारला, धेनुक मारला, केशीदानव मारला. हे सर्व कोणी गवळ्याच्या वेषानें, कोणी झाडाच्या रूपानें, गाढवाच्या रूपानें, घोड्याच्या रूपानें दामोदराला मारण्याकरितांच कंसाज्ञेनें आले होते.

अशा प्रकारें कृष्णाच्या वाढीबरोबर त्याच्या पराक्रमांच्या गोष्टीही सर्वत्र पसरल्या आणि तो फारच लोकप्रिय झाला. गोपगोपींना बरोबर घेऊन तो नानाप्रकारच्या उत्सवक्रीडा करूं लागला. एके दिवशीं अशाच प्रकारें गोपगोपींना घेऊन हल्लीसक नांवाचें नृत्य करावें म्हणून तो सकाळच्या प्रहरींच वृंदावनांत गेला. तेथें त्यानें आपल्या बरोबरीची सर्व मंडळी—गोप आणि गोपी—बोलावली होती, तीही आली होती. सर्वांनीं मिळून नृत्य आरंभिलें. वृद्ध गोपाळ मंडळी ती मौज मोठ्या आनंदानें पहात उभी

राहिली होती आणि मधून मधून गाणारांवाजविणारांना व नृत्य करणारांना "वहावा वहावा, भले शाबास" म्हणून उत्तेजनपर शब्द काढून त्यांच्या आनंदांत भर घालीत होता. असा एकंदर आनंदीआनंद चालला तों तेथें अरिष्टर्षभ नांवाचा दैत्य आला म्हणून एकच आरोळी झाली. सर्वांनीं नृत्य सोडून पळून जावें म्हणून एकच कल्लोळ केला. परंतु दामोदरानें त्यांना धीर देऊन सांगितलें कीं, या जवळच्या डोंगरावर सगळींजणें चढून बसा आणि तेथून पहा मी या राक्षसाची कशी राळ उडवितों ती. मंडळी त्याप्रमाणें डोंगरावर जाऊन बसतात इतक्यांत अरिष्टर्षभाची स्वारी मोठ्या डुरकण्या फोडीत आलीच. दामोदर त्याच्यापुढें दंड थोपटून उभा राहिला. हा अगदीं बालवयी असून आपल्याला भीत नाहीं, तेव्हां बलवान् असला पाहिजे असें अरिष्टर्षभास वाटलें. परंतु तें बाहेर न दाखवतां तो दामोदरास म्हणतो: "अरे तूं पोर. मी कोण आणखी माझा पराक्रम काय हें तुला माहिती नाहीं म्हणून असा निर्भय उभा राहिला आहेस नव्हे का?"

परंतु दामोदरानें त्यास उत्तर दिलें: "बाबारे, बाल म्हणून तूं माझी हेटाळणी करूं नकोस. कृष्णसर्पाचें पिलूं डसलें तरी माणूस मरतांच. पूर्वी क्रौंचाची बाल स्कंधानें काय वाट लावली? ध्यानांत धर. वज्राची धार काय असते परंतु केवढाले डोंगर तिनें भग्न होतात!"

तें सर्व ऐकून अरिष्टर्षभ हंसला व दामोदराला म्हणतो: "बरं मग तुझं म्हणणं काय?"

**दामोदरः**— तुला मारणारन् दुसरं काय म्हणणं?

**अरिष्टर्षभः**—आहे का ताकद?

**दामोदरः**— तुला संशय का वाटतो?

**अरिष्टर्षभः**— मग घे आपल्या योग्य शस्त्र.

**दामोदरः**— शस्त्र बिस्त्र कांहीं नको. बाबारे, या डोंगराच्या कड्याप्रमाणें कठिण असे खांदे आणि हे माझे बाहु हींच माझीं आयुधें. दुसरीं तिसरीं आयुधें घ्यावीं तुझ्यासारख्या दुर्बलांनीं. या माझ्या भुजदंडांनीं आवळून तुला जर पाडला नाहीं, तर नांवाचा दामोदरच नव्हे.

**अरिष्टर्षभः**— मग ये पुढें चल.

**दामोदरः**— अरे असं कर. तुझ्या अंगांत सामर्थ्य असलें तर माझा हा पाय ठेवल्या ठिकाणापासून थोडा चळव पाहूं.

**अरिष्टर्षभः**— अंः त्यांत काय आहे!

परंतु हें बोलण्यापुरतेंच झालें. प्रत्यक्ष दामोदराच्या पायाला विळखा घालायला जातो आणि तो उचलण्याकरितां धडपड करतो, तों तो मूर्च्छा येऊनच पडला. दामोदरानें त्याला म्हटलें, "आस्ते. आस्ते. या पराक्रमानंच तुला गर्व होऊन तूं ताठलास वाटतं?" तो दैत्य मनांत पुरतें समजला कीं, दामोदर म्हणजे प्रत्यक्ष पुरुषोत्तमाचा अवतार आहे. तेव्हां याच्या हातून मरण येण्यांत मुक्तिच आहे. मग त्याच्याशीं युद्ध करावें तेंच बरें. त्याप्रमाणें त्यानें दामोदराच्या हातून मृत्यु संपादिला.

दामोदर याप्रमाणें त्या अरिष्टर्षभ दैत्याला मारून थोडी विश्रांति घेणार तों यमुनेच्या डोहांत कालिया नांवाचा विषारी सर्प उठला असून त्याच्या वधाकरितां बलराम संकर्षण गेला आहे, अशी बातमी आली. लागलीच दामोदर तिकडे धांवला.

कालिय सर्प म्हणजे महा भयंकर. त्याच्या विषफूत्कारांनींच तो डोह मनुष्यांच्या

प्राणास घातक झाला होता. अशा डोहांत उतरून दामोदर त्या कालियाचें मर्दन करणार, हें ऐकूनच गोपी व गोप त्याच्याजवळ येऊन सर्वजण त्याचें निवारण करूं लागलीं. श्रीदामोदरानें त्यांना " तुम्ही बिलकूल काळजी करूं नका. एकदां त्याचा नायनाट करून यमुनानदी निर्भय करून टाकतों. " असें म्हणून तो त्या डोहाजवळ गेला. गोपगोपी त्याचें निवारण करीतच होत्या. परंतु त्यानें व बलरामानें त्यांना आश्वासन देऊन काळजीचें कांहीं कारण नाहीं म्हणून बजावलें. कृष्णाचें प्रतिबिंब पाण्यांत पडल्याबरोबरच तो नाग खालीं मान घालूं लागला आहे पहा असें बलराम सर्वांस सांगतो, तों श्रीकृष्णानें डोहांत उडी झोंकून दिली. त्या डोहाचें पाणी वाघ, सिंह, हत्ती, लांडगे वगैरे प्याले तर तेथल्या तेथें मरून पडतात, आणखी हा कृष्ण तर बेधडक आंत शिरला आहे. आतां तो जिवंत कसला परत येतो, म्हणून जिकडे तिकडे गोपाळ हाहाकार करूं लागले.

इकडे त्या डोहांत कालियाची व श्रीकृष्णाची झटापट सुरू झाली. होतां होतां कालिया अगदीं जर्जर झाला आणि श्रीकृष्णाला शरण आला. तेव्हां श्रीकृष्णानें त्याला अभय देऊन एवढीच आज्ञा केली कीं, या डोहांत पसरलेलें आपलें विष शोषून घेऊन तूं दुसरीकडे जावेंस. कालियानें त्याप्रमाणें करून तो डोह त्यानें अगदीं निर्भय करून सोडला. हा कृष्णाचा पराक्रम पाहून सर्वांना आनंद झाला. आणि त्या आनंदांत मंडळी असतांनाच कंसाकडून एक दूत येऊन त्यानें श्रीकृष्णास निरोप सांगितला कीं, " मथुरेंत धनुर्मह नांवाचा महोत्सव आहे तर तूं आपल्या सगळ्या परिवाराला घेऊन ये. " तो निरोप ऐकतांच श्रीकृष्णाला आनंद झाला. देवांनीं नेमलेली कंसवधाची वेळ हीच असें मनांत घेऊन त्यानें लागलीच मथुरेस जाण्यासाठीं तयारी केली. मनांत असा निश्चय केला कीं, कंसाचा मुकुट उडवीन, त्याच्या केंस धरून ओढीन, त्याच्या गळ्यांतले हार व माळा तोडीन. आणि मग मदमत्त हत्तीला सिंह मारतो तसा एका सपाटयानें त्याला मारीन.

इकडे मथुरेंत कंसानें श्रीकृष्णाचा घात करण्याकरितां नानाप्रकारचे बेत व उपाय योजून ठेवले होते. कृष्णाच्या बलासंबंधानें त्यानें अनेक गोष्टी ऐकल्यापासून त्याला त्याचें भयच वाटत होतें. त्याला मथुरेंत आणून कांहीं तरी निमित्तानें ठार करावा ही त्याची इच्छा आणि अशाच आज्ञा त्यानें आपल्या सर्व सेवकगणांना दिल्या होत्या. त्या आज्ञांप्रमाणें काय काय झालें काय काय नाहीं यासंबंधानें चौकशा त्यानें सारख्या चालविल्याच होत्या. नंदगोपाचा पुत्र मथुरेंत आपल्या परिवारासह आला असतां त्यानें आधीं रजकांपासून सर्वांच्यासाठीं वस्त्रें घेतलीं, असें ऐकण्याबरोबर तेवढीच सबब पुढें करून आपल्या सेवकांनीं त्याच्या अंगावर मदमस्त हत्ती सोडला. परंतु त्यानें झटक्यासरसा त्याचा दांत तोडून टाकून त्याच दांतानें त्याला हाणलें, व तो ची ची करीत तडफडून मेला, ही पहिली बातमी त्याला लागली. पुढें असें कळलें कीं, ध्वजपताकातोरणांनीं सुशोभित व चंदनागरूच्या धूपांनीं धूपित केलेल्या राजमार्गावरून आपल्या परिवारासह मोठ्या थाटानें तो चालला असतां राजमंदिराच्या द्वारीं तो आला. तेथें कुब्जा मदनिका गंधद्रव्यें घेऊन उभी होती. तिच्या हातांतून तीं द्रव्यें घेऊन त्यानें यथास्थितपणें आपल्या अंगाला चोपडलीं. नंतर तोच हात धरून कुब्जेच्या